मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्र. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत


विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक
युगवाणी
जानेवारी-फेब्रुवारी-मार्च
एप्रिल-मे-जून २०१४
।। नामदेव ढसाळ विशेषांक ।।

अनुक्रमणिका


सूर्यफुले हाती ठेवणारा फकीर हजारो वर्षानंतर लाभला
आता सूर्यफूलासारखे सूर्योन्मुख झालेच पाहिजे
विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक
युगवाणी
जानेवारी-फेब्रुवारी-मार्च
एप्रिल-मे-जून २०१४

अनुक्रमणिका


विदर्भ साहित्य संघाचे वाङ्

युगवाणी

जानेवारी री

एप्रिल-मे-जून २०१

।। नामदेव ढसाळ विशेषांक




अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक

युगवाणी

जानेवारी - फेब्रुवारी - मार्च
एप्रिल - मे - जून २०१४

संपादक
प्रा. अजय देशपांडे



मुखपृष्ठ
सौ. चित्रगंधा सागर सुतार
मु. वेढी, पो. विराथन बुद्रूक, ता. पालघर, जि ठाणे ४०१ १०२ भ्रमणभाष ९७६४६०६४१५

मलपृष्ठ व आतील रंगीत पाने
अजेय गंपावार
दुसरा मजला, गोल्डन पॅलेस, सुदामा टॉकिजच्या बाजूला, वेस्ट हायकोर्ट रोड, धरमपेठ, नागपूर ४४० ०१०
भ्रमणभाष ९८२३९७३५९७

रेखाटने
प्रा. वसंत आबाजी डहाके
'कॅक्टस' दक्षिण मालटेकडी, परिगणित कॉलनी, अमरावती, भ्रमणभाष ९८९०३६२७०३
श्रीधर अंभोरे
४-अभिषेक अपार्टमेंट, पानसंवळ दवाखान्याशेजारी, कुष्ठधाम रोड, अहमदनगर ४१४ ००३
भ्रमणभाष ९८९०९६५८५०

मांडणी, सजावट, अक्षरजुळवणी व मुद्रण
ॲक्टिव्ह कॉम्प्युटर, वणी, जि.यवतमाळ

मूल्य शंभर रूपये

वार्षिक वर्गणी २०० रूपये

ISSN - 2319-6092

प्रकाशक
सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ,
सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक, नागपूर ४४००१२
दूरध्वनी ०७१२-२५२३९२९, २५५३७६७

वर्गणी व अंकासंबंधी चौकशीकरिता दूरध्वनी ०७१२-२५४००१४

संपादकीय पत्रव्यवहार
प्रा.अजय देशपांडे
वामनघाट मार्ग, हनुमान नगर,वणी ४४५३०४, जि. यवतमाळ
भ्रमणध्वनी ९८५०५९३०३०
ई-मेल srushti_ajay@rediffmail.com, yugwanivss@rediffmail.com

www.yugwanivss.com
www.facebook.com/yugwani.ank@gmail.com

अनुक्रमणिका



संपादकीय

भारतीय युगप्रवर्तक कवी, दलित पँथरचे संस्थापक, कादंबरीकार, राजकीय-सामाजिक पर्यावरणाचे भाष्यकार नामदेव ढसाळ यांचे अलीकडेच निधन झाले. नामदेव ढसाळ यांचे 'गोलपिठा' (१९७२) 'मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलविले' (१९७५), 'आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्र प्रियदर्शनी' (१९७६), 'तुही इयत्ता कंची तुही इयत्ता' (१९८१), 'खेळ' (१९८३), 'गांडू बगिचा' (१९८६), 'या सत्तेत जीव रमत नाही' (१९९५), 'मी मारले सूर्याच्या रथाचे सात घोडे' (२००५), 'तुझे बोट धरून चाललो आहे मी' (२००६), 'निर्वाणा अगोदरची पीडा' (२०१०) हे या दहा कवितासंग्रहांसह 'मी भयंकराच्या दरवाजात उभा आहे' (२००७), 'चिंध्यांची देवी आणि इतर कविता' (२०१२) ही दोन काव्यसंकलने प्रकाशित झाली आहेत. 'हाडकी हाडवळा' (१९८१) व 'निगेटिव्ह स्पेस' (१९८७) या दोन कादंबऱ्यांसह 'आंधळे शतक' (१९९५), 'आंबेडकरी चळवळ आणि सोशालिस्ट कम्युनिस्ट' (२००१), 'सर्व काही समष्टीसाठी' (२००८), 'बुद्ध धम्म आणि शेष प्रश्न', 'दलित पँथर एक संघर्ष' (२०१३) ही गद्यलेखनाची पुस्तके प्रकाशित आहेत. त्यांच्या कवितांचे इंग्रजीत व हिंदी भाषेत अनुवादही झाले आहेत.

भारत सरकारचा पद्मश्री पुरस्कार आणि साहित्य अकादमीच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त सर्व भारतीय भाषांमधून एका कवीला देण्यात येणारा जीवन गौरव हा विशेष पुरस्कार त्यांना मिळाला. याशिवाय सोवियत लॅण्ड नेहरू पुरस्कार, महाराष्ट्र राज्य पुरस्कारांसह इतर अनेक पुरस्कार त्यांना मिळाले.

नामदेव ढसाळ यांच्या निधनाने भारतीय साहित्य विश्वाची, विचारविश्वाची आणि पुरोगामी चळवळीची मोठी हानी झाली आहे.

भारतीय भाषांतील एक महत्त्वाचे कवी म्हणून नामदेव ढसाळ यांच्या कवितेची नोंद भारतीय विविध भाषातील समीक्षेने घेतली नाही, हे अप्रिय वाटावे असे सत्य आहे.

एकूणच भारतीय सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय पर्यावरणाच्या पार्श्वभूमीवर नामदेव ढसाळ यांच्या कवितेचा, राजकीय-सामाजिक जाणिवा व्यक्त करणाऱ्या गद्यलेखनाचा, कादंबरीचा, त्यांनी ठिकठिकाणी दिलेल्या मुलाखतींतून, भाषणांतून व्यक्त झालेल्या राजकीय, सामाजिक व वाङ्मयीन मतांचा अत्यंत गंभीरपणे, चिकित्सक दृष्टीने, उदात्तीकरण, दैवतीकरण, भक्तीभाव, दैत्यीकरण टाळून अभ्यास करण्याची गरज आहे. मराठी समीक्षा व्यवहाराने नामदेव ढसाळ यांना नाकारले नसले तरी त्यांच्या एकूण साहित्याची गंभीरपणे

अनुक्रमणिका

चिकित्सा केल्याचेही दिसत नाही. काही लेख, काही प्रबंध यापुढे मराठी समीक्षा गेलेली दिसत नाही. खरे तर नामदेव ढसाळ हे युगकवी होते, ते एका संप्रदायाच्या, गटातटाच्या चौकटीतले कवी नव्हते. मराठी कवितेसह भारतीय कवितेला नव्या वाटेवर नेणाऱ्या या कवीची कविता काही अपवाद वगळले तर मराठी समीक्षेने गंभीरपणे अभ्यासू नये, तिच्यावर निर्भयपणे व पुरेशा गांभिर्याने अभ्यासपूर्ण चर्चा-चिकित्सा करू नये, हे आपला वाङ्मयीन व्यवहार निरोगी व निःपक्ष नसल्याचेच एक लक्षण होय. ढसाळांनी केलेले स्फुट लेखन राजकीय, सामाजिक सांस्कृतिक आणि वाङ्मयीन दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे आहे, त्यांच्या कादंबरी लेखनासह इतर गद्यलेखनाची चिकित्सा फारशी झाली नाही, ही बाब देखील आपल्या वाङ्मयीन व्यवहाराच्या एकूणच स्थिती-गतीचा विचार करायला लावणारी आहे.

महाराष्ट्राच्या राजकीय सांस्कृतिक इतिहासात दलित पँथर या ढसाळांनी स्थापन केलेल्या चळवळीचे महत्त्व अव्हेरून चालणार नाही, परंतु संकुचित राजकीय-सामाजिक विचारांची लेबलं लावून राजकीय समाजव्यवहारावर व साहित्यव्यवहारावर भाष्य करणाऱ्या मराठी समीक्षेने आणि समाजकारण, राजकारणाच्याही समीक्षेने दलित पँथर विषयीचे परिपूर्ण आकलन व्यक्त करायला जरा कंजुषी दाखवलेली दिसते. आता ढसाळांच्या मृत्यूनंतर तरी, त्यांच्या समग्र साहित्याचे आकलन व मूल्यमापन होण्याची गरज आहे, ढसाळ यांच्या भाषणांचे, मुलाखतींचे शब्दांकन, त्यांच्या कवितेविषयी इतर लेखनाविषयी जी काही दर्जेदार, निःपक्ष समीक्षा प्रकाशित झाली आहे, तिचे संकलन संपादन करण्याची गरज आहे. ढसाळ यांच्या साहित्यात राजकीय सामजिक जाणिवांसह त्यांचे कलाभान व्यक्त झाले आहे, पण ढसाळांच्या साहित्यातून व्यक्त झालेले त्यांचे विविध ललित कलांविषयीचे विचार आणि आकलन यावर कुणी अभ्यासपूर्ण लेखन केले असण्याचीही शक्यता नाही. अशा स्थितीत नव्याने अभ्यास करणाऱ्या, लिहिणाऱ्या मंडळींना त्यांच्यापुढील आव्हानांची जरा जाणीव व्हावी, ढसाळ यांच्या साहित्याच्या संदर्भात नवी आकलने व्यक्त व्हावीत या उद्देशाने 'युगवाणी'चा 'नामदेव ढसाळ विशेषांक' प्रकाशित करीत आहोत. या अंकात ढसाळ यांचे व्यक्तिमत्त्व, कविता, स्फुटलेखन, कादंबरी या विषयीचे लेखन आहे. नागपूर येथील ८० व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात रंगलेली ढसाळ यांची मुलाखत शब्दबद्ध केली आहे. ढसाळ यांच्या साहित्याचे आकलन तटस्थ वृत्तीने, गंभीरपणे अभ्यासूवृत्तीने व्हावे, हा यामागील हेतू आहे.

या विशेषांकाकरिता विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष मनोहर म्हैसाळकर, उपाध्यक्ष डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी, कोषाध्यक्ष विलास मानेकर यांनी सहकार्य केले त्यांचे आणि अंकासाठी लेखनसहकार्य करणाऱ्या सर्व अभ्यासकांचे मनःपूर्वक आभार.

नामदेव ढसाळ यांना भावपूर्ण आदरांजली.

▮ अजय देशपांडे

।। नम्र आवाहन ।।

प्रिय वाचक,

'युगवाणी'ला सर्वस्तरातून उत्तम प्रतिसाद मिळत असला तरी वर्गणी पाठवून सहकार्य करणाऱ्या हातांची संख्या मात्र मर्यादित आहे. सहाजिकच त्याचा परिणाम 'युगवाणी'च्या अर्थकारणावर होतो. अंक प्रकाशित करताना आर्थिक अडचणी निर्माण होतात. प्रचंड आर्थिक ओढाताणीतून दरवर्षी एका विशेषांकासह चार अंक नियमित प्रकाशित होत आहेत, महाराष्ट्रातून व महाराष्ट्राबाहेरूनही सर्व स्तरातून अंकाचे स्वागतही होत आहे. वाचक-अभ्यासक-लेखकांना महाविद्यालयांना, ग्रंथालयांना अंक पाहिजे असतो, पण वर्गणीदार व्हायचे नसते, मराठी नियतकालिके जगवायची असतील तर ही वृत्ती बदलायला हवी. 'ऑक्टो.,नोव्हें.,डिसें. २०१३'चा अंक लेखिका संमेलन विशेषांक होता, आता हा अंक नामदेव ढसाळ विशेषांक आहे. सलग दोन विशेषांक प्रकाशित करीत असल्याने आर्थिक बाजू सांभाळीत हा अंक जोडअंक (जाने.,फेब्रु.,मार्च २०१४ व एप्रिल,मे,जून २०१४) प्रकाशित करावा लागत आहे. याची नोंद घ्यावी.

वर्गणी पाठवून, नवे वर्गणीदार करून, जुन्या वर्गणीचे नूतनीकरण करून, जाहिरात देऊन 'युगवाणी'ला सहकार्य करावे, ही विनंती.

- संपादक



विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक

युगवाणी

जानेवारी-फेब्रुवारी-मार्च
एप्रिल-मे-जून २०१४

अ नु क्र म

अनुक्रमणिका



चित्र : चित्रगंधा सुतार

वेदना आहे माझ्या कवितेचा मूलस्त्रोत!
माझ्या कविते,
तेव्हा तू त्या मायलेकरांच्या अपरोक्ष
त्या मुलाच्या आईचा दुःखाने भरलेला
तो चेहराही टिपून घे...
माझ्या कविते, तू टिपून घे
समस्त बाईजातीचे दुखणे!

- नामदेव ढसाळ



नामदेव ढसाळ असा कवी पुन्हा होणार नाही...!

डॉ. रा. ग. जाधव

कविवर्य नारायण सुर्वे ज्याला साठोत्तरी कालखंड म्हणत, त्यातील सात कवींनी मर्ढेकरोत्तर काव्याला सात वेगळ्या व वैशिष्ट्यपूर्ण दिशा दिल्या. त्यातील नामदेव ढसाळ हे एक महत्त्वाचे कवी होत. नामदेव ढसाळांच्या 'गोलपीठा'ने त्यांच्या एकूण कवितेचे रंगरूप, तिची शब्दकळा, शैली व काव्यात्म भान एक धक्कादायक विदारक स्वरूप प्राप्त करून दिले. 'गोलपिठा'नंतरचे त्यांचे बहुतेक सर्व काव्यसंग्रह 'गोलपीठा'च्या आवारातले आहेत. 'तूही इयत्ता कंची' 'या सत्तेत जीवन रमत नाही', 'गांडू बगीचा' यासारखे काव्यसंग्रह याची साक्ष देतात. कवीचे चरित्र व त्याचे काव्य यांचा संबंध कशा प्रकारचा असू शकतो, याचा एक आकलनीय नमुना ढसाळांच्या कवितेने निर्माण केला. दलित कवी व काव्य असे वर्णन करूनही ढसाळांचे वर्णन पुरेसे समाधानकारक केले असे वाटत नाही. नामदेव ढसाळ दलित कवी म्हणणे म्हणजे त्यांच्या कवी म्हणून आलेल्या योग्यतेचा संकोच करणे ठरेल.

ा हा कवी वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यांच्या संदर्भात परिवर्तनेही आहेत आणि धक्कादायक ठरतील अशी आहेत. राजकीय दृष्टिकोणातही त्यांच्या बदल होत गेल्याचे दिसेल. म्हणूनच 'या सत्तेत जीव रमत नाही!' असे उद्‌गार हा कवी काढू शकला. एक मनस्वी वृत्तीचा बेडर वृत्तीचा निर्भय कवी असेच वर्णन त्यांना शोभून दिसेल. राजकीय सत्ताकारणात राहूनही काव्याशी साथ ढसाळांनी कधी सोडली नाही. उलट 'मी तुझेच बोट धरून चाललो आहे! असा सुस्पष्ट निर्वाळा त्यांनी डॉ. आंबेडकर यांना दिला आहे. त्यांची प्रेरणास्थाने म्हणजे डॉ. आंबडकर व त्यांचा युयुत्सु लढाऊपणा. नामदेवांची कविता म्हणजे शब्दप्रतिमा, कल्पना, प्रासंगिक ग्राम्यता यांच्या दुंदुभीचा कधी कर्कश तर कधी हळुवार आला निनाद आहे.

प्रतिभेची बीजे कोणत्या परिस्थितीत, कुण्या कशा प्रकारे रूजली सांगणे अवघड आहे. महानगराचा परिसर ढसाळांना लाभला. इथेच प्रतिभेचाही लाभ झाला. एक प्रकारच्या निरंकुश बेफामपणे ते जगले, लढले, चळवळी केल्या, राजकारण केले. कविता ही त्यांच्या जगण्याची गरज होती. कवितेशिवाय ते जगूच शकले नसते. कवितेत काहीही निषिद्ध नसते हे त्यांना स्वानुभावतून जाणवले. अवतीभवतीच्या वाङ्‌मयीन वातावरणाचा परिचय असूनही, वाचनही असूनही ते परंपरागत काव्याच्या परिभाषेत अडकू शकले नाहीत.

त्यांच्या कविता वाचकाला स्वतः बरोबर वाहून नेतात. त्यातील ग्राम्य-शब्द, वाक्‌प्रचार यांचा विचार करण्यास थांबू देत नाहीत. एका प्रचंड उसळीसारखे त्यांचे शब्द येतात., प्रतिमा येतात, शब्दकळा येते व त्यात वाचक आपोआप वाहत जातो.

आधुनिक मराठी काव्यात नामदेव ढसाळांसारखा कवी पूर्वी कधी झाला नाही व बहुधा यापुढेही कधी होईलसे वाटत नाही. विद्रोह, नकार, निषेध आणि या सगळ्या प्रोटेस्टच्या आयडियालॉजीला फरफटत नेणारी स्वानुभूत आशय अभिव्यक्ती हे त्यांच्या अपूर्व काव्याचे वैशिष्ट्य होय. खरे तर साठोत्तरी कालखंडातील सातही कवी सप्तर्षी हे अनन्यसाधारण होते. नारायण सुर्वे, अरूण कोलटकर, दिलीप चित्रे, नामदेव ढसाळ, आरती प्रभू, ग्रेस व महानोर हे सातही कवी अपूर्व होते असेच म्हटले पाहिजे. साठोत्तरी काव्याचा हा कालखंड मराठी काव्याच्या दृष्टीने एक अमृतयोग होता असेच म्हटले पाहिजे. प्रत्येक कवीची अभिव्यक्ती वेगळी, आशय वेगळा, दृष्टिकोन वेगळा आणि परिणामकारकताही वेगळी. या सात कवींनी आधुनिक मराठीची उत्तुंग शिखरे पादाक्रांत केली आहेत. प्रत्येकाची ताकद जाणवण्याइतपत त्यांच्या कविता भारावून टाकणाऱ्या आहेत.

नामदेव ढसाळांना दलित कवी म्हणणे म्हणजे दुर्बिणीतून सूर्य हाताशी आणणे ठरेल असे मला वाटते. 'तुही इयत्ता कंची?', 'या सत्तेत जीव रमत नाही' असे कवितासंग्रह लिहिणाऱ्या कवीला महान कवीच म्हटले पाहिजे. ज्याला पूर्वपश्चिम नाही असा हा काव्याचा सविता होता.

नामदेव ढसाळांच्या एका संपादित काव्यसंग्रहाचे नाव आहे. 'मी भयंकराच्या दरवाजात उभा आहे' ही प्रतिमा आजकालच्या माणसाची प्रतिमा आहे. युगसंगत आत्मप्रतिमा निर्माण करणारा कवी छोट्या लेबलने छोटा होत नाही, करू नये असे वाटते. एझरा पाऊंड या इंग्लिश समीक्षकाचे एक वचन आठवते. 'प्रत्येक मोठा कवी आपल्या युगाची, आपल्या आत्मभानाची एक लखलखीत प्रतिमा समाजाला देत असतो' अशा अर्थाचे ते वचन आहे. अशी एक प्रतिमा देणारा असतो, तोच खरा श्रेष्ठ कवी होय, असे पाऊंडला म्हणावयाचे होते.

नामदेव ढसाळांनी 'गोलपिठा'ला काव्यात्म रूप दिले, 'तुही इयत्ता कंवी?' मधून परंपरेला निरुत्तर करणारा ठाशीव प्रश्न विचारला आणि आज आपण सर्वजण एका भयंकाराच्या दरवाजात उभे आहोत असा निर्वाळा दिला.

काहीही म्हटले, तरी नामदेव ढसाळांसारख्या द्रष्टा कवी पूर्वीही कधी झाला नाही व यापुढेही कधी होईलसे मला तरी वाटत नाही.

'मी तर भयंकाराच्या दरवाजात उभा आहे' या कवितेतील पुढील पाहिले कडवे पहा :

''या पावसाच्या कक्षेतून तू अंग काढून घेतलं आहेस
पोहचती होऊ दे अश्लीलता एकीकडून दुसरीकडे
मी तर भयंकराच्या दरवाजात उभा आहे
धीरोदात्त जगण्याचे स्वप्नभ्रम
सत्याच्या पोटी असत्य पोसलं जातं इथे
नंतर उजवलं जातं भोळ्या सांवाचं आकांडतांडव
विनापुच्छ भाषेचा सोजिरा उत्सव
अशांत - तूही एकदा नाच गडे...''

आज उद्याच्या माणसाची नियती व नीती एवढ्या सरळ, फटकळ व अभिजात ग्राम्य काव्यरूपात कोणी मांडली नसेल...!

'गांडू बगीचा'मधील पुढील काही ओळी :

''कुठल्या गोष्टींची जिक्र करू मी
तुझ्या भावभूमीत हा असा अश्रूंचा पूर
सकाळ संध्याकाळ
तुझ्या उजाड सुनसान
मैदानांत होमगार्डची परेड
एखाद्या सणावाराला लंवडेवाज
कौन्सिलराचं प्रवचन
यल्लमाची नाचरी घागर
आणि स्त्रियांचं अखिल भारतीय संमेलन...''

असले बागबगीचे असे, ब्रीद हरवलेले, अर्थशून्य! ही तुमची माझी जिण्याची सत्यता! 'तुही इयत्ता कंची तुही इयत्ता ?' ही कविता म्हणजे जळजळीत सांस्कृतिक काव्य आहे, जीवन आणि वास्तव यांचा शिक्षणाशी तुटलेला संबंध त्यातून प्रखरपणे व्यक्त होतो.

आजच्या वास्तवाची ही भावोत्कट भाष्ये, प्रतिमा आहेत. एवढी जगण्यासंबंधी प्रचंड घृणा निर्माण करणारा दुसरा कवी कालही इथे नव्हता, आजही नाही व बहुधा उद्याही असणार नाही, असे मला वाटते.

साहित्याची विशेषतः अव्वल दर्जाच्या कवीची कविताभाषा ही त्याच्या समाजात व समाजाने घडविलेल्या व्यक्तिमत्त्वाची असते. अश्लिलता, ग्राम्यता, बिभत्सता यासारखे शब्द उसळत्या अनावर कवीच्या भाषेत हटकून येतात, हे म्हणूनच स्वाभाविकही म्हटले पाहिजे. खरे तर, ढसाळांची काव्यभाषा बऱ्याच अंशी प्रमाणभाषाही आहे. परंतु ते बऱ्याच अंशी spontaneous over flew of powerful felling करीत असतात, तेव्हा त्यांची भाषा आपणास प्रमाणशीर वाटणाऱ्या शब्दात येत नाही. कवी, कविता व भाषा यांचा सेंद्रिय संबंध असतो, हे स्पष्ट आहे.

खरे तर, ढसाळांच्या बाबतीत काव्यभाषेचा प्रश्न अधिक व्यापक उत्तरे देणारा ठरेल. तो सूक्ष्म अभ्यासविषय आहेच आहे. पण नामदेव ढसाळांनी त्यांची आत्मभाषा वापरण्याचा अधिकार नाकबूल करण्यात अर्थ नाही.

■ **डॉ. रा. ग. जाधव**
अमेय, २१२ शनिवार पेठ,
पुणे - ४११ ०३०
भ्रमणभाष : ९४०४२२७२१५

अनुक्रमणिका



आता उरल्या आठवणी

डॉ. गंगाधर पानतावणे

■

नामदेव ढसाळांची पहिली भेट झाली, महाडच्या दलित साहित्य संमेलनात १९७१ साली. बाबुराव बागूल संमेलनाचे अध्यक्ष होते. मी कवीसंमेलनाचा अध्यक्ष होतो. मुंबईहून राजा ढाले आणि नामदेव ढसाळ सोबतच आले होते. नामदेव शिडशिडीत. बोटभर दाढी खांद्यावर शबनम बॅग. त्यानं संमेलनात सहभाग घेतला. कविता म्हटली. नामदेवची कविता 'अस्मितादर्श' मध्ये त्याअगोदर प्रकाशित झाली होती. कविता लेखनाला त्यानं नुकताच प्रारंभ केला होता. महाडच्या संमेलनातील बाबुराव बागुलांचं भाषण खूप गाजलं. म. भि. चिटणीस, सुधीर बेडेकर, वामनराव कर्डक, वामन निंबाळकर, अशी खूप मंडळी सहभागी झाली होती. नंतर नामदेवच्या नेहमीच गाठाभेटी होत राहिल्या. मी मुंबईला कुठल्या ना कुठल्या कामानिमित्त गेलो की, त्याची भेट व्हायची. मी आरंभी वडाळ्याच्या सिद्धार्थ विहारात थांबायचो, नामदेवला कळवलं की तो यायचा. मग किती तरी विषयावर गप्पा. एखादी नवी कविता लिहिली असली तर वाचून दाखवायचा. मल्लिकाशी विवाह झाल्यानंतर तो सात रस्त्याला अमर शेखांच्या घरी राहायचा. तिथंही त्याची भेट व्हायची. एकदा मी आणि वसंतराव मून सात रस्त्याच्या घरी गेलो तर म्हणाला, 'सर, आता दोन तास इथून जायचं नाही' विचारलं तर सांगितलं ते गुपित आहे. काय गुपित आहे ते नंतर कळलं. नामदेवनं खेकडे आणले होते. स्वतः तयार केले. मल्लिकाची अजिबात मदत घेतली नाही. गंमत तर पुढे आहे. खेकडे कसे खायचे. ह्याचं प्रात्यक्षिक त्यानं करून दाखविलं. मनसोक्त जेवण झालं.

पँथर स्थापन झाली आणि महाराष्ट्रातील तरूण वर्ग जागा झाला. जिथं जिथं दलितांवर अन्याय अत्याचार होत तिथं तिथं तरूण पँथर धावून जात. ढसाळ-ढालेही असत. दलित विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर मोर्चे-मिरवणुका काढत. पोलिसांशी मुकाबला करीत. विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तींच्या संदर्भातील एक भव्य मोर्चा झाला तेव्हाची गोष्ट. नामदेव सूत्रबद्ध बोलत असे. मोर्चा संपल्यावर त्यानं शिष्यवृत्तींच्या मागची भूमिका शांतपणे सांगितली. तरूणांनी आता मागे हटता कामा नये. संघर्षाशिवाय आणि संघटनेशिवाय आपल्याला पर्याय नाही हा बाबासाहेबांचा संदेश कायम मनात कोरून ठेवा, असे तो म्हणाला तेव्हा टाळ्यांचा झालेला गजर अजून माझ्या कानांत गुंजतोय. सभा संपल्यावर ढसाळ आणि ढालेंना मी घरी जेवायला नेलं. त्यावेळी आम्ही लहानशा दोन खोल्यांच्या घरात राहात होतो. डायनिंग टेबल वगैरे प्रकार नव्हताच. मी खालीच सतरंजी अंथरली. तिघेही खालीच बसलो. प्रभानं जेवणं वाढलं. आम्ही जेवलो. आणि जेवण संपताच नामदेवनं स्वतःचं ताट उचललं. आणि मोरीकडं निघाला. प्रभानं थांबा-थांबा म्हटलं. ताट तिथंच ठेवा. मी नेईन म्हणाली. पण त्यानं काही एक ऐकलं नाही. उलट म्हणाला, ''वहिनी, हे माझं घर आहे. अशी कामं करायची मला सवय आहे'' किती साधेपणा. किती आपुलकी!

केशव मेश्राम आणि मी एकदा त्याच्या 'फ्लोरिडा'त गेलो तेव्हा त्या महिन्यात त्यानं किती पुस्तकं खरेदी केली हे आवर्जून सांगितलं. या पुस्तकात चरित्रे होती, मार्क्स होता, बाबासाहेबांचे ग्रंथ होते. मराठीतील काही काव्यसंग्रह होते. नामदेव म्हणला, वेळ मिळाला तसा मी वाचतो. आशुतोषनं - मुलानं ही पुस्तकं वाचावीत अशी इच्छा आहे. अखखा दिवस गप्पासप्पात आम्ही घालविला. आणि आतिथ्याला तर तोडच नव्हती. पुण्याचा, शंकराचार्याबरोबरचा किस्साही मग त्यानं रंगवून सांगितला. अस्पृश्यतेच्या प्रश्नांवर आम्ही शंकराचार्याशी कसे भांडलो तेव्हा त्यांची अवस्था कशी झाली हे त्यानं साभिनय सांगितलं होते.

अनुक्रमणिका

मी नवी गाडी घेतल्याचं नामदेवला सांगितलं तेव्हा तो उत्स्फूर्तपणे म्हणला होता. गाडीत हे हवं. ते हवं. 'सर, मुंबईला या. आपण मार्केटमध्ये जाऊ' आणि मग मुंबईला गेल्यावर त्यानं आपल्या 'टोयाटो'तून कामाठी पुऱ्यातल्या एका गल्लीत नेलं. हा सगळा भाग मला अपरिचित होता. गाडीतून खाली उतरताच त्या भव्य शॉप मधले नोकर धावतच बाहेर आले नि म्हणाले, 'आईये, दादा आईये' आम्ही आत गेलो. मालक म्हणला, 'दादा फर्माइये, कैसा आना हुवा' नामदेवनं हिंदीतच सांगितलं. 'सर के कार के लिए एक स्टिरिओ चाहिये!' आणि मालकानं भराभर आठ-दहा प्रकारचे स्टिरिओ दाखविले. म्हणाला 'ए सब इम्पोर्टेड है। सिर्फ बोलो, कौनसा चाहिये।' मी मध्येच म्हणालो, 'इनता महंगा नही चाहिये।' मालक म्हणला, 'दादा के साथ आये हो तो अच्छाही माल दिखाना पडेगा ना?' नामदेवला माझं म्हणणं पटलं असावं. तो म्हणाला 'भाई, सरका भी सूनना चाहिये ना!' आणि आम्ही शॉपच्या बाहेर पडलो. नंतर नामदेव म्हणाला, 'सर, तो मालक तस्कर होता. त्याचा सगळा माल तस्करीचा होता. हे लोक अडचणीत आले की माझ्याकडे येतात.' चला, दुसऱ्या दुकानातून स्टिरिओ घेऊ. आणि आम्ही निघालो.

'अस्मितादर्श' साठी नामदेव नेहमीच कविता पाठवायचा. कधी कधी सोबत मल्लिकाचीही कविता असे. त्याचा कवितासंग्रह प्रकाशित झाला की, आवर्जून पाठवायचा. आतल्या पानावर ठरलेल्या दोन ओळी 'आदरणीय सर, आदरपूर्वक भेट' आणि खाली स्वाक्षरी. त्याच्या 'खेळ' वरील मुखपृष्ठावर मी नाराजी व्यक्त केली, तेव्हा त्यानं कळवलं, पुढच्या आवृत्तीत बदलून टाकू. आणि तसं घडलंही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठातून मी निवृत्त झालो हे नामदेवला कळलं तेव्हा त्यानं लगेच फोनवर सांगितलं, ''सर, षष्ट्यब्दीपूर्तीच्या निमित्तानं मला तुमचा मुंबईत सत्कार करायचा आहे'' मी आढेवेढे घेतले, वय होतच असतं म्हणालो. पण त्यानं काही एक ऐकलं नाही. त्यानं स्थापन केलेल्या 'आंबेडकर प्रबोधिनी'च्या वतीनं, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या सभागृहात समारंभ आयोजित केला. थोर विचारवंत डॉ. य. दि. फडके यांच्या हस्ते नामदेवनं माझा गौरव केला. केशव मेश्राम, वामन होवाळ ह्यांनी माझ्या संबंधानं मनोगतं व्यक्त केली. स्वतः नामदेवनं सद्गदित होऊन भावना व्यक्त केल्या. 'अस्मितादर्श'नं मराठी साहित्यात एक मानदंड निर्माण केलं आहे. आमच्या सारख्या अनेकांना वाङ्मयीन शक्ती देण्याचं कार्य सरांनी आणि 'अस्मितादर्श'नं केलं, म्हणून आज आम्ही त्यांचा गौरव करून कृतज्ञता व्यक्त करीत आहोत, असं म्हणताना तो भारावून गेला होता. माझ्या डोळ्यातही आनंदाचे अश्रू होते.

मुंबईत १९७८ साली 'अस्मितादर्श साहित्य संमेलन' प्रा. केशव मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली ठरलं तेव्हा नामदेव ढसाळांनी खूप मोठं सहकार्य दिलं. संमेलनाच्या उद्घाटनासाठी विख्यात तत्त्वचिंतक प्रा. मे. पुं. रेगे आणि प्रमुख अतिथी म्हणून नाटककार विद्याधर गोखले ह्यांच्याशी त्यांनीच संपर्क केला होता आणि ते आवर्जून उपस्थित राहिले. कवी संमेलनाचं अध्यक्षस्थान तर खुद्द नामदेवनंच स्वीकारलं होतं. कोण कोण कवी या कवीसंमेलनात सहभागी झाले होते? काही नावं सांगायलाच हवीत. शंकर वैद्य, रमेश तेंडूलकर, नारायण सुर्वे, वामनराव कर्डक, केशव मेश्राम, राजा ढाले, त्र्यंबक सपकाळे, ज. वि. पवार, अरूण कांबळे, मल्लिका अमरशेख, माधव कोंडविलकर, प्रेमानंद गज्वी यांच्याबरोबर अनेक कवी होते. नामदेवनं शेवटी दोन कविता म्हटल्या. अध्यक्षीय समारोपात किती आवेशानं तो बोलला होता. काही ओळी उद्धृत कराव्याशा वाटतात. ''बाबासाहेबांनी या देशातील प्रस्थापितांच्या परंपरेच्या देव व दैवाच्या विरूद्ध चळवळ उभी केली. त्यांचे आम्ही अनुयायी आहोत. आंबेडकरी माणूस जिवंत आहे. पुरोगामी आहे, अशा दलितांच्या चळवळीला शब्दबद्ध करण्याचे फार मोठे कार्य 'अस्मितादर्श'ने केले आहे. नियतकालिक चालविणे कसे अवघड काम आहे, हे आम्हाला माहीत आहे. 'अस्मितादर्श' हे अकारा वर्षे टिकले आहे व टिकणार आहे. कारण प्रा. पानतावणे सर ते चालवित आहेत. 'अस्मितादर्श'मधून कितीतरी लेखक पुढे आले आहेत, हे कुणी नाकारू नये. दलित कवींनी निर्भय असले पाहिजे. त्याची कविता जशी निर्भय असेल तसे त्याने मैदानातही उरतले पाहिजे. लढ्यात-मोर्च्यात सामील झाले पाहिजे. केवळ कवितेतच प्रक्षोभ व्यक्त करून काय उपयोग? प्रत्यक्ष जीवनातील आंदोलनात सहभागी होणे हे कवीचे, विशेषतः दलित कवीचे कर्तव्य आहे'' (अस्मितादर्श जाफेमा १९७८) दलित साहित्याची बांधीलकी कोणती, ते स्पष्टपणानं नामदेवनं निवेदन तर केलं होतंच दलित कवींना त्यांच्या कर्तव्याची जाणीवही त्यानं करून दिली होती. 'अस्मितादर्श'चं दहावं साहित्य संमेलन नागपूरला १९८४ साली घ्यायचं ठरलं तेव्हा नामदेव ढसाळ हेच अध्यक्षस्थानी असावेत असं एकमतानं ठरलं. मी फोनवरून नामदेवला कळवलं तेव्हा तो खूपच आनंदित झाला होता. अलीकडे त्याची प्रकृती बरी राहात नव्हती हे मला माहीत होतं. मग विमानानं ये पण तू यायलाच हवं असं सांगितलं. तेव्हा तो तयार झाला. संमेलनाला आला. सगळ्यात मिसळला. कुठलाच

बडेजाव नाही. पत्रकारांनी वारंवार घेरलं. दलित पँथरविषयी प्रश्न विचारले. ढालेशी होत असलेल्या बेबनावाबद्दल पत्रकारांनी छेडलं. दलित साहित्याविषयी नाना प्रश्न विचारले. परंतु कुठेही आक्रस्ताळेपणा नाही की चीडचीड नाही. सगळी उत्तरं समतोल होती. आपल्या वाङ्‌मयीन भाषणानं त्यानं नागपूरकारांना जिंकलं होतं.

दुर्धर आजारानं नामदेव बेजार होता, तरी त्यांची भ्रमंती, भाषणे सुरूच होती. कैकदा इस्पितळात राहावे लागे. भरपूर गोळ्या घ्यावा लागत. एक-दोनदा तर तो अत्यवस्थही झाला होता. हे सारं तो फोनवरून सांगायचा. ज्यांनी ज्यांनी आजारात आर्थिक बळ दिलं त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करायचा. थोडी स्वस्थता लाभली की पुनः लेखन, भटकंती सुरूच.

दलित पँथरचा वर्धापन दिवस पुण्यात करायचा असं त्यानं मला कळवलं आणि या समारंभाला मी प्रमुख पाहुणा म्हणून यायचं निमंत्रणही दिलं. मी स्वीकारलं पुण्याच्या नेहरू हॉलमध्ये समारंभ होता. अलिकडे त्याला चालणं जमत नव्हतं. तो व्हिलचेअरवर होता. अशाही अवस्थेत कार्यकर्त्यांच्या मदतीनं माझ्या स्वागतासाठी प्रवेशद्वारापर्यंत आला. मी काहीसा ओशाळलो. त्यानं मंचावर माझं स्वागत केलं. दमदार आवाजात प्रास्ताविक केलं. दलित पँथरचा इतिहास सांगितला. पँथर फुटल्याचं दुःख व्यक्त केलं. माझ्याविषयी तर भरभरून बोलला. मी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधान' या विषयावर विचार मांडले. नामदेवच्या लोकप्रियतेचा प्रत्यय आला. स्त्री-पुरूष कार्यकर्त्यांची प्रचंड गर्दी होती. निरोप घेताना, माझ्या हातात पाकिट देत नामदेव म्हणाला, 'सर, हे प्रवासासाठी?' मी म्हटलं, हे काय नामदेवराव. पाकिट परत घ्या. औरंगाबाद-पुणे फार दूर नाही आणि हा आपला कार्यक्रम आहे'' मी लगेच ते पाकिट नामदेवच्या खिशात टाकलं आणि जयभीम म्हणालो. पुनः नामदेव म्हणला, 'सर, मग निदान चार घास खाऊन तरी जा' मी थांबलो. आम्ही सारेच जेवलो. कार्यकर्त्यांसोबत जेवणं अलभ्य लाभ होता.

'अस्मितादर्श'च्या अनेक साहित्य संमेलनाला नामदेव उपस्थित राहायचा. सहभागी व्हायचा. नाशिकचं साहित्य संमेलन आठवतं. गावात दंगलं उसळली होती. संमेलनाचं कसं ही चिंताच होती. स्वागताध्यक्ष श्रद्धेय कवीवर्य कुसुमाग्रज होते. मी, नामदेव ढसाळ आणि संमेलनाध्यक्ष डॉ. निर्मलकुमार फडकुले, तात्यासाहेब शिरवाडकरांच्या घरी गेलो. त्यांनी खूप धीर दिला. म्हणाले, ''दंगल थांबेल, आपण कार्यक्रम तासभर उशीरा सुरू करू'' तासा-दीड तासांनी लोक जमले. कुसुमाग्रजांचं स्वागताध्यक्षीय आणि डॉ. फडकुले यांचे अध्यक्षीय भाषण वाङ्‌मयाभ्यासकांना मेजवानीच होती. नामदेव ढसाळांनी कवीसंमेलनात आणि लेखक-वाचक संवादात सहभाग नोंदवला. 'लेखक-वाचक संवाद' हा 'अस्मितादर्श'च्या साहित्य संमेलनातील वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम. निमंत्रित साहित्यिकांनी मंचाच्या खाली अर्धगोलाकार वसायचं आणि वाचकांनी साहित्यिकांना, त्या साहित्यकृतीविषयी, साहित्याविषयी प्रश्न विचारायचे. आणि साहित्यिकांनी समर्पक उत्तरं द्यायची. नामदेवला समोरच्या श्रोत्यातून दोन प्रश्न आले. एक होता 'गोलपीठ्या' विषयी आणि दुसरा मल्लिकानी लिहिलेल्या तिच्या आत्मकथनाविषयी पहिला प्रश्न चांगला होता आणि त्याचं उत्तरही म्हणजे स्वतःच्या कवितेविषयीचं निवेदन- उत्तम होतं. परंतु श्रोत्यानं नंतर विचारलेला प्रश्न खोचक आणि खवचट होता. असंबद्ध होता, प्रश्न असा की मल्लिकानं नामदेवकडं येणाऱ्या कार्यकर्त्यांच्या वर्तनाविषयी जी तक्रार केली त्याविषयी नामदेवचं काय मत आहे? नामदेवला मी पहिल्यांदाच इतकं गंभीर होताना पाहिलं होतं. तो एवढंच म्हणला, ''हा प्रश्न मला विचारण्यापेक्षा पुनः एकदा ते आत्मकथन वाचा. संदर्भ नेमके काय आहेत, हे पाहा आणि मग प्रश्न विचारा.'' श्रोत्यांनीच त्या प्रश्नकर्त्याला खाली बसवलं. नामदेवचा असा रोखठोकपणा खूपदा अनुभवाला येत असे.

जळगावच्या दोन वर्षापूर्वीच्या 'अस्मितादर्श' साहित्य संमेलनाचं उद्‌घाटन नामदेव ढसाळांच्या हस्ते व्हावं अशी आम्हा सर्वांचीच इच्छा होती. प्रकृती बरी नसल्याचं कळलं होतंच. पण तरीही प्रयत्न करावा म्हणून फोन केला आणि अशाही स्थितीत नामदेवनं यायचं कबूल केलं. मध्यंतरी स्वागताध्यक्ष शिरीष चौधरी भेटून आले. मिलींद बागूलनं आभार मानले. नामदेव स्वतःच्या कारनेच पुणे-औरंगाबाद असा प्रवास करीत जळगावला आला. सोबत आठ-दहा कार्यकर्ते. त्याची खूप काळजी घेत होते. गाडीतही व्हीलचेअरवर बसण्याची सोय. संमेलन मोठ्या हॉलमध्ये व्हिलचेअरवर बसूनच नामदेव साहित्य मंचावर आला. लोकांनी उत्थापन दिलं. टाळ्यांचा कडकडाट झाला. संमेलन सजीव झालं. बाबासाहेबांच्या प्रतिमेला हार घालण्यासाठी नामदेव व्हिलचेअरवरून उठला आणि आहिस्ते आहिस्ते एकेक पाऊल टाकीत, चालत प्रतिमेसमोर उभा राहिला. क्षण भर डोळे मिटले. प्रतिमेला पुष्पहार घातला आणि तसाच एकेक पाऊल व्हिलचेअरकडे आला. नामदेवच्या मुद्रेवर थकल्याच्या, आजाराच्या खुणा होत्या. नामदेवचं भाषण ज्वालाग्राही होतं.

विचारप्रवर्तक होतं. हलवून सोडणारं होतं. 'अस्मितादर्श'चा त्यानं पुनः एकदा गौरव केला. ''चार दशकाहून अधिक काळ दलित शोषितांच्या साहित्य चळवळीचं द्रष्टेपणाने नेतृत्व केलं. खरं तर हा साहित्य कला क्षेत्रातील एक चमत्कार म्हटला पाहिजे'' असं प्रारंभीच आपल्या भाषणात म्हणला. आणि मग एकूणच भारतीय आणि मराठी साहित्यावर परखडपणे प्रकाश टाकत दलित साहित्याचीही चिकित्सा केली. उद्‌घाटकीय भाषणाच्या अंतिम भागात साहित्यिकांकडून अपेक्षा व्यक्त करताना त्यांनी प्रतिपादन केलं, ''या संमेलनाचे मी उद्‌घाटकपद याच कारणे स्वीकारले की, आम्ही सर्व लेखक, जे दलित शोषित समाजातून आलो, त्यांना नवे जग घडवायचे आहे. आर्य-अनार्याच्या जेतेपणामुळे, अनार्यांची म्हणजे आमची मूळ भाषा दडपली गेली. तिचा शोध घ्यायचाय. आमचे कला, साहित्य सौंदर्यशास्त्र प्रस्थापित करायचे आहे. आमची दडपली गेलेली सृष्टी पुनः उजागर करायची आहे. त्यासाठी संस्कृती, इतिहास, परंपरा आणि प्रस्थापित वाङ्मय याची समीक्षा करणार आहोत. कालबाह्य ते फेकून देणार आहोत.'' (स्मरणिका-३१ वे अ.द.सा.संमे.जळगाव)

नामदेवचं विचारप्रवर्तक भाषण सर्वांच्याच लक्ष्यात राहिलं. उद्‌घाटन समारंभ संपताच नामदेव परतीच्या प्रवासाला निघाला. मी मुक्काम करा म्हटलं पण तो म्हणाला, 'कार्यकर्ते सोबत आहेत. माझ्यासाठी खोळंबा व्हायला नको त्यांचा' मग मी आग्रह केला नाही. जाता जाता नामदेव म्हणालाच, आता मुंबईला केव्हा येताय, कळवा.

शासनाच्या राज्य मराठी विकास संस्थेच्या वतीनं दलित-ग्रामीण साहित्य शब्दकोशाचं काम सुरू असल्याचं आणि त्यासाठी मला वारंवार मुंबईला यावं लागतं, याची कल्पना नामदेवला होती. गेल्या वर्षीच्या एका बैठकीची वेळ आणि तारीख मी त्याला कळविली होती. झालं बैठक संपण्याच्या अगोदरच नामदेव टोयॅटो घेऊन आला होता. त्याचा निरोप आला आणि मी मराठी विकास संस्थेच्या कार्यालयातून खाली आलो. नामदेव खूपच मोकळा वाटला. माझ्यासोबत डॉ. किसन पाटील, डॉ. चिंतामण कांबळे आणि डॉ. संजीवकुमार सोनवणे होते. मी त्या सर्वांचा परिचय करून दिला. नामदेव म्हणाला, ''चला आपण सगळे बाहेर जाऊ या.'' आणि त्यानं आम्हाला फोर्टमधल्या एका मोठ्या हॉटलमध्ये नेलं. नामदेवला पाहून मॅनेजर धावतच आला. दोनतीन वेटर्सही आले. त्यांनी नामदेवला व्हिलचेअरसह खाली उतरविलं. मॅनेजर खूप आनंदित झाला होता. तो आम्हाला सांगत होता, 'दादांमुळेच आमचं हॉटेल वाचलं. नाही तर कार्पोरेशन तोडणार होतं' नामदेवचा हा एक वेगळाच पैलू होता.

नामदेव मॅनेजरला बजावून सांगत होता, 'ए हमारे सर है। बेहतरीन खाना चाहिये।' आणि थोड्याच वेळात आम्ही सारे डायनिंग टेबलाभोवती बसलो. सगळं मांसाहारी जेवण. तऱ्हेतऱ्हेचे नवनवे पदार्थ. नामदेव भराभर सांगत होता. ही नावं नामदेवला पाठ होती. किती खायचं हा प्रश्नच होता. त्याचा केवढा आग्रह! मॅनेजरची नुसती पळापळ. आम्ही तृप्त झालो. नामदेवनं मात्र दोन साधे फुलके आणि चिकनचे एक-दोन तेवढे तुकडे घेतले. स्नेह्यांना जेवू घालण्याचा अपूर्व आनंद नामदेवच्या चेहऱ्यावर ओसंडत होता. हॉटेलातून बाहेर पडताना संजीवकुमारने आपल्या मोबाईल कॅमेऱ्यातून तीनचार फोटो घेतले. प्रसन्न नामदेव कॅमेऱ्यात बंदिस्त झाला होता. नामदेवसोबतचा हा सर्वांचा फोटो कधीच विसरता नाही येणार!

गेल्या ऑक्टोबरमध्ये नामदेवनं फोन करून मुंबईला यायचा आग्रह धरला म्हणून गेलो. प्रकृती बरी नव्हती. तरी तो म्हणला, 'सर, आपण जरा स्टुडिओत जाऊ या' मला काही कळेना. आणि लगेच गाडीतून दोन-तीन ठिकाणी नेलं. त्याच्या कवितांच्या आणि गीताच्या 'सिडीज' त्याला द्यावयाच्या होत्या. मल्लिकाच्या कविताचीही एक सिडी होती. एका सिडीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरची गीतं होती. अतिशय उत्कट आणि भावपूर्ण. गाडीत बसूनच ती ऐकली. काळजाला हात घालणारे सूर. गीतात तर आमचे अपराध माफ करावे अशी आर्त याचना होती. मराठीतल्या नामवंत गायक-गायिकांनी त्याच्या आणि मल्लिकाच्या कवितांना आणि गीतांना स्वर दिले होता. आणि मग तो त्यावर भाष्य करीत होता. त्यात केवढा जिवंतपणा होता. भावनांचा ओलावा होता. हे सारं सारं मनात साठवलं आहे. त्याचं आर्त भाष्य अजून पाठलाग करीत आहे. मनात भिनलं आहे.

नंतर त्याची प्रकृती बिघडत गेल्याचं कळलं. कर्करोगाचं निदान झालं. केशव मेश्रामांचंही असंच निदान झालं होतं. मध्यंतरी इस्पितळात जाऊन भेटून आलो. काहीशी निराशा दाटलेली होती.... आणि १५ जानेवारीला एक धगधगता अंगार विझला. आता पुनः कधी फोन येणार नाही. आणि नामदेवचे शब्दही. 'सर, मुंबईला केव्हा येताय?'

आता उरल्या फक्त आठवणी...

▌डॉ. गंगाधर पानतावणे
'श्रावस्ती'
मिलिंद महाविद्यालयासमोर, औरंगाबाद.
भ्रमणभाष ९४२२२०५१८७



नामदेव ढसाळ विद्रोही अभिव्यक्तीचे आधुनिक आद्यपीठ

डॉ श्रीपाद भालचंद्र जोशी

■

ते वर्ष होते १९६९. मुंबईच्या ए. जी. ऑफिसमध्ये असतांना पांडुरंग वाडकर नावाचा माझ्याच सेक्शनमधला एक कवीमित्र असणारा सहकारी मला सांगत असे की तुझी भेट नामदेवशी व्हायला हवी. वारंवार त्याच्या तोंडून नामदेवचे नाव ऐकून माझीही उत्सुकता वाढली होती. कविता लेखन, काव्य-साहित्य आणि संस्कृतीचे संस्थात्मक क्षेत्र यात त्या एकोणवीस वर्षाच्या वयातही बऱ्यापैकी नाव आणि काम वाट्याला आलेले असल्याने आणि विदर्भ-नागपूर भागातील असूनही हा तरूण या वयात एवढे काम करतो आणि कवितेतही नाव कमावतो याचे वेगळेच आकर्षण आणि कुतुहल मुंबईकरांना वाटण्याचे ते दिवस होते. ते दलितांचे असो वा दलितेतरांचे त्या साऱ्याच विश्वात तेव्हा बोलबाला हा मुंबई-पुण्याचाच होता. इतर भागातील लेखक-कवी, दलित असो की दलितेतर यांना जणू कविता, लेखन, भाषा, कथा, साहित्य, संस्कृती यातले फारसे काही समजतच नाही आणि ते याबाबत फारच काही तरी मागासलेले असतात असेच समजणारा अहंकार मुंबई-पुणे परिसर तेव्हा पुरेपूर वाळगून होता.

वाङ्मयीन-सांस्कृतिक व्यवहाराची सारी केंद्र आणि सत्ताच तिकडे एकवटलेली होती. त्यातही ही केंद्र आणि ही सत्ता त्या काळी प्रामुख्याने केवळ सवर्णच नव्हे तर त्यातही ब्रह्मवर्गीयांच्याच गडद प्रभावाखाली व नियंत्रणाखाली होती. त्या साऱ्यांना 'सुरूंग' लावणाऱ्या छावण्या तेव्हा निर्माण होण्याचे 'अस्वस्थ वर्तमान' आणि ते देखील केवळ अधोविश्वासारखे आतल्या आत कुठे तरी मूळ धरत होते. त्याला पुरेसे प्रभावी आणि परिणामकारक असे शब्द फुटलेले नव्हते.

साहित्य, सौंदर्य, रूची, अभिरूची, संस्कृती या क्षेत्रांमध्ये विद्रोह, परिवर्तन, सामाजिक, बांधिलकी, वास्तव, जीवनवास्तव, शोषण, लढा, मुक्ती, सामाजिक मुक्ती, सामाजिक क्रांती, सामाजिक न्याय, साहित्य चळवळ, राजकारण अशा शब्दांचा वावर देखील सुरू व्हायचाच होता. थोडक्यात, 'अब्राह्मणी' सौंदर्यशास्त्राची परिणामकारक जाण येण्याची सुरूवात देखील व्हायचीच होती. पर्यायाने, साहित्य, साहित्यव्यूह, सौंदर्य, रूची, अभिरूची, साहित्याचा व संस्कृतीचा व्यवहार हा सारा आजच्या परिभाषेत 'ब्राह्मणी' सौंदर्याशास्त्राच्या संकल्पनाव्यूहाबाहेर पडलेला नव्हता. त्या परिघाबाहेरच्या लेखन, अभिव्यक्ती, साहित्य, सौंदर्य यांना कलात्मक म्हणून, लेखन, साहित्य, अभिव्यक्ती म्हणून मान्यताच नव्हती. साहित्यातील 'लोक' व्यवहार हा केवळ वरच्या सर्वोच्च स्तरापुरता, उर्ध्व लोकातला व उर्ध्व लोकांच्याच, वरच्यांचाच तेवढा शिष्टसंमत व्यवहार होता.

एकोणवीसशे साठच्या दशकाने साऱ्याच वरच्यांच्या या वरवरच्या समग्र जीवनव्यवहाराचाच झाडा घेणाऱ्या उठावाचे रणशिंग जगभरच फुंकलेले होते. मात्र या देशात त्याचा क्षीण असा आवाज उमटत होता आणि त्या आवाजाचा प्रतिध्वनी ज्यातून प्रभावीपणे जाणवत होता त्याचे नाव अनियतकालिकांची, लघु नियतकालिकांतील अभिव्यक्ती एवढे सीमीत होते. मात्र त्याचाही परिचय आमच्यासारख्या मुंबई-पुण्यापासून दूरस्थ ठिकाणच्या तेव्हाच्या विशीच्या उंबरठ्यावरील लिहित्या, कर्त्या, कार्यकर्त्या तरूणांना व्हायचाच होता.

तर पांडुरंग वाडकर या माझ्या एजीतल्या त्या सहकाऱ्याने एक दिवस मला सांगितले की आज नामदेव येणार आहे आणि तुझी त्याची भेट मी करून देणार आहे.

दुपारी अडीच-तीनच्या दरम्यान एक माझ्याच वयाचा

अनुक्रमणिका

सडपातळ तरूण सोबत दोन-चार जणांचे 'टोळके' घेऊन आमच्या त्या ऑफिसात आला. हातात काही छापील अंक होते. पांडुरंग सोबत आम्ही सारेच मग मागच्या रस्त्यावर, युसीसच्या कार्यालयासमोर चहाच्या टपरीवर एकत्र गेलो. युसीसचे ते केंद्र म्हणजे जिथे मंगेश पाडगावकर, जयवंत दळवी, रमेश मंत्री एकत्रच कामाला होते व ज्यायोगे त्यांच्या परिचयाचा व पुढे स्नेहाचाही लाभ झाला ते केंद्र. मग पांडुरंगचे परिचय करून दिला. म्हणाला, ''शिरप्या, हाच तो नामदेव'' आणि नामदेवला माझा परिचय करून देताना पांडुरंग म्हणाला, ''याच्या 'जोशी' आडनावावर जाऊ नको तेवढे सोडले तर बाकी तो आपल्यासारखाच आहे. 'विद्रोह' नावाच्या अनियतकालिकाचा नामदेव तेव्हा कर्ता-धर्ता होता. पांडुरंग वाडकरच्या परिचय करून देण्याच्या त्या पद्धतीनेच खरे तर नामदेवच्या आणि माझ्या परस्पर स्नेहाचा धागा जुळला, जो शेवटपर्यंत उभयपक्षी कायम टिकला.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या ज्या 'प्रस्थापित' व्यासपीठाला नामदेवने आयुष्यभर कटाक्षाने टाकले आणि स्वतः कधीच त्या व्यासापीठावर जाऊन त्या व्यासपीठाला मान्यताच प्रदान केली नाही व तसे करणे हे ज्या नामदेवने आयुष्यभर कटाक्षाने आपल्या धोरणाचा भाग म्हणून पाळले त्या नामदेवाने केवळ नागपूरच्या ८० व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात दोन तास त्याच्या त्या ऐतिहासिक मुलाखतीसाठी जे दिले तो त्याने सतीश काळसेकर आणि माझ्यासारख्या त्याच्या स्नेह्यांच्या मित्रत्वाचा केलेला गौरव होता. नागपूरचे ते संमेलनही त्याच्या त्या अपवात्मक उपस्थितीने संमेलनाच्या इतिहासातली एक संस्मरणीय नोंदही ठरले.

या देशातही जातीव्यवस्था, त्यातही पेशवाईची देणगी म्हणून महाराष्ट्राला लाभलेला कठोर अस्पृश्यतेचा शाप आणि उत्तरपेशवाईत महात्मा फुल्यांचा त्या पार्श्वभूमीवरचा उदय, त्यांनी चेतविलेले स्फुल्लिंग, शाहू महाराज किंवा सयाजीराव गायकवाडांनी त्या संकल्पना व्यूहाला दिलेली राजकीय प्रतिष्ठा व त्याचे सामाजिक परिणाम, प्रबोधन काळातील सुधारकांचे कार्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्या संपूर्ण विचारव्यूहात घातलेली अद्वितीय अशी मोलाची लढाऊ आणि क्रांतिकारक भर. दरम्यान व नंतर या समाजावर पडलेला मार्क्सवादी, समाजवादी, समाजसत्तावादी नवमानवतावादाचा प्रभाव, स्वातंत्र्यानंतर हाती आलेली त्या साऱ्या प्रभावाचा परिपाक असणारी भारतीय राज्यघटना, आंबेडकरांची धम्मक्रांती आणि हे सारे होऊनही या समाजावरची सनातन्यांची, शोषणाची, मानवताविहीन दृष्टीने माणसांना तुच्छ लेखणाऱ्यांची जीवनावरची, धर्मावरची, संस्कृतीवरची, समाज आणि राजकारणावरची, साऱ्या व सत्ताकेंद्रावरची मुळीच ढिली न झालेली पकड आणि त्या साऱ्यांबाबत फारसे प[illegible]मकारक न ठरलेले समाजकारण, सत्ताकारण, साहित्य[illegible]ग आणि राजकारण या पार्श्वभूमीवर ज्या चळवळीचा, [illegible]त लेखनाचा आणि दलित मुक्तिलढ्याचा उदय झाला आणि जो पुढे सर्वच दबल्या, पेचल्या, शोषित, वगळल्या गेलेल्या अशा साऱ्याच प्रवाहांच्या स्वायत्त अस्तित्वभानाचा प्रेरक लढा ठरला ते सारेच्या सारे एका सूत्रात आकळल्या शिवाय नामदेव ढसाळ, त्याचे पँथरचे स्थापना कार्य, त्याची कविता, त्या कवितेचे विद्रोही जीवन मूल्य, त्याची भाषा, शब्दकळा, शैली आणि अभिव्यक्ती या साऱ्यांचे आकलन आणि समर्थन अशक्य आहे.

नामदेवचा संबंध येण्यापूर्वी व त्याचा संसर्ग होण्यापूर्वी जी मुंबई मुंबईबाहेरच्या आमच्यासारख्या, त्यातही जन्मदलित नसणाऱ्या वाचक तरूणांना ठाऊक होती ती केवळ बाबूराव अर्नाळकरांच्या झुंजार, काळापहाड, धनंजय-छोटू या त्यांच्या पात्रांच्या त्यांच्या गाजलेल्या रहस्यकथांच्या मधला त्यांचा जो वावर असे त्यातून. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याच्या साहित्यापासून, मुंबईपासूनचा दूरस्थ तरूण दूरच होता. त्यामुळे अमरशेख, गवाणकर, अण्णाभाऊ साठ्यांच्या शाहीरीतून व्यक्त झालेली वर्ग- जाणिवेची मुंबई मुंबईबाहेरील तरूणाच्या तेव्हा परिचयाचीच नव्हती. ठाऊक होती ती केवळ आकर्षण, नवलाई, चंगळीचे, मौजेचे, गुन्हेगारीचे केंद्र असणारी मुंबई.

या राज्यातला एकत्र आलेला सारा उर्ध्वलोक म्हणजे मुंबई हे नामदेवच्या सर्वांगीण कार्याने प्रथमच ठसठशीतपणे सर्वदूर पसरले. वरून वरून, बाहेरून, काठाकाठाने, मरीन ड्राईव्ह, मलबार हिल आणि नरीमन पॉईट पर्यंतचीच ठाऊक असणारी मुंबई वगळून नामदेवच्या कवितेने, कार्याने जो अधोलोक व त्याचे जीवन साहित्याच्या केंद्रस्थानी आणले ते सारे जीवन केवळ नामदेवच्या झालेल्या त्यावेळच्या त्या वयातल्या परिचयाने माझ्या सारख्याला तेव्हा प्रत्यक्ष बघून जाणून घेण्याची तीव्र गरज निर्माण झाली आणि ते बघण्याचा, जाणण्याचा व त्याचे जीवनानुभवात रूपांतर होण्याचा योगही त्याच्यामुळेच आला.

नामदेवच्या 'गांडू बगीचा' या शब्द प्रयोगावर आक्षेप घेणाऱ्यापैकी कित्येकांना अद्यापही या नावाचा प्रत्यक्षात बगीचाच तिथे होता हे आजही ठाऊक नाही. त्याचा 'गोलपिठा' हे ज्या जीवनाचे प्रतीक आहे ते जीवन मुंबई ज्या

भूगोलात बसले आहे तो भूगोल व त्याचा इतिहास, तिथले जीवन, त्याची जडण-घडण व त्याची कारणे जाणून घेऊन ती कविता समजून घेण्यात अद्यापही अनेकांना रूचीच नाही.

मला मात्र त्या वयातच तो सारा त्या काळी तथाकथित सभ्यजनांना भयभीत करणाऱ्या वस्त्यांच्या नावाचा सारा भाग नामदेवमुळे अंतर्बाह्य बघता आला, जाणता आला. त्याने काढलेल्या वेश्यांच्या त्या ऐतिहासिक 'समता मोर्चा'चे साक्षीदार होता आले, ज्याचे पडसाद पलीकडे नागपूरसारख्या दूरस्थ ठिकाणी कृष्णकुमार कुसुम सारख्या कविमित्राच्या तसल्याच कार्याच्या निमित्ताने पुढे उमटले. ग्रँट रोड, अलंकार टॉकीज चौकापासूनचा पलीकडचा सारा परिसर नामदेवने ज्याला 'संत फॉकलंड रोड' म्हटले तो रस्ता, फोरास रोड, कामाठीपुरा, भेंडीबाजार या तत्कालीन पूर्णपणे तथाकथित बदनाम वस्त्या ज्याला व ज्यातल्या माणसांना, स्त्रियांना, तरूणांना नामदेवच्या कवितेने व कार्याने प्रथमच मराठी साहित्य व संस्कृतीच्या उरावर ताठपणे आणि प्रतिष्ठेने आणून साहित्याच्या केंद्रस्थानी बसवले. त्या साऱ्या वस्त्या, ते सारे जीवन, त्या जीवनाचे भोग, क्लेष, यातना, दुःख, दारिद्र्य, उपासमार, बेरोजगारी व त्या साऱ्याच्या परिणामी उद्‌भवलेली गुन्हेगारी, त्या साऱ्याने कीडलेले, पोखरलेले, उद्‌ध्वस्त झालेले जीवनाचे ते दर्शन, ज्याला केवळ आणि केवळ नामदेवनेच समर्थ, प्रभावी, परिणामकारक शब्द दिला, हे जीवन त्यांच्या वाट्याला आणणाऱ्या साऱ्या साऱ्यांना मग ते देव, धर्म, धर्मग्रंथ, धर्मसंस्था, पुरोहित, संस्कृती, तत्त्वज्ञाने, दर्शने, विचार, पक्ष, पंथ, व्यवस्था म्हणून जे जे काही असेल त्या समग्र व्यवस्थांना कचकचून शिव्या हासडत, भोसकत, त्यांना घायाळ करत व त्याच्या त्या अभिव्यक्तीची 'वाहवा' करण्याची इच्छाच होणार नाही इतक्या परिणामकारकरित्या त्याने शब्द दिला.

साऱ्याच तथाकथित सभ्य, सुस्वभावी, सुसंस्कृत, सद्‌वर्तनी, नामवंत व्यवस्थाधीशांचे इमले त्यामुळे धडाधडा सुरूंग लागून स्फोट व्हावे असे उद्‌ध्वस्त झाले नसते तरच नवल. तसे ते झाले. त्यामुळे त्यांना त्याला व त्याच्या अभिव्यक्तीला, कार्याला व कर्तृत्वाला असभ्य, असांस्कृतिक, अश्लील, अर्वाच्य अशा विशेषणांनी निकालात काढणे त्यांच्या गरजेचे होते. ही गरज मात्र नामदेवच्या अभिव्यक्तीने निर्माण केली आणि तेच त्याच्या त्या अभिव्यक्तीचे यशही होते.

ती मुंबई, ती माणसे, त्या वस्त्या, ते जीवन हे सारे आपण जीवनाच्या नकाशावरच कधी गृहीत धरले नव्हते त्यामुळे साहित्याच्या नकाशावर ते सारे असण्याचा प्रश्नच नव्हता. नामदेवच्या वाङ्मयीन बंडाने ते प्रथमच साहित्याच्या आणि जीवनाच्या नकाशावर आले.

मुंबईच्या त्या तेव्हाच्या वास्तव्यात वाट्याला आलेल्यांमध्ये नामदेव सोबतच प्रल्हाद चेंदवणकर होता. सतीश काळसेकर होते, भाऊ पाध्ये होते. चंद्रकांत खोत होते. नामदेवचा 'गोलपिठा' हा संग्रह येण्याच्या अगोदरचा तो काळ होता. पँथरची स्थापना होण्याचाही अगोदरचा तो काळ होता. या कवींची ही टोळी, अर्थात ज्यात मीही कधीकधी होतो. चर्चगेट स्टेशनसमोर, अलंकार टॉकीज समोर, गोलपिठ्यावर, कधी स्मशानात तर कधी लोकलमध्ये कविता वाचन करणारी टोळी होती.

'दलित पँथर'च्या स्थापनेनंतर काय झाले हे जेवढे महत्त्वाचे आहे त्याहून अधिक 'दलित पँथर'ची स्थापनाच का झाली हे महत्त्वाचे आहे. दलितांवरील वाढते अन्याय, अत्याचार आणि त्याला पायबंद घालण्याची तत्कालीन राजकारणाची व समाजकारणाची अनिच्छा व सत्तारूढ राजकारण्यांच्या नादी लागलेले रिपब्लिकनांचे राजकारण ही पँथरच्या स्थापनेची कारणे होती.

पँथरचा जाहीरनामा ही घटना त्या वेळेला मार्क्सच्या व एंजल्सच्या 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो'च्या धर्तीवरच बघितली गेली होती. नामदेव हा त्या साऱ्या लढ्याचा, लढणाऱ्यांचा प्रतीक झाला होता. नामदेव सोबत अर्जुन डांगळे, ज. वि. पवार, राजा ढाले, लतिफ खाटीक ही सारी मंडळी हा सारा समूह तत्कालीन दलित सामूहिक मनाचीच अभिव्यक्ती साहित्यात आणि साहित्याबाहेरही करत होता. ती अभिव्यक्ती त्यामुळे केवळ त्या कवींची कविता उरली नव्हती तर ती साऱ्या वंचित, शोषित, दलितांच्या मुक्तीची, परिवर्तनाची, त्यांच्या लढ्याची धारदार अशी शस्त्रसामुग्री झालेली होती.

'दलित साहित्य की मुक्तीलढा' या आपल्या पुस्तिकेतून प्रथमच वामन इंगळे या मुंबईपासून शेकडा मैल दूरच्या काटोलच्या कवी-लेखकाने दलित साहित्य व दलित मुक्तिलढ्याचे अभिन्नत्व आणि हे साहित्य हे दलितांच्या मुक्ति लढ्याचे हत्यार या स्वरूपात प्रतिष्ठित केले होते.

नामदेव आणि या मित्रांच्या या अभिव्यक्तीचा शरच्चंद्र मुक्तीबोधांनी 'मानुषतेचे तत्त्वज्ञान' म्हणून गौरव केला होता आणि बाबूराव बागुलांनी पुढे त्याचा कक्षाविस्तार केला होता.

संपूर्ण कुरूप व्यवस्था उलथवून टाकण्याच्या आणि एक तीळ सर्वांनी कुरवंडून खाण्याच्या, माणसाने माणसांचे गाणे गावे या समताधिष्ठित व सामाजिक न्यायाच्या संस्काराचे जग

निर्माण करण्याचे व्रत घेतलेल्या या अभिव्यक्तीने धारण केलेली उग्रता, संतप्तता व हिंसक वाटणारा चेहरा त्यावेळच्या सांस्कृतिक, सामाजिक अत्याचाराचा प्रतिकार करण्यासाठी परिणामकारक ठरलेला मुखवटा होता. नरहर कुरूंदकर तेव्हाही सांगत असत की पँथरची ही मुले व्यासपीठावरून बोलतात तेव्हा त्यांचे फक्त ऐका, सहन करा, ते खाली उतरल्यावर त्यांच्याशी बोला म्हणजे त्यांच्या बोलण्यामागे काय ठसठसते आहे ते तुम्हाला उमगेल.

शिवसेनेच्या 'अरे'ला त्याच पद्धतीने 'कारे'ने उत्तर देणारी पँथरची एकमेव शक्ती तेव्हा प्रभावी व परिणामकारक ठरली होती.

नामदेवची कविता आणि दलित मुक्तीची प्रत्यक्षातली लढाई या अविभाज्य, परस्परात मिसळलेल्या बाबी होत्या. एकीला दुसरीशिवाय अस्तित्त्वच नव्हते. मराठी समाजाच्या आणि वाङ्मयाच्या इतिहासातील महानुभाव चक्रधरांचे परिवर्तनाचे बंड, ज्ञानेश्वराचे प्राकृत बंड, तुकारामाचा विद्रोह, केशवसुतांची तुतारी, मर्ढेकरांची आधुनिकता आणि लेखक - कार्यकर्त्या नामदेवच्या विद्रोही अभिव्यक्तीने दिलेला विद्रोह ही वाङ्मय आणि जीवनमूल्याची दीक्षा या इतिहासातून कधीही न पुसल्या जाणाऱ्या अमीट अशा घटना आहेत.

टॅक्सी ड्रायव्हर असणाऱ्या तेव्हाच्या नामदेव ढसाळच्या कवितेचे मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयातील अनंत काणेकरांच्या अध्यक्षतेखालील कविसंमेलनातील ते नाट्यपूर्ण ऐतिहासिक आगमन पुढे प्रवास करीत आज ते मोठे वाङ्मयीन सामाजिक संचित झालेले आहे.

तो या प्रांतात प्रवेश करीत होता त्यावेळी ग. दि. माडगुळकर हे 'महाकवी' हे भूषण मिरवीत होते. 'रसाळ नामदेवांचा काळ संपून ढसाळ नामदेवाचा काळ आला' हे त्यांचे उद्‌गार कौतुकाचे नव्हते तर तुच्छतेचे होते. मात्र ज्याच्याबद्दल माडगूळकर ते उद्‌गारले तो पुढे केवळ महाकवीच नव्हे तर 'युगकवी' होऊन राहिला आहे.

अकरावीच्या पुढे रूढ शिक्षण नसणाऱ्या नामदेवचे वाचन, आकलन, जाण आणि भान अद्वितीय होते. पौर्वात्य आणि पाश्चात्य दर्शने, तत्त्वज्ञाने, धर्म, संस्कृती, रूढी परंपरा, समाजव्यवस्था, कलेतले चित्रकला शिल्पकलेतले, जगभरातले नवनवे वाद, सिद्धांत अशा कितीतरी अंगांनी नामदेवचे वाचन, जाण आणि भान कसे समृद्ध होते याचे संदर्भ त्याच्या कवितेतून, मुलाखतीतून, लेखनातून उपलब्ध आहेत.

दलित पँथरची चळवळ ही अल्पजीवी ठरली हे खरेच आहे. मात्र तेवढ्या काळातच या चळवळीने जो दरारा निर्माण केला त्याचा परिणाम मात्र पुढे या राज्याचे समाजकारण, राजकारण आणि संस्कृतिकारणावर खोलवर ठर मटवणारा आणि दलितांवरील अत्याचाराच्या मोकाट मानसिक ला वेसण घालणारा ठरला याबद्दल कुणाचेच दुमत असण ाही.

या चळवळीचा मूल्यात्मक परिणाम हा महाराष्ट्राच्या प्रबोधन परंपरेतले एक कायमचे संचित होऊन राहिला. या चळवळीने केवळ दलित मुक्तीच्या अंगाने कार्य केले असे नाही तर जातिविहीन, वर्गविहीन समाजरचनेचे आंबेडकरी उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या वाटेवरचा तो प्रवास होतो. माझ्यासारखे जन्मदलित नसणारे कितीतरी सवर्ण तरूण दलित पँथरचे सहप्रवासी व या दलित मुक्तीलढ्याचे जे समर्थक झाले त्याचा लाभ पुढे नामांतर चळवळीला देखील झाला. अनेक सवर्ण तरूणांना डी-कास्ट, डी-क्लास होण्याच्या प्रेरणा आणि उर्जा देखील या चळवळीतून मोठ्या प्रमाणावर लाभली.

साहित्य समाज समाजकारण राजकारण संस्कृतिकारण हे परस्परांपासून वेगवेगळे कप्पेबंद ठेवणाऱ्या व त्यांचा परस्परांना संसर्ग न होवू देता आपले सांस्कृतिक वर्चस्व अबाधित राखणाऱ्या प्रस्थापित व्यवस्थेच्या पायालाच दलित साहित्य आणि पँथरच्या चळवळीने जो सुरूंग लावला आणि ह परस्पर साहचर्य ज्या समग्रतेने समाजावर, समीक्षेवर बिंबवले गेले ते पायाभूत महत्त्वाचे कार्य करणाऱ्या अभिव्यक्तीचे नायकत्वच नामदेव ढसाळकडे जाते.

नामदेवची कविता आणि कविताबाह्य एकूणच सर्वच प्रकारची पँथरसहित अभिव्यक्ती ही केवळ वाङ्मयीन घटना नव्हती तर मराठीतली, महाराष्ट्रातली या देशातली ती पहिली समग्र अशी सामाजिक - वाङ्मयीन - सांस्कृतिक - राजकीय कृती होती.

लेखक कलावंताने समग्र शोषणाच्या व्यवस्थेविरूद्ध उभारलेला व त्या व्यवस्थेला संपूर्ण नकार देण्याचा हा सांस्कृतिक विद्रोह अभूतपूर्व होता.

शब्दांना शस्त्र करून वैचारिक सैद्धांतिक पातळीपासून तो प्रत्यक्ष रस्त्यावरची लढाई लढणारा हा लेखक कवींचा मेळा नामदेवच्या नायकत्वाखाली उभा झाला होता.

क्रांती, संघर्ष, लढा, परिवर्तन या बद्दलच्या सवर्ण मध्यमवर्गीयांच्या कल्पना या फार रोमँटिक असतात. त्यातल्या ऐन धुमःश्चक्रीत स्वतः मध्यभागी येवून सहभागी न होता

अनुक्रमणिका

इतरांनी तो लढा लढावा व यांनी मात्र तो लढणाऱ्यांचे फक्त मूल्यमापन करावे, लढणाऱ्यांनी काही तडजोडी केल्या तर त्यांना धारेवर धरावे, त्यांना दोषी ठरवावे, जे तडजोडी न करता सदेह शहीद होतील त्यांचेच तेवढे गुणगान गावे व तसे ते शहीद झाले तरच त्यांच्या विचार कृती व्यक्तित्वाला सुसंगत ठरवावे अन्यथा त्यांना विसंगत पराभूत म्हणून हिणवावे, पर्यायाने, पारंपरिक सनातन मूल्य व मूल्यव्यवस्थेवर हे लढे व हे संघर्ष साधा ओरखडा देखील कसा उमटवू शकले नाहीत हेच सिद्ध करण्यात या वर्गाला नेहमीच रूची असते.

राणा प्रताप, राणी लक्ष्मीबाई, भगतसिंग व नेताजी सुभाषचंद्र बोस यांनाही त्यांची अंतिम उद्दिष्ट्ये गाठता आली नाही तरीही त्यांचे कार्य कर्तृत्व - व्यक्तित्व हे ऐतिहासिक मोलाचेच ठरते, त्यांना आलेल्या अपयशावरून ते जोखले जात नाही तर त्यांनी चेतवलेल्या स्फुल्लिंगावरून व त्याच्या पुढील व्यापक परिणामांवरून ते जोखले जाते. तीच कसोटी नामदेव, त्याची कविता, त्याने उभारलेली पँथरची चळवळ व त्या लढ्याला लावूनच त्याचे मोल जोखावे लागेल व त्यायोगेच त्याचे, त्याच्या कवितेचे व त्याच्या संघर्षाचे जतन करावे लागेल.

गांधींनी, सावरकरांनी केलेल्या आणि खुद्द डॉ. आंबेडकरांनीही पुणे करारासारख्या केलेल्या काही तडजोडींमुळे जसा त्यांच्या कार्यकर्तृत्वाच्या गाभ्याला धक्का पोहचत नाही तीच बाब नामदेवने केलेल्या तडजोडींबाबतही लागू करावीच लागेल. आचार्य अत्र्यांचेच व्यक्तिमत्त्व केवळ अफाट होते असे नव्हे तर नामदेवचेही व्यक्तिमत्त्व अफाटच होते. भारतात जातिव्यवस्था नसती तर नामदेव नोबेल पारितोषकाचा मानकरी ठरावा एवढे त्याचे मोल निश्चितच वाढवले जाऊ शकले असते.

त्याने इंदिरा गांधींवर कां लिहिले, तो शिवसेनेत कां गेला, त्याने सुसंगत असे एकपक्षीय राजकारण कां केले नाही आणि त्यामुळे दलितांचे नुकसानच झाले, त्याने वापरली ती व तशी भाषा न वापरताही त्याला सांगायचे ते सांगता येऊ शकले असते असे केवळ सवर्ण, मध्यमवर्ग म्हणत नसून दलित अभ्यासक - समीक्षकच जेव्हा म्हणतात तेव्हा असे समीक्षक - अभ्यासक हे जन्मदलित असोत वा सवर्ण त्यांनी नामदेवचे कार्य, कर्तृत्व आणि व्यक्तिमत्त्व जोखण्याच्या कसोट्याच पारंपरिक आणि सनातनी राखलेल्या असतात. त्या साऱ्याचे प्रतिवाद स्वतंत्रपणे करता येतील. त्याचे हे स्थळ नव्हे.

मराठीला आणि एकूण भारतीय साहित्यालाच जीवनसन्मुख, जीवनवास्तवाचे, सामाजिक न्यायाचे आणि समग्र शोषणमुक्तीचे भान प्रदान करण्याचे ऐतिहासिक मोलाचे कार्य करणाऱ्या विद्रोही अभिव्यक्तीचे आद्यपीठ म्हणून जसे बाबूराव बागुलांचे नाव कायम उरणार आहे तसेच नामदेव ढसाळांचेही नाव त्याच कारणांसाठी कायमचे कोरले जाणार आहे.

▌ डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी
१०५, संकल्प सहनिवास,
४० खरे टाऊन, धरमपेठ,
नागपूर ४४० ०१०
प्रमणभाष : ९९६०४९३६२२


।। लेखकांसाठी सूचना ।।

- लेखकांनी आपले साहित्य कागदाच्या एका बाजूने लिहून वा मुद्रित करून पाठवावे.
- लेखनाच्या डाव्या बाजूस आवर्जून समास सोडावा.
- लेखन सुवाच्य हस्ताक्षरात आणि शुद्धलेखनाचे अधिकाधिक नियम पाळणारे असावे.
- लेखकाने आपल्या लेखनाची प्रत स्वतः जवळ ठेवावी. नापसंत लेखन परत पाठविणे शक्य होणार नाही.
- लेखन अनुवादित वा रूपांतरित असल्यास मूळ लेखकाची व प्रकाशकाची संमती लेखी स्वरूपात जोडावी.
- नव्या लेखनाचे 'युगवाणी'त स्वागत आहे.

युगवाणी

- साहित्य व कला यांच्यातील अनुबंध शोधणाऱ्या दर्जेदार लेखनाचे स्वागत आहे.
- भाषा व बोलीविषयक संशोधनपर लेखन 'युगवाणी'ला हवे आहे.
- अभ्यासपूर्ण पुस्तक परीक्षणे पुस्तकाच्या दोन प्रतींसह पाठवावे.

अनुक्रमणिका



तुकारामाचा खरा वंशज नामदेव ढसाळ

डॉ. प्रमोद मुनघाटे

'माझी वांड प्रतिभा' ही नामदेव ढसाळ यांची अगदी अखेरअखेरची एक कविता :

धगधगत्या अंगाराला अग्नीपुष्प म्हणून
मी त्याचा अवमान करणार नाही.
मला आवडते पेटत्या अंगारावरून चालणे
कुठल्या नशेत आहे मी.
धगधगत्या, पेटत्या अंगारावरून चालल्यानंतरही
पोळले नाहीत माझे पाय
मी जगताना गेंड्याची कातडी पांघरून जगलो नाही.
आणि संवेदनाहीन होऊन कधी जगलोही नाही.
ही कसली स्फूर्ती मला अहोरात्र उचकवणारी ?
मला कळत नाही हा वेडेपणा आला कुठून
आला कुठून हा पिसाळलेपणा
उधाणत्या वाऱ्यावर मांड ठोकणारा
वादळी वाऱ्याला अधिक वादळी करणारा
ही कसली उसळती उकळती स्फूर्ती ?

भाषेतील सर्जनाच्या सगळ्या शक्यता कवितेत प्रकटत असतात. पण भाषिक सर्जन हेही सामाजिक कृतीचाच एक भाग असते, हे सिद्ध करणारी कविता भारतीय साहित्यात तशी दुर्मीळ आहे. मराठीत तुकारामानंतर तशी भाषिक कृती नामदेव ढसाळ यांच्या कवितेने केली आहे. 'गोलपिठा'च्या प्रस्तावनेतच विजय तेंडुलकरांनी सांगून टाकले, की ''त्याच्या कवितेने अनेकदा तुकारामाच्या अस्सल अभंगांची आठवण मला दिली असे मी म्हटले तरी त्यात मी ढसाळची औपचारिक स्तुती करतो असे कोणी मानू नये. तुकारामाचा आध्यात्मिक नव्हे काव्यरचनेचा वारसा तिच्यातील उत्स्फूर्त, रांगड्या, रोकड्या, संतप्ततेसकट ढसाळची कविता वागवताना मला दिसते.''

ढसाळांच्या कवितेचे एकेक वैशिष्ट्य तपासत जावे, तसतशी ही गोष्ट अधिकच स्पष्ट होत जाते. ढसाळांनी 'गोलपिठा' पासून 'निर्वाणा अगोदरची पीडा' पर्यंतच्या संग्रहात लिहिलेल्या कवितांच्या आशयाची आणि शैलीची परिमाणे वेगवेगळी आहेत. त्याही पूर्वी त्यांनी लघुनियतकालिकांत आणि अगदी अलीकडे 'मुक्त शब्द' या मासिकातून लिहिलेल्या कवितांतून 'नामदेव ढसाळ' नावाचे जे रसायन सापडते ते मात्र इतके अद्‌भुत आहे, की त्याची तुलना मराठीतील फक्त तुकारामाच्या कवितेतील अद्‌भुताशीच होऊ शकते. आत्मसंघर्ष आणि सामाजिक व्यवस्थेविरूद्ध संघर्ष एकाच वेळी विद्रोहाच्या अत्युत्कट पातळीवर करून इतिहासात केवळ 'शब्दांच्या' भरवशावर आपल्या कर्तृत्वाचा अमीट ठसा उमटविणाऱ्या तुकारामाचा खरा वंशज नामदेव ढसाळच आहे, हे निःसंशय.

भालचंद्र नेमाडे यांना मराठी कवितेच्या आणि पर्यायाने मराठी भाषेच्या केंद्रस्थानी तुकाराम आहेत, असे वाटते. सदानंद मोरे तर तुकारामांना संस्कृतिपुरूषच मानतात. तुकारामाची भाषा केवळ भाषाच नव्हे तर एक विचारपद्धती आहे असे आता सर्वमान्य झाले आहे. कवी नामदेव ढसाळ यांची कविता आणि भाषा ही सुद्धा मराठीतील एक 'विचारपद्धती' याच अर्थाने विकसित झाली आहे, असे विधान केल्यास ते अतिशयोक्त ठरू नये. कारण साठोत्तरी मराठी कवितेचा मौलिक ऐवज दलित कविता हाच आहे, आणि ढसाळांची 'विचारपद्धती' म्हणजे त्यांची भाषा व मूल्यनिष्ठा हाच त्या कवितेचा प्राण आहे. याच कवितेने समकालीन भारतीय कवितेलाही एक चेहरा मिळवून दिला आहे.

वेगवेगळ्या काळात चळवळीच्या प्रवाहाबरोबर ढसाळांची कविता काहीशी बदलत गेली. ती अधिकाधिक समृद्ध आणि संपृक्त होत गेली. पण त्या कवितेचे 'जिन्स' मात्र तेच राहिले, जे 'गोलपिठा'च्या बीजात आढळतात. त्यामुळे ढसाळांच्या एकूण कवितेतील काही वैशिष्ट्ये शोधून त्या वैशिष्ट्यांची पूर्वपरंपरा कोणती आणि भविष्यातील वारसदार कोण असतील एक प्रयत्न करून पाहणे अवास्तव ठरणार नाही.

समूहसन्मुखता हे ढसाळ यांच्या कवितेचे पहिले वैशिष्ट्य आहे. तसा तो अनयितकालिक किंवा लघुपत्रिकेच्या सर्वच कवितांचा विशेष आहे. पण इतरांच्या कवितेत आणि ढसाळांच्या कवितेत या संदर्भात फरक आहे. बहुतेकांच्या समूहकेंद्री कविता या घोळक्यांच्या किंवा मोर्चाच्या असतात. त्यांना स्वतःचा चेहराच नसतो.

समूहजाणिवेच्या संदर्भात एक वैशिष्ट्य म्हणजे नामदेव ढसाळ यांना स्वतःच्या कवित्वाच्या सामाजिक जबाबदारीचे भान आहे. या सामाजिक जबाबदारीचे एक रूप म्हणजे प्रस्थापित अन्यायी व शोषक अशा व्यवस्थेविरूद्धची 'बंडखोरी' आहे आणि त्याची जाणीव या कवीला आहे. 'मला आवडते पेटत्या अंगारावरून चालणे' असे म्हणत असतानाच हा कवी 'मी जगताना गेंड्याची कातडी पांघरून जगलो नाही' हेही स्वतःच सांगून जातो. संत तुकाराम जीवाच्या आकांताने गेंड्यासारख्या व्यवस्थेला आव्हान देतात, तेव्हा त्यांच्याजवळ फक्त शब्दांचेच धन आणि शब्दांचेच शस्त्र आहेत, याची त्यांना तशीच जाणीव असते, नामदेव ढसाळ म्हणतात.

''हे शब्दांनो या ना इथे विश्रांतीला
पायांना चक्रे बांधून चिकार वणवण केलीत
जरा याही धडधडणाऱ्या हृदयाला पाहून घ्याना
जरा याही धमनीचा रिदम ऐकूण घ्याना
कदाचित तुमच्या वांझ गर्भाशयाला पालवी फुटेल''

मराठी साहित्य, कविता यांच्या पूर्वपरंपरेला ढसाळ यांनी घातलेली साद ही आतून विद्रोहाची धग प्रज्वलित करणारी आहे. या परंपरेचे गर्भाशयच वांझ होते. कोणत्याच निर्मितीची बीजे कधीच अंकुरली नाहीत. अशा साध्याच शब्दात या कवीने प्रस्थापित मराठी साहित्यावर प्रहार केले आहेत.

उपरोक्त कवितेत 'मला कळत नाही हा वेडेपणा आला कुठून, आला कुठून हा पिसाळलेपणा, उधाणत्या वाऱ्यावर मांड ठोकणारा, वादळी वाऱ्याला अधिक वादळी करणारा' असे ढसाळ स्वतःला विचारतात. पण त्यांना ते माहीतच आहे. ते सगळ्यांनाच माहीत आहे. कारण ढसाळांच्या कवितेतील हा पिसाळलेपणा जितका नामदेव ढसाळांचा आहे, तितकाच तो ढसाळरूपी मोठ्या शोषित-पीडित समूहाचा आहे. कारण 'माझ्या प्रिय कविते' या कवितेत ते म्हणतात.

''मला नाही वसवायचे वेगळे वेट
माझ्या प्रिय कविते, तू चालत न्हा सामान्यातल्या सामान्य
माणसांसोवत थेट त्याचे बोट पकडून''

नामदेव ढसाळ आपल्या कवितेला थेट असे सामान्यांच्या जीवनाशी जोडून टाकतात. अशावेळी हा कवी खरोखरच स्वतःचे कवित्व, प्रतिभा आणि सामाजिक जबाबदारी ही एकाच वेळी प्रत्यक्षात उतरवत आहे. असे लक्षात येते. आणि ही कृती काही सामान्य नाही. तिच्या अवतीभवती कोणते संदर्भ आहेत, ते हा जाणून आहे. या कृती मागील 'अहोरात्र उचकवणारी स्फूर्ती' कोणती आहे. हेही या कवीला माहीत आहे.

'शूद्राचं जीवन घेऊन' या कवितेत ढसाळ म्हणतात.

''शूद्राचं जीवन घेऊन जन्माला आलो
अनयासे मुकलो सगळ्याच गोष्टींना
जे जे माझं होतं होणार होतं माझं
त्यावर सांगू शकलो नाही पहाडी अधिकार
हक्काचा वारसदार होतो पण अनाम
ओठ शिवलेले हात वेड्यांनी जखडलेले
गुलामीचं आयुष्य जगतानासुद्धा''

इथे सुद्धा तुकारामाचेच शब्द आठवतात. बरा देवा कुणबी केलो । नाही तरि दंभे असतो मेलो।।

एरवी नामदेव ढसाळ यांच्या कवितेत शब्द एखाद्या अत्यंत वेगवान प्रवाहाच्या लोंढ्यासारखे येतात. त्यांच्या जाणिवेचेही नियंत्रण उरत नाही असा तो वेग असतो. एक सामूहिक नेणीव जणू स्वार होते. त्यांच्या कवित्वावर (आणि कर्तृत्त्वावरसुद्धा); पण या कवितेत अत्यंत संयमाने आपल्या भाषिक कृतीचा उच्चार करतात.

अत्यंत व्यक्तिगत अनुभव आणि तेही कमालीच्या उत्कट लैंगिक संवेदनांच्या संदर्भासह व्यक्त करणे हा ढसाळ यांच्या शैलीचा एक अपरिहार्य विशेष आहे. आशयाला विद्रोहाचे परिमाण येण्यासाठी अशी शैली कवीच्या नकळत भावनांच्या

उसळत्या लाटांमधून येत असते. अशा शैलीचे औचित्य अनौचित्य ठरविण्यापूर्वी त्या कवीच्या जीवनातील वैयक्तिक संदर्भ लक्षात घ्यावे लागतात. अशा कवीचे वैयक्तिक अनुभव विशाल सामाजिक संवेदनांमध्ये रूपांतरित होतात, म्हणून त्या अनुभवांना केवळ सामाजिकच नव्हे तर व्यापक मानवीय नैतिकतेचे परिमाण प्राप्त होत असते. जेव्हा प्रस्थापित शोषक समाजाकडून मूल्यऱ्हास होतो. तेव्हा त्याचा निषेध करण्याची नवी कलात्मक व क्रांतिकारी शैली कालप्रवाहात आपोआप उत्क्रांत होत असते, आपल्या समकालीन काळात भारतीय साहित्यात अशी शैली नामदेव ढसाळ यांनीच दिली आहे.

'शूद्रांचं जीवन घेऊन' याच कवितेत नामदेव ढसाळ लिहितात.

''भावनेचा व्यापार करणाऱ्या घाऊक वाया
पैशाच्या राशीवर हुंदडणाऱ्या त्यांच्या मडक्यातला
मदन हिंदकळता
त्यांच्या एकेका स्पर्शासाठी मरण तोलणारे माझे बापजादे
अतिरिक्त विरहाच्या अग्नीनं जळून शेवटी अस्पृश्य
राहिलेले, वर्गास हरवून बसलेले
ज्यांच्या घरातून विझलेले दिवे
फिरलेले नांगर, आजही एकोणिसशे ७४ सालातल्या
जानेवारीपर्यंत पुढे सरळ धावत राहणारे रूळांच्या
वामाचाराचे''

कमालीच्या लाक्षणिक अर्थाने भारित झालेल्या या ओळी आहेत. यातील प्रतीके - प्रतिमांना सांस्कृतिक - ऐतिहासिक व वर्गवर्णविषमतावादी राजकारणांचे संदर्भ आहेत. अशा ओळीतून जाणवणाऱ्या भाषिक सौंदर्याबरोबरच विषण्ण करणारी वेदनाही आपले मध्यमवर्गीय मन कुरतडून टाकते. ढसाळ यांनी पारंपरिक वाङ्मयीन संकेत मोडून टाकले असे म्हणत असतानाच आस्वाद - रसास्वादांना थेट ओलांडूनच ही कविता उत्तरकर्तव्योन्मुखतेकडे जाणारी आहे, असे लक्षात येते.

कलाकृतीची समीक्षा निर्मातासापेक्ष करू नये, त्याच्या चरित्राची वाट पुसू नये असा मराठीतील कलावादी दंडक अशा कवितेपाशी आपोआपच मोडून पडतो. किंबहुना हे ढसाळांच्या व त्यांच्या भोवतालच्या कवींनी या सगळ्यांनी जी माडतोड केली, तीच एक मराठीतील ऐतिहासिक कृती ठरली. याच कृतीने मराठी माणसाला मध्यमवर्गीय मनाच्या खुराड्यातून बाहेर काढले आणि याच कवितेने मराठी साहित्याला भारतीय साहित्याचा रस्ता मोकळा करून दिला. ढसाळांचे आयुष्य सगळ्यांना माहीतच आहे. मुंबईतील रात्रीच्या डार्करूममधील निगेटिव्ह आयुष्यच नामदेव यांच्या वाट्याला आले होते. त्यांनी ते जीवन डॉक्युमेंटरी म्हणून काही सोवळे नेसून पाहिले नाही. पँथरच्या आगडोबांपासून शिवसेनेच्या सत्तेच्या सारिपाटावरील खेळही त्यांनी साक्षात पाहिला. त्या सर्व जगण्यातील नोंदी भरून आलेल्या आभाळाने प्रचंड आवेगात बरसावे, कशाचीही भीडमुर्वत न ठेवता, तशा ढसाळांच्या कविता आहेत.

थोडीफार काव्यकमाई करून आयुष्यभर त्याच पुंजीवर दिवाळी अंक सजवत राहणारे करिअरिस्ट कवी मराठीत काही कमी नाहीत. ढसाळ अखेरपर्यंत लिहीत होते, पण त्यांच्या काव्यात स्वतःला आणि समाजाला कठोरपणे तपासून पाहण्याचे धैर्य होते. ते वर्तमानातील ताज्या संदर्भात माणूसपणाला बट्टा लावणाऱ्या प्रवृत्तींशी झगडत होते. निवृत्त कवी कौटुंबिक गोतावळ्याला सुखा-समाधानात पाहून कृतकृत्य होत पुरस्काराच्या वाटेकडे डोळे लावून बसलेला असतो. ढसाळे हे असले कवी नव्हते. खरा कवी अंतर्बाह्य संतच असावा लागतो. त्याला सोंग आणता येत नाही. त्याचा जीव 'सत्तेत कधी रमत नाही' कवी हा त्या भाषिक समूहाचे हृदयच असतो. तो सतत धर्मांध, सत्तांध आणि शोषक प्रवृत्तीचे विषारी रक्त आपल्या स्पंदनशील हृदयाने शुद्ध करण्याचा प्रयत्न करीत असतो. लौकिकार्थाने रूग्णशय्येवर पडून असलेले ढसाळ 'राज्यस्थापनेच्या सुवर्णमहोत्सवाचे निमित्त साधून' ''सुवर्णमहोत्सव कसला? हा तर यातनांचा उत्सव'' या शब्दात जेव्हा झाडा घेतात, तेव्हा ते परत तुकारामाच्या आभाळासारख्या करूणामय संताचीच आठवण करून देतात. 'आकांताचा कोरस' या कवितेत ते म्हणतात,

सर्वच दोर कापले गेलेले
गावगाड्याकडे : घराकडे : परतण्याची
सोयच उरली नाही.
कधीकाळी राबत होतो गावगाड्यात
नापीक जमिनीची करत होतो मशागत
आता ती शेतीही कोणीतरी चोरून नेलीयत.
नशीब, नियती न मानणारे आम्ही
आमचा पंथ नागड्या नास्तिकांचा
पहा पहा कशी जगद्व्याळ भूकेने
आमची करून टाकली गोची -
गोची कसली शोकांतिका जीवघेणी -

इच्छा बळावल्या तरी आम्हाला परतता
येत नाही घराकडे.
त्यांनी फिरवला घराहून अखेरचा नांगर
राजरोस वाहून नेले घराचे वासेही.
चोरून नेल्या घराच्या भिंती- विटा माती
कष्टाने तासलेली
एक एक तोड त्यांनी नेली वाहून -
आमचे घर पाडून, छान रचले स्वतःचे घर.
या महानगरात खस्ता खाऊन कष्ट उभारून.
घाम गाळून, रक्ताचे पाणी करूनही
अस्थिर आहे आमचे जगणे.
अशांत आहे पुरे आयुष्य -
साहित्य संस्कृतीच्या गप्पा नाही मनाला
रिझवत
नाही मनाला परमात्म्याची
पूजा वांधणारे संगीत.


नामदेव ढसाळ हा मराठीतील नुसता कवी नाही, तर तो महाराष्ट्राचा लोककवी असल्याचा पुरावा या ओळी देतात. महानगर मुंबईतीच्या गोलपिठ्यातील बायामाणसं त्याला जशी त्याची वाटतात अशीच गावगाड्यातील शेतकरी, लेकीबाळी - सुना आणि गोठ्यातील जनावरंही त्याला त्याच्याच आतड्याची वाटतात. महाराष्ट्राच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात लिहिलेल्या या कवितेत ढसाळ यांनी 'आकांताचा कोरस' मांडताना व्यक्त केलेली जाणीव महाराष्ट्रात गेल्या पन्नास वर्षात सर्व सतरावर पिचल्या गेलेल्या सामान्य माणसाची व्यथा व्यक्त करण्या इतपत व्यापक आहे. एरवी 'चिंता करतो विश्वाची' भूमिका घेत कवी अस्तित्वाचे प्रश्न मांडत पुन्हा आपले खासगी आयुष्य चिवडत बसतात. पण ढसाळ ते करीत नाही. ते आपल्या कवीकुलातील कवींना 'कवितेचा करिश्मा' सांगतात, ते म्हणतात.


"कवीच्या कविता म्हणजे नसतात नुसत्या समाजशास्त्रीय नोंदी
तो निराश होऊन कधीकाळी मिरवत असेल विचारधारेचे वैराग्य
तो कधी काळी बसला असेल आत्मनाशाच्या झिगझॅगवर
पण खरंच सांगतो
कवी असतो जादुगार किमयागार
तो शोषकांची पाठराखण करत नाही
तो त्यांचे साम्राज्य उद्ध्वस्त करण्याची द्वाही फिरवतो दशदिशांत
तो अत्याचारी राज्यकर्त्यांना
लोकांचे अन्न पाणी, वस्त्र निवारा महाग करणाऱ्या राज्यकर्त्यांना
माफ करत नाही
उजव्या हातातली छडी फिरवून
तो हातावर ठेवतो सोनेरी नाणी, सोनेरी स्वप्न आणि भविष्य
गरिबांच्या हातात
हिरवा रूमाल हवेत फेकून
पिळल्या जाणाऱ्यांना देतो हिंमत आणि धाडतो युद्धभूमीवर
जीवनाचा पराभव करू इच्छिणाऱ्या शत्रूंना गारद करण्यासाठी
हे नास्तिकांच्या नामदेवा,
या सुवर्ण महोत्सवी वर्षात घडो असेच काही..."

या अर्थाने नामदेव लोककवी आहेत; याच अर्थाने ते तुकारामाचे खरे वंशज आहेत.

संदर्भ :
१. 'मुक्त शब्द' मासिक, मुंबई, मे २०१० व ऑगस्ट २०१३.
२. 'दृश्यांतर', संपादक चंद्रकांत पाटील, नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडिया, नवी दिल्ली, दु. आ. २०१३.
३. 'अर्वाचीन मराठी काव्यदर्शन' अक्षयकुमार काळे, पां. ना. बनहट्टी प्रकाशन, नागपूर, १९९९.
४. 'साधना' साप्ताहिक, पुणे, १ फेब्रुवारी २०१४.

■ डॉ. प्रमोद मुनघाटे
सी-३०१, शेवाळकर गार्डन्स,
दक्षिण अंबाझरी मार्ग, नागपूर ४४० ०२२
भ्रमणभाष : ७७०९०१२०७८
email - pramodmunghate304@gmail.com





अनुक्रमणिका



मराठी भाषेला लाभलेली महान देणगी

डॉ. महेंद्र भवरे

साठोत्तरी दलित साहित्याचा उदय ही विसाव्या शतकातील वाङ्‌मयीन आणि सांस्कृतिक घटना होय. या साहित्याची प्रेरणा फुले आंबेडकरवादात आहे. नव्या समाजरचनेची विधायक दृष्टी त्यामागे आहे. या साहित्याचा पहिला हुंकार कवितेतून प्रकट झाला. दलित कवितेच्या उदयानंतर इथले सामाजिक, सांस्कृतिक, वाङ्‌मयीन पर्यावरण ढवळून निघाले. अभिजन परंपरा, मराठी कवितेची परंपरा दलित वंचितांच्या वेदनेला शब्द देवू शकली नाही. उलट दलित जगाचा दुस्वास मात्र मराठी कवितेने केला. दलित कवितेच्या रेट्यामुळे मात्र एक फॅशनेबल रोमेंटिसिझम अभिजन परंपरेने आपल्या कविततेत जोपासला. त्याहून दांभिक मोठेपणाही त्यांनी प्राप्त करून घेतला असेल. त्याला कोडगेपणाचा कळसही म्हणता येईल. मात्र दीनदलितांच्या दुःखाला देण्यासाठी त्यांचेकडे शब्दच नव्हते. हा त्यांच्या दांभिकतेचा इतिहास सरळसोटपणे नामदेव ढसाळांच्या कवितेने मांडला.

> भरल्या पोटावरून हात फिरवत
> सोन्याच्या काडीने दात कोरीत
> यापूर्वी त्यांनी लिहिल्या होत्या 'भूकबळीवर' अनेक कविता
> रवंथ करीत त्यांनी गायली होती परदुःखाची शीतल गाणी...
> आता त्यांना करता येत नाही उजळ माथ्याने
> नि करता येत नाही सादर नाटक रंगभूमीवर
> खुलेपणाने सर्वसामान्यांच्या जीवनाचं.

दलित कवितेच्या वास्तववादी आणि प्रांजळ आविष्कारामुळे 'त्यांच्या' नाटकीपणावर प्रश्नचिन्हं उभे झाले. त्यामुळे अभिजनवादी रोमँटिक कवी बेचैन झाले. दलित कविता झंजावातासारखी आली तेव्हा फॅशनेबल कवींची भंबेरी उडाली, त्यांची स्वतःची कविता विस्कळीत झाली. आणि दलित कविता ही कविताच नव्हे असा सूर आळवायला त्यांनी सुरूवात केली. त्यांचे शब्दही पिसाळल्यासारखे होते. दलित कवी, कविता यावर भडीमार करायला सुरूवात केली. ढसाळांसारख्या थोर कवीची संभावना करायलाही सुरूवात झाली कुणाला रसाळ नामदेवाचा जमाना संपल्यासारखे वाटले, कुणाला ब्रिभत्स गारठ्यासारखे वाटले तर कुणाला कवितेऐवजी ढसाळांची जात विचारणे महत्त्वाचे वाटले. संभावना करणारे मातीआड गेले मात्र ढसाळ नामदेवाची कविता या मातीतूनं अफाटपणे उगवतच राहिली. तिने माणसाच्या समर्थ्याचे महत्त्व अधोरेखित केले. न्हास, विजय आणि छळाचा इतिहास ती सांगत राहिली. एवढ्यावरच ती थांबली नाही तर तिने सातत्यशीलता ठेवली. एकेका अल्पविरामानंतर ती आपणाला अफाट जगाचे दर्शन घडविते. ढसाळांच्या कवितेने मराठी साहित्यप्रांतात एक वादळ निर्माण केले. वर्णव्यवस्था, शोषकव्यवस्था, या व्यवस्थांची शोषक मूल्ये यांच्या विरोधात तीव्रतर विद्रोह, विध्वंसक भूमिका आणि सामान्यांविषयी अपार करूणा असा विलक्षण ताण त्यांच्या कवितेने व्यक्त केला आहे. त्यांच्या कवितेमुळेच दलित कवितेची समर्थ पायवाट निर्माण झाली.

नामदेव ढसाळ हे भारतीय कवितेत शीर्षस्थानी असलेले नाव आहे. असे सांगितले जाते की, चांगली कविता निर्माण होण्यासाठी पहिल्यांदा कवी हा चांगला माणूस असावा लागतो. ही चांगल्या कवितेची पहिली अट आहे. ढसाळ हे थेट, परखड आणि पारदर्शी होते. 'फुलांच्या सुगंधापेक्षा छान असतो चारित्र्याचा वास' असे सांगणारा नामदेव ढसाळ हा कवी

अनुक्रमणिका

आपले चरित्रही नितळपणे मांडतो. 'माझ्या चॅपलिनचा बुटच फाटका तुटका', 'माझ्या उचकलेल्या टाचात भरता आलं नाही कैलासजीवन', 'कैकवेळा मीही वागलो श्वापदासारखा', 'निर्बंधाच्या सर्वच भिंती मी टाकल्या आहेत पाडून' एवढी पारदर्शकता ढसाळ नावाच्या चरित्रात आहे. कवितेने आपणास खराखुरा माणूस बनवून सोडले, देहामनात 'सहावा सेन्स' सजविला आणि जगण्याच्या वाटेवर काम, क्रोध, मत्सर, वासना जाळून टाकणारा तथागताचा दगडी ध्यानस्थ पुतळा उभा केला. एवढे कवितेचे आपल्यावर उपकार आहेत अशी कबुली त्यांनी दिली आहे. कविता हे जगाचे हृदय आहे असा त्यांचा दावा आहे.

प्रकाश आणि स्वातंत्र्य ही आहे जगाची शक्ती
आणि कविता आहे जगाचं हृदय
ती जाणिवेला सखोलता देते, ती भावनेला व्यापकता देते
ती रक्तातून उमललेल्या संवेदना फुलांवर मोहित होते
ती पूर्वजांच्या चुकांचा कर्तृत्वाचा वैगुण्याचा
ऱ्हासाचा विजयाचा छळाचा इतिहास अधोरेखित करते
(प्रियदर्शिनी/२२)

येथे कवितेचे उद्दिष्ट आणि प्रयोजन ढसाळांच्या कवितेने सांगतानाच कार्यही स्पष्ट केले आहे. कोणत्या जाणिवेला या कवितेने सखोलता दिली आहे? तर ढसाळांच्या कवितेने सांस्कृतिक विसंवादाला नाकारणारी बंडखोर जाणीव व्यक्त केली आहे असे प्रत्ययाला येते.

हे वाद्या! तुला वेशीवाहेरचा आक्रोश ऐकू आला नाही का?...
तुझे गुणगाण गावे असे होत नाही
वाटते पान खाऊन तुझ्यावर पचापच थुंकावे
तुला लेडाच्या गाडग्यात बुडवावे (गोलपिठा/१०)

ज्यांना वेशीबाहेरचा आक्रोश ऐकू येत नाही, पेटलेला माणूस दिसत नाही, जे माणसाला हीन लेखतात अशा सर्वच तत्त्वज्ञान, विचार आणि मूल्यांची लायकी काय आहे किंवा ते कसे कुचकामी आहे हे या कवितेने सिद्ध केले आहे. सांस्कृतिक जगातील व्यवहाराची, त्यामागील प्रवृत्तीची एवढी चिरफाड करणारी कविता आजवरच्या काळात एकूणच भारतीय कवितेत लिहिली गेलेली नाही. या कवितेने बेडरपणे सांस्कृतिक चिरफाड केली आहे. एवढेच नव्हे तर संस्कृतीच्या गिरासदारांना इशाराही दिला आहे.

लक्तरात गुंडाळलेली आमची आब्रु
गोलपिठ्यावर नागविणारांनो तुमचा ऱ्हास जवळ आलाय
मुक्तछंदाच्या संजीवनीने आम्ही जिवंत झालो आहोत
तुमच्या पापाचे छिनाल घट फोडण्यासाठी
शब्द म्हणाले अंधाराने सूर्य पाहिला तेव्हा...
(गोलपिठा/६)

हे शब्द समूहाचे आहेत. समूहाच्या वतीनेच हा कवी बोलतो आहे. अंधारग्रस्तांना 'सूर्याच्या' दिसण्यातून, शब्दाच्या माध्यमातून व्यक्त होण्याची शक्ती प्राप्त झाली. 'आंबेडकर' नावाचा सूर्य दिसल्यामुळे अंधाररूपी समाजाला वाचा फुटली. हे वाचा फुटलेले समाजमन कसे पेटून उठले, संघर्षासाठी सज्ज झाले. याचे अतिशय प्रत्ययकारी चित्र ढसाळांच्या कवितेने रेखाटले आहे. ही कविता दलित जगात आंबेडकरी शक्तीमुळे संचारलेल्या सळसळत्या रक्त प्रवाहाचे मानसच वाचकांसमोर ठेवते. लढाऊ बाण्याचे आक्रमक चित्र साकार करते आणि संस्कृतीच्या मिरासदारांना आव्हान देऊन आवाक व्हायला भाग पाडते. हा विलक्षणपणा ढसाळांच्या कवितेत पदोपदी प्रत्ययाला येतो. दलित कवितेच्या आरंभकाळातच विद्रोही आणि स्फोटक आशयाला वाट मोकळी करून देण्याचे कार्य या कवितेने केले. या कवितेमुळे एकूणच कवितेचा प्रांत आणि साहित्याचे जग ढवळून निघाले. या कवितेने चित्रित केलेले जग अनोखे होते. एकूणच साहित्य परंपरेला. या जगाचा ओझरता स्पर्शही झालेला नव्हता. समाज, साहित्य, संस्कृती, इतिहास, तत्त्वज्ञाने, नकार, विद्रोह, बंडखोरी या सर्व घटकांना कवेत घेऊन भक्कम भूमी ढसाळांच्या कवितेने तयार केली. या कवितेने बाबासाहेब आंबेडकरांशी असलेला जैविक संबंध स्पष्ट केला आहे. विद्रोह मूल्याची स्फोटकताही या कवितेने दिलेली देणगी आहे. सामाजिक, सांस्कृतिक जीवनातील शोषण, अन्याय, अत्याचार, लादली जाणारी बंधने या सर्वांविरूद्धचा समग्र विद्रोह ढसाळाच्या कवितेने पुकारला आहे.

स्वकीयांवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराच्या विध्वंसाचा विचार आणि स्वेतरांची निर्घृणता अशाप्रकारे द्वंद्व विद्रोहात आहे. प्रक्षोभामुळे विद्रोह स्फोटक झाला आहे. स्फोटक विद्रोहासोबतच प्रखर नकारही व्यक्त होतो. प्रतिकाराचे आंबेडकरी तत्त्वज्ञान हे विद्रोहनिर्मितीचे केंद्र आहे. विषमतेच्या विरोधात नकाराचे शस्त्र परजण्याचे काम आंबेडकरी तत्त्वज्ञानानेच केले. आंबेडकरी तत्त्वज्ञान हे परिवर्तनाच्या लढ्यातील एक मूलभूत हत्यार आहे. म्हणून 'अंधाराने सूर्य पाहिला तेव्हा शब्द झंकारले', 'नरकाच्या कोंडवाड्यात किती

दिवस राहायचं आम्ही श्वास घुसमटत?' असा सवाल उपस्थित करण्यात आला.

हजारो वर्षे होतो खंगत / या गुहागुहातल्या प्रचंड अंधारात

कालच तो गुहेच्या तोंडाशी ठेवून गेला पिसाळलेला जाळ

मी शिलगावीत जाणार आहे यापुढचा काळ
(गोलपिठा/११)

विद्रोहाचे शस्त्र डॉ. आंबेडकरांनी दलित समाजाच्या हातात दिले. त्यामुळेच पुढचा काळ पेटवत जाण्याची कृती साध्य होणार आहे. इतिहास आणि वर्तमानातील गतिमानता व भविष्यातील कृतिशीलता अशा त्रिविध संबंधाची जाणीव ही कविता स्पष्ट करते. ढसाळांची कविता केवळ विद्रोह पुकारून थांबत नाही तर ती समताधिष्ठीत समाजरचनेची मागणी करते. केवळ विध्वंसाच्या भाषेमुळे कविता विद्रोही ठरत नाही तर मूल्याधिष्ठीततेमुळे या विद्रोहाला एक वेगळे सौंदर्य प्राप्त होते. स्फोटक विद्रोहाकडून निरागस मानवतेकडे या कवितेचा प्रवास झाला आहे.

पीडा देणाऱ्यांविषयी तिरस्काराची भावना ही कविता व्यक्त करते, 'त्यांची सनातन दया फॉकलंड रोडच्या भडव्याहून उंच नाही' विद्रोह म्हणजे संताप, वैर असाही अर्थ सांगितला जातो मात्र विद्रोही मनाचा संताप क्रूर स्वरूपाचा नसतो. तर तो मानवतेवरील निष्ठेतून आलेला असतो म्हणून या विद्रोहाला कारूण्याची जोड मिळते. त्यामुळे मानवतेची विटंबना करणाऱ्या प्रवृत्ती, अमानुषता, क्रूरपणा याविषयी संताप आणि चीड विद्रोही अभिव्यक्तीतून प्रकट होत असते. एकाच वेळी संताप, चीड, करूणा आणि विद्रोह या सर्व बाबींची प्रचिती देण्याचे सामर्थ्य ढसाळांच्या कवितेत आहे. या कवितेने सामाजिक सांस्कृतिक भानातून तत्त्वमूल्यांचा उद्‌घोष केला आहे. वर्णधर्मावर अधिष्ठीत व्यवस्थेमुळे 'पाणी' हा दलित जीवनाचा सामाजिक विषय ठरला. चवदार तळ्याच्या संग्रामामुळे हे 'पाणी' ज्वालाग्रही बंड आणि मानवी हक्काची, मानवी तत्त्वाची अतिशय अर्थपूर्ण आणि व्यापक प्रतिमा ठरली आहे. 'पाणी' ही ढसाळांची सर्वांगसुंदर कविता आहे.

किती सुंदर गोंडा घोळतात तुमच्या धर्मातीत राजवटी

वर्ल्या अंगाला तुमी पाणी भरायचे खाल्ल्या अंगाला आमी

वाहव्वा वाहव्वा कसा सोवळ्यानं शिकवला जातोय पाण्यालाही चातुर्वर्ण्य

तुम्ही पाण्याच्या नादी लागू नका त्याची जातकुळी शोधू नका

पाणी अस्तं सिद्धार्थासारखं, पाणी अस्तं अशोक वृक्षासारखं, पाणी अस्तं तेजाबही

हे छळकऱ्यांनो, पाण्यासारखं सुंदर कर्तव्य दुसरं कुठलंच नस्तं जगात (गोलपिठा/६५)

पाणी हे मूलभूत तत्त्व आहे. मानवतावादी तत्त्वज्ञाने नीरक्षीर न्यायानेच कार्यरत होत असतात. सत्याला सत्य आणि मिथ्याला मिथ्य ठरविणे ही या तत्त्वज्ञानाची प्रतिज्ञा असते. म्हणून या तत्त्वाच्या खळाळत्या रूपाला तटबंदी घालता येत नाही. अशा तत्त्वाला नैराश्य आणल्यानंतर जीवनमरणाचे प्रश्न जटील बनत असतात. अशाप्रकारे निखळ मानवी कल्याणाच्या हेतूने उदयास आलेल्या तत्त्वज्ञानाची विविध रूपे आणि कृतीसातत्य 'पाणी' या प्रतिमेमुळे साकार झाली आहेत. ढसाळांनी 'पाणी' या प्रतिमेला विविध आयाम प्राप्त करून दिले आहेत. काव्य आणि तत्त्वज्ञान यांचा सुंदर मिलाफ त्यांच्या कवितेत झाला आहे.

नामदेव ढसाळांनी आपल्या कवितेविषयी म्हटले आहे की, ''खरं तर कला ही दोन जगात विभागली आहे. एक जग आहे घमेलेवाल्याचं, दुसरं जग आहे डबुलंवाल्याचं. माझं जग आहे घमेलेवाल्याचं. ज्या लोकांना मी जनता मानतो आणि ज्या लोकांच्या कष्टातून आजचा भारत उभा आहे ते लोक माझे अढळ श्रद्धास्थान बनतात. मग माझी कविता खेड्यापाड्यातील वैराण दारिद्र्याचा, अज्ञानाचा, दुःखाचा वेध घेते, तिरस्कार करते. त्यांच्या मूळावर घाव घालते. हे होत असताना माझ्या कवितेला पिळदार कलात्मक घाट येतो. माझी कविता वर्गशत्रूशी हाडवैराचा खेळ करते'' ढसाळांची भूमिका राजकीय आहे. ते कष्टकरी शोषितांच्या बाजूने उभे आहेत. ढसाळांच्या कवितेतील वर्गजाणिवा इथला देश, समाज, संस्कृती, स्वातंत्र्य, न्यायव्यवस्था, संसद, लोकशाही अशा अनेकविध पातळ्यांवर व्यक्त झाल्या असून वर्गीय अंतर्विरोध पदोपदी व्यक्त झाला आहे. भांडवलशाहीच्या आसाभोवती ढापण लावलेल्या बैलागत खासगी मालमत्तेचे जू मानेवर घेऊन ढोरमेहनत करणारा कष्टकरी वर्ग, बकालपणात जगणारा सर्वहारा आणि झगमगाटात जगणारा अलिशान भांडवलदार असा अंतर्विरोध आहे. हा अंतर्विरोध मिटवण्यासाठी संघर्षाशिवाय पर्याय नाही. म्हणून 'आपल्या हातांना लढाई फुटो' 'आपल्या बोटांनी युद्धाच्या ठिणग्या पसरोत' 'आपल्या जिवाला गांजणाऱ्यांचा नाश आपणाला अभिप्रेत असो' अशी अभिलाषा ढसाळांनी व्यक्त केली आहे.

त्यासाठी दोन मार्गही सांगितले आहेत.

एक रस्ता भूकमरी आणि लाचारीचा, तडजोडीचा आणि स्वतःला विकण्याचा
दुसरा रस्ता विद्रोहाचा, सरळसोट सत्तेवर जाण्याचा
जग बदलण्याचा आणि स्वतःलाही बदलण्याचा
(मुर्ख म्हाताऱ्याने.../५८)

विद्रोहाचा रस्ता ज्यांच्याकडे गमावण्यासाठी बेड्याशिवाय काहीच नाही अशा सर्वहारा वर्गाचाच असू शकतो. जनसामान्यांच्या विशाल संघर्षाशी या कवितेचे नाते अटळपणे जोडलेले आहे. जनसामान्यांचे विद्रोही मानस व्यक्त केले आहे. समूहामध्ये क्रांतीची चेतना निर्माण करणारी उग्र विद्रोही व्यक्तिमत्त्वाची लढाऊ प्रतिमा ढसाळांच्या कवितेने साक्षात केली आहे. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे बोट धरून चालणारा हा कवी हेगेल, मार्क्सची तत्त्वे सहजपणे आपल्या कवितेत पेरत जातो. सामाजिक, आर्थिक आणि सर्व प्रकारच्या विकासासाठी अमलात आलेले कुठलेही तत्त्वज्ञान ढसाळांना परके वाटत नाही. विरोध विकासवादापासून बुद्धाच्या अनित्यतावादापर्यंतची सर्व तत्त्वे त्यांच्या कवितेत एकवटलेली आहेत.

ढसाळांच्या कवितेने देश, देशाची न्यायव्यवस्था, लोकशाही अशा सर्व संस्थात्मक संरचनावर तीव्र स्वरूपाचे भाष्य केले आहे. 'या देशाचा इतिहास मूळातच गुन्हेगार आहे.' इतिहास गुन्हेगार आणि वर्तमान नालायक असलेला देश त्यांच्या कवितेने चित्रित केला आहे. न्यायदेवता मदमत्त झाली आहे. राज्यघटनेने दिलेल्या सार्वभौम हक्काची राजरोसपणे पायमल्ली सुरू आहे. कल्याणकारी राज्य मान मोडून पडले आहे. न्यायव्यवस्थेने केलेला पक्षपात, कल्याणकारी राज्याऐवजी उदयाला आलेले तस्करी राज्य. लोकशाही ऐवजी हुकूमशाही वर्तन अशा वास्तवामुळे सर्वसामान्यांना समजावून घेणारे कुणीही उरले नाही अशा वंचितांच्या दुनियेचे दुःख अधिकच ठळक होऊन कवितेतून पुढे आले आहे. ही कविता प्रस्थापित व्यवस्थेची लायकी काय आणि किती, 'तुही इयत्ता कंची' असा प्रश्न उपस्थित करते. चिंतन, अंतर्मुखता यासोबतच सांस्कृतिक मिरासदारीला झिडकारून लावणारी, मराठी भाषेच्या कुचकामीपणाला हिणवणारी अशी ही कविता एका उद्वेगशील मनस्थितीतून अभिव्यक्ती करते. दगडासारखे स्वातंत्र्य आणि एरंडाच्या गुऱ्हाळासारखा, विद्रुप पानं फैलावत जाणारा देश असल्यामुळे या देशावर फिदा व्हावे असे काहीच नाही. संसद, देश या संस्थांचे विरूपीकरण झाले आहे. भांडवलदाराच्या विळख्यात हा देश सापडला आहे. सत्तासमतोल ढळला आहे. स्वातंत्र्याने सर्जनशीलताच मारून टाकली आहे.

हे आमच्यापर्यंत पोहचलेलं सर्जनशील स्वातंत्र्य
त्याच्या पौरूषत्वाचा उच्छेद करून
तुम्ही केले त्याचे नामांतर हिजड्यात
शेवटी तुम्ही हे असं वाल्मीकीचं वारूळ करून टाकलंत करंट्यानो
तुमच्या पुराणकथांच्या बाजिंद्या कोकशास्त्राची
आम्हाला किळस यायला लागलीय पुन्हा पुन्हा
(तुही इयत्ता कंची/२८)

बेदरकार शैलीतील ही अभिव्यक्ती जुलूमाच्या हंगामात आपला प्रतिकाराचा ध्वनी झंकारत राहिला पाहिजे अशी चालना देते. जुलूमाचा हैदोस आणि अन्यायाची न्यायालयं, जिथं माणूस म्हणून कधीच न्याय मिळाला नाही, म्हणून माणूसपणासाठीचा आक्रोश ढसाळांच्या कवितेने मांडला आहे.

संसदेत हिजड्यांचा नंगा नाच
इथल्या बेकसूर मरणाची उत्तरं तुला अशी मिळणार नाहीत
एका आवश्यक हिंसेसाठी उचल तुझा हात
उगार स्वतःच्या आत्महत्येविरूद्ध बंड
ही असली वसंताची गाणी कुणाच्या गांडीत घालायचीत?
(गांडू बगीचा/२९)

अशा स्थितीत वास्तवापासून पलायन करता येणार नाही. स्वतःपासूनच संघर्षासाठी सिद्ध केले पाहिजे. भावविभोर तर मुळीच होता येणार नाही. ताठ मानेनंच वास्तवाला भिडता आलं पाहिजे असा विचार ही कविता मांडते. मुक्तीची स्वप्ने हवेतच विरून गेली. हवा, पाणी या सर्वांचा ताबा अधिसत्तेने घेतला आहे. त्यामुळे माणूस निराश्रीत झाला आहे. त्याच्या पोरकेपणावर कोणत्याही वृक्षाने सावली धरली नाही. स्वतंत्र राष्ट्रात पारतंत्र्यच वाट्याला आले म्हणूनही कदाचित या देशाला ढसाळांनी 'गांडू बगीचा' असे संबोधले असावे.

माणसाला पशूपातळीवर पोहचविणाऱ्या धर्मसंस्कृतीचा इतिहास म्हणजे बहिष्कृत भारताचा इतिहास. ढसाळांची कविता गतकालीन वेदनेचे हादरवून सोडणारे रूप चित्रित करते. ही वेदना केवळ आपल्या देशापुरती मर्यादित होती अशातलाही भाग नाही. ही कविता वैश्विक दुःखालाच गवसणी घालते. भारतीय वर्णव्यवस्था आणि पाश्चिमात्य

श्वेतवर्णव्यवस्था या व्यवस्थांचे शोषक स्वरूप स्पष्ट करते. शोषणाची रूपे वेगळी असतील पण शोषण जागतिक पातळीवर सर्वत्र आहे. काळ कुणासाठी थांबत नसतो आणि इतिहासालाही घड म्हणावे लागत नाही. व्यक्ती हेच इतिहासाचे सृजनशील साधन असते. इतिहास सूडही घेतो आणि बक्षीसही देत असतो. प्रेषितांच्या अहंकारासह प्रेषिताला काळाच्या उदरात गडप करीत असतो. 'मी म्हणजेच इतिहास' असे म्हणणारे प्रेषित काळाच्या कसोटीवर उतरू शकत नाहीत. पायाभूत दिशा देऊ शकत नाहीत. ढसाळांच्या कवितेच्या मते प्रेषितांनी माणसाचा विचार केला नाही. माणसाच्या भल्याचा विचार केला नाही. उलट माणसाची कत्तल घडवून आणली. स्त्रियांना विद्रुप केले. अमानुषता, हिंस्रपणा, पृथ्वीवरील जखमा यावर हे प्रेषित मलमपट्टी करू शकले नाही. ही प्रेषितांची मर्यादा ढसाळांच्या कवितेने विशद केली आहे. तथागत गौतम बुद्धाने मात्र स्वतःला प्रेषित म्हणून कधीही घोषित केले नव्हते. उलट मानवी दुःखाचा विचार त्यानेच प्रथम मांडला. मानवी दुःखाचे मूळ शोधून काढले. 'अत्तदीपभव' हा मार्ग दाखविला. घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीमागे कार्यकारणभाव असतो हेही त्याने समजावून सांगीतले. एका अर्थी बुद्धविचार हाच इतिहासातील खजिना आहे. वर्तमानाने ज्याच्याशी संबंध जोडावा असे हे महाद्वार आहे. म्हणून क्रुसावर ठोकलेल्या येशूच्या वेदनांकित चेहऱ्याशी बुद्धाच्या चेहऱ्याची तुलना करीत कवीने येशूला प्रश्न विचारला आहे, 'कोकरांना क्षमा करून आकाशीच्या बापाकडे जाताना बुद्धाचा चेहरा का घेऊन गेला नाही?' ढसाळांची समग्र कविता एक समूहगानच आहे. दांभिक इतिहासाचे अवलोकन करीत बहिष्कृत भारताच्या इतिहासाचे विदारक रूप या कवितेने स्पष्ट केले आहे. या माणूसकेंद्री कवितेने वैश्विकतेशी नाते जोडून शोषक व्यवस्थेचे धिंडवडे काढले आहेत. प्रेषितांच्या मर्यादा स्पष्ट करून बुद्धाची महानता सांगितली आहे.

ढसाळांच्या कवितेची भाषा हा स्वतंत्र चर्चेचा विषय आहे. नवे भाषिक संकेत घडवत नवी भाषा आकारास येत असते. अंगावरील सर्व लक्तरे फेकून कर्मविपाकाची नियती झुगारून देणारा नामदेव ढसाळ हा कवी वेद, पुराणे, शास्त्रे या साऱ्यांना स्वतःच्या खास भाषिक शैलीने धुडकावून लावतो. त्यांच्या कवितेची भाषिक अभिव्यक्ती बरेचदा अंगावर येणारी, धक्कादायक अशा स्वरूपाची आहे. मात्र ती जोरकस आणि सार्थ आहे. भाषिक नवतेचा खास प्रांत त्यांनी प्रस्थापित केला. त्यांच्या कवितेत शिवराळपणा, लिंगयोनीवाचक शब्दांची अर्थपूर्ण योजना केलेली दिसून येते. ईश्वर, आत्मा वगैरे संकल्पनांना नाकारण्याची एक वेगळी तऱ्हा कवितेत पहावयास मिळते.

इश्वर नश्वर नंदीच्या अंडासारखी सृजनखोर जर्दाळू
आत्म्या चल फुट भडव्या नसती साली ब्याद
(तुही इयत्ता कंची /५४)

याप्रमाणे इतरही भाषिक अभिव्यक्तीच्या विविध तऱ्हा प्रत्ययाला येतात. उदा. 'देवः माणसाने मारलेली एक अस्खलीत थाप', 'मृत्यू एक शिडी चढत जाणारी पीडा', 'खळाळ पाण्यात फेडून टाक आतातरी ही वेदांगाची लुगडी', 'त्यांची पुष्टावलेली अभिजात ढुंगणे', 'इथले धर्मसंस्थापक असतात मवाली, खुनी' इ. ही सर्व अभिव्यक्ती म्हणजे त्या त्या संकल्पनांवर केलेले भाष्य होय. भाष्य हा दलित कवितेचा एक महत्वाचा विशेष ढसाळांनी जोरकसपणे ठळक केला. बोलभाषेला वक्तृत्वाच्या पातळीवर नेऊन तिला विचार तत्त्वाचेही अधिष्ठान प्राप्त करून द्यायचे ही किमया ढसाळांनी लिलया साधली आहे. सोबतीला उपरोधाचा जिवंतपणा आहेच. लोकाविष्कार, लोकगीतातील लय, उखाणे, वाक्प्रचार, म्हणी या सर्व गोष्टींनी कवितेची समृद्धी उच्च पातळीवर नेऊन पोहचवली आहे. ढसाळांच्या कवितेने अतिशय धीट आणि धडधाकट भाषेतून पारंपरिक प्राक्कथांचा दुजाभाव आणि पक्षपात कथन केला आहे.

लक्ष्मी सरस्वती पक्षपाती रांडा / आम्ही या म्हटलो त्या आल्या नाहीत
आमच्याखाली निजा म्हटलो/त्या निजल्या नाहीत
(खेळ/७०)

धन आणि विद्या या दोन्ही गोष्टींपासून वंचित ठेवल्या गेलेल्या सामजिक समूहाची वेदना याठिकाणी प्रकट झाली आहे. ढसाळ अशी भाषा वापरतात त्यामागे एक उद्वेग आणि संतापाची भावना आहे. पक्षपाती प्रवृत्तीविषयीची चीड आहे. येथे आवाहकता आणि आक्रमता या दोन्ही प्रक्रियांना न मिळणाऱ्या प्रतिसादातून, पक्षपात करणाऱ्या प्रतिसादातून, पक्षपात करणाऱ्या विद्या आणि धनाच्या देवतांना वेश्येच्या पातळीवर आणून ठेवले आहे. म्हणजेच पारंपरिक उच्चभ्रू प्रतिमांना निचतेच्या पातळीवर आणून ठेवले आहे. उच्चभ्रू आणि उपेक्षित अशा दोन जगाचे सूचनही त्यातून होते. हा ढसाळांच्या अभिव्यक्तींचा खास विशेष आहे.

ढसाळांच्या कवितेत स्त्रीकेंद्री, स्त्रीविषयक कवितांचा स्वतंत्र विभाग मानता येईल. त्यात आई, मावशी, बहीण, बायको, प्रेयसी, वेश्या या सर्व रूपांचा विविधांगी आविष्कार झाला आहे. ही सारी नाती कवीच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग बनून

अनुक्रमणिका

अविभाज्यपणे येतात. स्त्री गूढत्वाची केंद्रे शोधण्याच्या नादात विविध पातळ्यांवरील तत्त्वज्ञानाच्या अनेक छटा कवितागत अनुभूतीला लगडून येतात. वर्णव्यवस्थेने लादलेल्या शूद्रत्वाच्या जीवनाची प्रतिमा सिद्ध करतांनाच 'आईबापाची' प्रतिमाही साकार केली आहे.

इथल्या व्यवस्थेची दारू पिऊन जस्सा माझा बाप झिंगला आहे
आई तुही तशीच अज्ञानाचं पाणी पिऊन खल्लास झाली आहेस (मु.म्हा.../१३)

मराठी कवितेच्या इतिहासात आईचे उदात्तीकरण मोठ्या प्रमाणात करण्यात आले आहे. ढसाळांच्या कवितेने ही उदात्तीकरणाची परंपरा मोडीत काढली. वास्तवाच्या धगधगत्या भूमीवरील 'आई' अशी पहिल्यांदाच दलित कवितेने चित्रित केली आहे.

स्त्रीच्या संदर्भात मन, शरीर आणि बुद्धीच्या पातळीवरील शोधाची संहिताच ढसाळांनी सादर केली. स्त्रीजातीच्या दुःखभोगाचं, राग, लोभ आणि सोशिकतेचं विशाल विश्व त्यांच्या कवितेत प्रत्ययाला येते. दुःखापासून तृष्णा आणि वासनेपर्यंत किती स्तर असतात, त्या दुःखाची केंद्रेही मानवी जीवनात कशी खोलवर रूतून बसलेली असतात याचा प्रत्यय ह्या कविता देतात. प्राथमिक गणसमाजात स्त्रीला प्रतिष्ठा होती. स्त्रीकडे एक शक्ती म्हणून पाहिले जात होते. अशा स्त्रीशक्तीशी या कवितेने नाळ जोडली आहे.

तुझे डोळे ज्वालेचे आहेत आणि तुझा स्पर्श क्रांतिदायी
तू चंदनाचं लाकूड आणि बाभळीची साल
तू हाडातून खेळणारी वीज आणि पाणी
तुझी सुकी ओली वोटं चराचराला लाव
आणि वघ किमया तुझ्यातल्या निस्तेजपणाची
बोट लावताच प्लेटिनम होईल दगडाचं
(चिंध्याची देवी /३२)

असं सामर्थ्याचं रूप जे शंभरं मरणं मरूनही न मरणारं आहे. 'सहजपणे सापडावीत खनिजं तशा या आया, सारवायला हव्यात त्यांच्या अंतरंगाच्या भिंती' या हेतूनेच ह्या कविता दाखल झाल्या आहेत. 'माझ्या कविते तू टिपून घे समस्त बाईजातीचे दुखणे' असे कवितेला बजावणारे ढसाळ 'बाई गूढ राहिली कायमची माझ्यासाठी' अशी मर्यादा ते स्पष्ट करतात. त्याचवेळी 'किती सहजगत्या या पशूला तू माणसात आणलेस' अशी बायकोबद्दल कृतज्ञताही व्यक्त करतात. साळूबाईच्या अंगणात जमलेल्या कष्टकऱ्यांची मांदियाळी या कवितेत उभी राहते. त्यात राहीबाईसारखी देवदासी असते. विनती, विन्नी, जहीदा, फ्रिडा, लोरा, सलमा अशा वेश्या असतात. अनुराधा बुधाजी उपशाम पासून मंदाकिनी पाटलांपर्यंत अनेक स्त्रिया आपल्या अस्तित्व आणि जगण्याच्या पसाऱ्यासह कवीच्या नजरेतून साक्षात होतात. या कवितेतील स्त्रीप्रतिमा विचार तत्त्वांशी जोडूनच साकार होतात. एकीकडे स्त्री हेच एक तत्त्व म्हणून साकार होते, त्याचवेळेस स्त्रीजीवनाला नागवणारी तत्त्वे आणि विचारप्रणाल्या ज्या धर्म आणि पुरूषी सत्ताकेंद्रातून उगम पावल्या आहेत. त्यांचे एक छिद्रान्वेषी अन्वेषण ह्या कविता वाचकांपुढे ठेवतात. स्त्रीपुरूष नातेसंबंधांचे जंजाळ उकलण्याचा प्रयत्न हा या कवितांचा खास विशेष आहे. स्त्रीपुरूष नातेसंबंधाची व्यवस्था कशी टाकाऊ आहे याचे एक समीकरण ही कविता मांडते.

थोड्याशा रांडा थोडेसे भडवे थोडेसे दातवण
जे वापरल्यानंतर थुंकून टाकायचे आणि गंगेत दात खंगाळयचे (चिंध्याची देवी /३२)

या समिकरणातून हाती येणारा निष्कर्ष म्हणजे 'वापरा आणि फेका' हे तत्त्व होय. व्यभिचार करून गंगेत दात खंगाळायची सोय पुरूषी व्यवस्थेने करून ठेवली आहे. नातेसंबंधाची निखळ व्यवस्थाच अस्तित्वात नाही. आहे ती व्यवस्था कशी हास्यास्पद आहे हे ठरविण्यासाठी व्यभिचारी रूपकाची योजना या कवितेने केली आहे. पुरूषांनी निर्माण केलेल्या व्यवहारी कावेबाज आणि चालबाज व्यवस्थेचे रूप या कवितेने अधोरेखित केले आहे.

देहविक्रय करून जगणाऱ्या वेश्या हा या कवितातील प्रबळ विभाग आहे. ढसाळांची कविता वेश्या जीवनाच्या आधारेच समाजीवनाचे अधःपतन रेखाटते. या जगात स्त्रीला यंत्रवत बनवले जाते. यंत्राद्वारे अधिक उत्पादन काढणे हेच येथे तत्त्व ठरते. भांडवली जगात स्त्रीला यंत्रवत बनवले जाते. देहाचा भांडवल म्हणून उपयोग करण्याची पाळी येते. तेथे केवळ श्रमाचीच नव्हे तर स्त्रीत्व आणि मातृत्त्वाचीही खरेदी होऊ लागते. त्यामुळे नैसर्गिक जगणे जगता येणे केवळ अशक्य होते. 'वय उंची बांधा यांचेऐवजी हिशोब ठेवला तिनं हाडाचा. चामड्याचा, चिखलाचा' असे अनैसर्गिक नरकाचे भीषण वास्तव वाचकांसमोर उभे राहते. या कवितेत देहमनाचे अनेक विभ्रमी जाळे विणले आहे. येथे प्रेम, ओढ, आकर्षण आहे ते वास्तवाच्या भूमीवर. म्हणून येथे रोमँटिक झुले झुलताना दिसत नाहीत.

अनुक्रमणिका

मैथुनापलिकडे जनावराच्या प्रेमाची सीमा नाही
माणूसही जनावरासारखा वागू लागला तर
ते प्रेम असू शकत नाही माणसासाठी!
(चिंध्याची देवी / ८२)

अशी या कवितेची धारणा आहे. आज प्रेमाचंच काय जीवनाचं आणि जगाचंही पर्यावरण बदललं आहे. म्हणून 'ती' गेली तेव्हा येथे पाऊस वगैरे निनादत नाही. तर सिझोफ्रेनिक, हिंस्त्र वाऱ्याच्या थोबाडीत लगावून दिली जाते. सूर्याकडे तुच्छेतेने पाहून थुंकण्याची क्रिया घडते. आणि ती गेली त्यादिवशी कवी स्वतःचा चेहरा काळ्या रंगाने रंगवून घेतो. प्रदर्शनी सौंदर्यवाद आणि हळव्या स्वच्छंदतावादाची धोबीपछाड करण्याचे कार्य ढसाळांच्या कवितेने केले आहे.

वर्तमानात जाहिरातीच्या धंद्यामुळे स्त्रीजातीची अवहेलना एक अभूतपूर्व टोकाला जाऊन पोहचली आहे. माध्यमे उत्पादनाऐवजी जाहिरातीतून स्त्रीप्रतिमेचे विविध कोनातून दर्शन घडवितात. एकीकडे 'कवळ्या कलेजीची शिकार उरकणारे बाहेरख्याली लोक' आहेत तर दुसरीकडे 'प्रेतवत अंगामांड्यांची लपेट फेकली जाते टेलिव्हिजनवरून आपल्यात' अशाप्रकारे दोन्ही डग्ग्यावर थाप मारून पुरूषी व्यवस्था आणि माध्यम व्यवस्था मुजोर झाली आहे. हे आजच्या काळाचे लैंगिकतेवरील भीषण भाष्य ढसाळांच्या कवितेने केले आहे. स्त्री म्हणजे लैंगिक वस्तू आणि उत्पादन म्हणजेही लैंगिक वस्तूच अशी माध्यमाची नीती या कवितेने उजागर केली आहे.

आज ग्लोबल गावाने आकस्मिकपणे चिमण्यापाखरांचा किलबिलाट गारद करून टाकला आहे. ध्वनी आणि प्रकाशापेक्षाही माणसाच्या जाणिवा आणि संवेदनेचा वेग अधिक झाला आहे. या गावाने साऱ्यांनाच संभ्रमित करून टाकले आहे. अशावेळेस आजचे कवी आणि कविता कुठे आहे?

ग्लोबल गावातील दारू पबच्या गुत्यात बसून
वारेमाप ढोसून करताहात कवितेविषयी चर्चा
स्वतःच्या कवितेवर टाकताहात स्वतःचा जीव ओवाळून
घालताहात मागच्यांना शिव्या
उदो उदो करताहात पुढच्यांचा-तुमच्या पिढीचा...
कधीतरी उतरायला हवं होतं तुम्ही सुद्धा रणांगणात...
(चिंध्याची देवी /९६)

असे आजच्या संदर्भातील हे भाष्य! रणांगणावर कवितेचे शब्द उर्जा देत असतात. शस्त्राची ताकद वाढवतात. आजच्या कवितेतील शब्दांमध्ये अशी ताकद आहे का? हा खरा सवाल आहे. आणि कवी व कवितेकडे उत्तर नाही ही खरी गोची आहे. कवी आणि कवितेच्या संदर्भातील ही वर्तमान गोची ढसाळांच्या कवितेने अधोरेखित केली आहे.

ढसाळांच्या कवितेत विचार आणि जाणिवांचे स्तर एवढे भक्कम आहेत की, ते खरवडल्याशिवाय कवितेच्या गाभ्याचे मार्ग किलकिले होत नाहीत. त्यांची कविता वाचणे म्हणजे एकेक अनुभव अनुभवणे, अनुभवात सखोलपणे गुंतून जाण्यासारखे आहे. त्यात एकदा शिरले की परतीचा मार्ग लवकर सापडत नाही.

हार्लेम रेनसाँ पिरेडचा कवी, आफ्रीकन अमेरिकन कवी लँगस्टन ह्युजेस याचेशी ढसाळांच्या कवितेची तुलना केली जाते अथवा साम्य शोधले जाते. विविध विद्यापीठात हा अभ्यास सुरू आहे. श्वेतवर्णीय व्यवस्थेविरूद्ध उपहासात्मक विद्रोह ह्युजेसच्या कवितेने प्रकट केला. स्वातंत्र्य, समता, बंधुभाव ही मूल्ये त्याच्या कवितेच्या केंद्रस्थानी आहेत. काळ्या लोकांच्या अस्मितेबद्दल बोलणाऱ्या, लोकशाही प्रस्थापनेचा विचार मांडणाऱ्या या कवीने नकार, विद्रोहासह 'ब्लॅक इज ब्युटीफुल' हे तत्त्वज्ञान आपल्या कवितेतून मांडले. तर 'माणसासारखा सुंदर जन्म दुसरा कोणताच नाही' असे तत्त्वज्ञान ढसाळांनी मांडले. दलित, शोषित, पीडित, स्त्रिया या सर्वांच्या जगाचा प्रतिनिधी असलेला नामदेव ढसाळ नावाचा थोर कवी, वर्ण लिंग, जात, धर्म या साऱ्यांच्या पलिकडे गेलेला वैश्विक कवी आमच्या भाषेत होऊन गेला. ही मराठी भाषेला आठ नऊशे वर्षानंतर लाभलेली महान देणगी आहे. मराठी भाषा नामदेव ढसाळांचे उपकार विसरून बईमान होईल असे वाटत नाही!

▮ डॉ. महेंद्र भवरे
बी-२०१, डीएसके हरिता,
ठाकूर कॉम्प्लेक्स, कांदिवली (पूर्व)
मुंबई - ४०० १०१
भ्रमणभाष : ९९२०७८९३८५
email - mmbhaware@gmail.com

अनुक्रमणिका



नामदेव ढसाळ यांचे वैचारिक लेखन काही निरीक्षणे

डॉ. सतीश बडवे

महाराष्ट्राच्या मनावर गारूड करणारे व दीर्घकाल प्रभाव टाकणारे जे साहित्यिक आहेत त्यांच्यात अग्रस्थानी असणाऱ्यांमध्ये नामदेव ढसाळ यांचा समावेश होतो. वस्तुतः नामदेव ढसाळ ओळखले जातात ते कवी म्हणूनच. पण ही साहित्य जगतातली ओळख बाजूला ठेवून विचार केला तर सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात चळवळीच्या माध्यमातूनही ढसाळ यांनी आपली ठळक नाममुद्रा उमटवलेली दिसते. दलित पँथरचे त्यांनी केलेले नेतृत्व हे त्याचे उदाहरण ठरेल. तथापि यापलीकडे असणारे नामदेव ढसाळ त्यांच्या वैचारिक लेखनात जाणवतात. नामदेव ढसाळ यांच्यात दडलेला कुशाग्र बुद्धीचा विचारवंत, देश-विदेशातील घडामोडींची नोंद घेणारा सजग आणि जाणकार अभ्यासक, कार्यकर्त्यांची आणि डी-कास्ट झालेल्यांची दखल घेणारा त्यांच्या जवळचा मित्र अशा अनेक भूमिकांमधील नामदेव ढसाळांची रूपे त्यांच्या विचारप्रवर्तक गद्य लेखनातून प्रत्ययाला येतात. त्यांच्या या गद्यलेखनाची विशेषत्त्वाने दखल घेतली गेली नाही. ढसाळ आणि त्यांची कविता, ढसाळ आणि दलित पँथर, ढसाळ आणि त्यांच्या राजकीय भूमिका याविषयीच्या झालेल्या चर्चा व लेखन यांचे प्रमाण अधिक असल्याने त्याविषयी अधिक लिहिले-बोलले गेले ही वस्तुस्थिती आहे. पण याचा अर्थ हे लेखन कमी महत्त्वाचे आहे असे नाही. उलटपक्षी ढसाळांचे बहुश्रुतपण, त्यांचा व्यासंग, जागतिक पातळीवरच्या घडामोडी, साहित्य जगतातले भलेबुरेपण, माणूस जोखण्याची त्यांची हातोटी याचे खरे प्रत्यंतर त्यांच्या या लेखनामधूनच येते. भाषेवरची त्यांची हुकमत हा तर याही लेखनाचा कवितेएवढाच महत्त्वाचा पैलू आहे. मराठी भाषेच्या समृद्धीसाठी ज्यांचे ज्यांचे नाव घेतले जाते वा पुढेही घेतले जाईल, त्यांना नामदेव ढसाळ हे नाव दुर्लक्षित करता येणार नाही. 'आंधळे शतक' आणि 'सर्व काही समष्टीसाठी' या दोन पुस्तकांमधून ढसाळांनी केलेले लेखन हे खरे तर स्तंभलेखन आहे. स्तंभलेखनात प्रासंगिक गोष्टी नोंदवल्या जातात व त्याला लेखनाची विशिष्ट अशी मर्यादाही पडते. पण या मर्यादित अवकाशात समर्थ शब्दकळेचा वापर करून ढसाळांनी स्वतःचे वैचारिक विश्व आपल्याला बहाल केले आहे. चळवळी आणि आंदोलनात गुंतलेल्या ढसाळांनी हे अफाट वाचन केव्हा केले असेल असा प्रश्न पडल्यास नवल नाही. मराठी भाषकांसाठी केलेले हे लेखन मराठी भाषा-संस्कृतीचा दस्तऐवज आहे. ाहित्य अकादमीच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात संपूर्ण देशातून जीवनगौरव पुरस्कारासाठी नामदेव ढसाळांचीच निवड केली जावी ही मराठी भाषेच्या दृष्टीने गौरवाचीच घटना ठरली. त्यांचे भाषासौष्ठव आणि प्रखर वास्तवाची सडेतोड मांडणी एका बाजूला धक्के देते तर दुसऱ्या बाजूला विचारप्रवृत्त करते. प्रपातासारखी कोसळणारी धुवाँधार भाषा वापरण्याची हातोटी ढसाळांकडे असली तरी त्यांच्या लेखनाला असणारी चिंतनाची डूब वाचकाला स्तिमित करणारी ठरते.

'आंधळे शतक'मधील लेख हे 'आज दिनांक'साठी केलेले स्तंभलेखन आहे. 'माहौल'या शीर्षकाने ते वाचकांसमोर आले. 'सर्व काही समष्टीसाठी'मधील लेख हे 'सामना' दैनिकातून प्रकाशित झाले आहेत. स्तभलेखनाला 'विचारस्तंभा'चे रूप त्यांनी दिले. अस्सल अनुभवांची निवड, सखोल व विस्तृत वाचनाचे संदर्भ आणि प्रगल्भ विचारांची मांडणी यातून सधन आशय या स्तंभलेखनाला लाभला. साहजिकच त्याला चिंतनपर लेखनाचा बाज प्राप्त झाला. आंबेडकर प्रबोधिनीने १९९५ ला 'आंधळे शतक' प्रसिद्ध केले तर परममित्र पब्लिकेशनने २००६ मध्ये 'सर्व काही समष्टीसाठी' प्रकाशात आणले. याव्यतिरिक्त 'आंबेडकरी चळवळ आणि सोशालिस्ट कम्युनिस्ट' व 'बुद्धधर्म आणि शेष प्रश्न' हे त्यांचे चिंतनपर लेखनही तेवढेच महत्त्वाचे आहे. नामदेव ढसाळ यांच्या चिंतनाचा हा आवाका कवेत पकडणे ही अवघड असणारी गोष्ट आहे. 'आंधळे शतक' स्वतः ढसाळ यांनी 'असीम त्याग, धैर्य, निष्ठा यांबद्दल नेल्सन मंडेला यांना' अर्पण केलेले आहे. त्यांच्या या अर्पणपत्रिकेवरूनही

अनुक्रमणिका

त्यांची शोषितांच्या उद्धारासाठी झटणाऱ्या कार्यकर्त्यांविषयीची आपुलकी जशी स्पष्ट होते, त्याचप्रमाणे विश्वव्यापक शोषितांच्या लढ्याविषयीची आस्था व त्या आंदोलनावरची निष्ठाही प्रकट झालेली दिसते. प्रतिकुल विचारांशी संघर्ष करायचा असेल, लढा द्यायचा असेल तर तो विचारांनीच द्यायला हवा. हे ढसाळ यांच्या लेखनाचे एक महत्त्वाचे सूत्र आहे. 'सर्व काही समष्टीसाठी'मध्ये लेखनाच्या आरंभी एक विधान दिसते. ''Those who differ upon reason - may come together by reason'' आपली लढाई विचारांशी असते. ती एखाद्या व्यक्तीविरूद्ध असलेली व्यक्तिगत लढाई नसते. कारण अंतिमतः माणूस केंद्रस्थानी असणे महत्त्वाचे. शोषित-पीडितांचा उद्धार आणि लोककल्याणाचा विचार महत्त्वाचा असतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना स्वतःत मुरवून, त्यांच्या विचारांचा प्रभाव पचवून ढसाळ यांनी उभे केलेले हे व्यापक विचारविश्व एकूण मानव जातीचा विचार केंद्रस्थानी आणणारे ठरते.

आंधळे शतक : ऱ्हासकालाचे प्रभावी चित्रदर्शन

डाव्या पुरोगामी चळवळीतील जयंत प्रधानच्या मृत्यूनंतर रंगवलेले हृद्य शब्दचित्र म्हणजे 'आंधळे शतक' हा लेख होय. एका कार्यकर्त्याची निष्ठा आणि त्याच्या आयुष्याची झालेली परवड अतिशय प्रभावीपणे त्यात मांडली गेली आहे. जयंत प्रधान विसाव्या शतकाला 'आंधळ शतक' म्हणायचा. कारण या शतकात क्रांत्यांचा ऱ्हास झाला, तिसरे जगही कोसळले. हे सर्व बघून व्यथित होणाऱ्या एका अस्सल कार्यकर्त्याला नामदेव ढसाळ यांनी केलेला 'लाल सलाम' म्हणजे हा लेख. या पुस्तकाचे शीर्षक याच लेखावरून बेतले आहे. त्याला एक विशेष अर्थ आहे. ढसाळांनी जी मांडणी केली आहे त्यातूनही ऱ्हासकालाचेच चित्र उभे राहते. धर्माधिष्ठित राष्ट्रवादाने होणारी लोकशाहीची शोकांतिका, विसाव्या शतकाच्या मारेकऱ्यांनी केलेल्या गोष्टी, वेगवेगळ्या नेत्यांविषयी केलेले परखड प्रतिपादन, राजकारण आणि गुन्हेगारीच्या नात्यामुळे पांढरपेशांची होणारी तारांबळ याविषयीची नोंद त्यांच्या लेखनातून येते.

विसाव्या शतकाच्या मारेकऱ्यांविषयी लेखन करताना जागतिकीकरणाच्या प्रक्रियेची नोंद नामदेव ढसाळ करतात. त्यांच्या मते ''ही प्रक्रिया साम्राज्यशाहीच्या मुक्तकालाच्या पुनरागमनाची नाहीये. क्राईसिस ऑफ कॅपिटॅलिझमच्या एकीकरणाच्या बचावात्मक पवित्र्यातून आलेली आहे'' म्हणूनच प्रागतिक राजकीय तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने हे शतक 'काळे चेटूक' करणारेच आहे. यासाठी लेनिनच्या मृत्यूनंतरच्या घडामोडींचा वेध घेत जागतिक पातळीवरील समाजसत्तावादाचा झालेला पराभव ढसाळांच्या चिंतनातून पुढे आलेले दिसतो.

भारतीय राष्ट्रवादावरचे ढसाळांचे भाष्यही परखड असून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विधानाकडे ई। यांनी लक्ष वेधले आहे. ''धर्माधिष्ठित राष्ट्रवादाच्या कल्पने[illegible] नैतिकता आणि गुणवत्ता मारली जाऊन जात, धर्माने जा[illegible]बद्ध समाजच निर्माण होईल. असे झाले तर यामुळे सामाजिक भ्रातृभाव तुटून पडले. त्यातून वैरभाव दृढ होत जाईल.'' आपल्या राज्यकर्त्यांनी डॉ. आंबेडकरांची कल्पना वेळोवेळी पायदळी तुडवली, जमातवादी राजकारणाचा आश्रय घेतला व त्यातून आंबेडकरांच्या भारतीय राष्ट्रवादाच्या अस्तित्वालाच धोका निर्माण झाला असे ते निरीक्षणात नोंदवतात. धर्माधिष्ठित राजकारणविरूद्ध व जमातवादी राजकारणाविरूद्ध उभे राहण्याची अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे. मध्यममार्गी सत्ताधारी आणि तथाकथित डाव्या पुरोगाम्यांचा नतद्रष्टपणा यामुळे झालेली वाताहात ढसाळांना अस्वस्थ करीत असल्यानेच 'पुरोगाम्यांनो आता आत्महत्या करा' असे अस्वस्थ उद्गार ते काढतात. यापाठीमागचे सत्ताकांक्षी राजकारण विकृत बनत गेले व आक्रमक जातीयवाद्यांचे आव्हान आपल्यासमोर उभे राहिले. परिमाणी 'देश विध्वंसाच्या उंबरठ्यावर' उभा राहिला. आज मैदानात उतरून निर्णायक लढाईस तयार व्हायला हवे, असे त्यांना वाटते. याच शतकातील एक महत्त्वाची घटना म्हणजे बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले धर्मांतर ही होय. मनुष्यपण मिळविण्याच्या दृष्टीने टाकलेले हे पाऊल होते. तथापि अनुयायांनी मात्र धर्मांतराच्या मुख्य उद्देशालाच तिलांजली दिली. त्याची नेमकी नोंद करताना येवल्याची घोषणा (१९३५) मुंबई इलाका महार परिषद (१८३६) 'मुक्तीकोन पथे'चा पद दलितांच्या ऐहिक उद्धाराचा जाहीरनामा यांची नोंद घेत प्रत्यक्षात काय घडले याचा निर्देश नामदेव ढसाळ करतात. क्षुद्र महत्त्वाकांक्षा आड आल्याने पुढाऱ्यांनी आंबेडकरांच्या मूळ हेतूचा तेजोभंग केला. दादासाहेब गायकवाड निवर्तल्यानंतर चळवळीही हळूहळू संपल्या, गटतट प्रबळ झाले व धर्मांतराचा उद्देश बाजूला पडला हे दाखवून देत 'करंट्यांनो, बाबांचं नाव घेऊ नका' हे संतप्त उद्गार नामदेव ढसाळांनी काढले आहेत. आंबेडकरांचे वैचारिक अधिष्ठान, त्यांची वैचारिक बांधिलकी, धर्मकांडाचे अधिष्ठान नसलेला त्यांचा बौद्ध धम्म याचा विसर पडत गेलेला दिसतो. याचे कारण त्यांचे 'भुरटे अनुयायी' आहेत अशी स्पष्टोक्तीही ढसाळांनी केलेली दिसते.

या आंधळ्या शतकात भारतीय राजकारणाची झालेली वैचारिक शोकांतिका विविध लेखांमधून त्यांची मांडली आहे.

अनुक्रमणिका

भारतीय राजकारण आज गावठी हुकुमशाहीकडे झुकू लागल्याचे चित्र त्यातून पुढे येते. यात साम्यवादी चळवळीची झालेली शोकांतिका, डाव्या चळवळीतला दुबळा नेभळटपणा, साम्यवादापासून तुटत गेलेले समाजवादी यांच्याविषयीची नोंद 'सतीचं वाण डाव्या पुरोगाम्यांना पेललं नाही. सुसरीन बाय तुझी पाठण मऊ म्हणण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे' या शब्दांत केली आहे. अन्य मागासवर्गीयांची एकजूट संसदीय राजकारणात करणारे राम मनोहर लोहिया यांचे प्रयत्न ढसाळांना महत्त्वाचे वाटतात. पण पुढे जे जमातवादी व धर्माधिष्ठित सांप्रदायिक राजकारण निर्माण होत गेले, त्या जमातवादी राजकारणानेच विविध आव्हाने उभी केली, हे ढसाळांचे निरीक्षण आहे. या आंधळ्या शतकातल्या अनेकविध ऱ्हासशील गोष्टींविषयीचे चिंतन या स्फुट लेखसंग्रहात आलेले आहे. 'आंधळ्याची काठी भाग १ व भाग २' या लेखांमध्ये भैय्यासाहेब आंबेडकरांच्या मृत्यूनंतर त्यांच्या मनस्वी जगण्याचे व वृत्ती प्रवृत्तीचे दर्शन ढसाळांनी चित्रित केलेले दिसते. डॉ. आंबेडकर यांच्या मृत्यूनंतर उत्तराधिकारी पदासाठी घडलेल्या गोष्टी नोंदवून आंबेडकरी विचारांची आवश्यकता कशासाठी याची चर्चा ते करतात. आंबेडकरी विचाराचे विश्व व्यापक व प्रचंड आहे याची जाणीव करून देतात. ''आज आंधळाही नाही, त्याची काठीही नाही. परंतु आंधळ्याला आणि काठीला मार्ग दाखवणारा आंबेडकरी विचार आहे. तो आहे तसाच स्वीकारणे हेच शहाणपणाचे आहे.'' यावर ढसाळांचा भर आहे.

या लेखांमधून अनेकविध व्यक्तींची शब्दचित्रे अनोख्या ढंगात ते साकारतात. पण केवळ व्यक्ती रंगवणे हे ढसाळांचे उद्दिष्ट नाही. ती व्यक्ती, तिचे जगणे, त्या व्यक्तीचा विचार या लेखनाच्या केंद्रस्थानी असतो. कुमारी मातेचे आयुष्य स्वीकारणारी नीना गुप्ता, सूड घेण्यासाठी डाकू बनलेली व शेवटी धर्मांतर करून बौद्ध बनलेली दस्यूकन्या फूलन, 'गांधी मला भेटला' नावाची कविता लिहिणारा वसंत दत्तात्रय गुर्जर, जागतिक दर्जाचे लेखन करूनही परवड झालेला लेखक भाऊ पाध्ये, सामाजिक न्यायाचा लढा लढणारा लोहशाहीर रामभाऊ नगरकर; अस्सल कवी म्हणूनच आयुष्यभर जगणारा मन्या ओक अशा अनेकांविषयी ढसाळ आत्मियतेने लेखन करतात. या सर्व लोकांनी स्वतःचे आयुष्य जगण्याच्या भूमिका स्वतःहूनच स्वीकारल्या होत्या; पण त्याचबरोबर त्यांच्या जगण्याला व विचाराला आटोपशीर शब्दांत चित्रित केल्याने त्याला विचारचित्राचेही कोंदण लाभलेले आहे. 'आंधळे शतक' मधून माणसांवर प्रेम करणाऱ्या नामदेव ढसाळांचे जसे प्रत्यंतर येते, तसेच विविध वादांच्या संदर्भातील ढसाळांचा अभ्यास व त्यांच्या सूक्ष्म निरीक्षणांचेही प्रत्यंतर येते. त्यांचे शब्दवैभव आणि सखोल विचारांचे दर्शन घडवणारी ओघवती शब्दकळा यामुळे थेट वाचकांच्या अंतःकरणापर्यंत ढसाळ पोचतात. एखाद्याला गदगद हलवून जागे करण्याचे सामर्थ्य त्यांच्या लेखनातून प्रत्ययाला येते. विसाव्या शतकातील ऱ्हासकालाचे जितेजागते चित्र समाजासमोर उभे करण्याचे सामर्थ्य त्यांना लाभले आहेच. कवीमनाची संवेदनशीलता त्यातून उमटते तशीच कार्यकर्त्यांच्या मनातला अंगारही त्यातून उदित होतो. एका अर्थाने या छोट्या छोट्या विचारशलाका आहेत. वाचकाला त्या अस्वस्थ बनवतात आणि विचार करायला भाग पाडतात. म्हणूनच ते ऱ्हासकालाचे प्रभावी चित्रदर्शन म्हणून लक्षात राहाते. जागतिक पातळीवरच्या विविध घटना, अर्थकारणाशी संबंधित घडामोडी, इतिहास, तत्त्वज्ञान याविषयीचे विचारमंथन, वारकरी संप्रदाशाशी निगडीत उदारमतवादी विचारसरणीचा समकालातील विचारांशी सांधेजोड, कला व साहित्य यांचे चिंतन असा एक बहुआयामी पट 'आंधळे शतक' मधून उलगडाला गेला आहे. त्याचीच पुढची दिशा 'सर्व काही समष्टीसाठी' मधून अधोरेखित झालेली दिसते. ढसाळ यांचे हे वैचारिक लेखन त्यांच्या विद्वता, व्यासंग व समकालाला प्रतिसाद देत झाल्याने त्यात एक उत्स्फूर्तता व जिवंतपणा येत जातो. वाचकाला खेचत नेण्याची ताकद या त्यांच्या दोन्ही संग्रहातून लक्षात येते.

सर्व काही समष्टीसाठी : साहित्य, समाजाचा व्यापक वेध

'सर्व काही समष्टीसाठी' मधील लेखन ४ ऑगस्ट २००१ ते १७ जून २००६ या काळातील आहे. एका व्यापक परिप्रेक्षात हे चिंतन मांडले गेले आहे. 'आंधळे शतक' मधील काही लेखांची पुनर्मांडणीही त्यातून लक्षात येते. पूर्वी लेखनातून जे निसटले त्याची नोंद या समान विषयाच्या मांडणीत बघण्यास मिळते. समष्टीचा विचार समाजधारणेत व तत्त्वज्ञानातही महत्त्वाचा ठरतो. कालौघात जे बदलत जाते त्यातून हाती काय येते ? या प्रश्नाचा शोध चिंतनशील व संवेदनशील लेखक करीत असतो कित्येकदा तो अस्वस्थ होतो, आतून पेटून उठतो पण त्याचबरोबर तो स्वतःला बदलूही पाहतो. एका विशिष्ट काळात मांडलेल्या विचाराला त्याने कडाडून केलेला विरोध हळूहळू मावळत जातो. ज्यांना विरोध केला त्यांच्या बदलत जाणाऱ्या भूमिका त्या लेखकाला विचारप्रवृत्त करण्यास भाग पाडतात. एका अर्थाने प्रगल्भतेकडे होत जाणारी ही वाटचाल असते. नामदेव ढसाळ यांच्या या प्रगल्भ व वैचारिक वाटचालीचा लेखाजोगा 'सर्व काही समष्टीसाठी' मधून मांडाल्या जातो. ढसाळ यांचे हे वैचारिक गद्यलेखन 'डिफर' होता होता 'कम टू गेदर'च्या दिशेने वाटचाल करताना दिसते. ढसाळ यांना विचारांचा कोणताच प्रांत वर्ज्य नाही. वैचारिक

अस्पृश्यतेला ते स्वतःच्या जगण्यात आणि विचारात कुठेच थारा देत नाहीत. म्हणूनच त्यांची चिंतकाची भूमिका अधिकाधिक पारदर्शी बनत जाते. झापडबंद वैचारिकतेच्या सूत्राला कवटाळणारे आपल्याला अव्हेरतील याची फिकिर ते कधीच करीत नाहीत. जे बोलायचे, करायचे ते रोखठोकपणे, स्पष्टपणे आणि निर्भीडपणे हीच त्यांची वृत्ती आहे. या लेखनातही ती तशीच प्रकटते आणि म्हणूनच त्यांचे हे चिंतनपर लेखन एका वेगळ्या उंचीवरून अनुभवता येते.

'समष्टीचे भान हरवू लागलेली साहित्य चळवळ' या पहिल्या चिंतनपर लेखापासून 'विंदांच्या अष्टदर्शनी कविता' या शेवटच्या लेखापर्यंत झालेला हा विस्तार साहित्य, समाज, धर्म, राजकारण, इतिहास अशा अनेकविध अंगांनी झालेला आहे. मराठी साहित्याच्या साचलेपणाविरूद्ध समर्थ द्रष्टा उच्चार करणारे दलित साहित्य नंतरच्या काळात कसे झाले व ते तसे का झाले? याची चिकित्सा ढसाळ यांनी केली आहे. त्यातील सवंग निर्मिती, अप टू डेट होता न येणे, नकाराने विधायकतेला आत्मसात न करणे, दलित साहित्य निर्मितीत नवा मूलतत्त्ववाद निर्माण होणे, सवंग निर्मितीतून मूळ उद्दिष्टांशी विसंवादितता निर्माण होणे, सर्जनापेक्षा केवळ तात्त्विक भाष्यकार होण्याची आवड असणे यामुळे दलित साहित्याची कोंडी झाली आहे. आत्मनिष्ठेमुळे व समष्टीचे भान हरवून बसल्याने हे घडले आहे, अशी परखड चिकित्सा नामदेव ढसाळ करतात. साहित्य आणि साहित्यिक यांच्यावर निरपेक्ष प्रेम करणारा नामदेव ढसाळ नावाचा विचारवंत त्यांच्या लेखनातून सतत डोकावत राहतो. साहित्याच्या सकसतेचे भान कायमच मनात ठाण मांडून असल्याने त्या सकसतेला केंद्रस्थानी ठेवूनच ही बहुरंगी मांडणी झालेली आहे. अण्णाभाऊ आणि शाहीर अमरशेख यांनी अन्नपाण्यासाठी वंचित असलेली व संघर्ष करणारी समष्टी आपलीच आहे याची जाण ठेवली. त्यांचा मोठेपणा मरणोत्तर काळात ध्यानात घेतला गेला याची खंत ढसाळांना वाटते. अण्णाभाऊ, अमर शेख व गव्हाणकर या शाहिरांनी शोषितांच्या दुःखाला फोडलेली वाचा, त्यांनी घडविलेली बहुजनांची अभिरूची, वर्ण - वर्ग - धर्म यांच्या पलीकडे जाऊन त्यांनी बघितलेले नव्या जगाचे स्वप्न, परिवर्तनासाठी त्यांनी केलेली लोकनाट्ये, विविध चळवळीतील त्यांचे योगदान या विषयीची बारकाईने मांडणी केली आहे. त्यातून तो काळ तर लक्षात येतोच, पण या सर्व घटनांकडे बघण्याची ऐतिहासिक दृष्टीही ध्यानात घेता येते. सरदार जाफरी यांच्या निधनानंतर त्यांच्याविषयीची आत्मीय भावना व्यक्त होताना ढसाळ यांच्या व्यक्तिमत्त्वातील कवी प्रकर्षाने जागा झालेला दिसतो. उर्दूच्या विकासाची परंपरा, उर्दू लेखनातील वैविध्य, फाळणीनंतरच्या द्वेष भावनेला दूर फेकू पाहणारी जाफरींची 'सरहद' कविता व त्यातील प्रत्यक्षात न आलेले वास्तव ढसाळ यांनी अधोरेखित केले आहे. दोन कवींच्या सहसंवेदनेचा प्रत्यय 'सरदार कहाँ हे मैं। ल में?' या शीर्षकातून ध्वनित होतो. पु. लं.चे प्रस्थापितांपेक्षा असणारे वेगळेपण त्यांच्या निधनानंतर नोंदवताना शेवटपर्यंत त्यांना भेटल्याची सलही या लेखनातून व्यक्त होते. दलित साहित्य आणि दलित साहित्यिकांशी पुलंचा असणारा ऋणानुबंध ते साधार उलगडतात. 'पुल वृत्तांत' या डॉक्युमेंटरीमध्ये दलित साहित्याविषयी पु. ल. देशपांडे जे बोलले त्याची आठवण इथे ताजी होते. पुलंची गुणग्राहकता, नामांतराविषयी त्यांची सकारात्मक दृष्टी, अभिनिवेश न बाळगता दलित चळवळीच्या पाठीशी उभे राहण्याची भूमिका आणि डॉ. आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणानंतर त्यांच्या अंत्ययात्रेचे आकाशवाणीवरून पुलंनी केलेले समालोचन अशा गोष्टींवरही प्रकाश पडतो. पुलंचा विनोद आणि त्यांचे नाट्यलेखन यातील वेगळेपणही ढसाळांना भावलेले आहे. प्रबोधनकार ठाकरे यांचे समाजपरिवर्तनाचे काम, ब्राह्मणी संस्कृतीचा त्यांनी केलेला दंभस्फोट, कर्मकांडाला स्वतःच्या वैयक्तिक जीवनातही केलेला विरोध आणि त्यांनी केलेले वास्तव लेखन ढसाळ यांच्या लेखनातून मांडले जाते. प्रबोधनकारांचे मर्मभेदी लेखन, त्याला लाभलेले सामाजिक संदर्भ, धर्म व रूढी परंपरेच्या विरोधात घेतलेली खंबीर भूमिका, डॉ. आंबेडकर यांच्याशी असणारा वैचारिक व वैयक्तिक ऋणानुबंध अशा अनेकविध बाबी त्यातून सूचित होतात.

विजया राजाध्यक्षांच्या कथा लेखनावर ढसाळ यांनी केलेले चिंतन हे समीक्षेच्या पातळीवर जाणारे आहे. स्त्रीच्या आंतरिक दुःखावर बोट ठेवणाऱ्या कथाकार अशी त्यांच्या लेखनाची भलावण त्यांनी केली आहे. कमल देसाई व विजयाबाईंच्या कथेची तुलना करताना विजयाबाईंच्या कथालेखनाचा विस्तार अधिक असल्याने त्यांचे लेखन मूळ मुद्यांपासून व लक्षणीयतेपासून ढळते हे नामदेव ढसाळांचे निरीक्षण आहे. विजयाबाईंच्या कवितेवरील समीक्षा लेखनाचा धांडोळाही या लेखनात घेतलेला आहे. या समीक्षेत बांधिलकी व मराठी कवितेच्या प्रकरणात त्यांनी स्पष्ट प्रतिक्रिया दिल्या नाहीत. त्यांची भूमिका गुडीगुडी आहे. तरीही त्यांच्या कथालेखनात स्त्रियांचे अंतररंग, अनुभव व जगण्या मरण्याचे द्वंद्व प्रकट होते. भालचंद्र फडके यांनी विजयाबाईंच्या कथेचे केलेले मूल्यमापन ढसाळ यांना रूचलेले नसल्याने नव्या समीक्षकांनी विजयाबाईंना न्याय द्यावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे. ढसाळ यांची समीक्षेची चिकित्सक दृष्टी इथे

व्यक्त होते. याच स्वरूपाची नामदेव ढसाळ यांची भूमिका दि. पु. चित्रे यांच्या संदर्भातही जाणवते. त्यात मराठी समीक्षेचा परखड समाचार ढसाळ यांनी घेतलेला आहे. विद्यापीठाच्या कवितास्वादाने साहित्यिक मूल्य मारून टाकले वा मराठी समीक्षा कोळशाचा भार रचते, अशी टोकाची विधाने ते करतात. याचे कारण दिलीप चित्रे यांची कविता कळत नसल्याचे समीक्षकांनी म्हटले होते. तुकारामाला आणि ज्ञानेश्वरला ज्यांनी छळले ते दिलीप चित्रे किंवा नामदेव ढसाळांना कसे समजून घेणार? अशी खंतही त्यात डोकावते. चित्रे यांच्या कवितेत भाषेचे नागर, अभयारण्य पेरलेले दिसते. त्यात आदिअंताचा व अंतराळाचा ठाव घेतलेला असतो. ज्ञान, विज्ञान व संस्कृतीचे दर्शन असते. दिलीपची भाषा पुराच्या पाण्यासारखी सुसाट, नागरी व वादळी असते, याकडे ढसाळ यांनी लक्ष वेधलेले आहे. अण्णाभाऊ साठेंच्या जयंतीनिमित्त लिहिलेल्या लेखात मराठी वाङ्मयीन समीक्षेने व तिला विरोध करणाऱ्या अप्रस्थापितांच्या वाङ्मयीन समीक्षेनेही अण्णाभाऊंच्या वर्गहीन, वर्णहीन साहित्यिक अभिव्यक्तीला मनापासून दाद, मान्यता दिली नाही, याचा रोष व्यक्त झालेला आहे. अण्णाभाऊंच्या लेखनाचा अंतःस्वर सामाजिक वास्तव, सांस्कृतिक विषमता, भुकेकंगालांचे जग यांच्याशी कसा निगडीत आहे. हेही ढसाळ यांनी सोदाहरण नमूद केले आहे. साहित्यविश्वाशी निगडीत असणारे बरेच लेख 'सर्व काही समक्षीसाठी'मध्ये आलेले आहेत. ते आंतरराष्ट्रीय साहित्य महोत्सव, बर्लिन आणि आम्ही, आमुच्या कवि कुळा बोलू लागेल गा, मराठी वाङ्मयातले समाजवादी रोमँटिसिझमचे युग संपले, समरसता मंचाविषयी थोडेसे काही, विंदांची अष्टदर्शनी कविता अशा लेखांमधूनही नामदेव ढसाळ यांची साहित्याकडे व्यापक दृष्टीने पाहण्याची वृत्ती प्रकट होते. त्यांच्या साहित्यविषयक लेखांचा विचार केला तर या क्षेत्रातील अनेकविध प्रश्न, अभिव्यक्तीचे वेगळेपण, समीक्षकांची कोती दृष्टी यावर प्रकाश पडतो. सकस साहित्याचा पुरस्कार करणारा एक लेखक, कवी आणि समीक्षक म्हणूनही ढसाळ यांच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन त्यातून घडते. टोकाला जाऊन केलेली विधाने व त्यातून प्रकटणारा रोष मान्य करूनही जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन साहित्यविषयी आत्यंतिक तळमळीने विचार करणारा अभ्यासक या लेखनातून डोकावत राहतो.

नामदेव ढसाळांची भूमिका समष्टीचा विचार करण्यास प्राधान्य देणारी आहे. देव व समष्टीच्या हिताकडे दुर्लक्ष करणाऱ्या मानवाधिकार चळवळी, अमेरिका, रशिया आणि हिंदूस्थान यांच्या मैत्रीचा त्रिकोण, आण्विकी करण्याची अपरिहार्यता आणि हिंदुस्थान, स्वतंत्र काश्मीरपेक्षा स्वायत्त काश्मीर बरा, धगधगता इंडोनेशिया आणि आपण, श्रीलंकेतील वांशिक समस्येचा तिढा आणि इतिहास, चीनपासूनही हिंदुस्थानने सावध असायला हवे, महाराष्ट्र धर्माची संकल्पना, भाषावार प्रांतरचना आणि बाबासाहेब, लोकशाही व्यवस्था शाप की वरदान! राजकीय स्थैर्य, सर्वच पक्षांना आत्मपरीक्षणाची गरज, घटनेत आता बदल आवश्यक!, राखीव जागा, सर्वोच्च नायालय आणि लोकमानस अशा अनेकविध विषयांवर नामदेव ढसाळ यांनी मुक्त चिंतन मांडलेले आहे. त्यात देशातील प्रश्न, राजकारण, देशातंर्गत घडामोडी, आंतरराष्ट्रीय राजकारण यांचा समावेश होतो. अनेकविध प्रश्नांची नेमकी जाण ढसाळ यांना आहे. या विविध प्रश्नांकडे ते व्यापक समाजहित किंवा समष्टीचे हित यादृष्टीने पाहतात. या सर्व विषयांमध्ये संचार करताना मानवी कल्याणाच्या दृष्टीने विचार करीत जातात. साहित्य आणि मानवी समाज यांचा व्यापक वेध घेण्याची ढसाळांची भूमिका इथे प्राधान्याने प्रकट झालेली दिसते. चिंतनाची डूब या लेखनाला तर आहेच पण मानवी कल्याणाचा व्यापक विचार करणारा एक पट त्यातून उभा राहतो. मुख्य म्हणजे ढसाळ यांच्या विस्तृत वाचनाचा, सूक्ष्म निरीक्षणाचा, अभ्यासपूर्ण वृत्तीचा, अचूक जाणकारीचा प्रत्यय त्यातून येतो. वस्तुतः हे वृत्तपत्रीय लेखन आहे. तरीही त्यातील वैचारिकता थेट काळजात घुसून वाचकाला अस्वस्थ करणारी आहे. 'सर्व काही समष्टीसाठी'च्या प्रस्तावनेत दिनू रणदिवे यांनी म्हटले आहे की, ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अनेक विषयांचा दांडगा अभ्यास होता. ते जिवंत असताना हा नामदेव त्यांना आढळला असता तर त्यांनी त्याचे नामांतर 'ज्ञान'देव असे करून त्यांना आपल्या संग्रहातील अनेक ग्रंथ भेट म्हणून दिले असते'' या विधानाचे प्रत्यंतर हे दोन्ही चिंतनपर लेखसंग्रह वाचताना येते. ज्ञानलालसेची तृष्णा, सामाजिक बांधिलकी, जातधर्माच्या पलीकडे नेणारा व्यापक समाजहिताचा विचार ही नामदेव ढसाळ यांच्या लेखनाची व व्यक्तिमत्त्वाचीही वैशिष्ट्ये आहेत. आंधळ्या शतकाने ऱ्हासशीलतेचा कटु व विदारक अनुभव पदरात टाकला. पण त्यावर मात करण्यासाठी आपमतलबी व स्वार्थी वृत्तीच्या पलीकडे जाऊन विचार केला तर सर्व काही समष्टीसाठी असते ही जाणीव प्रत्येकानेच मनात खोलवर रूजवायला हवी, असा आशावादी विचार नामदेव ढसाळांनी दिला. त्यांचे हे वैचारिक गद्यलेखन, मुक्त चिंतन 'माणसाचेच गाणे गावे माणसाने' या विचाराच्या भक्कम अधिष्ठानावर उभे आहे, असेच म्हणावे लागेल.

आंबेडकरी चळवळ : सोशालिस्ट, कम्युनिस्ट

दोन वेगवेगळ्या स्तंभलेखनातून नामदेव ढसाळ यांनी

केलेले चिंतन बहुआयामी झाल्याचे दिसते. पण त्यांच्या गद्यलेखनातील विशिष्ट विषय केंद्रस्थानी ठेवून केलेले अभ्यासपूर्ण विवेचन 'आंबेडकरी चळवळ आणि सोशालिस्ट कम्युनिस्ट' या पुस्तिकेत बघता येते. यात दोन भाग केले असून पहिल्या भागात समाजवाद्यांनी आणि कम्युनिस्टांनी बाबासाहेबांना शत्रू मानल्याने दलित चळवळीचा अडसर सोशालिस्ट व कम्युनिस्ट हे दोन पुरोगामी पक्षच ठरतात, याचे ठोस विवेचन करण्यात आले आहे. तर दुसऱ्या भागात कामगार आणि शेतकरी यांच्या चळवळीशी असलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाते स्पष्ट करण्यासाठी त्यांच्या विचारांचे 'संकलन' करून त्या आधारे मांडणी करण्यात आली आहे. या व्यतिरिक्त या पुस्तिकेतच स्वतंत्र मजूर पक्षाचा जाहीरनामाही प्रकाशित केलेला दिसतो. 'राज्ये ती अल्पसंख्यांक' या पुस्तकातून घेतलेला 'शासकीय समाजवाद' हा डॉ. आंबेडकरांचा विचारप्रवर्तक लेखही छापलेला आहे. दलित चळवळीला कामगारांच्या चळवळीपासून डाव्या पक्षांनी दूर ठेवले. बाबासाहेबांना कामगारांच्या चळवळीविषयी आस्था होती. ते कधीही कामगार चळवळीच्या विरोधात गेले नाहीत याऊलट डाव्या चळवळीचे नेतृत्त्व मात्र विरोधात गेले हेच येथे दाखवून देण्याची भूमिका आहे. थोडक्यात आंबेडकरी विचारांच्या प्रभावातील दलित चळवळ आणि सोशालिस्ट, कम्युनिस्टांच्या विचारातील अंतर लक्षात यावे या भूमिकेला या पुस्तिकेत प्राधान्य मिळालेले दिसते.

डॉ. राम मनोहर लोहिया यांच्या अस्पृश्यता नष्ट करण्याच्या सिद्धांताने भारल्याने त्यांच्या समाजवादी पक्षात नामदेव ढसाळ एक साधा कार्यकर्ता म्हणून कार्यरत होते. त्याअगोदर समाजवादी पक्षाशी संबंध असलेल्या मोडक मास्तरांचा संस्कार आपल्यावर कसा झाला याची नोंद ढसाळांनी केली आहे. समाजवादी पक्षाची ही राजकीय दीक्षा त्यांनी घेतली होती. किंबहुना समाजवादी समाजरचनेच्या जाणिवा स्वीकारल्या तर दलितांची सर्व प्रकारच्या शोषणापासून मुक्ती होऊ शकते. ही त्यांची ठाम धारणाही इथे लक्षात येते. शास्त्रशुद्ध समाजवादी जाणिवेचा अभाव आणि डाव्यांनी व समाजवाद्यांनी उडवलेला गोंधळ यामुळे शास्त्रशुद्ध पद्धतीने काम करण्यास आपण असमर्थ ठरल्याची कबुलीही ढसाळ यांनी दिली आहे. तत्कालीन प्रजासमाजवादी पक्ष, त्याच्या अंतर्गत असणारे दोन पक्ष एक लकवामार ज्यात वरपांगी गोष्टी होत्या, तर दुसरा सच्चे समाजवादी नेते डॉ. लोहिया यांचा खरा समाजवादी पक्ष होता. या पक्षातील समकालीन मित्रांनी काढलेला समता मोर्चा ही महत्त्वाचा ठरला. त्यानंतर महाराष्ट्रभर दलितांवर अन्याय झाला, बहिष्कार टाकला गेला, स्त्रियांवर बलात्कार झाले. इंदापूर बावडा प्रकरणाने दलित पँथरचा उदय झाला. बाबासाहेबांच्या नंतरच्या समन्वयवादी व तडजोडवादी दलित नेतृत्त्वाकडून अत्याचार थांबवले जाऊ शकत नाहीत, डावे एकदोन मोर्चांच्या पलीकडे जात नाहीत. यात दलित कार्यकर्त्यांची घुसमट झाली होती. ट्रेड युनियनवाले व जॉर्ज फर्नांडीस यांना कामगारांशिवाय दलित प्रश्न महत्त्वाचे वाटत नव्हते. यातूनच संयुक्त समाजवादी पक्षाशी काडीमोड घेऊन पँथर अस्तिवात आली. दलितांवर होणाऱ्या अत्याचारांच्या प्रतिक्रियेतून व डॉ. आंबेडकरांना मानणाऱ्या कार्यकर्त्यांच्या एकत्रीकरणातून पँथरचा जन्म झाल्याचे या लेखात ढसाळ यांनी स्पष्ट केलेले दिसते. वर्ण व वर्गलढ्याशिवाय दलितोद्धार होणार नाही ही भावना प्रबळ झाली होती. वरळीची दंगल हे निमित्त घडले व त्यातून पुरोगामी व डाव्या चळवळीतील अंतर्विरोध उघड झाला. पँथरचा झंझावत सुरू झाल्यानंतर समाजवादी व कम्युनिस्ट यातला फरक कळला. डाव्या पक्षातील खेचाखेची व मारामाऱ्यांमुळे पँथर दुबळी झाल्याची कबुलीही ढसाळ यांनी दिली आहे. रिपब्लिकन पार्टी व त्यातील सर्व गटांनी पँथरचे नाव घेणे सोडून दिले. डॉ. बाबा आढावांनीही पँथरमध्ये फूट पाडली. परिणामी पँथर या दलित संघटनेचे आट्यापाट्याच्या मैदानात रूपांतर झाले. समाजवादी एकीकडे ओढत होते तर दुसऱ्या बाजूने कम्युनिस्ट ओढत होते. नामदेव ढसाळांनी एका अर्थाने आपल्या समकालीन चळवळीचा इतिहास याप्रमाणे नोंदवला आहे. कम्युनिस्ट नेत्यांची डॉ. आंबेडकरांच्या संदर्भात असलेली भूमिका आकसाची होती. त्याचा परामर्श नामदेव ढसाळ यांनी घेतला आहे. वस्तुतः कम्युनिस्ट जोपर्यंत आंबेडकरी चळवळीचा अभ्यास करणार नाहीत तोपर्यंत हिंदुस्थानात त्यांना वर्गहीन समाज निर्माण करता येणार नाही अशी त्यांची धारणा आहे. साम्यवादी व समाजवादी यांना आंबेडकरी चळवळीचे आकलन न झाल्याने त्यांचे आंबेडकरांवरील हल्ले पारंपरिक विचारसरणीतून, युरोपातील लोकशाहीच्या अथवा मार्क्सवादाच्या पुस्तकी ज्ञानावर आधारलेले होते. आंबेडकरांचा लढा हा मूलतः सामाजिक, भौतिक उत्थापनासाठी - समतेसाठी होता, हे कम्युनिस्टांना कळले नाही अशी वैयक्तिक प्रतिक्रिया ढसाळ यांनी व्यक्त केली आहे. या निमित्ताने आंबेडकरांचा उदारमतवादी व सुधारणावादी दृष्टीकोन त्यांनी स्पष्ट केलेला दिसतो. डॉ. आंबेडकरांचा संसदीय मार्ग आणि डॉ. आंबेडकरांचे धर्मांतर याबाबतची त्यांची मते व डाव्यांचे विचार यांचा परामर्श त्यांनी घेतलेला दिसतो. नामदेव ढसाळ यांची समाजवादी व कम्युनिस्ट यांच्याबाबतीतली निरीक्षणे त्यांच्या आंबेडकरी


विचारधारेच्या अभ्यासावर आणि स्वानुभवावर घेतलेली आहेत. सामाजिक व राजकीय कार्यकर्ता या दृष्टीने ही निरीक्षणे महत्त्वाची ठरावीत.

या पुस्तिकेच्या दुसऱ्या भागात कामगार आणि शेतकरी यांच्या चळवळीशी असलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाते नेमके कोणत्या प्रकारचे होते हे त्यांच्याच विचारांच्या आधारे दाखविण्याचे काम नामदेव ढसाळ यांनी केले आहे. १९३६ ला 'स्वतंत्र मजूर पक्ष' हा राजकीय पक्ष डॉ. आंबेडकर यांनी स्थापन केला. त्यांच्या जाहीरनाम्यात भूमिहीन, गरीबकुळे, शेतकरी व कामगार यांच्या गरजा व गाऱ्हानी मांडलेली आहेत. या जाहीरनाम्यात ज्या गोष्टींचे स्पष्टीकरण करण्यात आले होते त्यावर ढसाळांचा भर आहे. त्यातून प्रकट होणारी जनहिताबद्दलची दक्षता, इंग्रजी दैनिकाचे यासंदर्भातले मत, टाईम्स ऑफ इंडियाला डॉ. आंबेडकरांनी दिलेली मुलाखत, त्यांचे परदेशी जाणे, परतल्यानंतर त्यांनी केलेला प्रचार, साहित्यसम्राट केळकरांचा पुरस्कार, पुणेकर ब्राह्मणांबरोबर डॉ. आंबेडकरांची झालेली युती, निवडणुकीतील यश, नवीन राज्यघटना राबविण्यासंबंधी स्वतंत्र मजूर पक्षाच्या, सभेत जाहीर करणे अशा अनेकविध बाबींची नोंद व त्यावरची निरीक्षणे ढसाळांनी नोंदवली आहेत. कामगार चळवळीशी डॉ. आंबेडकरांचे असणारे नातेही त्यांनी स्पष्ट केले आहे. कम्युनिस्टांचे आपण वैरी आहोत कारण ते राजकीय ध्येयसिद्धीसाठी कामगारांना राबवतात असे आंबेडकरांचे मत होते. विधीमंडळावरील शेतकऱ्यांचा मोर्चा शेतावर काम करणाऱ्या मजुरांचे किमान वेतन ठरविण्यासाठी केलेली मागणी, शेतकऱ्यांच्या प्रश्नावर राज्यकर्त्या पक्षाबरोबर आंबेडकरांची झालेली खडाजंगी, नगर येथे १९१८ ला शेतकरी व कामगार यांच्या परिषदेत त्यांनी केलेले मार्गदर्शन, मनमाड येथील वीस हजार अस्पृश्य रेल्वे कामगारांच्या परिषदेतील त्यांनी मांडलेली कामगार विषयक भूमिका, मानवेंद्र रॉय यांच्या भूमिकेला विरोध करताना असणारा त्यांचा कामगारहिताचा विचार औद्योगिक कलहाचे विधेयक कामगारांच्या हक्काला बाधा आणते म्हणून त्याविरूद्ध कामगारांचा घडवलेला संप व अखेरीस प्रथम श्रेणीचे कामगार नेते म्हणून आंबेडकरांची झालेली कीर्ती या साऱ्या घटनांवर खास प्रकाशझोत टाकण्याचे काम नामदेव ढसाळांनी केले आहे. बाबासाहेब कामगार चळवळीच्या विरोधात कधीच नव्हते. तरीही त्यांच्यावर आक्षेप घेतले गेले. परिणामी कामगार वर्गाची डावी चळवळ व दलित चळवळ यात अंतर निर्माण झाले. कामगार चळवळीसंबंधी डॉ. आंबेडकरांची आस्था 'शासकीय समाजवाद' या लेखातही व्यक्त झाल्याने तो लेखही विचारार्थ ढसाळांनी याच पुस्तिकेत छापला आहे. खासगी मालकांची हुकूमशाही असे स्वरूप न येता शेती व औद्योगिक क्षेत्रात विकासासाठी भारताला शासकीय समाजवाद अपेक्षित असल्याची भूमिका डॉ आंबेडकरांनी मांडली होती. याकडे त्यांनी लक्ष वेधले आहे

एकूणच डॉ. आंबेडकर श्रमिक, कष्टकरी शोषित, वंचित, दलित, पीडीत आणि सर्वांच्या उद्धाराचं स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी धडपडत होते. नामदेव ढसाळ यांच्या वैचारिक भूमिकेवर व गद्य लेखनावर तीच छाप असल्याने ते अर्थपूर्ण व मानवताप्रधान भूमिकेला प्राधान्य देणारे ठरते असे म्हणता येईल. प्रजासमाजवादी व डॉ. लोहिया प्रभावीत समाजवादी पक्ष, डाव्यांच्या चळवळीतील सहभाग व अखेरीस आंबेडकरी विचारांची कास धरीत दलित पँथरची निर्मिती या सर्व गोष्टींमधून नामदेव ढसाळ यांच्या वैचारिकतेचे अधिष्ठान तयार झालेले आहे. त्यांच्या वैचारिक भूमिकेविषयी मतभेद निर्माण झाले तरी त्यांची मूळ वैचारिक बैठक आंबेडकरी विचारधारेवर आधारलेली आहे, हे नाकरता येत नाही. महाराष्ट्रातील वैचारिक संघर्षाचा इतिहास मांडण्यासाठी ढसाळ यांच्या भूमिकेचा विचार करणे आवश्यक ठरते. अगदी अलीकडच्या काळात 'दलित पँथर' या विषयावरचे नामदेव ढसाळ यांचे पुस्तक प्रकाशित झाले आहे. त्यातही पँथरची निर्मिती व संघर्षाची कहाणी मांडली गेली आहे. (प्रस्तुत पुस्तकाच्या अनुपलब्धतेमुळे त्याची इथे केवळ नोंद केली आहे.)

नामदेव ढसाळ यांच्या चिंतनपर व वैचारिक गद्यलेखनाचा एकत्रित विचार केला तर त्यांची आंबेडकरवादी भूमिका, सच्चेपणाचा स्वीकार, ऐतिहासिक दृष्टी व सर्वहारा समाजाच्या उद्धाराची भूमिका प्रत्ययाला येते. त्यांच्या या भक्कम मांडणीला आधार आहे तो त्यांच्या संपन्न व प्रभावी भाषाशैलीचा. अत्यंत ठाशीवपणे, युक्तिवाद चातुर्याचा वापर करीत परखड व स्पष्ट प्रतिपादन करणारी शैली त्यांनी आत्मसात केली आहे. या संपूर्ण लेखनात कटुता वा तिरस्काराची भावना आढळत नाही. सामाजिक विकासाच्या लढाईत एका निष्ठावान सैनिकाचे हे चिंतन थेट काळजात घुसणारे आणि विचार करायला भाग पाडणारे आहे. मर्मभेदी शैली आणि प्रखर वास्तवाचा लेखाजोगा यामुळे त्यांची उंची वाढली आहे. कवी ढसाळांपेक्षा वेगळे असणारे त्यांचे हे रूप तितकेच विलोभनीय व दिलखेचक आहे.

■ डॉ. सतीश बडवे
विभाग प्रमुख, मराठी भाषा व वाङ्मय विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
औरंगाबाद.
भ्रमणभाष ९१५८९९७७९७



नामदेव ढसाळ यांच्या कवितेतील स्त्रीरूपे

डॉ. अरूणा देशमुख

नामदेव ढसाळ हा कवी विलक्षण अशा प्रतिभेचा धनी आहे. त्याच्या कवितांमधून दिसणारे त्याचे व्यक्तिमत्त्व अफाट अशा समुद्राच्या पोटातल्या गिरीकंदासारखे आहे. या समुद्रातून लाव्ह्याचा स्फोट होतो आणि तो लाव्हा भवतीच्या पाण्याची वाफ करीत अस्तित्वाला छान शेकून काढतो. या समुद्रात वाहणाऱ्या जोरकस अंतःप्रवाहाने हे व्यक्तित्त्व तोलून धरलेले असते आणि त्या अतःप्रवाहाचा खळाळ त्यांच्या कवितेत सततच कानावर पडत असतो. या समुद्रात एक बर्म्युडा प्रदेशही आहे. या प्रदेशाच्या तडाख्यात वाचक सापडला की तो कायमच त्या प्रदेशाचा नागरिक होऊन जातो. फरक इतकाच की त्याच्या दुनियेत तो परत येतो तेव्हा या प्रदेशाचे नागरिकत्व मोठ्या दिमाखाने मिरवतच येतो.

नामदेव ढसाळ स्वतःच्या अस्तित्वाची जमीन खणून काढत, नांगरण करीत कवितालेखन करतात त्यामुळे त्यांची कविता कुठल्यातरी एका चौकटीचे नाव देऊन वर्णिता येत नाही. सर्वंकष परिवर्तनाशी स्वतःची नाळ ते जोडून घेतात तेव्हा परिवर्तनाच्या संदर्भातली जागतिक सांधेजोड त्यांच्या कवितेत होताना दिसते आणि याबाबतीतली रुढ चौकट उल्लंघिली जाते. त्यांना आंबेडकरवादी कवी म्हणून नाव द्यायला जावे तर त्यांच्या कवितेने तीही संदर्भचौकट ओलांडून किती तरी अफाट असे परिदृश्य आपल्या कवेत घेतलेले दिसते. एखाद्या लढवैय्या सैनिकाचा बाणा बाळगत प्रस्थापितांना पुढचा काळ शिलगावत जाणार असल्याचे ठणकावून सांगतानाच माणसावरचे गाणे गाण्याची शपथ स्वतःला घातली जाते. व्यक्तिविशेषांवर कविता लिहितानाही त्यांच्या मागच्या सामाजिक-राजकीय संबंधाचे एकात्मिक भान कधीच निसटताना दिसत नसते. स्त्री-पुरुष संबंधाबद्दल आणि विशेषतः स्त्रीविश्वाचा अंतर्वेध घेताना वर्ग-जात-धर्म यांची जाणीव जेवढी लख्खपणे जागी असते तेवढेच लख्खपणे त्यांचे पुरुष असणे त्यांच्या भाषेतून झळकत राहते. आपल्या कवितेला हत्यारांचे प्रयोजनमूल्य देतानाच तिला सृजनाच्या कलात्मक पातळींवर नेऊन ठेवण्याची मूल्यवत्ताही सहजपणे बहाल केली जाते. व्यवस्थेच्या प्रभंजनाचा आशय तिच्या गर्भात पेरतानाच प्रचलीत तत्त्वज्ञानाच्या संकल्पनांचा, भौतिक अधिभौतिकतेचा आणि पुराणकथा-मिथकांचा प्रचंड मोठा पसाराही तिला मांडू दिला जातो. भाषेच्या आणि शैलीच्या विविध प्रयोगांनी कवितेला संपृक्त करताना गावकुसाबाहेरची भाषा जशी प्रतिष्ठित केली जाते तशीच अभिजनांची प्रमाण भाषाही तेवढ्याच क्षमतेने कवितेला लीलया वापरु दिली जाते. अशा अनेकानेक स्तरावर अधिष्ठित होताना नामदेव ढसाळांनी स्वतःच्या कवितेसाठी कवितेच्या इतिहासातली एक मौलिक जागा निर्माण केली आहे.

ढसाळांच्या कविता जेव्हा आपण वाचतो तेव्हा सतत अशी जाणीव होत राहते की ढसाळ आपल्या 'आयुष्याचे छोटे छोटे तुकडे वेचून तडा गेलेल्या आईन्यासमोर नागडयानेच' उभे आहेत. स्वतःला त्यांनी स्वतःचाच सूड घेण्याची पूर्ण मुभा दिलेली आहे. आपले जन्मभराचे दुःख, दारिद्र्य आणि यातना एकट्यानेच सोसताना आपल्यातला रानटी पशू त्यांनी मोकाट सुट्ट दिला आहे आणि या पशूचे पशूपणही त्यांची कविता पेलते आहे. ती जणू आपल्या प्रत्येक अनुभवानंतर पुन्हा नव्याने मिळालेला जन्म साहते आहे.

''मी नाही लपवले सत्य, मी नाही चोरली जात -
जे काही होते आणि आहे ते मी खुल्लमखुल्ला सांगितले.
मी आहे गुन्हेगार आणि पापभिरु

यांच्या जगण्यातील विधायक श्रध्दा
मी प्रत्येक फुलाचा घेतला ठाव
आणि मोडल्या आकाशाच्या भिंती,
मी झुगारुन दिली कर्मविपाकाची नियती.
अंगावरील सर्व लक्तरे फेकून
मी झालो गर्भयशयातून वाहेर पडणाऱ्या लहानुल्या
मुलासारखा नवा."
(चिध्यांची देवी आणि इतर कविता, नवा जन्म पृ.७४)

असे नामदेव ढसाळ म्हणतात, एकाचवेळी ते नुकत्याच जन्मलेल्या लहान मुलाइतके निरागस-निष्पाप असतात आणि जगण्याच्या रुढ पद्धतीच्या सगळ्या चौकटी मोडून, अंगावरील लक्तरे फेकून देऊन शुद्ध-स्वच्छ होऊ पाहतात. पण असा प्रत्येक नवा जन्म जन्मताना त्यांनी स्वतःचा आत्यंतिक छळही केलेला असतो. स्वतःच्या विफल अस्तित्वाच्या त्वचेचे थर निर्दयपणे छिलून काढलेले असतात, स्वतःच्या अस्तित्त्वाला लागलेल्या भयंकर रोगाची यातना सोसलेली असते. 'वर्षानुवर्षे मी घासत बसलोय मनाचा आरसा' असे म्हणत ही प्रक्रिया सतत ढसाळांच्या अंतरंगात सुरु असते.

"घोडे पिसाळतात
वखवखून येतात आतडी
अंगप्रत्यंगातून खेळतात विजा
रक्ताला फुटतात जिभा
अस्त्याचं नसतं
नस्त्याचं अस्तं होत जातं
कुठल्या दांभिक रुपाला साकडं घालूं ?" (विभ्रम, पृ. ६२)

आपल्या अस्तित्वाच्या अपंगपणाचे दशावतार आणि दुःखाच्या विभिन्न मुद्रा एकाबाजूला असतात. त्याचप्रमाणे दुसऱ्या बाजूला आभाळाला भिडायची असोशी असते. या खेचाखेचीत सरळ सरळ तेजोभंग ऐकटेपणासह वाट्याला येतो. या एकटेपणाच्या पाण्यात दगड टाकला की स्वतःच्याच बिघडून वर आलेल्या प्रतिबिंबाचं दर्शन हातं तेव्हा काळाच्या कराल दाढेल आपण पिसले जातो आहोत याची जाणीव होत राहते.

"सर्व माणसंच अशी मातीची होतात,
सर्व श्रद्धाच अशा कथलाच्या होतात;
आपलीच आपल्याला वाटू लागते भीती
कुठल्या रंग-रुप-गंधासाठी मांडलं गेलंय हे जागरण ?
चंद्राची भाकर भुकेलेल्याला कशी रिझवेल ?
प्रज्वलित झालेली वेदना कोण कसा विझवेल ?
मला थयथयाट करु दे तुझ्या अंगणात
आत्मछळातून उद्‌भवलीय करुणा
तशात तू सांगतेयस

फुलपाखरांच्या पंखावरले जे रंग वेचायला !
मी काय करु या विफलतेचं सवंग ?" (विभ्रम. पृ. ६२)

स्वतःचीच भीती वाटू लागलेल्या या कवीला थयथयाट करावा असे वाटू लागते तेव्हा त्याला हवे असते 'तिचे' अंगण. कारण 'ती' अशाही परिस्थितीत फुलपाखराच्या पंखावरले रंग वेचायला लावते. नामदेव ढसाळांच्या कवितेतले हे एक स्त्रीरुप आहे. विपरितेतून सत्व शोधायची प्रेरणा देणारे ते रुप आहे. तिच्यामुळे,

"आकाश आणि पाणी मिसळून जाते एकमेकांत
तसे आपले अस्तित्व वितळते, पसरते एकमेंकात"
(रंगविभ्रमाची गोष्ट पृ. ७८)

असा कवीला अनुभव येतो. तो स्वतःला एका उत्तुंग पातळीवर वाहत नेतो. खवळलेल्या समुद्राच्या लांटामागून लाटा जाणीवपूर्वक अंगावर झेलतो. आपले जन्माचे दुःख- यातना विसरतो ते तिच्यामुळेच.

"भटक्या षड्‌विकारांचे जनावर आले आहे तुझ्या देहाच्या समीप
असंख्य रंध्रांमधून वाहतो कामांध प्रवाह...
आता आकाश धरेला कवेत घेईल की धरा आकाशाला ?

निजलेल्या शवात चंद्रमोहर भरतो प्राण
आणि पसरते अंतर्बाह्य चांदणे."(चांदणे. पृ.७७)

कवी स्वतःतल्या जनावराची भटकंती पूर्ण उमजून आहे. त्याच्या शापित अस्वस्थतेचा आणि पशुत्वाचा लोप तिच्या देहाच्या सान्निध्यात होतो तेव्हा अंतर्बाह्य चांदणे पसरल्याची नोंद तो घेतो. चंद्रमोहराने शवात प्राण भरल्याचा हा अनुभव अत्यंत अनोखा असा असतो. थोड्याशाच का होईना त्यात रोमॅन्टिक छटा असतातच. पण असे रोमॅन्टिक होणे ही ढसाळांची प्रकृती नाहीच. ते वास्तवाच्या उघड्या-नागड्या स्तरावरचे भीषण जगणे उरावर घेत, काळाच्या तिन्ही डगरींवरचा तोल सावरत आणि जगण्याचे परखड सत्य विद्रोहाच्या हत्यारासह पाजळत वाट चालणारे युगकवी आहेत. स्त्री ही त्यांच्यासाठी विश्रब्धतेची जागा क्वचितच असते. एरवी

स्त्री या गूढाचा स्वतःच्या सापेक्षतेने आणि स्वतःसकटच शोध त्यांना घ्यायचा आहे. ते स्वतःचे उसळते ज्वालाग्राही वासनारुप लपविण्याचा दांभिकपणा करीत नाहीत. आपल्या रक्तात उधळणाऱ्या घोड्यांचे अस्तित्व सतत त्यांच्यासाठी एका सनातन आणि आदिम अशा शोधाची बाब असते. आणि त्या सापेक्षतेने ते स्त्रीच्या देहाचा-मनाचा-अस्तित्वाचा शोध घेत असतात. या शोधात कधी स्त्रीरुप त्यांच्यासोबत संघर्षाचे हत्यार घेऊन उभे होते. तर कधी हेच स्त्रीरुप निखळ मादीपणाचे सत्त्व प्रकट करीत उभे होते. 'माझ्या काळ्या सावळ्या लाडक्या मादिस' या कवितेत त्यांनी स्त्रीची जी प्रतिमा, उभी केली आहे ती तिने कवीबरोबर संघर्षात सहभागी हावे या अपेक्षेतून आलेली प्रतिमा आहे. ते म्हणतात -

'' हे माझ्या लाडके काळ्या सावळ्या मादे !
ह्या प्रचंड दुनियेत आपल्यासारखे वहुसंख्य आहेत ।
आपण भूमिहीन आहोत,
आपण वेघर आहोत,
आपण ओझे वाहणारे हमालही आहोत ।
तू अशी घावरतेयस का ? माझ्यावर विश्वास असला तर
गच्च पकड माझ्या विद्रोही हातांना ।
ह्या आगीतून पार होऊ
तू घावरतेयस का ? तू फक्त मला आधार दे.
आणि मग वघ मी कसा मरणाला सामोरे जातो ते
आणि मग वघ मी कसा दुनियेला आग लावतो ते !''
(माझ्या काळ्या सावळ्या लाडक्या मादीस पृ.३८)

हे स्त्रीरुप कवीला आधार देणारे आहे. तिच्या साथीने विद्रोहाची आग दुनियेला लावण्याची क्षमता त्याला मिळणार असते. परंतु या कवितेतून स्त्रीचे स्वतःबरोबरच माणूस असणेही कवीने अधोरेखित केलेले आहे. ते दोघेही आता कॉम्रेड झालेले आहेत. एकमेकांचे प्राणांतिक साथीदार झालेले आहेत ही बाब विशेषत्वाने मोलाची ठरावी अशी आहे.

''तू आता स्त्री स्त्री म्हणून राहिली नाहीस,
मी आता पुरुष पुरुष म्हणून राहिलो नाही :
नर आणि मादीच्या कल्पना या युगातच कशा पायदळी तुडवल्यात !
तू माझी दासी नाहीस, मी तुझा राजा नाही :
आपण कॉम्रेड, आपण प्राणांतिक साथीदार ।
तू नाहीस माझ्या लेखी बाजारु वस्तु,
मी नाही मालक,.....

चावडीसमोर कुजत पडलेला शस्त्रांचा साठा ।
प्रिये, उचल त्यातलं एक,
मीही उचलतो, चल-
आता तू काळीसावळी लाडकी मादी राहिलेली नाहीसः
ह्या प्रचंड विषमतेच्या देशात
तू व्हिएतनामी योद्धी झालीयस !'' (तत्रैव पृ. ३८)

स्त्रीचा 'मादी' पासून सुरु झालेला या कवितेतला प्रवास तिच्या 'योद्धी' या प्रतिमेपर्यंत येऊन पोचलेला आहे. ती. 'स्त्री' नसते, ती 'दासी' नसते, ती 'बाजारु वस्तू' नसते. ती आता कॉम्रेड आणि योद्धा असते. ती आधार देणारी किंवा विसाव्याचा खडक असतेच पण या सहप्रवासाने जिला जगाच्या उत्पत्तीपासून ते जग बदलविण्यापर्यंतची वैचारिक भूमिका मिळालेली आहे अशी ती प्रतिमा आहे. आता या लढाईला सिद्ध होताना स्वच्छ अशी दृष्टी तिला प्राप्त झालेली आहे. या पातळीवर एकमेकांची चक्र एकमेकात गुंतलेली असतात. त्यांची अस्तित्वे परस्परावलंबी झालेली असतात. आता भविष्याची किल्ली त्यांच्या मुठीत आलेली असते.

'बायकोसाठी' या कवितेतूनही नामदेव ढसाळांनी स्त्रीरुपाचा अनोखा आविष्कार केलेला आहे. 'बायको' हा कवींसाठी स्वशोधाचा मार्गच असतो. कवीला स्वतःची जी ओळख आजवर पटलेली असते त्याच्या पलीकडे जाणे तिच्या अस्तित्वासोबत, तिच्याशी असलेल्या देहस्वी नात्यातून त्याला साधते आहे. त्या जागेवर येऊन पोचल्यावर त्याला पवित्र झाल्यासारखे वाटते आणि धर्मग्रंथांच्यामधल्या सगळ्या संकल्पना विफल ठरताना पाहून तो धर्मग्रंथाचे एक एक पान फाडतो. म्हणून ती त्याच्यासाठी जनित्र असते. त्याची उर्जाच असते. 'किती सहजगत्या या पशूला तू माणसात आणलेस !' ही त्याची कबुली याच स्वशोधातून आलेली असते. आता

बायको, या सोंगाढोंगाच्या दुनियेत मी माझ्याजवळ
असोनसो, - तू माझ्याजवळ आहेस
आणि मी एकुलता तुझा । (पृ. ७५)

असे तो तिला संपूर्ण आत्मीयतेने सांगू शकतो. 'ती' च्या आधाराची गरज वर्तमानातील जगण्याची भीषणता बघून-अनुभवून अधिकच टोकदार होते. त्याला प्रेमाची व्याख्या करता येत नाही. विकट प्रेमाच्या अनुभवानंतर तसे करणे अशक्यच असते. प्रेमाचचं काय.... जीवनाचं आणि जगाचंही

पर्यावरण बदलत आहे आजः' हे त्याला कळते आहे. आपल्या प्रेमाच्या पूर्ततेची अधुरी कहाणी जे प्रेम देशापलीकडचे, स्वतःपलीकडचे होते ती आता सांगता येणे शक्य नाही.

''आताशा खूपसं एकटं वाटतं, स्वतःच्या
सावलीची भीती वाटावी असं....
खूप कष्टानं उभारलं होतं मी माझं जग :
तेच दुभंगताना पाहतो आहे मी !

पिकासोच्या गुर्निकात जशा आहेत
भविष्यातल्या सर्व भायानक गोष्टी तसे झाले -
या क्षणीचे आयुष्य माझे !
निष्पाप, निरागस मुली
माझ्या तळहातावर प्राजक्ताची फुले ठेऊन कशाला उघडलास
अचानक आदिम सनातन प्रेमाचा दरवाजा ?''
(नसलेल्या परमेश्वराजवळ पृ.८२)

असे कवी म्हणतो तेव्हा त्याचे संपूर्ण अस्तित्व व्यापून उरलेल्या या प्रेमाने कवी केवढातरी हळवा झालेला असतो. हेही प्रेम आपल्याला दुरावेल असे वाटून हे हळवे मन, अडचणीत आल्याची विलक्षण दुखरी जाणीव व्यक्त करते. आता तर तृष्णा आणि आसक्तीची कुंडले गळून गेलेली आहेत.

''तरीही एक सैतान मला छळतो आहे !
हतबल हतभागी मी
तुझा हात हातात मागू शकत नाही !
ओठात साठलेलं उभ्या आयुष्याचं विष
बाहेर फेकून तुझे चुंबनही घेऊ शकत नाही मी !''
(पृ. ८२)

अशी हतबल आणि अगतिक करणारी वेदना त्याच्या उरात साठून राहिलेली दिसते. अलीकडचे प्रेम म्हणजे हृदयाच्या धडधडत्या कातर व्याकूळ स्पंदनांचा छोटा अग्निबाण असू शकतो किंवा आण्विक मुखे एकमेकांना भेट देणेही असून शकते. अशा पार्श्वभूमीवरची ही अगतिकता असते. पण आता प्रेमाची अरण्यावर अरण्ये तुडवून तिच्यापर्यंत पोचताना त्याची भावना असते -

''मला हवा होता एक कोपरा त्यातला सुरक्षिततेसाठी,
वर्षानुवर्षे खांद्यावरुन वाहत आणलेला
दुःखाच्या एकाकीपणाचा क्रूस ठेवायचा होता क्षणभर
खाली,
नसलेल्या परमेश्वराजवळ
गुडघे टेकून मागायची होती क्षमा
आयुष्यातल्या सर्वच गुन्ह्यांची...

मायकेल अँजेलोने चर्चच्या गाभाऱ्याला
छताच्या आत चितारलेलं बायबल
अनुभवायचं होतं मला,
- या सर्वांमागे कुठली स्त्री होती त्याची प्रेरणा.
हे शोधायचं होतं मला :
करशील ना मदत ?''
(नसलेल्या परमेश्वराजवळ पृ. ८३)

'ती' चे हे रुप प्रेमाचा वैशिष्टपूर्ण असा स्तर गाठणारे आहे. या स्तरावर आता मायकेल अँजेलोसारख्या महान कलावंताच्या कलेमागे असलेल्या प्रेरणा कोणत्या स्त्रीच्या आहेत. याचा शोध घ्यावासा वाटतो आहे. आयुष्यभर केलेल्या गुन्ह्यांमधून मुक्त होत एक प्रेरणारुप अशा 'ती' च्या आधाराची मागणी या स्तरावर केली जाते. जिथे दुःखाच्या एकाकीपणाचा क्रुसही क्षणभर उतरुन ठेवात येईल अशी ही जागा कवीला 'ती' च्यामुळे उपलब्ध होते.

आई, बहीण, मावशी ही स्त्रीरुपेही नामदेव ढसाळांनी विलक्षण वैशिष्ट्यपूर्णतेने आविष्कृत केलेली आहेत. ढसाळांची आई अज्ञानाच्या घोषाआत आयुष्याच्या वाटाघाटी करणारी आहे. ती परंपरेच्या आत जगणारी आणि आभाळाची सत्ता मानणाऱ्यांच्या वर्गातली आहे. बापही तिच्या या करारामध्ये सामील असल्याचे दुःख त्यांना वाटते आहे.

''चिक्कारं पाहिलं-भोगलं आईनेही.
शहरातही तिने तवलीत अन्न शिजवलं,
पैठणीचे रंग न्याहाळता न्याहाळता
जुनेराला थिगळ लावलं:
बापअगोदर मरुन
तिने असं अहेवपण जिंकलं !'' (आई पृ. ६६)

कवीला आपल्या आईचे असे नियंत्याच्या स्वाधीन होऊन जगणे दुःखद वाटते आहे. तिच्या मृत्युपेक्षाही असे अज्ञानात आयुष्याच्या वाटाघाटी करणे जास्त दुःखकारक वाटते आहे. तिचे हे सगळे वागणेच त्यांना उलगडत नाही म्हणूनच मग तिचे मरणेही त्यांना अनाकलनीय वाटते. 'बहिण' या कवितेत मात्र आईची एक वैशिष्टयपूर्ण बाजू कवी सांगतो.

अनुक्रमणिका

"स्वतःच्या सुरक्षिततेची जागा
आईने शोधली नाही स्वतःच्याच गर्भाशयात.
पाठीवर पाय देत जेव्हा माझी बहिण
जन्माला आली
तेव्हा तिनें तिचंही कौतुक केलं

मुलगी जन्माला आली की
तिच्या नरडीला नख देणाऱ्यांच्या जगात
तसं हे नवीनच होतं !" (बहिण पृ. ६७)

राजकन्येपेक्षाही सुंदर मुलगी झाल्याचे कौतुक करणारी ही आई आहे. मुलीला जन्म साजरा करणारी ही आई आहे.

'आईच्या समजूतीसाठी' या कवितेतही 'आई' पतिव्रतेचं गठुडं जन्मभर वाहणारीच आहे. सवष्णीचं लेणं ल्यालेली, सतीचं वाण घेतलेली अशी ही आई आहे पण याच आईला कवी समजून सांगतोय की तू अज्ञानाचं पाणी पिऊन खल्लास झालेली आहेस.

"पुरूषप्रधान संस्कृतीनं तुला चूल आणि मूल या गोष्टीतच सडत ठेवलं
तुला दुय्यम दर्जा दिला. किड्यांचं जननयंत्र म्हणून तुझ्याकडं
पाहिलं गेलं.
तुझ नैसर्गिक असणं आणि पुरूषत्वाला रंग चढवणं गुलामीत पडलं.
आई, ही तुझ्या स्त्रीजन्माची कहाणी घर करून आहे माझ्या उरात.
ती मला तुझ्याकडे स्वच्छ पाह्यला लावतेय -
म्हणून मी तुझा खून करत नाही, कोथळा बाहेर काढत नाही -
कारण मी जसा नागवला गेलोय तशी तूही !
आपल्याला ज्यानं नागवलंय तो एक आहे,
त्याचा कोथळा बाहेर काढायचाय मला !
या क्षणी आई, मला तुझी गरज आहे.
तू मला समजून घे!

बाजारात स्वतःच्या देहाचा विक्रय करणाऱ्या
आणि रस्त्यात भीक मागणाऱ्या बाया पाहिल्या की
आई, मला तुझी आठवण होते!
या देशाने आई, तुला काय दिलं आहे?
भीक मागायला आणि व्यभिचार करायला
शिकवणारा हा देश!
आई, माझ्या शस्त्राचा तू आधार हो.
हे दारिद्र्याच्या आई, नव्या जगासाठी तू मला मोकळा सोड.
माझ्या कत्तलीच्या कल्पनेने तू फार वाकली आहेस.
जर अशा निर्णायक क्षणाला तू जमीनदोस्त झालीस
तर तुझ्या निश्चेष्ट शरीरावरून मला निर्दयपण पुढे
चालत जावं लागेल!
एवढ्या कृत्याचा धनी आई, मला तू करू नकोस !
- करू नकोस !" (आईच्या समजुतीसाठी / पृ. ३६-३७)

असे म्हणणारा हा कवी आईला जगाच्या इतिहासातले शोषण सांगू इच्छितो. आईची नुस्त्या प्रेमाची अन् वांझ मायेची अपेक्षा त्याला नाही. आपण करू इच्छिणाऱ्या या लढ्यात आईने आपल्याला आधार द्यावा या अपेक्षेने ही समजूत तो काढतो आहे. त्याला आपल्या आईचे हजारो वर्षांचे गडद आंधळेपण घालवायचे आहे. यामुळे इथला या आईचा मुलगा नेहमीच्या आईच्या मायेचा रोमॅन्टिक गौरव करणारा मुलगा नाही. त्यापेक्षा या हजारो वर्षांच्या आंधळ्या आईने जन्मतःच आपल्या नरडीला नख लावलेले त्याला चालले असते असा हा विलक्षण पुत्र आहे.

त्यांची बहीण तिच्या बालपणीच मरून गेलेली आहे. ती त्यांच्या आठवणीतच आता फक्त जिवंत आहे. पण तिच्यासोबत अख्खं गावच त्यांच्या मनात उमटतं. तेव्हाचं आणि आताचं गाव यातली तफावत मनात उमटते. बहिण असं समग्र महारवाड्याचं जीवनच घेऊन त्यांच्या आयुष्यात अवतरते. तिचा विषमज्वरानं झालेला मृत्यू कवीच्या मनात आता उरलेलाच नाही. ती गेली तेव्हाचा गावच आता उरलेला नसल्यामळे बहिणही अजून मेलेलीच नाही असे त्यांना वाटते. त्यांच्या आठवणीतल्या जुन्या गावात ती अजूनही जिवंतच असते. मावशीच्या मृत्यूवर लिहिलेल्या कवितेत त्यांनी तिच्या मरणाचे उदात्तीकरण केलेले आहे पण त्यासोबतच ते स्वतःच्या शोधाची प्रक्रियाही येथे साधत आहेत. मावशीसारखे सहजपणे एकेक पाश तोडणे आपल्याला जमणार नाही. हे सुंदर जग सोडताना आपल्याला यातना होतील असे त्यांना वाटते. दुर्गम दऱ्याखोऱ्यातला अंधार, हे दुःख आणि हा जमिनीवरचा नरक त्यांच्या जगण्याची पाठ सोडत नाही. माणसांनी अपार त्याग - धैर्य - निष्ठेने घडवलेल्या या जगात मावशीने कधी सत्याचा अपलाप केला नाही. ती आता अस्तित्वाच्या उच्च ठिकाणी

अनुक्रमणिका

विराजमान होऊन परतीच्या प्रवासाला निघालेली आहे. तिच्या या अशा मृत्यूने कवीला वेगळीच हिंमत मिळालेली आहे. तो म्हणतो -

''मावश्ये, यापुढे आवडेल मला मृत्यूशी बुद्धीवळ खेळायलाः
रात्रीच्या काळोखात एकमेकांना खात सुटलेल्या घोड्यांची
मावश्ये, मला भिती वाटत नाही!''
(मावशीचे मरण /पृ.७६)

मृत्यूला असे खेळातला प्रतिस्पर्धी मानण्याइतकी सहजता मावशीच्या मृत्यूने त्यांना बहाल केलेली आहे. हे स्त्रीरूप या संदर्भात महत्त्वाचे ठरणारे आहे.

'रमाबाई आंबेडकर' ही कविताही अशीच विलक्षण कविता आहे. आजही साहेब परमेश्वराच्या छताडावर बसल्यासारखे कवीला वाटतात आणि ही सर्व पुण्याई तुझी आहे असेही ते रमाबाईंना म्हणतात.

''पैस पाठीवर घेऊन
पोरक्या ज्ञानेश्वराने
अमृताशी पैजा जिंकल्या;
साहेबांच्या पाठीशी पैस होऊन तू
गुलामांच्या उद्धाराच्या ज्ञानेश्वरीची
पहिली ओळ लिहायला मदत केली.

तू चंदनाचं मूल्य केलंस कमी!
तुझ्या मुक्या मनाची गाणी
कल्कीचा घोडा ह्या कलियुगात घेऊन फिरतो आहे
मराठी भाषेची ऐसी तैशी करत.
हे बहिणाईच्या बहिणाई
मरण्यापूर्वी एकदा तरी तुझं
गाणं ऐकवशील काय?
या रांडाव मराठी भाषेला
पुन्हा सवाष्ण होताना पाहायचंय मला!''
(रमाबाई आंबेडकर / पृ. ४१-४२)

रमाबाईंच्या अस्तित्वाने डॉ. आंबेडकरांना मिळालेल्या पाठिंब्यांचे हे नुसते काव्यात्म वर्णन नाही तर तिच्या त्यागाची आणि वेदनेचीच ही महागाथा ठरावी. भाषेच्या तोकडेपणाची जाणीव करून देता देता शब्दांमधूनच कवी रमाबाईंच्या जीवनश्रेयाची जाणीव येथे करून देतो.

नामदेव ढसाळांच्या कवितेत जीवन शोधाच्या विविध पातळ्या अवतरलेल्या दिसतात. त्यातली एक पातळी स्त्रीच्या शोधाची आहे. आणि त्यातही आई - बहिण - प्रेयसी यांच्या शिवायच्या स्त्रीरूपांचा वैविध्यपूर्ण शोध त्यांची कविता घेते. त्याचा हा शोध त्यांनी आत्यंतिक प्राणपणाने घेतलेला असतो. साऱ्या शक्ती एकवटून ते हा शोध घेऊ पाहतात पण त्यांचा हा शोध त्यांना कायम दुःख आणि यातनांच्या प्रदेशात वणवण करायला लावतो. या संदर्भात लिहिताना प्रभा गणोरकरांनी व्यक्त केलेल मत लक्षणीय ठरावे असे आहे. त्या म्हणतात - ''नामदेवची स्त्रीविषयक कविता रोमँन्टिक नाही. आनंद, उल्हास, शांती, तृप्ती, विश्रब्धता, विसावा यांची लहानशीदेखील रंगछटा या कवितांमध्ये उमटत नाही. अस्वस्थता, तडफड, बेचैनी, आत्मक्लेष, अंतःकरणातून सुरी फिरत रहावी तशी वेदना, अस्तित्वाशी चिकटून असणाऱ्या, सतत खपली काढणाऱ्या आठवणी, आकांत, दुःख, प्रश्नचिन्हे, औदासिन्य या गडद रंगांनी या कवितांचा अवकाश व्यापला आहे'' (चिंध्यांची देवी / पृ. ७) तिच्या देहरूपाशी जोडू पाहिलेली स्वदेहाची उत्कट सांधेजोड ही स्त्रीशोधाची एक वाट या कवितेने शोधली पण त्यातून वाट्याला आली ती प्राणांतिक तडफड. अशी तडफड की ज्या तडफडीने अवघे अस्तित्वच कडेलोटाच्या टोकावर येऊन उभे राहिलेले आहे. आवरता येऊच नये असे उधाण त्यांच्या संवेदनेला स्त्रीच्या संदर्भात प्राप्त होते पण या उधाणाने ते फक्तच असीम वेदनेचे धनी होतात. जगण्याच्या एकूणच झंझावातात भोगाव्या लागणाऱ्या या तडफडीची कविता म्हणजेच त्यांची स्त्री विषयक कविता आहे. आपल्या कवितेला त्यांनी आण घातलेली आहे की आपल्या कवितेने समस्त बाईजातीचे दुखणे टिपून घेतले पाहिजे. 'माझ्या जन्मगावच्या बायका' ही कविता या दृष्टीने तपासण्याजोगी आहे.

''भर दिवसा उकिडव्या बसत
बायका जेव्हा आपली कहाणी ऐकमेकींना
सांगत सुटतात

ठळ्ळ दुपार - माथ्यावरला तापता सूर्य ढळू लागलाय..
साळूबाईच्या अंगणात जमल्यायत समद्या जणी;
कुणी खालच्या आळीची, कुणी मधल्या फळीची;
सुगंधा, यशोदा, यमुनी, हरणा, राही
झाडणं लोटणं । भांडीकूंडी । पाणीलवणी । कोरड्यास भाकरी ।

न्हाणीधूणी करकरून पार थकून गेलेल्या बायका.
'सारव भिंती तं म्हणं कोन्हाडं किती!'
एकमेकींच्या प्रपंचाची दुःखे वाटून घेतायत बायका.

परनारीशी रतलेला पुरूष असतो त्यांच्या टीकेचा विषय;
परपुरूषांच्या नादी लागलेल्या बाईवद्दल द्वेष करतात
या बायका - .....

माझ्या कविते, दिवा विझवून तळमळत राहणाऱ्या
बाईला जाणून घे - परपुरूषाच्या नादी लागणाऱ्या
बाईचा जीव घेऊ पाहणाऱ्या तिच्या नवऱ्याचा
राग टिपून घे.
माझ्या कविते, तू टिपून घे
समस्त बाईजातीचे दुखणे."
(माझ्या जन्मगावच्या बायका/ पृ.८५-८६)

परंतु बाईजातीचे दुखणे टिपून घेताना त्यांच्या कवितेंचा अवघा जन्मच व्याकूळ झालेला आहे.

"O my dear... I misss You !
Tell me somebody where is my Sweet Heart?
युगायुगांची कल्पना थोतांड असते माणसांसाठी,
कर्मविपाकाच्या भंपक संकल्पनेत जखडून जातो माणूस.
ही तुझ्या प्रेमाची आग सर्वत्र पसरली आहे भोवती...
तडफडतो आहे जीव व्याकुळतेच्या सर्व सीमा ओलांडून.
हे प्रिय स्त्री! माझ्याही कवितेचे पाय मातीचेच आहेत ना?
आणि मी सुद्धा" (प्रश्न : ज्याला उत्तर नाही/पृ.८१)

ही जाणीव झाल्यानंतर स्त्री पुरूष नात्यातले बंध कधी उकलणारच नाहीत कां ? स्त्रीच्या अंतरात्म्याला किती भिडलो असेन ? अशा प्रश्नांनी तो घेरला जातो. त्याला दिसतात असंख्य स्त्रिया, राहीबाई, रत्नमाला निळे, शोभा परब, जरीना, मंदाकिनी पाटील, अनुराधा बुधाजी उपश्याम, बिनती, बिन्नी, जाहिदा, फ्रिडा, लोरा, सलमा, आर्दीच्या जगण्याचे इतिहास - भूगोल त्याला वेदनेच्या घनदाट अरण्यात नेऊन पोचवतात, त्याच्या जगण्यात आक्रोश पाझरवून त्याला आक्रोशाचा धनी करून टाकतात.

"प्रेयसी : रांडेचं सोज्वळ रूप
प्रियकर : भडव्याचं
बायका पुरूषांच्या छापील रांडा
पुरूष बायकांचे भडवे
स्त्री - पुरूषांचा संबंध
थोड्याशा रांडा, थोडेसे भडवे, थोडेसे दातवण,
जे वापरल्यानंतर थुंकून टाकायचे आणि गंगेत दात खंगाळायचे"
(मंदाकिनी पाटील : मला अभिप्रेत असलेलं कोलाज / पृ. ३२)

अशा एका सलणाऱ्या, जखमी करणाऱ्या जाणीवेपाशी नेऊन पोचवतात. खरंतर स्त्री आपल्या स्पर्शानं 'जडलेल्या गंडांचा परिहार करून साखळदंडातून कवीला निसर्गाचा बनवते' हे त्याला ठाऊक आहे. तिच्या निस्तेज बोटांच्या स्पर्शाने दगडाचेही प्लॅटिनममध्ये रूपांतर होऊ शकते आणि आयुष्यभराच्या जखमांवरती फुंकरही घातली जाऊ शकते. पण कवीलाच स्वतःच दडलेल्या सैतानाची भिती वाटते. स्वतःतला रानटी पशू कवी तिची परवानगी न घेताच तिच्या दाराशी बांधून टाकतो. कवी मग वेदनेच्या बेटावरच वस्ती करतो, जिथे काळ्या सूर्याचाच वावर असतो.

कवीला दिसणाऱ्या स्त्रिया जातीच्या धर्माच्या, रूढी परंपरांच्या चौकटींमध्ये चिणलेल्या स्त्रिया असतात. लाल दिव्यांच्या वस्तीतले स्त्रीजीवन म्हणजे वेदनेचे गुतानुगतिक भांडारच. या सर्वच स्त्रियांच्या सर्वंकष शोषणाकडे, दुःख, दैन्य, दारिद्र्य याकडे ढसाळांना तटस्थपणे पाहता येत नाही. आपल्या अतःकरणातली अथांग करूणा घेऊन आणि ज्यामुळे हे शोषण त्यांच्या वाट्याला आले आहे त्याविषयीचा तीव्र विद्रोह घेऊन ते या जगाकडे पाहत आहेत. ढसाळांच्या मार्क्सवादी मानसिकतेचा प्रत्यय त्यांच्या या संदर्भातल्या कवितांमधून सतत येत राहतो. 'राहीबाई' या कवितेत ते म्हणतात -

"पहिल्यांदा आली होतीस या वस्तीत तेव्हा वाऱ्याच्या
वरातीत तूच नवरी होतीस :
तोडे, बाजुबंद, पुतळ्यांच्या माळा, नवथराची लाज,
कोल्हापुरी साज...
भपक्यासारखी भपकन मोठी झालीस,
अन् लगेच काजळी जडून विझून गेलीस.
ना यल्लमानं तुला नीट केलं, ना काळूबाईनं
परडी, भंडारा, कवड्यांच्या माळा...
शिणल्या माथ्यावरला सोन्याचा देव्हारा

तू उलचून ठेवलास भाचीच्या डोक्यावर,
नातीची नथनी उतरलीस आणि अदृश्य झालीस -
तुझ्या नशिवाचे भोग तिला न सांगताच निघून गेलीस''
(राहीवाई / पृ. ७२)

एका बाजूला हा राहीबाईच्या नशिबाचा भोग असतो आणि दुसऱ्या बाजूला तिच्याच कमाईने शेती पिकवणारा तिचा भाऊ असतो. राहीबाईच्या देहाची कमाई खाऊन ऊस पोसला जातो पण भावाला तिची आठवणही होत नाही या विदारक जाणीवेने ही कविता आपले अंतःकरण पोखरून टाकते. 'फॅमिली रूम्स', 'क्रुसाच्या कनवटीला', 'वेश्येच्या धंदेवाईक प्रेरणांतून', यासारख्या कवितांमधून हे विश्व आपल्या अवती भवती आहे ही जाणीव करून दिली जाते. या विश्वाची आणि सोसवणार नाही अशी अभिव्यक्ती ढसाळ करतात ही एक वैशिष्ट्यपूर्ण ठरावी अशीच बाब आहे.

''घराघरांवर चढलेली बुरशी गल्लीकुचींतून जीवन अस्ताव्यस्त

सारे सगेसोयरे येता - जाता करतात कशा टुचकुल्या
कापल्या करंगळीवर मुतत नाहीत अशा या
सांप्रदायिक खेळकावण्या, सावल्या''
(तिने यावे बरसत / पृ. २६)

अशी ही वस्ती आणि अशी ही इथली माणसे, राजरोसपणे त्यांच्या शरीरात विष पेरले जाते. इथं आपली वाटणारी माणसं आपली नसतात. ती केवळ धुळीचा न् धुराचा ढीग असावा तशी असतात.

''पूर्वी कधीच दिसला नव्हता मला एवढा निस्तेज चेहराः
जो तुझा होता आणि तुझ्यासारख्या हजार जणींचा,
नाना देशातून, नाना पिंजऱ्यातून झळकणारा
आणि वेगवेगळी नांव धारण करणारा''
(मंदाकिनी पाटील : मला अभिप्रेत असलेलं कोलाज / पृ. ३१)

अशी या जगातल्या स्त्रियांची रूपे असतात. जगण्याचं सारं सत्व निपटून काढलेल्या या स्त्रिया जगाच्या पाठीवर सर्वत्र आढळतात. त्यांच्याकडे बघण्याची ढसाळांची दृष्टी आणि मनोवृत्ती मात्र वेगळी असते.

''वाफसा नसतानाही जमिनीतून चाळवतेस
न्. के. एच. आराच्या न्यूड चित्रांसारखी
माझ्यातून स्वाभाविक न् तल्लख वावरतेस.
कामवासनेच्या मुक्ततेशी न् शांततेशी
अंतःकरणाच्या समतोलाशी न् निर्वाणाशी
शरीराची फेडाफेड करून : शरीर = इच्छा + भावना + विचार
व्यवहाराला नामरूप देतेस.
जडलेल्या गंडांचा परिहार करून
साखळदंडातून मला निसर्गाचा वनवतेस;
कण्साचं गाणं गायला लावतेस.
तुझ्याबद्दल मी काय सांगणार !
तू दूध भरलेलं दीर्घ रूपः
१०० मरणं मरूनही न मरणारं
न् लोकांनी वदनाम ठरवलेलं माझ्याच सामोर !''
(कु. अनुराधा बुधाजी उपश्याम हिच्याबद्दल/ पृ. ३४)

या कवितेतून अशा स्त्रीकडे कवी कसा बघतो त्याचे प्रत्यंतर आपल्याला येते. एरवी कवीसाठी एखादे स्त्रीरूप 'शुभदे. तुझे नाव व्हीनस' या कवितेतल्या स्त्रीसारखे असते. इथे कवी देव आणि पशू यांच्या पलीकडे जाऊन स्वतःतल्या कुरूपतेला हाकारात असतो. आपल्या अंतरंगातल्या दुःखाचा इलाज शोधत तो तिच्याकडे येतो. आपल्यातले ताण - तणाव, जखम वेदना आणि लिंगांचे आखात ओलांडून तो येतो. ती त्याच्यातल्या शुभंकराला स्पर्श करते. त्याच्या दगडी नशीबाच्या समईत स्वतःतल्या मूलभूत ज्योती फुलवते. त्याच्या अस्तित्वाची रंगपंचमी तिच्यामुळे उधळून येते. ती त्याच्यासाठी आनंदाचं निधानचं होऊन जाते.

''कित्येक युगानुयुगांच्या आत्महत्या
जाऊ देत एकदाच्या टळून.
परावर्तित पारदर्शक होऊन जाऊ देत ही सर्व
रहस्यं ! आयुष्यं ! वय ! वर्ष
धारणेला मिळून जाऊ दे निर्मितीची ताकद.''
(शुभदे, तुझं नाव व्हीनस / पृ. ४६)

असे कवी तिला म्हणतो. हे स्त्रीरूप वेगळे असले आणि कवीला या अशा स्त्रीरूपाची विलक्षण भुरळ पडत असली तरी त्यात कवीची रोमॅन्टिक वृत्ती दिसत नसते. स्त्रीरूपाचे उदात्तीकरण करण्याची भूमिका त्यामागे दिसत नसते. कवी तिच्या मना - देहाच्या सापेक्षतेने स्वतःला धुंडाळत असतो. म्हणूनच या अशा स्त्रीरूपांमध्ये आणि या कक्षेच्या पल्याड असलेल्या स्त्रीरूपामध्येही नामदेव ढसाळांची स्त्रीविषयक विलक्षण अशी समजूत प्रकट होत असते.

अनुक्रमणिका

मुंबई या शहराला स्त्रीरूपात पाहण्यामागेही ही अशीच समजूत आहे. हे शहर आलेल्या प्रत्येकाचा स्वीकार करतं. हे शहर कुणालाच उपाशी निजू देत नाही, मरू देत नाही. म्हणून कवीही तिला 'मुंबई, मुंबई, माझ्या प्रिय रांडे' असे संबोधतो. मी तुला 'नागवून' जाई असे म्हणतो. तुला 'खेळवून' आणि 'खिळवून' जाईन असेही म्हणतो. तो भुकेला आहे, तहानतेला आहे आणि निद्रानाशाने त्रस्तही आहे. इथे

''व्यापारी खेळवतात अस्वलं
घणाघात सर्व आर्थिक नसनाड्यांवर
फिरला जातोय शुभ्रतेवर पोचिरा
कटक्यानं पुसले जातात मुलाबाळांचे आक्रोश
राजवंशातले कावळे वाहून आणले जातात कासवाच्या पाठीवर.
अरे कुणीतरी बघा,
या मुलांचे कपडे फाटलेयत.
अरे कुणीतरी बघा,
या मुलांची नखं वाढलीयत''
(मुंबई, मुंबई, माझ्या प्रिय रांडे / पृ. ५३)

असे घडते आहे. इथे वावरणारी माणसे आक्रोश कारणारीही आहेत. ही मुंबई सुया, पोत, बिबे विकणाऱ्या बायांचीही आहे. डबा, बाटली, कागद, कपटा वेचणाऱ्यांचीही आहे. इथं जीवनाचे वाहाणे थांबता थांबत नाही. संपता संपत नाही. अशा या शहरात या भणंगांना लक्ष्मी आणि सरस्वतीनेही नाकारले आहे म्हणून मग कवी म्हणतो -

''लक्ष्मी ! सरस्वती पक्षपाती रांडा !
आम्ही या म्हटलो, त्या आल्या नाहीत.
आमच्या खाली निजा म्हटलो
त्या निजल्या नाहीत.'' (मुंबई,मुंबई,माझ्या प्रिय रांडे / पृ.५५)

मात्र मुंबई नावाच्या या स्त्रीने त्यांना जवळ घेतले आहे तेव्हा आता

''तू आमच्याशी इमान राख,
तू आमच्या विछान्यांना जागव,
अनंताची मुरली वाजव,
तू आमच्या स्वप्नांना खेळव,
तू आमच्या रेतांना अंकूर फोड.

मी तुझ्यातून फाटक्या भणंगासारखा
निघून जाणार नाही -
तुझं सत्त्व फेडून घेईन.
तू अल्लखनंदाचे दरवाजे वेडझव्यांसाठी खुले कर,
मुंबई, मुंबई, माझ्या प्रिय रांडे !
मी तुला खेळवून जाईन,
मी तुला असा खिळवून जाईन !'' (तत्रैव / पृ. ५५)

असे कवी म्हणतो, मुंबईचे समग्र वास्तव तिच्या बऱ्या - वाईट रूपासह नामदेव ढसाळांनी या कवितेत आविष्कृत केलेले आहे. त्यातून प्रकटणारी त्यांची संवेदनशीलता विलक्षण वाटावी अशी आहे.

'कविता' ही नामदेव ढसाळांच्या अस्तित्त्वाची मूल्यवत्ता आहे. कविता ही त्यांच्या जीवनातली सर्वात आत्मीय अशी बाब आहे. कवितेचे असणे त्यांच्या रिक्ततेने छळ मांडलेल्या जीवनात अर्थ भरणारे आहे. त्यांच्या बेभान जगण्याच्या अनावर वाटेत कवितेनेच तथागताचा ध्यानस्थ दगडी पुतळा आणून उभा केलेला आहे. कवितेने तृष्णा, काम - क्रोध - द्वेष - मत्सर - वासना, अहंकार जाळून टाकता येणार आहेत.

''किती जालीम अस्ते विष
माणूसपणाचे !
कवितेनेचे माझ्यातली
विषाची पिशवी काढून टाकली

मस्तक,
मान,
खांदे
पोट - पाय - हात,
पंचेंद्रिये
आणि या सर्वांनंतर सहावा सेन्स
कवितेनेच रूजवला माझ्या देह - शरीरात.

कवितेनेच मला केले
निर्मळ निरागस निर्वैर;
रात्रीच्या निळाभोर
आकाशातील ग्रहतारे मोजायला कवितेनेच
शिकवले मला.
कवितेनेच मला खराखुरा
माणूस बनवून सोडले, नाहीतर या

अनुक्रमणिका

नरकातून शक्य नव्हते मला बाहेर येणे -
अजूनही अस्तो नरकात तळमळत तडफडत''
(कविता २ / पृ. ९३)

अशी कवितेविषयीची ढसाळांची धारणा आहे. ग्लोबल गावातील दारू पबच्या गुत्यात बसून, स्वतःच्याच कवितेवरून जीव ओवाळून टाकत मागच्यांना शिव्या घालणाऱ्या कवींचा ते निषेध करतात. त्यांनीही क्रांतीच्या रणांगणात कधीतरी उतरायला हवं होतं असे त्यांना वाटते. स्वतःला हव्या असणाऱ्या फूटपट्टीने त्यांची कविता मोजत तिच्या मर्यादांविषयी, असत्यानसत्या सौंदर्यस्थळांविषयी बोलणाऱ्यां टीकाकारांचीही त्यांनी नोंद घेतली आहे.

''कवितेच्या व्याकरणाच्याच बळावर आणि तिच्या जागृतपणाने
अर्धसरंजामी, अर्धभांडवलदारी समाजात मी
पेटवू पाहिली ठिणगी;
पाहिली स्वप्ने अस्पृश्य - आदिवासी - भटकेप्रणीत
कामगार - शेतकाऱ्यांची भूमीहीनांना अभिप्रेत
असलेल्या क्रांतीचीः''
(मी लढत आलो आजवर / पृ. ९६)

आपल्या कवितेची अशी जातकुळी सांगताना नामदेव ढसाळ स्वतःच्या भूमिकेचे, मानसिकतेचे आणि कवितेचेही चरित्रच सांगत आहेत. आपल्या कवितेने समस्त बाईजातीचे दुखणे टिपून घ्यावे असे जसे त्यांना वाटते तसेच शोषण झालेल्या समग्रांसाठी उभ्या केलेल्या रणात कवितेचा शब्दच उर्जा देणार आहेत, शस्त्राची ताकद वाढवणार आहेत याची शाश्वतीही त्यांनी व्यक्त केलेली आहे. याचाच अर्थ त्यांच्या कवितेचे आणि माणसाचे आतड्याचे नाते आहे. माणसासाठी त्याच्या कवितेला आतड्यातून गहिवर फुटतो.

'माय रूखमिने!' आणि 'चिंध्यांची देवी' या दोन जराशा वेगळ्या पण वैशिष्ट्यपूर्ण कवितांची नोदं येथे करायला हवी. नामदेवाघरच्या 'दासी' जनीचे अस्तित्त्वच येथे अर्थपूर्ण केले जाते. सारे जग तिला 'नामयाची जनी' म्हणून ओळखते. पण या कवितेत खुद्द नामदेव, माय रूक्मिणीला सांगतो आहे की जनी ही तिची लेक आहे. रूक्मिणीची शेज त्यजून विठ्ठल लेकीच्या वाकळीची निर्मळ उब अनुभवायला येतो. तो असा चतुर की तिला चिडवायला हे सोंग घेतो.

''माय रूखमिने,
कितींदा गंडवले इठ्ठलाने तुला !
राती विटेवरून उतरून
भ्रमणाला जातो राणा,
त्याची वाहेरख्याली नाही ग विषयाचीः
रूखमिन एकटी त्याच्या ग प्रितीची !
नको रचूस कुभांड, नको घेऊस सौंशव -
अशा अदावती पायी होई संसाराचा नाश !
युगानुयुगे पाहता आलीस सरळ
मग मध्येच का ग हे शंकेचे गरळ ?
माय रूखमिने, तुह्या पांडुरंग मह्या जनीचा ग वाप
जनी नामदेवाची तुही सख्खी ग लेक !''
(माय रूखमिने ! पृ. / ८४)

हे सांगण्यामागे कवीची स्त्रीविषयीची पृथक् अशी समजूत व्यक्त होते. जगाच्या निंदेचा विषय होणाऱ्या स्त्रियांसाठी जो समजुतीचा दृष्टीकोन ढसाळांकडे आहे त्याच समजुतीने जनाबाईकडे बघण्याचा डोळा त्यांच्याजवळ आहे.

चिंध्यांची देवी ही वाटेवरची एक लोक श्रद्धेची जागा. पोटाची आग विझवण्यासाठी कराव्या लागणाऱ्या दळणवळणाच्या वाटेवर कवीसमोर आलेली. आईबरोबर दुसऱ्या गावाला जाताना ही भेटलेली आईचे तिला हात जोडणे, पदाराची दशी फाडून देवीच्या काठीला बांधणे हे सारे वागणे त्याला Funny वाटलेले आहे. चिंध्यांच्या देवीचे रूप प्रचलित अष्टभूजा देवीच्या रूपापेक्षा पूर्णतः भिन्न आहे.

''वाटायचे, चिंध्यांच्या त्या प्रचंड झापात
कुणी सुंदर स्त्री बसली आहे लपून !
चिंध्यांनीच बनलेले तिचे सर्व अवयव -
हात - पाय - कान - नाक- डोळे,
सुडौल देह -
केसही वाऱ्यावर उडणारे - लांवसडक चिंध्यांचे''
(चिंध्याची देवी / पृ. ८८)

देवीचे प्रचलीत अष्टभूजेचे रूप हिंस्त्र - क्रूर असे. पण ही देवी मात्र वेगळी. तिच्या चिंध्यांच्या उलगडलेल्या पिसाऱ्यानेच राक्षस दूर पळत असावेत असे कवीला वाटते.

''ज्या कोणी जन्मास घातले चिंध्यांच्या देवीला
मी सलाम करतो त्याच्या दिमाखदार डोक्याला,
डोक्यातून प्रसवलेल्या प्रतिमेला,
येड्या बागड्यांचा प्रपंच सजलेला असतो
चिंध्यांनीच अवघा !''

हे वास्तव त्याला नजरेआड करता येत नाही. तिथे ती उभी आहे त्या भयाण पर्वतराजीत आईशिवाय जेव्हा त्याला भिती वाटते तेव्हा -

"आणि मी जन्माचाच नास्तिक
हाकारू लागतो चिंध्यांच्या देवीला
त्या निर्जन पंचक्रोशीत
हसते कोणी - ढगांच्या गडागडाटासारखे.
दचकून जातो जीव.
आणि अलगद कुणीतरी पकडल्यासारखे
वाटते माझे बोट -
देहातल्या सर्व अष्ट महाभित्या होऊन जातात नाहीशा !
मी हिमतीनं आक्रमू लागतो वाट."
(चिंध्यांची देवी / पृ. ८९)


असा अनुभव त्याला येतो. ही देवी देवी नसतेच त्याच्यासाठी. ही तर साक्षात आपली आईच आहे जी आपल्याला बोट धरून प्रपंचात आणून पोचवते असा प्रत्यय त्याला येतो. हे येवढे आश्वासक आणि पाठराखण करणारे आईचे रूप असलेली लोकप्रतिमा इतक्या निखळ प्रसन्नतेने ढसाळांनी निर्मिलेली आहे की त्यांच्या एकूणच व्यक्तिमत्त्वासाठी तो अपवाद ठरावा.

नामदेव ढसाळांच्या कवितेत आपल्याला दिसतात ती स्त्रीरूपे या प्रकारची आहेत. या स्त्रीरूपांना आपण कोणत्या चौकटीचे नाव द्यायचे ? नामदेव ढसाळ हे उग्रसुंदराचे धनी आहेत. ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचीच सर्वार्थाने ओळख करून देणारी बाब आहे. या उग्रसुंदरात नकार आहे, विद्रोह आहे, संघर्ष आहे, व्याकुळता आहे, करूणा आहे आणि या सर्वांच्या तळाशी त्यांना व्यापून टाकणारे माणूसपण आहे. अभिव्यक्तीच्या आणि शैलीच्या चौकटी पार बदलवून टाकत हे उग्रसुंदर प्रकट होत जाते. भाषा त्यांना हवी तशी वाकवता येते. पण या वाकवलेल्या भाषेतून उभे राहते ते सामान्य माणसाच्या नजरे पल्याड असलेल्या, त्यांच्या परिचयाच्या कक्षेपल्याड असलेल्या जीवनविश्वाचे उभ्या आडव्या तिरप्या छेदातून काढलेले सूक्ष्मदर्शी प्रतिमांकन. हे जीवनविश्व चौकटीच्या बाहेरचेच आहे. त्यामुळे त्यातली स्त्रीरूपेही आपल्या ज्ञात चौकटींना उल्लंघूनच अवतरतात. त्यामुळे त्यांना एका चौकटीचे नाव देता येणे शक्यच होत नाही.


स्त्रीप्रतिमांचा अभ्यास करण्यासाठी आज स्त्रीवादी चौकटीचा वापर केला जातो. संपूर्ण वाङ्मयाच्या इतिहासाचे पुनर्लेखनही या चौकटीचा वापर करून लिहिता येणे शक्य आहे. एखाद्या कलाकृतीची वा त्याच्या निर्मात्याची मूल्यवत्ता या स्त्रीवादी विचारसरणीला ठरवता येते. आजपर्यंत साहित्याचे मानदंड म्हणून मिरवणाऱ्या अनेक साहित्यिकांचे स्थानही कदाचित या प्रयत्नात डळमळण्याची शक्यता आहे. पण ही विचार चौकट ढसाळांना लावताना आपल्याला प्च वेगळा अनुभव येतो. त्यांच्या स्त्रीकडे पाहण्याच्या भूमिकेतील समजूत या चौकटीलाच वेगळी अर्थवत्ता देऊन जाणारी आहे. स्त्रीचे 'स्त्री'पण, तिचे आईपण, मादीपण, तिचे देहस्वरूप, तिचा व्यभिचार, तिची नीतिमत्ता, तिचे दुःख, तिच्या यातना, तिचे माणूसपण आणि सर्वाश्लेषी अशी तिची करूणा यांची अपरंपार महती त्यांच्या कवितेने मांडलेली आहे. स्त्रियांच्याकडे त्यांना जेवढे गाढ समजुतीने पाहता आले आहे तेवढेच त्यांच्याकडे माणूस म्हणून त्यांना पाहता आलेले आहे. शतकानुशतकांच्या तिच्या प्रवासात तिच्या वाट्याला आलेल्या पिंजऱ्यांमागचे मालक त्यांना चांगलेच ठाऊक आहेत. या पिंजऱ्यांनी तिचा केलेला कोंडमाराही त्यांनी नीटच मांडला आहे. आपल्या आईचे 'स्त्री' म्हणून जगणेही ते याच भूमिकेने मांडतात. आणि जिथे आईकडे असे बघता येते तिथे समस्त स्त्रीजातीचे दुखणे मनाच्या तळ्यात खोलवर घुसून, घुसळून काढत असणारच आणि याचा प्रत्यय त्यांच्या कवितांच्या ओळी मनाच्या तळ्यात खोलवर घुसून, घुसळून काढत असणारच आणि याचा प्रत्यय त्यांच्या कवितांच्या ओळी ओळींमधून येत असतो. त्यांच्या मनाच्या ज्वालामुखीचे राहून राहून स्फोट व्हावेत तसा उद्रेक होत राहातो. आणि वाहणाऱ्या लाव्ह्याचे विश्लेषण त्यांना प्रगाढ कारूण्याने करता येते हेच ढसाळांचे वैशिष्ट्य म्हणावे लागते.

(या लेखातील सर्व कविता 'चिंध्याची देवी आणि इतर कविता' या संग्रहातून घेतल्या आहेत.)

■ **डॉ. अरूणा देशमुख**
मराठी विभाग प्रमुख
सेठ केसरीमल पोरवाल महाविद्यालय, कामठी
भ्रमणभाष : ९८५०७५०३३६



अनुक्रमणिका



नामदेव ढसाळ यांच्या कवितेची भाषा

डॉ. गोविंद काजरेकर

॥ १ ॥

प्रस्तुत लेखात ढसाळांच्या कवितेच्या भाषेचे स्वरूप तपासण्याचा प्रयत्न केला आहे. आधुनिक मराठी कवितेला तिच्या सत्त्वाची खरीखुरी जाणीव करून देणारी कविता नामदेव ढसाळ यांनी लिहिली. भारताबाहेरच्या साहित्यविश्वात मराठी कवितेला प्रस्थापित करण्याची क्रयशक्ती हा कवी जन्मतः घेऊन आला होता असे दिसते. त्यामुळे केवळ सर्वहरा वर्गाच्या संदर्भचौकटीतच ढसाळांची लेखकप्रतिमा पाहाता येत नाही. वर्ग, वंश आणि जातधर्माच्या कक्षा भेदून सामाजिक विषमतेला आणि तिच्या शिलाबंध बरूजांना सतत धडका देण्याचे प्रयत्न त्यांच्या कवितेने सातत्याने केले. माणसामाणसांतील संबंधांचे निखळ भान, विषम समाजरचनेच्या चौकटी उखडून देऊ पाहणारी राजकीय स्तरावरची काव्यात्म जाणीव ढसाळांच्या कवितेत प्रकटली आहे. 'गोलपिठा'पासून मार्गस्थ झालेली त्यांची कविता शब्दाशब्दांत स्फोटक दाहकता घेऊन येते. हा प्रवाह शेवटच्या 'निर्वाणा आधीची पीडा'पर्यंतच्या दहा काव्यसंग्रहातून खळाळता राहतो.

ढसाळांना आतल्या आवाजाची साथ होती. बाहेरच्या कल्लोळांनी सतत अस्वस्थ होणारी वृत्ती, भाषिक रूपांतून प्रकटणारा राक्षसी फटकळपणा, जगण्याविषयीची बेफिकीरी, समूहसंज्ञेचे प्रखर भान हे त्यांच्या काव्यात्मवृत्तीचे काही महत्त्वपूर्ण पैलू होते. त्यामुळे साऱ्या काव्यप्रवासात संवेदनशील वाचनाकानां अस्वस्थ करणारी, ऊर्जा देणारी, अचंबित करणारी प्रेरक कविता त्यांनी लिहिली. लौकिकातल्या काव्ययशाचा मोह त्यांच्या प्रतिभेने कधीच धरला नाही, हे या कवितेचे प्रयाजेनच नव्हते. उलट त्याविषयीचे तुसडेपण त्यांनी अलंकारासारखे जपले. कोणत्याही साचेबंध प्रस्थापिततेला त्यांनी आक्रमक भाषिक उपयोजनातून पाहिल्यापासून शेवटपर्यंत नकार दिला.

॥ २ ॥

काव्यभाषेचा विचार अनेक अंगांनी केला जातो. कवितेची भाषा भावनात्मक असते. भावस्पर्शीत्व हे काव्यभाषेचे अंगभूत लक्षण मानले जाते. अर्थात भावनात्मकतेच्या अनेक कोटी शक्य असतात. त्या कवीने घेतलेल्या वास्तवाविषयीच्या स्वीकारनकाराच्या भूमिकेशी संबंधित असतात. याशिवाय कवितेतील अनेकार्थता, प्रतीकप्रतिमांचा वापर, लयतालाचे प्रयोग, वैशिष्ट्यपूर्ण शब्दरूपे किंवा शब्दकळा, बोलीरूपता किंवा नागर आणि ग्राम्य उच्चारित शब्दबंधांचा वापर, अन्यभाषारूपांचा समर्पक वापर, कवितेचा रचनाबंध आणि शैली असे अनेक घटक काव्यभाषेशी निगडित असतात. यातून भाषेचे रसायन तयार होते. भाषेची अर्थवत्ता ही त्या त्या कवीचे एकप्रकारचे शक्तिस्थानच असते. परंपरागत अर्थविश्वाला ओलांडून भाषेचे डोंगर पार करता आले तर कवी काळावर आपला अमीट ठसा उमटवू शकतो. ढसाळ आपल्या भाषेने एकूणच मराठी भाषा उपयोजनातील सांकेतिकतेला ठोकारून आक्रमक, प्रतिहल्ल्यातील हत्यारासारखा भाषेचा वापर करतात.

ढसाळांनी आपल्या साऱ्या काव्यलेखनात अर्थपूर्ण भाषारूपांतून मराठी भाषेला अधिकाधिक सतेज केले आहे. भाषेचा इतका आवेगी, ओघवता वापर मराठी काव्यविश्वात अन्यत्र झालेला नाही. रचनाबंधाचे सर्वंकष नवेपण त्यांनी कवितेला दिले आहे. अनेक नव्या प्रतिमाप्रतीकांनी काव्यभाषा घडविली. सामान्य अभिरूचीला अज्ञात असलेली शब्दकळा प्रकट केली. लैंगिक व्यवहारातील शब्दांच्या मुक्त वापरातून

अनुक्रमणिका

विद्रोहाचे, संतापाचे स्वर उमटवले. ही भाषा श्रमिकांची, वेश्यावस्तीची, भणंगांच्या तोंडची, वंचितांची, गुन्हेगारांची, मवाल्यांची अशी एकूणच घमेलेवाल्यांच्या विश्वातील माणसांची भाषा आहे, जी डबुलंवाल्यांच्या विश्वाचा धिक्कार करते. त्यांच्या साऱ्या श्रद्धास्थानांपासून संकेतव्यवस्थेशी उभा दावा घोषित करते.

ढसाळांच्या कवितेची भाषा ही मूलतः विद्रोहाची भाषा आहे. हा विद्रोह त्यांनी अर्थांच्या अनेक शक्यतांसह मूर्त रूपाला आणला आहे. प्रस्थापित व्यवस्थेला अधिकाधिक विटंबित करून नव्या मानव्याची प्रस्थापना करू पाहणारी ही विद्रोहाची जाणीव आहे. ढसाळांनी विद्रोहाचे हत्यार व्यवस्थेवर तितक्याच निर्दयपणे चालवले आहे. व्यवस्थेच्या प्रत्येक शक्तिपीठाचा शक्तिपात व्हावा असा मारा त्यांनी केला आहे. मराठी काव्यप्रवाहातले बुजरेपण किंवा मध्यमवर्गीय शुचिता त्यांनी आपल्या जाणिवेच्या आसपासही फिरकू दिली नाही. आपल्या आतल्या आवाजाशी प्रतारणा करणे त्यांना शक्य झाले नाही. रसिकानुनयाच्या भुलभुलैयात ते स्वतःला निर्मोही ठेवण्यात यशस्वी झाले. त्यामुळे ढसाळांची काव्यभाषा रूढ मराठी कवितेतील विद्रोहाहून आपली पृथगात्मता राखताना दिसते.

ढसाळ अनेक भाषारूपांचा सूचक वापर करतात. उदा. त्यांची सनातन दया फॉकलंडवरच्या भडव्यांहून उंच नाही / खरंच त्यांनी आपल्यासाठी आभाळात मांडव घातला नाही / या किंवा 'माण्साने' या कवितेतील येसूच्या पैगंबराच्या बुद्धाच्या विष्णूच्या वंशजाना फाशी द्यावे / देवळे चर्च मशिदी शिल्पे म्युझियम कुस्करून टाकावीत... माण्साने जगातील सर्व धर्मग्रंथांची पाने फाडून हागायचे झाल्यावर त्यांनी बोचे साफ करावेत. ढसाळ रूढ सामाजिक सभ्यतेचा बुरखा फाडून तिच्यातील हीनता अधोरेखित करण्याचे काव्यात्म कार्य अशा आक्रमक शब्दबंधांतून करताना दिसतात. 'मी मारले सूर्याच्या रथाचे सात घोडे', 'तुही इयत्ता कंची', 'बेंबीचा देठ ओला होण्याच्या वयात', 'ज्ञानोबा', 'मुंबई, मुंबई, माझ्या प्रिय रांडे' अशा कितीतरी कवितांतून त्यांनी प्रस्थापित व्यवस्थेच्या श्रद्धास्थानांना अधिकाधिक विटंबित केले आहे.

व्यवस्थेला प्रश्नांकित करणे आणि त्यांतील कावेबाजपणावर प्रहार करणे हा ढसाळांच्या विद्रोही जाणिवेच्या अंतस्तरातील एक पैलू आहे. ढसाळ आपल्या शब्दाशब्दांतून व्यवस्थेच्या कावेबाज, कुटिल आणि छुप्या नीतिमत्तेवर कुऱ्हाड चालवतात. वेदकाळापासून तथाकथित सांस्कृतिक मूल्यांच्या प्रस्थापनेपासून आजवरच्या सामाजिक रचनेमध्ये उतरंडी निर्माण करणाऱ्यांच्या विश्वावर ही कविता बेसुमार घाला घालते. तसेच संस्कृतीचे पूनर्वाचन करून रूढ सामाजिक नैतिकतेच्या कल्पनांना उधळून देत शेवटच्या माणसासाठी नव्या मानव्याची प्रस्थापना करण्या प्रयत्न करते. त्यामुळे ढसाळांची कविता म्हणजे एकप्रकारचे सामाजिक सांस्कृतिक उत्खनन आहे असे म्हणता येईल.

'हे वाघ्या! तू माणसालाच असे हीन केलेस / तुला वेशीबाहेरला आक्रोश ऐकू आला नाही का? /पेटलेला माणूस दिसला नाही का? / उदासीनतेचा विराटपणा तुला स्पर्शला नाही का?' मानवी अस्तित्वविनाशाची परखड जाणीव येथे प्रकट होते. किंवा 'स्वातंत्र्य कुठल्या गाढवीचे नाव आहे / रामराज्याच्या कितव्या घरात आपण न्हातोत / उद्गम विकास उंची संस्कार संस्कृती / कंचा मूलभूत अर्थ स्वातंत्र्याचा', स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या अपेक्षाभंगातून जाणवलेल्या भेसूर सत्याचा समाचार ढसाळांनी वरील सांकल्पनिक परिभाषेत घेतला आहे. 'ज्ञानोबा' या कवितेत ढसाळ जात, वर्ण, धर्माचे नद्याडोंगर ओलांडून अमृतानुभवाकडे जाऊ न शकलेल्या ज्ञानोबांना प्रश्नांकित करतात.

'किती झटकन विसरलात आई बापाचा भावंडांचा / स्वतःचाही झालेला छळ / पाठ तुमची फोडली त्यांनी रेड्याच्या पाठीवर वळ / ज्या प्रस्थापित व्यवस्थेने असे तुमचे हालाहाल केले / त्या प्रस्थापितांची मान्यता मिळवून तुम्ही काय मिळवले / सर्व ब्रह्म कळल्यावर असे मान तुकवणे बरे का?' सामाजिक शोषणाचा प्रतिकार न करणाऱ्या ज्ञानोबांचा ढसाळ तितक्याच परखड शब्दांत झाडाझडती घेतात. 'लक्ष्मी / सरस्वती पक्षपाती रांडा / आम्ही या म्हटलो त्या आल्या नाहीत / आमच्याखाली निजा म्हटलो / त्या निजल्या नाहीत.' कला आणि संपत्ती हिरावून घेऊन दलितांना नरकात ढकलून दिलेल्या व्यवस्थेवर ढसाळांचे हे शब्दास्त्र भेदकपणे मारा करते.

ढसाळांच्या कवितेतील प्रतिमा अधोविश्वाच्या भाषेतील व्यंजक अर्थाच्या प्रतिमा आहेत. वरवरच्या सामान्य वाटणाऱ्या जीवनातच शोषणाची भयकारी जाणीव कशी क्रियाशील आहे याचा साक्षात्कार घडविण्यासाठी आणि त्याबाबतचा संताप व्यक्त करण्यासाठी ढसाळांनी एरव्ही आच्छादून ठेवल्या जाणाऱ्या गुप्तांगाना उघडे केले आहे. लंड किंवा लवडा, पुची, गुद्द्वार, गांड, फोदा, मलमुत्राचे उल्लेख करून ढसाळ भाषेला सोज्वळतेच्या सोवळ्यात गुंडाळून ठेवणाऱ्यांच्या सर्व संकेतांना हरताळ फासतात. आपण सर्व किड्यांचे भायबंद असल्यासारखे, वेश्येच्या धंदेवाईक प्रेरणांतून सांगाडलेलं

जिभांचं जुळं, गुदद्वारात उठलेली फॉस्फरस संध्याकाळ, गू-माण्सं, मुतणाऱ्या पालीचा शुभशकून, अशी काव्यात्म विधाने अनेकार्थसूचक करून कवितेचा आशय समृद्ध करतात. माणसांच्या प्रवृत्तीमधील विकृती अत्यंत साध्या शब्दांतून तरीही उपहासात्मकतेने ढसाळ अधोरेखित करतात. 'प्रेयसी : रांडेचे सोज्वळ रूप / बायका पुरषांच्या छापील रांडा / पुरूष : बायकांचे भडवे / स्त्रीपुरूषांचा संबंध / थोड्याशा रांडा थोडेसे भडवे थोडेसे दातवण / जे वापरल्यावर थुंकून टाकायचे आणि गंगेत दात खंगाळायचे /' अशा अपरिचित शब्दकळेमुळे ही कविता वाचकांच्या अभिरूचीलाही सतत धडका देत राहते. प्रतिशोधासाठी भाषेला शस्त्र म्हणून वापरण्याचे काव्यात्म भान ढसाळांनी आपल्या साऱ्याच काव्यप्रवासात प्रकट केले आहे.

काव्य भाषेतून संतापभावनेचे विश्वरूप ढसाळांनी आपल्या समग्र कवितेत घडविले आहे. सनातनी धार्मिक संस्कृतीवाद्यांवरच नव्हे तर समाजातील न्यायव्यवस्था, राजकीय, आर्थिक व्यवस्थांच्या कुटिलतेवर त्यातील भ्रष्टतेवर, चंगळवादावर ते प्रतिहल्ला करतात. अपेक्षाभंग आणि मनोभंगामुळे कृद्ध झालेल्या, चवताळलेल्या वीरनायकाचे हे उद्‌गार आहेत. 'रक्तात पेटलेल्या अगणित सूर्यानों या शहरालाच आग लावीत चला' असा इशारा देतात. काळ्या कपड्यातील काळ्या हृदयाचा माणूस / हा आधुनिक राक्षस आहे / तो आम्हाला हॅरॅश करतो / तो आम्हाला जमीन नाकारतो, कायदा आणि सुव्यवस्थेच्या आडून क्रियाशील असलेली न्यायव्यवस्था कशी राक्षसी रूपात वावरत आहे. याविषयीची चीड येथे व्यक्त होते. स्वातंतत्र्योत्तर काळात सामाजिक न्यायासाठी उभी राहिलेली ही व्यवस्था किती विकृतीच्या मार्गाने प्रस्थान करते आहे याचा साक्षात्कार ढसाळ घडवितात. याने न्यायदेवतेला केले आहे वारांगना / ती झोपते दिवसाढवळ्या पैसेवाल्यांकडे, कलुषित झालेल्या न्यायव्यवस्थेच्या व्यभिचारी रूपाला ढसाळ लाथाडताना दिसतात. न्यायव्यवस्थेच्या पावित्र्यभंगाविषयीची इतकी विखारी भाषा मराठी साहित्यात अन्यत्र आलेली नाही.

संतापातून उद्‌भवलेले अनेक विखार ढसाळांच्या काव्यभाषेचे एक अभिन्न अंग झालेले दिसतात. या विखारांतून प्रतिपक्षाच्या विश्वावर ते कुऱ्हाड चालवतात. मराठी साहित्यविश्वातील अतिपरिचित संहितांची मोडतोड करून त्यातून आत्यंतिक उपहासाचे, उपरोधाचे भाषिक आविष्कार ढसाळांनी घडवून आणले आहेत. उदाहरणार्थ -

१. पाण्याला जातीय रंग देणारा तुमचा / एकुलता एक ईश्वर त्याला लागेल अफलातून बुळगा

२. पैल तो गे काऊ हागताहे / अपशकुन गे माये सांगताहे

३. देव आणि देवाची भानगड अस्ती बोंडीच्या भोकासारखी/ मुतून झालं की आपून गप्प बसावं

४. वर्तमानाच्या कागदानं / आपलं ढुंगण पुसलेलं बरं / राज्यपालांच्या दारात आपलं हागतेलं बरं

५. ४ वेद १८ पुराणे ६ शास्त्रं / मी मारतो लंडावर / ६ राग ३६ रागिण्या मी खेळवतो उरावर

नमुन्यादाखल वरील काही ओळी ढसाळांच्या मानसिक उद्रेकाचा प्रत्यय देणाऱ्या आहेत. हा मानसिक उद्रेक त्यांच्या कवितिक व्यक्तिमत्त्वाचे एक अंग आहे.

'खेळ' या संग्रहात ढसाळ लिंगसंवेदना आणि लिंगप्रतिमाचे क्रीडाजनक उपयोजन करताना दिसतात. 'खेळ'मधील भाषिकबंधातून रूपकभावाचा आविष्कारही मराठी काव्यप्रवाहाला नवा होता. ती केवळ स्वैर कामविलासाची कविता नव्हती तर ढसाळांनी स्त्रीपुरूष कामभावाचे, सहभावाचे रूपक उभे केले आहे. कामभाव हाच सहभाव अशी एकात्मता साधून ढसाळ स्त्रीपुरूषाना समानबिंदूवर आणून उभे करतात. 'खेळ'ची अर्पणपत्रिका 'स्त्रीपुरूषांच्या कामविलासांना' अशी देऊन ते शोषणरहित जीवनाच्या आदिम प्रेरणेला उजागर करतात. 'तुही इयत्ता कंची', 'गांडू बगिचा' या संग्रहातही ढसाळांनी भाषेला आपल्या शैलीने वाकवून तिच्याविषयीचे संवेदन व्यक्त केले आहे. फाटलेल्या हृदयाचा हा भेदक स्वर आहे. त्यामुळे उपहासाच्या जाणिवेसह कारूण्याचा उद्‌गार या कवितेच्या केंद्रस्थानी राहिला आहे.

संतापजन्य भाषिक रूपे ढसाळांच्या कवितेत दिसली तरी 'गोलपिठा'पासून उत्तरोत्तर ही संतापभावना व्यापक अशा संयमिततेकडे झुकत गेलेली दिसते. 'गोलपिठा'त तिचा उच्चार सर्वाधिक तीव्र होता. कारण प्रारंभीच्या काळात ढसाळ उग्र लेखकाच्या प्रतिमारूपात अवतरलेले दिसतात. पँथरची आग मनात आणि मेंदूत घेऊन वावरणाऱ्या कार्यकर्त्या कवीची होती. पँथर संपवून पुढे राजकीय व्यवस्थेच्या आसऱ्याला विसावल्यामुळे ढसाळांमधील वीरनायक शांत होत गेला. त्यामुळे काव्यभाषा सुद्धा आधीच्या उग्रतेपासून दूर गेली. 'या सत्तेत जीव रमत नाही' या संग्रहापासून ढसाळांची भाषा परात्मता, विफलता, हळव्या भावनांचे चित्रण करताना दिसते. 'गतकाळात किती मरणे मरून मी जगलो आहे.' असा हा शांततेचा स्वर या भाषेत आहे. मात्र उपहास उपरोधाची शस्त्रे

मात्र ढसाळांच्या हातातून शेवटपर्यंत गळून पडली नाहीत.

'या सत्तेत जीव रमत नाही', 'मी मारले सूर्याच्या रथाचे सात घोडे', 'निवार्णा अगोदरची पीडा' या काव्यसंग्रहात कविता आत्मस्वराकडे झुकली. साहजिकच या संग्रहातील भाषिक संवेदन करूणा, व्याकुळता, मनाची घालमेल, कासावीसपणा, भ्रमनिरासता उद्वेग, चिंता अशा वेदनांना उत्सर्जित करताना दिसते. 'मातीच्या वैभवात जीव पडला आहे अडकून म्हणून कधी नव्हे ते आयुष्य लागले आहे आवडू' अशी मानसिक घालमेल इथे व्यक्त होते. कोणत्याही प्रकारच्या सत्तेत जीव रमेनासा झाला आणि जगणे हे केवळ जगणे राहिले. आला दिवस जगून टाकला / गेला दिवस हगून टाकला इतके स्वाभाविक झाले. रान रानासारखे राहिले नाही अशा अनेक उद्गारांतून काहीतरी हरवून, हातातून निसटून गेल्याची खंत व्यक्त होत राहते.

ढसाळांनी आपल्या काव्यभाषेत अनेकप्रकारच्या प्रतिमा विपुलतेने वापरल्या आहेत. किंबहुना या प्रतिमावैपुल्यामुळे त्यांच्या भाषेचे असांकेतिकीकरण सहजच होत जाते. या प्रतिमा त्यांच्या दैनंदिन जीवनजाणिवेचा प्रत्यय देतात. तसेच द्रोहाची, बंडखोरीची, आक्रमकतेची, नकाराची, उद्वीग्नतेची, बेफिकीरीची अनेक अर्थरूपे या प्रतिमांमधून आली आहेत. उदाहरणादाखल काही प्रतिमा पाहाता येतील. माझ्या चेहऱ्यामोहऱ्यातनं गळणारं गूपाणी, जडजंबाल अंधार, उद्ध्वस्त पुच्या, नरकाचा कोंडवाडा, रक्तात पेटलेले अगणित सूर्य, झगे वर केलेले हिजडे, दारिद्र्याचे स्वतंत्र शेत, थुई थुई काळोख, उद्ध्वस्त उजेड, संत फॉकलंड रोड, गांडू बगिचा, रांडव मराठी, पापाचे छिनाल घट, सामाजिक पोतराजी प्रेषित, भ्रमाचा कंडोम, भाषेच्या गुप्तांगातला उपदंश, अक्षय योन्या, काळोखाचा जार, कलीयुगातलं आमच्या अस्तित्वाचं उघडंनागडं तान्हुलं अशा कितीतरी अर्थवाही प्रतिमातून ढसाळांनी रांडव मराठी भाषेला सवाष्ण करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. 'सूर्यफुले हाती ठेवणारा फकीर' ही डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांविषयी आलेली प्रतिमा कृतज्ञतेच्या आणि अपार प्रेमाच्या जाणिवेचे निदर्शक असलेली दिसते.


ढसाळ प्रतिमांमधून भाषेचा सर्जक वापर करतात तसे शब्दांची नादमय आवृत्तीवाचक रूपे साकार करून वैशिष्टपूर्ण शब्दकळेचा प्रत्यय देतात. गुबुगुबु आतबाहेर, उद्ध्वस्त उजेड, थुईथुई काळोख, थूः तुझ्यावर इझ्यावरतू थू थू थू ः, अशा विशिष्ट आवृत्तीवाचकतेने भाषेला अपरिचित बनविण्याचे कौशल्य ढसाळांच्या काव्यत्म वृत्तीचाच भाग असलेला दिसतो. हिंदी बोलभाषेतील अनेक विधाने व इंग्रजी शब्दरूपातून ढसाळ बंबैया मराठीचे वैशिष्ट्यपूर्ण रूप साकार करतात.

शिव्या, म्हणी, वाक्प्रचार, लोकगीते यांचा सर्जक वापर ढसाळांनी केला आहे. त्यांच्या सर्व काव्यसंग्रहांची शीर्षकेही तितकीच अर्थवाही असलेली दिसतात. मात्र शिव्या किंवा म्हणी सामान्यतः अश्लील वाटत असल्या तरी त्या अर्थाच्या संदर्भांत बोलभाषेची विशेषता प्रकट करतात. जीवाचे नाव लवडा ठेऊन जगणाऱ्यांनी खुशाल जगावे, आयभन झवून टाकली ही शब्दरूपे फ्रेज म्हणून आल्यामुळे त्यांचे सूचितार्थ सामान्यच ठरतात. अर्थात घमेलेवाल्यांच्या विश्वाचा प्रतिनिधी म्हणून आपण अशी शब्दरूपे जाणिवपूर्वक वापरली आहेत. असे त्यांनी प्रज्ञा दया पवार आणि सतीश काळसेकर यांना दिलेल्या मुलाखतीत म्हटले आहे.

ढसाळांची भाषा मराठी काव्यप्रवाहात महाजलप्रपातासाखी आदळली. त्यांनी भाषेला विविध संदर्भांनी खेळवत ठेवले. ओघवत्या शैलीने आणि बंधनमुक्त रचनाप्रकारांनी अभिनव असे प्रयोग केले. ही भाषा मराठी भाषाकुळाला खचितच समृद्ध करणारी भाषा आहे. या सर्व घटकांमुळे ढसाळांच्या कवितेचे अनुकरण करणे त्यानंतरच्या कवितेला झेपले नाही आणि सोपेही राहिले नाही.

■ डॉ. गोविंद काजरेकर
मु.पो. तळवडे, ता. सावंतवाडी,
जि. सिंधुदुर्ग - ४१६ ५२९
भ्रमणभाष : ९४२२६३३३५५

अनुक्रमणिका



नामदेव ढसाळ यांचे कादंबरी लेखन

प्रा. राजेंद्र मुंढे

नामदेव ढसाळ कवी म्हणूनच परिचित आहेत नामदेव ढसाळांचे 'गोलपीठा' (१९७२) ते 'निर्वाणा अगोदरची पीडा' (२०१०) पर्यन्त दहा काव्यसंग्रह प्रकाशित आहेत. 'मी भयंकराच्या दरवाज्यात उभा आहे' आणि 'चिंध्यांची देवी' आणि इतर कविता अशी काव्यसंकल्पनेही प्रसिद्ध आहेत. त्याचबरोबर त्यांनी गद्यलेखनही केले असून 'भिंतीचा अनादिबंध' ही एकमेव कथा 'हाडकी हाडवळा' आणि 'निगेटीव्ह स्पेस' या दोन कादंबऱ्या लिहिल्या आहेत. प्रस्तुत लेखात 'हाडकी हाडवळा' (१९८१) आणि 'निगेटीव्ह स्पेस' (१९८७) या दोन कादंबऱ्यांचा विचार करण्यात येऊन कथात्मक साहित्यात या कादंबऱ्याचे स्थान कुठे आहे, याचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

हाडकी हाडवळा :

'हाडकी' या शब्दांतील अर्थ 'गावातील मेलेली जनावरे नेऊन टाकण्यासाठी तसेच त्यांचे विच्छेदन करण्यासाठी महार समाजाला दिलेली जागा' होय. तर 'हाडोळा' चा अर्थ महाराला दिलेली इमानी/वतनी जमीन होय. तर 'हाडकी हाडोळा' या संज्ञेचा बोलीभाषेत झालेला 'हाडकी हाडवळा' असा अपभ्रंश नामदेव ढसाळ यांनी आपल्या कादंवरीच्या शीर्षकासाठी उपयोजिला आहे.

कथानक :

पुणे जिल्ह्यातील कनेरसर गावच्या देवनाक महाराची धाकटी मुलगी बायजा ही या कादंवरीची नायिका आहे. तिचा विवाह पूर गावच्या सायबाशी झाला आहे. हाडकी हाडवळ्याच्या जमिनीतून येणाऱ्या तटपुंज्या उत्पन्नामुळे त्यांच्या एकत्रित कुटुंबाचा पुरेसा उदरनिर्वाह होऊ शकत नाही. म्हणून घरातील दीर, जाऊ आणि तिचा नवराही मुंबईला राहात आहेत. सायबा मुंबईच्या क्राफर्ड मार्केटमधील रहेमान शेठच्या पदरी राहून कापलेल्या जनावरांची ने-आण करुन गावी पैसा पाठवीत असतो.

सायब्या मुंबईला गेल्यानंतर येसकरकीची काठी बायजाच्या कुटुंबाकडे येते. बलुतेदारीनुसार महाराला गावाने नेमून दिलेल्या कामांना येसकरकी म्हटले जाते. ती प्रत्येक महार कुटुंबाकडे एक वर्षासाठी दिली जात असे. त्या वर्षभरात त्या कुटुंबाने गावाची नेमून दलेली कामे करावयाची हा दंडक कादंबरीत आलेल्या कथागत काळात ही येसकरकीची काठी बायजाच्या कुटुंबाकडे येते. परंतु तिच्या घरचे सगळेच मुंबईला राहात असल्याने येसकरकीची सारी जबाबदारी बायजावर येऊन पडते. हे या काळातील बायजाचे जगणे कादंवरीच्या केंद्रस्थानी आहे.

कनेरसरच्या परिसरात अतिवृष्टीमुळे ओला दुष्काळ पडला आहे. या ओढावलेल्या नैसर्गिक आपत्तीला बायजा सामोरी जाते. या दिवसांत ती आणि तिचा मुलगा सावळ्या यांना भाताभाकरीशिवाय केवळ तरवडाची भाजी उकडून खाऊन दिवस कंठावे लागतात. त्यानंतर काही दिवसांच्या कुपोषणामुळे बायजा व सावळ्या बामणाच्या नह्यारात जाऊन शेंगा तोडतात, त्याचवेळी इमानदाराचा गडी बायजाला शेंगा तोडतांना पकडतो आणि तिच्याशी अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न करतो. तेव्हा या गड्याशी बायजा व सावळ्या यांचा संघर्ष उद्भवतो.

गावातील उच्चवर्णीय सखा गावडेचा रक्तपितीमुळे मृत्यू झाल्यानंतर बायजाला प्रेताचे अंत्यसंस्कार करायला सांगतात. इतकेच नव्हे तर त्यासाठी तिच्यावर गावकरी दबाव आणू पाहतात तेव्हा गावकरी आणि बायजा यांच्यात शाब्दिक

चकमकी होताना दिसतात. परंतु ती खचून न जाता या प्रसंगाला धीराने सामोरी जाते. यासोबतच बायजा व पाराय यांच्यातील व्यक्तिगत हेव्यादाव्यांवरुन होणारी शिवीगाळी आणि त्यानंतर हाणामारी होते.

बायजा गावकरी आणि कुटुंबीय यांच्याशी एकाचवेळी संघर्ष करीत असते. सायबाचा चुलता नारायण कौटुंबिक मालमत्तेवरुन भांडण करतो. घराची, हाडकी हाडवळ्याची वाटणी करतो. तेव्हा त्यांच्यात संघर्ष होतो. तसेच रोजरोज महारडोहात पोहून कंटाळा आल्यानंतर आपल्या मित्रमंडळीला घेऊन त्यांच्यात हाडकी हाडवळ्याच्या जमिनीत इनामदाराने अनधिकृत बांधलेल्या विहिरीत पोहण्यास जातो. तेव्हा इनामदार आणि सावळ्या यांच्यातही संघर्ष उद्‌भवतो.

कादंबरीच्या शेवटी स्वतःच्या शीलाचे रक्षण करण्यासाठी बायजा मनबाशी ज्या पद्धतीने दोन हात करते तो संघर्ष म्हणजे या कादंबरीतली तीव्रतम बिंदू आहे. ज्या मनबाला पोटच्या मायेने वागविले त्या दिरालाच तिच्या देहाविषयी भूक निर्माण व्हावी या प्रसंगाला धीरोदात्तपणे सामोरी जात तिच्या तनामनाची आग शांत होईपर्यंत त्याचा सूड घेते.

या कादंबरीचे 'संघर्ष' हे कथानकाच कथाबीज असून ह्याआधारे कादंबरीची उभारणी झाली आहे. ओल्या दुष्काळात स्वतःला जगविण्यासाठी, शील रक्षणासाठी, माणूस म्हणून जगण्यासाठी, भुकेसाठी, समतेसाठी म्हणजेच नैसर्गिक आपत्तीपासून ते मानवी वासनाविकार आणि एक समाजव्यवस्था या सर्वाच्या विरोधातील संघर्षाची नानाविध रुपे कादंबरीतून मुखरित होतात. थोडक्यात या संघर्षाला सामाजिक-सांस्कृतिक-आर्थिक परिणाम प्राप्त होते.

व्यक्तिरेखा :

या कादंबरीतील बायजा ही नायिका असून तिच्यात जीवन संघर्षातून कथानक पुढे सरकते. बायजाचा नवरा नोकरीनिमित्ताने मुंबईस राहात असतो. त्याच्या आठवणीने ती व्याकुळ होते. तिच्या मनाची हुरहूर ती नारायणाच्या पारीकडे व्यक्त करते, 'म्हणतात ना की, कुंकाशिवाय भांगाला नि नवऱ्याशिवाय भावनाशीला शोभा न्हाय यावरुन तिच्या आयुष्यात नवऱ्याची सोबत किती महत्त्वाची आहे हेच ती येथे पटवून देते.

पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत स्त्रियांची स्थिती अवमानकारक केली जाते. जात, धर्म, वंश आणि संस्कृती या सर्वाचीच जपणूक करण्यासाठी या सर्वांचाच संबंध स्त्रीचरित्र्याशी जोडला जातो. याच परंपरेचा संस्कार असणारी बायजा मनबाच्या स्वच्छंदी वर्तनाला जबाबदार न धरता गावातील बायकांनाच दोष देते. ''बायकांच्या जल्म म्हंजी नरकाची कुंडी!'' असे सांगून ''मानसाच्या भोगा-इलासाला बी मर्यादा होवी. त्यातच मानसाच्या जल्मानं भलं असतं. सार्थक असतं. वेसवासारखं, ध्यानवासारखं बाईला वागून कसं चालल? बाईचा जल्म लय कठीण, लय अवघड.''[१] यातून पुरुषाची स्त्रीसंबंधी असणारी स्वच्छंदी मनोवृत्ती येथे गृहीतच धरली जाते असे निरीक्षण नोंदविता येते. म्हणूनच बायजा मनबाच्या स्वच्छंदी वृत्तीला जबाबदार मानीत तर नाहीच उलटपक्षी ती बायकांनाच दोष देते.

पतीवर निष्ठा असणारी बायजा 'नवरा खूप दिवस मुंबईहून न परतल्याने आपल्याला विसरला तर नाही ना? या विचाराने साशंक होते. परंतु सायब्याचे आपल्यावर प्रेम आहे. हा विश्वासही तिच्या मनात दृढ आहे. बायजा ज्या परिसरात घडली-वाढली त्या मातीतले संस्कार तिच्या वर्तनातून प्रतिबिंबित होतात. स्वप्नांवर, शकून-अपशकूनांवरही तिचा गाढ विश्वास आहे. तसेच परंपरेने चालत आलेले सण-उत्सव, कौटुंबिक विधीही ती मोठ्या भक्तिभावाने साजरे करते. त्यामुळेच मरीदेवीचा, काळूदेवीचा उत्सव साजरा करणे, दर अमावस्येला नाथबाबाला चिलीम चढविणे, मुलाच्या सुखासाठी नवस बोलून फेडणे व त्यासाठी भंडारा घालणे असे विधी ती अंतःकरणपूर्वक साजरी करते. बायजा अशिक्षित असली तरीही पाप-पुण्य अशा परंपरागत कल्पनाविषयी, प्राचीन कथा-मिथकांविषयी पुनर्विचार करताना दिसते. हे शहाणपण ती प्रत्यक्ष जगण्यातल्या अनुभवांवरुन शिकली आहे. बायजा स्वभावाने बंडखोर आहे. तिची ही बंडखोरी सखा गावडेच्या मृत्युप्रसंगी दिसून येते. एरव्ही उच्चवर्णीय कोणत्याही कार्यात जवळ न येऊ देणारे, रक्तपिती झालेल्या सखा गावडेच्या प्रेतावर अंत्यसंस्कार करायला सांगतात. याला ती बाणेदारपणे नकार देते. बंडखोर असणारी बायजा मनाने तितकीच हळवी आणि संवेदनशीलही आहे. म्हणूनच सखा गावडेच्या मृत्यूनंतर मायबाप शिवाय अनाथ झालेल्या त्याच्या मुलाच्या आक्रंदनाने तिचे हृदय पिळवटते. परंतु अस्पृश्यतेच्या कलंकापायी ती त्या मुलाचे दुःख हलके करु शकत नसल्याने तो सारा राग सावळ्यावर काढते. नात्याने चुलतदीर असणाऱ्या मनबावर पोटच्या मुलासारखी माया करते. पण तोच मनबा पुरुषी नजरेने तिच्या स्त्री-देहाकडे पाहतो तेव्हा ती पेटून उठते आणि त्याचा सूड घेते. या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर तिच्या आयुष्यात काही विश्रांतीच्या जागाही आहेत त्या म्हणजे तिच्या वडिलांच्या व माहेरच्या आठवणी, अधूनमधून मिळणारा सायब्याचा सहवास आणि सणासुदीच्या दिवसात बायकांनी एकत्र येऊन गाणी

म्हणणे, नृत्य करणे, हास्यविनोद करणे अशा गोष्टीमधून बायजाला जगण्याचे बळ मिळते.

अशाप्रकारे रुढी-परंपरांना जोपासणारी तरीही कथा मिथकांविषयी चिंतन-मनन करणारी बायजा ही एक स्वाभिमानी आणि बंडखोर व्यक्तिरेखा आहे. त्यामुळे काठीच्या जिंदगानीची (येसकरकीची) तिला किळस वाटते. मुलगा सावळ्या व बाप देवनाक यांच्यावर अपार माया करणारी तसेच नवरा सायब्यावर एकनिष्ठेने श्रद्धा ठेवणारी बायजा ही कर्तृत्ववान स्त्री आहे. नवऱ्याच्या अनुपस्थितीतही ती संसारातील जबाबदाऱ्या नेटाने सांभाळते. थोडक्यात एक संघर्षशील नायिका अशी तिची प्रतिमा 'हाडकी हाडवळा' या कादंबरीतून प्रतीत होते.

देवनाक महार हा बायजा या कादंबरीच्या नायिकेचा बाप आहे, तत्कालीन परिस्थितीतील प्रचलित असणाऱ्या दलित समाजात परिस्थितीपेक्षा एक पाऊल पुढे आहे. तसेच आपल्या मुलीचे बायजाचे पालनपोषण करतांना एक खंबीर, कर्तृत्ववान स्त्री म्हणून घडवितांना तिच्यावर मर्दानी संस्कार घडविणारा कर्तृत्ववान बाप म्हणून त्याची प्रतिमा कादंबरीतून साकार होते.

'सायब्या' हा बायजाचा पती असून कादंबरीत दुय्यम स्थान असले तरी सायब्या हा बायजाच्या एकून जगण्यामागील कृतिशील प्रेरणा आहे. 'सावळ्या' ही या कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखा असून बायजा-सायब्याचा आठदहा वर्षाचा एकुलता एक मुलगा आहे. तो अभ्यासू व खट्याळ आहे. तसाच तो कष्टाळूदेखील आहे. त्याच्या पातळीवर तो बंडखोर असल्याची व्यक्तिरेखा या कादंबरीतून प्रत्ययाला येते. 'मनबा' कादंबरीच्या उत्तरार्धात येणारी ही व्यक्तिरेखा संपूर्ण कथानकाला कलाटणी देण्याचे कार्य करते. वासनेने वखवखलेल्या व्यक्तिरेखेचा शेवट कसा केविलवाणा होतो हे दर्शविले जातेच, याशिवाय कादंबरीच्या नायिकेच्या जाज्वल्य व्यक्तिमत्वालाही झळाळी प्राप्त होते. यादृष्टीने मनबा ही व्यक्तिरेखा महत्वाची ठरते.

वातावरणनिर्मिती :

कादंबरीचे कथानक साकार होते ते स्थलकालबद्ध वातावणातच होय. तसेच कादंबरीतील कोणतीही व्यक्तिरेखा पोकळीत जगत नाही, तर ती व्यक्तिरेखा कादंबरीतील वातावरणातच घडत, वाढत, वावरत असते. कादंबरीतील व्यक्तिरेखांच्या अंतर्बाह्य वर्तनाला चालना देण्याचे फार मोठे ामर्थ्य या वातावरणात असते. त्यामुळेच हे वातावरण वर्णनपर पातळीवर न राहता रचनेचे ते अविभाज्य अंगच बनते. 'हाडकी हाडवळा' मधील वातावरणनिर्मितीच्या दृष्टीनेही असाच अनुभव येतो. या कादंबरीत कनेरसर गाव तेथील रान, नदी, धामणटेकचा डोंगर, बामणाची विहीर, हाडकी हाडवळा, शाळा आणि महारवाडा हा सर्व परिसर आणि त्यात वावरणारी माणसे व त्यांचे जगणे हे सारे 'हाडकी हाडवळ्या' तील वातावरणनिर्मितीद्वारे साधले आहे हे निश्चित. शिवाय आट्यापाट्या, हुतूतू, लगोरी, शिवणापाणी अशा खास ग्रामीण परिसरातच आढळणाऱ्या खेळांच्या उल्लेखांवरुन आणि तेथील धर्मविधी, जत्रा-उरुस, सणउत्सव, कुस्त्यांचे फड, आपपसांतले हेवेदावे, भाऊबंदकी, रागलोभ या साऱ्यांतून समग्र गाववाड्यातले वातावरण प्रत्ययाला येते हा या कादंबरीचा एक विशेष मानावा लागेल.

निवेदन :

'हाडकी हाडवळा' या कादंबरीतील निवेदन करणारा निवेदक कादंबरीतील प्रत्यक्ष व्यक्तिरेखा नसल्याने तो तृतीय पुरुषी निवेदक आहे असे म्हणता येते. तसेच तृतीयपुरुषी निवेदकाप्रमाणे तो सर्वज्ञ, सर्वसाक्षी असला तरी आणि कादंबरीत घडणाऱ्या घटनाप्रसंगामध्ये तो कृतिरुपाने सहभागी नसला तरी त्याला तटस्थ निवेदक म्हणता येत नाही. कारण घडणाऱ्या घटनाप्रसंगाचे केवळ बाह्य तटस्थेने वर्णन तो करीत नाही; तर त्या घटनाप्रसंगावर आपले मत प्रदर्शित करतो, भाष्य करतो, चिंतन व्यक्त करतो. घटनाप्रसंग - व्यक्तिरेखा यांच्याकडे तो ज्या पद्धतीने पाहतो त्यावरुन त्याची स्वतःची एक मूल्यदृष्टी आहे असे म्हणता येते.

कादंबरीत घडणाऱ्या घटना-प्रसंगाची मांडणी करतांना त्याविषयीचे निवेदन 'अखेर भळभळत राहणाऱ्या पावसाचं प्रपातात रुपांतर झालं. दिवसांवर दिवस रेटू लागले; पण पाऊस काही खळेना...' किंवा 'तसा आषाढ श्रावण म्हटला की तो महारमांगाचा काळ ठरतो....' या निवेदनातून निवेदकाची सहानुभूती बायजा या नायिकेला आणि तिच्या बरोबरच महारवाड्यातील दलितांना असल्याचे निदर्शनास येते. म्हणूनच तिच्याभोवती बाह्य परिस्थितीचे, रुढी-परंपरांचे जे पाश आहेत त्याविरुद्धचे त्याचे चिंतन, भाष्य कादंबरीत वारंवार प्रकट होतांना दिसते. या कादंबरीतील निवेदनाचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे बायजाचे 'स्वगत' होय. या स्वगतातून बायजा आत्मचिंतन करतांना दिसते. परंतु या स्वगताच्या माध्यमातून कादंबरीतील गर्भित लेखकच समाज, देव, देश, संस्कृती आणि एकूणच व्यवस्थेवर विदारक भाष्य करतांना दिसतो. कधी कधी बायजाच्या स्मरण साखळीतून, अनुलोम पद्धतीने हे उलगडले

अनुक्रमणिका

जाते. कादंबरीच्या निवेदनाचे तिसरे वैशिष्ट्य म्हणजे बरेचदा निवेदकाच्या निवेदनाने सुरुवात होऊन त्याचा दृष्टिक्षेप बायजाच्या आत्मचिंतनात्मक स्वगताकडे वळतो. उदा. ''घरातल्या घरात बायजा चिंताक्रांत होऊन बसलेली डोळ्यात पाणी अडवून टपोऱ्या डोळ्यांनी ती पावसाकडे पाहात होती. काय केलं म्हणजे पाऊस बंद होईल ह्या विचारात ती गढून गेली.''[२] या निवेदकाच्या निवेदनानंतर लगेचच बायजा आपल्या भूतकाळात रममाण होते. तिचा भूतकाळ स्मरणरुपाने चित्रमय शैलीत तिच्या आणि पर्यायाने वाचकाच्याही डोळ्यासमोरुन सरकत राहतो. या कादंबरीचा निवेदक तृतीय पुरुषी असला आणि कादंबरीतील घटनांमध्ये प्रत्यक्ष कृतिरुपाने तो सहभागी नसला तरी त्याची ह्या कादंबरीतील 'भावनिक गुंतवणूक' स्पष्टपणे अधोरेखित होते. यातून त्याचा कल स्पष्टपणे शोषित दुर्बल घटकांकडे असल्याचे निष्पन्न होते.

भाषा :

या कादंबरीची भाषा ही पुणे जिल्ह्यातील कनेरसर-पूर परिसरातील ग्रामीण महारी बोलीभाषा आहे. या कादंबरीचे निवेदन प्रमाण मराठी भाषेतील असून संवाद मात्र ग्रामीण बोलीतच आहेत. संवाद आणि चित्रण यासाठी लेखकाने केलेली ग्रामीण शब्दांची चपखल निवड ही या कादंबरीतील ग्रामीण वातावरण जिवंत करण्याचे कार्य करते. साहजिकच कादंबरीतील कथानकाला अस्सल ग्रामीणबाज प्राप्त होते. उदा. चाव्हरा / भगोली / चिपरुळ / वायसाक / मायंदाळ / मुसांडा / कडोसरी / निबराट / हिळाळ इत्यादी. ज्या ग्रामीण दलित जीवनाचे चित्रण ह्या कादंबरीतून चित्रित केले आहे त्या जीवनातील दैनंदिन बोलीभाषेतील प्रस्तुत शब्दप्रयोगांनी कादंबरीतील जीवनचित्रणाला विश्वसनीयता प्राप्त होते.

काही जाती विशिष्ट जीवनानुभवाशीच निगडीत शब्द ढसाळ यांच्या कादंबरीतून अविष्कृत झाले आहेत. जसे- हुल्ली / चिलबाट / पडं / हयाळ / फोफीस / पितळ / काळीज / बोकं / गुडसं / सागुती, इत्यादी, अशा शब्दांचा उपयोग कनेरसर-पूर परिसरातील महारी-मातंग बोलीमध्ये होत असलेला आढळतो. सामिष भोजनातील जनावरांच्या अवयवाशी निगडीत असणारे प्रस्तुत शब्द तथाकथित सोवळ्या मध्यमवर्गीय अभिरुचीला नाकारुन धीटपणे मराठी साहित्यात रुजू झाले आहेत. तर 'कहार करुन सोडणे (पृ. १७)/'घांगसं घेणे' (पृ. १७) 'उस्मरु लागणे' (पृ. ४२)/हुई उठणे' (पृ. ७४)/'भोनगड्यात पडणे' (पृ. ७६) इत्यादी. अशा अनेक अपरिचित वाक्यप्रयोगांची नव्यानेच ओळख प्रमाण मराठी भाषेला 'हाडकी हाडवळा' द्वारे झाली. त्यामुळे या वाक्प्रयोगांची देणगी मराठी भाषेला लाभली आहे.

'खडाव-खडाव' / 'गुंठामुंठा' / 'उचलनं-वाचलनं' / 'करण्या-मोहिन्या' / शेलका-सुलका', इत्यादी अभ्यस्तयुक्त शब्दाच्या उपयोजनाने कादंबरी मधून प्रकट होणाऱ्या भावानुभवांना तीव्रता प्राप्त झाली आहे. कादंबरीतून येणाऱ्या म्हणी व ग्रामीण वातावरण साकार करण्यास महत्वाचा हातभार लावतात. उदा - 'देईल दता खाईल प्राणा' (पृ. ४६) / 'कुंकाशिवाय भांगाला आन् नवऱ्याशिवाय भानवशीला सोभा न्हाय' (पृ. ५१), इत्यादी. कादंबरीतील शिव्या पुढीलप्रमाणे येतात. उदा- आरं चांगळा, किती वेळ त्या बुकात डोकंस खुपसून बसलायस? (पृ. ८) / 'या, या बर भडव्यांनो / 'चामडीच लोळवतो एकेकाची' (पृ. ६३) / 'तो इवसा मेलाय ना' / गामराला हीच वेळ मिळाली' (पृ. ४०) 'काय ग छिन्नाल' (पृ. ७२) / अरे धेडाच्या कार्ट्यांनो विहीर बाटवली (पृ.६४) इत्यादी.

त्याचप्रमाणे 'श्रियाळ-चांगुणा आणि आदिमानापार्वती-महिषासुर ह्यांच्या मिथकातून गावगाड्यातील समूहमनाने जपलेल्या आदिम श्रद्धांचा आविष्कार होतो आणि ग्रामीण व्यक्तिमत्वाचा समूहजीवनाशी असणारा संबंध अन्योन्यभावाने दृढ होतो. त्याशिवाय 'स्वप्नावरुन शकून-अपशकून मानणे' (पृ. २३)/हातबांधी करणे (पृ.६९) इत्यादी अशा अनेक पारंपरिक संकेतांच्या उपयोजनाने ग्रामीण समूहमनाने जपलेल्या श्रद्धा-अंधश्रद्धांचा धांडोळा या कादंबरीतून घेतला जातो.

या कादंबरीत अस्सल ग्रामीण प्रतिमांची रेलचेल आहे. उदा- 'एखाद्या सासुरवाशिणीला अत्याचारी नवऱ्यानं चाव्हऱ्याखाली बडवून काढावं, अशी जीवघेणी सडसड अधिकच गहिरी होऊ लागली', (पृ. ५)/'तोही पाखरं हुसकावून लावावीत तसं तिचं सांगण-शिकवणं कानाआड टाकायचा' (पृ. १०५) इत्यादी, या प्रतिमा योजनेतून काव्यात्मता प्राप्त झाली आहे.

ग्रामीण भागात कोणत्याही व्यक्तीला 'स्वतंत्र व्यक्ती' म्हणून स्थान नसते तर ती विशिष्ट एका कुटुंबाची, जातीची घटक असते. त्यामुळे त्या व्यक्तीचा उल्लेख क्वचित स्वतंत्रपणे केला जातो. ती कोणाची कोणातरी या नात्याने बांधलेली असते. म्हणूनच ग्रामीण भागात वापरले जाणारे हे संकेत ढसाळ यांच्या भाषेतून सर्वाथाने प्रत्ययाला येतात. उदा- 'भिम्याची यमी'/'बळीबाची सुगंधा / 'नारायणाची पारी' असे उल्लेख कादंबरीत येतात तर स्त्रियांच्या नावाचा उल्लेख रचनेत न येता

तिच्या नावापुढे 'बाई/बाय आणि आई/आय असे शब्द जोडले जातात. उदा- सीताबाय / धोंडाबाय / सुंदराबाय / पाराय / चिमाय / तानाय' अशा नावांच्या उल्लेखावरुन ग्रामीण संस्कृतीचेच प्रतिबिंब ह्या भाषेद्वारे प्रत्ययाला येते. सुंदराबाय/पाराय अशा येणाऱ्या उल्लेखावरुन प्राचीन काळातील मातृसत्ताक अनार्य संस्कृतीचे अवशेष आजही काही प्रमाणात टिकून राहिले आहेत. याचा प्रत्यय 'हाडकी हाडवळा' या कादंबरीतून येतो. या कादंबरीतील यथोचित रुपकयोजनेमुळे कादंबरीतील भाषेला सौंदर्य प्राप्त होते. ''हाडकी हाडवळा म्हणजे महारांना मिळालेला गावकुसाबाहेरील एक विशिष्ट भूखंड असतो. गावातील मेलेली ढोरे ओढून आणून तेथेच फाडली जातात. मेलेली ढोरं इतरत्र कोठेही फाडण्याची परवानगी नसते. यावरुन हाडकी हाडवळास 'ढोर-फाडी' असेही म्हणतात. या भूखंडावर महारांचाच अधिकार असतो''[१] म्हणजेच ज्यांच्या वाट्याला तो वेदनेचा, उपेक्षेचा, अज्ञान, दारिद्रय आणि एकूणच हतप्रभ जीवनाचा भोगवटा येतो तो 'हाडकी हाडवळा' या रूपकातून चित्रीत केला आहे.

या कादंबरीत आलेले दुसरे रूपक म्हणजे 'दुबळवाडी' होय. भारतीय शासन पद्धतीत खेडी स्वयंपूर्ण असत. वस्तुविनियम हीच गावगाड्यातील बलुतेदारीची पद्धत प्रचलित असल्याने पैशाचे व्यवहार क्वचितच होत. त्यातच कादंबरीची नायिका कनेरसरपूरच्या महारवाड्यात राहत असल्याने हाडकी हाडवळ्याच्या वारसाहक्क प्राप्त झालेली स्त्री आहे. अर्थातच, गावकुसाबाहेरचा हा महारवाडा अभावग्रस्त जीवन जगणारा नाहीरे वर्ग आहे. त्यामुळे साहजिकच महारावाड्यातील प्रत्येकाचीच आर्थिक परिस्थिती ओढग्रस्तीची असल्याने या परिस्थितीचे नेमके वर्णन 'दुबळवाडी' या रुपकातून केले आहे. वर्णव्यवस्थेमुळे भोगवट्याला आलेले जातिअंताचे दुःख, संसाराची आणि लेकराची जबाबदारी सांभाळताना नवऱ्याचा सहवास नाही. स्वाभिमानी जगण्याची आस असतानाही स्वीकारावी लागणारी येसकरकी आणि त्यातच सायब्याने पैसे न धाडल्याने सोसावी लागणारी आर्थिक चणचण, या सर्वांचा परिपाक असलेली परिस्थिती बायजाच्या वाट्याला आलेली आहे. त्यामुळे तिच्या मनाची होणारी घालमेल 'अजगराच्या स्वप्नाच्या' रूपकातून चित्रित केली आहे. तसेच प्रस्तुत स्वप्नातून तिच्या मनात दबा धरुन बसलेल्या भितीचा निचरा होण्याच्या दृष्टीनेही हे अजगराच्या स्वप्नाचे उपयोजन उचित ठरते. कमीत कमी शब्दात आशयघन चित्रण करण्याचे ढसाळ यांचे कसब या कादंबरीतील भाषेच्या उपयोजनेतून प्रतीत होते.

णच चपखल शब्दप्रयोग, समर्पक वाक्प्रयोग, यथोचित म्हणी, शिव्या, प्रतिमा, रूपके यांच्या उपयोजनाने या कादंबरीला साहित्यमूल्य आणि कलामूल्य प्राप्त झाले आहे.

निगेटिव्ह स्पेस :

ही कादंबरी राजा या नायकाची कथा असून त्याच्या निमित्ताने मुंबई महानगरीच्या अधोविश्वातील मानवसमूहाचे चित्रण करणारी आहे. विशिष्ट एका स्तरावरील जीवनाचा मर्यादित पट उलगडून दाखविण्याचा प्रयत्न या कादंबरीतील एकूण सात प्रकरणातून नामदेव ढसाळ यांनी केला आहे. तेथील भल्याबुऱ्या वृत्तीप्रवृत्तींचा वेध या कादंबरीच्या माध्यमातून त्यांनी घेतला आहे. कादंबरीतून चित्रित केले गेलेले जीवनविश्व हे दलित, शोषित, पीडित, वंचित गुन्हेगार आणि वेश्यांचे निगेटीव्ह स्पेस (नकारात्मक अवकाश) असणारे अधःपतित समुहजीवनाचे आहे. त्यामुळे कादंबरीचे शीर्षकही सूचक आहे. साधारणतः दोन अडीच वर्षाच्या कालावकाशात राजा आणि लुंपेन-प्रोलिटेरिएट् अशा सर्वहारा वर्गांच्या जीवनातील स्थितीगतीचा आलेख ढसाळ यांनी या कादंबरीमधून रेखाटला आहे.

कथानक :

राजा हा कर्नाक बंदरात कामगार - मुकादमाच्या हुद्यावर असणाऱ्या एका गृहस्थाचा एकुलता एक मुलगा आहे. तो महाविद्यालयात फाईन आर्टच्या दुसऱ्या वर्षाला शिकत असतो. एक महान चित्रकार होण्याचे त्याचे स्वप्न असते. परंतु एके दिवशी धान्याच्या गोणी अंगावर कोसळून त्यात त्याच्या वडिलांचा मृत्यू होतो. चरितार्थासाठी तो अवैध धंदे करणाऱ्या माधोभाईकडे आपला मित्र लंबूसमवेत नोकरी करतो. येथे तो लंबूभाई प्रामाणिक असूनही त्यावर खूनाचा आळ येतो म्हणून राजाचा राग अनावर होतो. यातून माधोभाईचा खून होतो. यात त्याला सजाही होते. तेव्हापासून खून, मारामाऱ्या, अपहरण, खंडणी गोळा करणे अशा अनैतिक गोष्टींद्वारे राजाचा गुन्हेगारी विश्वात प्रवेश होऊन तो त्या विश्वाचा अनभिषिक्त सम्राट बनतो आणि मग राजाची 'ब्लॅक पँथर' नावाची गँग सर्वदूर प्रसिद्ध होते. वेश्या व्यवसाय चालविणाऱ्या इस्माईलवर अनेक संकटे एकाचवेळी आल्याने तो राजाचे साहाय्य घेतो. यातून त्याची मैत्री होते. यातून त्याची जैनीशी ओळख होऊन प्रेमात रुपांतर होते- जैनी ही भारत-पाकिस्तान फाळणीच्या दंग्यात अनाथ झालेली मुलगी असून तिला घेऊन मुमताज बेगम मुंबईला इस्माईलच्या आश्रयाला येते. आयुष्यात आकस्मिक आलेल्या राजाचे प्रेम तिच्या आयुष्यातील सुखाचा एक कोवळा अंकुर ठरतो.

याच दरम्यान राजा व मित्रमंडळीच्या निरुद्देशी ध्येयहीन जगणे पाहून ॲड. दिघे गुंडमवाल्यांनाही क्रांतिकारक बनविता येऊ शकते, या फ्रॉन्स फेनॉनच्या सिद्धांताची प्रतिती घेण्याचे ठरवितात. त्यांचा ब्रेनवॉश करतात आणि 'गुलामाला गुलामीची जाणीव करुन द्या म्हणजे तो आपल्या हक्कासाठी स्वतःच लढेल' या न्यायाने ते लुंपेन-प्रोलिटेरिएट (सर्वहारा) वर्गाचा मोर्चा आयोजित करतात. त्यासाठी राजा, त्याची मित्रमंडळी व जैनी रात्रंदिवस मेहनत घेऊन मोर्चा यशस्वी करण्याचा प्रयत्न करतात. परंतु पोलिसांतर्फे मोर्चावर अमानुषपणे लाठीहल्ला व गोळीबार केला जातो. राजा व ॲड दिघे यांना अटक केली जाते. त्यावेळी गाडीतच राजाच्या ओठांवर कवितेच्या ओळी जुळून येतात.

एकंदरीत, अपरिहार्य परिस्थितीच्या रेट्याने एका सामान्य युवकाचे 'पशुत्वात झालेले रुपांतर आणि प्राप्त परिस्थितीत पुन्हा पशूपातळीवरील जीवन जगणाऱ्या गुंडमवाली-गुन्हेगाराचे 'पशुत्व' गळून 'मनुष्यत्वा' च्या पातळीवरील प्रवास असे या कादंबरीचे कथाबीज असल्याचे दिसून येते.

व्यक्तिरेखा :

राजा ही 'निगेटिव्ह स्पेस' या कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखा आहे. राजा जरी गुन्हेगारी विश्वात सदोदित वावरत असला तरी त्याच्यातील चिंतनशीलता आणि कविवृत्तीही जागी आहे. त्याच्यातले 'माणूसपण' अजूनही शिल्लक आहे. त्यामुळेच 'आपण हैवान झालो आहेत' हा सल त्याला अधूनमधून डाचत असतो. तसेच माणुसकीच्या विरोधातील कोणतीही कृती तो स्वतःच्या विरोधातील कृती मानतो. म्हणूनच सुरेशच्या बहिणीची विटंबना करणाऱ्या जाड्या अहमदचा तो निर्घृणपणे खून करतो. तसेच जैनीच्या निमित्ताने त्याला निर्व्याज-निष्पाप प्रेमाचा साक्षात्कार झाल्याने तिच्या कुंटणखान्याच्या नरकयातनेतून सोडविण्याचा निश्चय करतो आणि शेवटी ॲड्‌. दिघेंच्या प्रेरणेने गुन्हेगारी विश्वाचा त्याग करुन मानवमुक्तीसाठी भुकेकंगाल, दलित, शोषित अशा सर्वहारावर्गाचा समता मोर्चा आयोजित करतो. त्यामुळे सर्वसामान्य युवक ते गुन्हेगारी विश्वाचा सम्राट ते पुन्हा सर्वहारावर्गाचा नेता अशा खडतर वाटा वळणांनी त्याच्या आयुष्याचा प्रवास चालू राहतो. 'अत दीप भव' या न्यायाने व्यवस्थापरिवर्तनाच्या सर्वंकष लढ्याला सज्ज झोलल्या एका परिवर्तनशील-विकसनशील नायकाची प्रतिमा या कादंबरीतून साकार होते. या कादंबरीतील ॲड. दिघे सामाजिक बांधिलकी-माननारे वकील व साम्यवादी कार्यकर्ते आहेत, डाव्या गटाला माननारे ते कॉम्रेड आहेत. निष्णात वकीलही आहेत. झापडबंद विचाराची निष्ठा आयुष्यभर श्रद्धापूर्वक जपणारी त्यांची वृत्ती नसल्याने समाजात अन्य कोणत्या चळवळी रूजत आहेत याचा कानोसा घेऊन ते त्या चळवळींची कारणमीमांसा करतात. ॲड. दिघे हे राजकीय वर्तुळात व कायद्याच्या गद्य विश्वात वावरत असले तरी त्यांनी कवितिक वृत्ती जोपासली आहे. 'माओ-त्से-तुंगची कविता', 'व्हायलन्सचं झाडं' अशा कवितांचा पुनःपुन्हा आस्वाद घेत राहतात. माणसाला घडविण्यात एकूण समाजव्यवस्था कशी कार्यरत असते हे लक्षात घेऊन ॲड् दिघे गुन्हेगार विश्वातील बादशहा असलेल्या राजाची पार्श्वभूमी सहानुभूतीपूर्वक समजून घेतात आणि राजाला रचनात्मक कार्यास कृतिप्रवण करण्याची प्रेरणा ठरतात. या कादंबरीतून ॲड. दिघे यांची एक कृतिशील विचारवंत अशी प्रतिमा प्रत्ययाला येते. यासोबत जैनी हे देखील तेवढेच महत्वपूर्ण पात्र या कादंबरीतून येते. एका अगतिक-अपरिहार्य परिस्थितीत वाढलेल्या अनाथ जैनीपासून आत्मोद्धाराचा मार्ग चोखाळणारी स्वतःच्या हक्कांसाठी लोकशाहीने दिलेल्या सनदशीर मार्गाने लढणारी जैनी; अशी जैनीची गतिशील व्यक्तिरेखा या कादंबरीतून साकार होते.

वातावरण निर्मिती :

कादंबरीतील वातावरणाचे प्राथमिक स्वरुपाचे प्रयोजन म्हणजे कथानकासाठी एक कल्पित परिसर निर्माण करणे. निसर्गपरिसर आणि सामाजिक-सांस्कृतिक परिसर याद्वारे कादंबरीत प्रत्यक्षतेचा परिणाम साधला जातो. त्यामुळे साहजिकच अशा वातावरणनिर्मितीमुळे कादंबरीला अर्थवत्ता प्राप्त होत असते. 'निगेटिव्ह स्पेस' मधील वातावरणनिर्मितीही अशाच प्रकारचा अनुभव देते. ही कादंबरी महानगरी जीवनदर्शन घडविणारी असल्याने तिचे 'कॉस्मोपॉलिटन' रूप, महानगरतील अधःस्तराचे जीवनचित्रण, महानगराच्या ज्या काळ्या बाजूला, विकृत, प्रवाहपतित जीवनांचा आलेख प्रस्तुत कादंबरीतून मांडला आहे. एका बाजूला उपेक्षित, वंचित, दलित, पीडित, शोषित आणि दुसऱ्या बाजूला रम, रमा आणि रमी यांच्या विश्वात रममाण धनिक अशा परस्पर विसंगतींना एकाचवेळी पोटात घेणाऱ्या मुंबापुरीतील अधःस्तरीय जीवनाला साकार करणारे वातावरण 'निगेटिव्ह स्पेस' मधून दृग्गोचर होते. त्यादृष्टीने व्ही. पी. रोड, अरब गल्ली, बाष्टी रोड, कामाठीपुरा, नागपाडा, लालबाग, फोरस रोड, मुंबईतील समुद्र आदी स्थळांचा उल्लेख औचित्यपूर्ण वातावरण निर्माण करण्यास साह्यभूत ठरला आहे. या कादंबरीत स्वातंत्र्यापासूनचा पंधरा-वीस वर्षाचा कालखंड व्यक्तिरेखांच्या स्मृतिरुपाने वा अनुलोभ पद्धतीने येत असला तरी कादंबरीत

अनुक्रमणिका

घडणाऱ्या प्रत्यक्ष घटनांनी व्यापलेला कालावकाश साधारणपणे दोन अडीच वर्षांचा आहे.

निवेदन :

कथन, वर्णन, संवाद आणि भाष्य या चार प्रकारांतून आकारणाऱ्या निवेदनाद्वारे कादंबरी उभी राहते. याही कादंबरीचे निवेदन तृतीयपुरुषी असून हा निवेदक घडलेल्या घटितांचे निवेदन केवळ सर्वसाक्षीभावाने न करता त्यावर आपली मते नोंदवितो आणि भेदक भाष्ये करीत जातो. उदा- भारतीय समाजातीय न्यायवस्थेत लागणारा विलंब आणि गुन्हेगारी विश्वातील तात्काळ निर्णय घेऊन दिली जाणारी शिक्षा यातील विसंगतीवर नेमके बोट ठेवून निवेदक भाष्य करतो. समाजव्यवस्था, स्त्रिया, गुंडागर्दी वेश्याव्यवहार, राजकारण आदी विषयावरील भाष्ये निवेदकाच्या माध्यमातून कादंबरीतून येतात. या कादंबरीतील निवेदक हा तृतीयपुरुषी निवेदक असला तरी काहीवेळा तो नाटकातील सूत्रधाराप्रमाणे कादंबरीत मध्येच अवतरतो आणि आपली उपस्थिती नोंदवून कादंबरीत हस्तक्षेप करतो. उदा- ''या मुद्याचा पोकळपणा आपण मागील प्रकरणातच स्पष्ट केला आहे'' (पृ. २९) किंवा ''तराई रिपार्ट म्हणतो'' (पृ. २९) अशाप्रकारे निवेदक कादंबरीतील एखादी प्रत्यक्ष व्यक्तिरेखा नसतानाही कादंबरीत प्रथम पुरुषी निवेदनाचा उपयोग करतो. हा एक निवेदनाचा वेगळा प्रयोग या कादंबरीत हाताळला गेला आहे. शिवाय पृष्ठ क्रमांक २५ ते ४७ पर्यंत फक्त विविध चळवळींची माहिती, अहवाल व निवेदन आल्याने कथानकाच्या ओघात विक्षेप निर्माण होतो. एकंदरीत, कथन, वर्णन, संवाद व भाष्य या निवेदनाच्या चार प्रकारांपैकी अन्य तीन प्रकारांचा या कादंबरीत समावेश असला तरी भर मात्र 'भाष्य' या घटकावर दिला आहे. यातून या निवेदकाकडे दलित, शोषित, पीडित, वंचित आणि उपेक्षितांविषयी असणारा व्यापक सहानुभव व्यक्त होतो. तसेच त्याची नैतिक-सामाजिक बांधिलकीही त्याद्वारे अधोरेखित होते.

भाषा :

नामदेव ढसाळ यांनी कवितेमध्ये आपली स्वतंत्र भाषा जशी घडविली तशीच भाषा त्यांनी आपल्या या दोन्ही कादंबऱ्यातून आकाराला आणली आहे. या कादंबरीची भाषा ही दक्षिण मुंबईतील झोपडपट्टी, गुन्हेगारी अड्डे आणि रेडलाईट परिसरात बोलली जाणारी मराठी-हिंदी-इंग्रजी मिश्रीत 'मुंबईचा' भाषा असून कादंबरीतील निवेदन मात्र प्रमाण मराठी भाषेतील आहे. या कादंबरीतील भाषा गुन्हेगारी जगताशी संबंधित असल्याने व्यक्तिरेखांची संबोधनेसुद्धा सर्वसामान्य माणसांच्या जीवनाशी फारकत घेणारी आहेत. उदा- तंबू / मकांडा / झवण बुटक्या / बदल्या पतंग / खरबुज्या / गेम करणे / सुपारी देणे-घेणे / लेव्हल करणे, इत्यादी अशा गुन्हेगारी विश्वाशी निगडीत असलेल्या व्यवसायांचा उल्लेख येतो. ह्या व्यवसायांना गुन्हेगारी विश्वात विशिष्ट सांकेतिक अर्थ आहेत.

महानगरीत जीवनातील नकारात्मक अवकाशात जगणाऱ्या लोकांची भाषा ही तथाकथित उच्चभ्रू, पांढरपेशी मध्यम वर्गीयांच्या भाषेहून पूर्णतः भिन्न स्वरुपाची आहे. याचा प्रत्यय ॲड. दिघेच्या दीर्घ स्वगतातून येतो. पृ. ६८-७० या दरम्यान ते आले आहे. या कादंबरीतून येणारे वाक्प्रचारही गुन्हेगारी विश्वाला प्रतिबिंबित करणारे आहेत. उदाहरणार्थ नांगी टाकणे (पृ. १) 'डिंगडँग करणे' / (पृ. ३) / गफला करणे (पृ. १५) / 'राडा करणे' (पृ.१५) / हैवाक उडवून देणे (पृ. १८) / संदल घालणे' (पृ. १८) इत्यादी अशा मराठी-हिंदी-इंग्रजी मिश्रीत शब्दांनी बनलेल्या प्रस्तुत वाक्प्रचारातून सर्वसामान्यपणे व्यक्त होणाऱ्या आशयापेक्षा भिन्न आशय ध्वनित केला जातो. याशिवाय 'मेललं माणूस आगीला भीत नाही' (पृ. १८) / भूकेला कोंडा आणि निजेला धोंडा' आदी म्हणींमधून समाजवास्तवाचे नेमके भान व्यक्त केले जाते. तसेच कादंबरीतील वाक्यरचनेचे उपयोजन लक्षात घेतल्यास मराठी-हिंदी-उर्दू-इंग्रजी भाषांच्या मिश्रणाने एक अजब रसायन निर्माण झाले आहे. उदा- बेट्यांनो, डिंगड्याँ करा पण तो माणुसपणासाठी, चांगुलपणासाठी हा मातीचा देह विनाशी त्याचा काय भरोसा, गुर्मीत जाऊ नका.' (पृ. ३) / 'त्याचा नावाचा सर्वीकडे बवाल होता.' (पृ. ३) 'जाना दुश्मनाचा किंवा पोलिसांचा मेहेर नजर-नजरघडीचा भरोसा नाही.' (पृ. ३), कुणी टीपबीप दिल तर गेम होणार नाहक' (पृ. ५) इत्यादी वाक्ययोजनेद्वारे महानगरी जीवनातील अधःस्तराचे जीवनदर्शन घडविले जाते.

कादंबरीतून व्यक्त होणाऱ्या अनुभवविश्वाला प्रभावीपणे व्यक्त करण्याचे कार्य 'कामाठीपुऱ्यातला महापूर ओसरु लागला होता.' (पृ. १९) / सुखलाजी स्ट्रीटचे दिवेही प्रकाश ओकून-ओकून अंधूक झाले होते' (पृ. १९) / जखमींच पार्सल अगोदरच झालं होतं' (पृ. २०) / 'आपल्या साथीदारांवर झालेला जीवघेणा हल्ला पाहून राजाने येळकोट केला.' (पृ. १९) / 'माणसानं सालं नळी झटकून मोकळं व्हावं ,- हात भाजून घ्यायचा नि नंतर फोडाला जपत बसायचं' (पृ. ५) / चित्याच्या चालीनं राजा चालत होता' (पृ. १) इत्यादी

अनुक्रमणिका

प्रतिमांद्वारे साधले आहे. औचित्यपूर्ण रूपकयोजना ही या कादंबरीच्या भाषेचा एक विशेष आहे. महानगरी जीवनातील अधःस्तराचे अनुभवविश्व मूर्त करणारी ही कादंबरी असल्याने यातील रूपकयोजनाही औचित्यपूर्ण आहेत. जेथे सूड-, क्रौर्य, भूक, शोषण, विषयवासना अशा आदिम पातळीवरील विकृतींचे प्राबल्य आढळते तेथे या विकृतींनाच प्रकृतीचे रुप लाभते. अशा विकृत जीवनानुभूतीचे योग्य चित्रण 'सिटी सिंड्रोम' या रूपकातून दृग्गोचर होते. तसेच ज्या दलित' शोषित वंचित, पीडित, उपेक्षितांच्या वाट्याला जन्मतःच व अपघाताने अशा प्रकारचा नरक आला आहे अशी आयुष्ये व ती ज्या परिसरात वास्तव करतात तो परिसर यांचे नेमके वर्णन 'कोंडवाडा' या रूपकाद्वारे सूचित केले आहे.

या कादंबरीत कृष्ण, परिक्षित राजा आणि कुराण-बायबलमधील मिथकांचा जो उल्लेख येतो त्या मिथकांच्या उपयोजननाने अनुक्रमे लंबू, ॲड. दिघे आणि जैनी या व्यक्तिरेखांच्या मनोविश्वाची आणि विचारविश्वाची घडण कशी झाली आहे हे दिसून येते. साहजिकच व्यक्तिरेखाच्या तोंडून येणारी ही मिथके कादंबरीला आशयधनता प्राप्त करुन देतात.

उपसंहार :

'हाडकी हाडवळा' आणि 'निगेटिव्ह स्पेस' या कादंबरीद्वयीचा एकंदरीत विचार करता 'प्राप्त परिस्थितीशी दोन हात करणाऱ्या व्यक्तीचा जीवनसंघर्ष हे नामदेव ढसाळांच्या लेखनाचे सूत्र आहे असे दिसते. कादंबऱ्यातील 'तो' या सर्वनामाने संबोधला जाणारा नायक आणि शासनव्यवस्था-, तो आणि पोलीसयंत्रणा यातून प्रस्थापित आणि विस्थापित संघर्ष तसेच बायजा-मनबा-, मुमताज बेगम, जैनी-इस्माईल यांच्या संबंध-संघर्षातून पुरुषसत्ता, तो आणि क्रांतिकार्यातून मध्येच माघार घेणारे मध्यमवर्गीय सहकारी, गावगाडा आणि महारवाडा, तसेच मध्यमुंबईतील अधोविश्वाच्या (Underworld) चित्रणातून वर्गसत्ता, बायजा व गावकरी यांच्यातील संघर्ष तसेच टिपऱ्यांचा खेळ, येसकरवीची कामे, सखा गावडेचा मृत्यु प्रसंग यातून वर्णसत्ता आणि दलित जीवनाला नाकारुन बौद्ध धर्माचा स्वीकार न करता उलट आर्थिक ओढग्रस्तीच्या परिस्थितीतही हिंदूधर्मप्रणित रुढीपरंपराचे सश्रद्ध मनाने जतन-पालन करणे यातून धर्मसत्तेचे वर्चस्व दिसून येते. अशा तऱ्हेने शासनसत्ता, धर्मसत्ता, पोलिससत्ता, पुरुषसत्ता, वर्णसत्ता, वर्गसत्ता अशा विविध पातळीवरील सत्तासंघर्ष नामदेव ढसाळ यांच्या या साहित्यकृतींमधून प्रत्ययाला येतो.

या कादंबऱ्यातील व्यक्तिरेखा माणुसकीची प्रतिष्ठा जपणाऱ्या खंबीर, निर्भीड, साहसी असल्याचे दिसून येते. जरी या व्यक्तिरेखा तथाकथित अर्थाने सुशिक्षित, सुसंस्कृत शहरी शिष्टाचार पाळणाऱ्या नसल्या तरी त्यांचे कादंबरीतील दर्शन अस्सल, सोलिव स्वरुपाचे आणि मानवीय पातळीवरुन झालेले आढळते. त्यांचे जीवनमार्गही शिष्टसंमत नाहीत. या साहित्यकृतींमधील व्यक्तिरेखांचे भूतकाळचे, आजचे जीवन घडविले असले तरी भविष्यकाळ मात्र त्यांना खुणावताना दिसतो. काही वेळा त्या परिस्थितीशी तडजोड करीत असल्या तरी शक्यता दिसताच पुन्हा परिस्थितीशी टक्कर देतात.

नामदेव ढसाळ हे मूलतः कविपिंडाचे लेखक असल्याने कथनात्म साहित्यकृतींतूनही त्यांचे कविमन डोकावताना दिसते. त्यामुळेच लोकगीते, चित्रपटगीते आणि कविता तसेच काव्यात्म वर्णनातून वातावरणनिर्मिती साधली जाते. हा त्यांच्या कथानात्म साहित्यकृतींचा एक वेगळा विशेष मानावा लागतो.

'हाडकी हाडवळा' या कादंबरीच्या तुलनेत 'निगेटिव्ह स्पेस' ची कलात्मकता ढासळली असली तरी त्यातून त्यांच्या लेखनामागील फुले-आंबेडकरी विचारांची बांधिलकी अधोरेखित होते. दोन्ही कादंबऱ्यातून अभिव्यक्त झालेला जीवनानुभव व्यक्तिरेखा, घटनाप्रसंग, स्थलकाल यांनी व्यापलेला अवकाश हा मर्यादित पटाचा असल्याने त्यांना 'कादंबरिका' अथवा 'लघुकादंबऱ्या' म्हणणे योग्य ठरावे. 'हाडकी हाडवळा' च्या संदर्भात कादंबरीच्या शेवटी लेखक नामदेव ढसाळ यांनी म्हटले आहे; ''ऑटोनॉव्हलेच्या अंगाने केलेले हे लिखाण आहे.''[४] म्हणजेच ही आत्मपर कादंबरी होय, वर वर पाहता किंवा प्रथमदर्शनी असे वाटते, की बायजाच्या जीवनाची ही शोकांतिका आहे. पण हे एक आशयसूत्र या कादंबरीत गोवलेले आहे असे नाही, तर कादंबरीतून अनेक आशयसूत्रे व्यक्त होतात. वासनेचे आशयसूत्र, विषमताधिष्ठित शोषणाचे वर्गीय आशयसूत्र, गावगाड्याचे आशयसूत्र आणि परंपरेचे धार्मिक आशयसूत्र अशा अनेक सूत्रांनी, कादंबरी सचितपणाने ही अभिव्यक्त होताना दिसते. दलित समाजातील स्त्रीच्या वाट्याळा येणाऱ्या अनेकपदरी दुःखाचे दर्शन घडविणारी, ही नायिकाप्रधान कादंबरी आहे. ''नामदेव ढसाळ यांच्या स्वतःच्या आयुष्याचे आणि त्यांच्या आईच्या जीवनाचे दर्शनच त्यांनी ह्या छोटेखानी कादंबरीतून घडविले आहे.' आपल्या कवितेबद्दलच्या मुलाखतीत या काही गोष्टींचा त्यांनी खुलासा केला आहे. म्हणजे काही प्रमाणात ही स्वकथनपर कादंबरी आहे, असे

म्हणता येईल.''[५] असे असले, तरी 'निगेटिव्ह व्यक्तिरेखांच्या दृष्टीकोनातून व त्यांच्या जीवनपद्धतीवरुन विविध तत्वज्ञानांच्या फोलपणावर भाष्य करतात. आणि समकालीन प्रश्नांचा उलगडा आजच्या संदर्भात करण्यासाठी ढसाळ 'फुले-आंबेडकरी विचारांनी संपृक्त असणाऱ्या मानवमुक्तीच्या बौद्ध तत्वज्ञानाचा पुरस्कार करतात. हे स्पष्ट करण्यासाठी ते अनेक पौर्वात्य आणि पाश्चात्य तत्वज्ञानाची साक्ष जैनीच्या चिंतनातून आणि राजाच्या अॅड्. दिघेंशी होणाऱ्या संवादातून काढतात आणि आतापर्यंत उपेक्षित राहिलेल्या दलित घटकांच्या उत्थानासाठी हे मानवमुक्तीचे बौद्ध तत्वज्ञानच कसे कालोचित आहे हे या कादंबरीद्वारे नामदेव ढसाळ प्रतिपादन करतात. नामदेव ढसाळांची कविता जशी दलित कवितेत स्वमुद्रा घेऊन प्रकट झाली तशी त्यांच्या कादंबऱ्यांनी स्वतंत्रपणे दलित कादंबरीत स्थान निर्माण केले नसले, तरी इतर दलित कादंबरीपेक्षा वेगळी कादंबरी लेखनाची वहिवाट त्यांनी दाखविली असे निश्चितच म्हणता येईल.

संदर्भ :

१. ढसाळ नामदेव, 'हाडकी हाडवळा' अस्मिता प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती : १९८१

२. तत्रैव, पृ. ६

३. मेश्राम नंदा, 'दलित कादंबरी : स्वरुप आणि समीक्षा' डिंपल प्रकाशन, वसई, पहिली आवृत्ती : १६ डिसेंबर २००६, पृ. १६६-१६७

४. ढसाळ नामदेव, 'अनुष्टुभ' नामदेव ढसाळ विशेषांक, जुलै-ऑगष्ट १९९७ मध्ये समाविष्ट, पृ. ६७-६८.

५. मेश्राम नंदा, उनि. पृ. १७१

* ढसाळ नामदेव, 'निगेटिव्ह स्पेस' प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर, पहिली आवृत्ती : जानेवारी १९८७

प्रा. राजेंद्र मुंढे
मराठी विभाग
यशवंत महाविद्यालय, शेलू जि.वर्धा
भ्रमणभाष : ९४२२१४००४९
email - rajendramundhe004@gmail.com

।। विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक 'युगवाणी'बद्दल वार्षिक निवेदन ।।

विदर्भ साहित्य संघाच्या 'युगवाणी' या नियतकालिकाची मालकी व इतर बाबी यांच्या संबंधी वृत्तपत्रे आणि पुस्तक नोंदणी अधिनियम, कलम डी १९ (बी) आणि वृत्तपत्रे नोंदणी (केंद्रीय) नियमावली १९५६, नियम ८, नमुना ४, यांना अनुसरून केलेले निवेदन.

०१. **प्रकाशन स्थळ :**
नागपूर, महाराष्ट्र

०२. **प्रकाशनाची कालनियतता :**
त्रैमासिक (जानेवारी, एप्रिल, जुलै, आक्टोबर)

०३. **प्रकाशकाचे नाव, राष्ट्रीयत्त्व व पत्ता :**
शोभा अरूण उबगडे, भारतीय
सरचिटणीस विदर्भ साहित्य संघ, सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक, नागपूर ४४० ०१२.


०४. **मुद्रकाचे नाव, राष्ट्रीयत्त्व व पत्ता :**
वासुदेव लक्ष्मणराव विधाते, भारतीय
ॲक्टिव्ह कॉम्प्युटर, नांदेपेरा रोड, वणी, ता. वणी, जि. यवतमाळ ४४५ ३०४.

०५. **मुद्रणस्थळ :**
ॲक्टिव्ह कॉम्प्युटर, नांदेपेरा रोड, वणी, ता. वणी, जि. यवतमाळ ४४५ ३०४.

०६. **संपादकाचे नाव, राष्ट्रीयत्त्व व पत्ता :**
अजय जनार्दन देशपांडे, भारतीय
वामनघाट मार्ग, हनुमान नगर, वणी, जि. यवतमाळ ४४५ ३०४

मी शोभा अरूण उबगडे असे प्रतिज्ञापूर्वक सांगते की वर दिलेला तपशील माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे खरा आहे.

- शोभा अरूण उबगडे
सरचिटणीस
विदर्भ साहित्य संघ, नागपूर
(प्रकाशक)



नामदेव ढसाळ यांची मुलाखत

मुलाखत   सतीश काळसेकर, डॉ. शरणकुमार लिंबाळे
शब्दांकन   अनिल कुळकर्णी

दि. ०२, ०३ व ०४ फेब्रुवारी २००७ रोजी नागपूर येथे झालेल्या ८० व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात नामदेव ढसाळ यांची सतीश काळसेकर आणि डॉ. शरणकुमार लिंबाळे यांनी घेतलेली मुलाखत

सतीश काळसेकर :

नंतर...
नंतर उरल्यासुरल्यांनी कुणालाही गुलाम करून लुटू नये
काळा गोरा म्हणून नये,
तू ब्राह्मण, तू क्षत्रिय, तू वैश्य, तू शूद्र असे हिणवू नये
कुठलाही पक्ष काढू नये घरदार बांधू नये
नाती न मांनण्याचा आयभैन न ओळखण्याचा गुन्हा करू नये
आभाळाला...
आभाळाला आजोबा आणि जमिनीला आजी मानून
त्यांच्या कुशीत गुण्यागोविंदाने आनंदाने राहावे.
चंद्र सूर्य...
चंद्र सूर्य फिके पडतील असे सचेत कार्य करावे
एक तीळ...
एक तीळ सर्वांनी करंडून खावा
माण्सावरच सूक्त रचावे, माण्साचेच गाणे गावे माण्साने
माण्साचेच गाणे गावे माण्साने

उपस्थित माझ्या सगळ्या जेष्ठ समकालीन आणि तरूण मित्रांनो, मी संयोजकांचे आभार आरंभीच मानतो कारण नामदेव ढसाळची अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर मुलाखत घेण्याची ही संधी आम्हाला त्यामुळे मिळाली. नामदेव ढसाळच्या, साहित्य अकादमीने केलेल्या गौरवाचा आत्ताच उल्लेख आला. हा गौरव नामदेव ढसाळचा आहे, याविषयी मी निःशंक आहे. परंतु हा गौरव मराठी भाषेचाही आहे आणि त्याहून महत्त्वाचं म्हणजे हा कवितेचा गौरव आहे. ह्याच कारण असं आहे की पन्नास वर्ष साहित्य अकादमीने जे कार्य केलं, त्याचा एक कळसाध्याय म्हणून हा जीवनगौरव देण्यात आला. होता. आणि त्यावेळेला सगळ्या भारतीय भाषातल्या सर्व प्रकारच्या लेखनाचा विचार करण्यात

आला होता. आणि ह्या कसोटीवरती मराठीतला कवी, मराठी भाषेचा कवी नामदेव ढसाळ हा त्यावेळचा मुख्य कवी ठरला. आणि नामदेव ढसाळचा गौरव झालेला आहे. मी त्याही वेळेला त्याचं अभिनंदन केलेलं आहे. पुन्हा आपणा सर्वांच्या साक्षीने, मराठी भाषेचा झालेला सन्मान, कवितेचा झालेला सन्मान आणि या सन्मानाचं मुख्य कारण असलेला नामदेव ढसाळ ह्या सगळ्यांचा सन्मान इथे पुन्हा एकदा उच्चार करून पुन्हा सगळ्यांचं अभिनंदन करतो.

मित्रांनो, नामदेव ढसाळने ज्या काळात 'गोलपिठा' लिहिला तो १९७२ च्या आधीचा काळ आहे. आणि १९७२ मध्ये नामदेवचा 'गोलपिठा' हा संग्रह प्रसिद्ध झाला. या संग्रहावरती ज्या काही प्रतिक्रिया त्या काळात उमटल्या त्यातली एक प्रतिक्रिया फार बोलकी होती, की ''आत्ता रसाळ नामदेवांचा काळ संपला आणि ढसाळ नामदेवांचा काळ सुरू झाला'' अशा तऱ्हेची खंत म्हणावी किंवा त्या चळवळीला प्रतिसाद म्हणता येईल असे उच्चार त्यावेळेला मराठीमध्ये काढले गेले होते. आपणा सगळ्यांना ते माहिती आहेत. मला असं वाटतं की रसाळ नामदेवांपासून ढसाळ नामदेवांचा प्रवास आणि या ढसाळ नामदेवचा आजच्या अखिल भारतीय साहित्य संमेलनातला हा मुख्य कार्यक्रम होण्यापर्यंतचा गौरवास्पद प्रवास हा कसा झाला याविषयी नामदेव ढसाळांनी आम्हाला काही सांगावं असं मला वाटतं. म्हणजे हा जो सगळ्यात एक आरंभीचा मुद्दा होता त्याच्यावरच आपल्याला नामदेव ढसाळांना बोलतं करता येईल.

नामदेव ढसाळ :

दलितांचे दिग्विजयी नेत परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर, क्रांतीबा फुले, छत्रपती शाहू महाराज, आगरकर, प्रबोधनकार ठाकरे, सामाजिक परिवर्तनातले सर्व आजवर होऊन गेलेले महानुभाव, रमाई, सावित्रीबाई या सर्व माझ्या श्रद्धास्थानांना नम्र अभिवादन करून मी या प्रश्नाचं उत्तर देणार आहे. खरं तर प्रस्थापित साहित्य संमेलनामध्ये आणि अशा भरगच्च रसिकांच्या, अभिरूचीसंपन्न रसिकांच्यासमोर मला वाटतं निमंत्रण मिळाल्याचा हा माझ्या आयुष्यातला पहिला प्रसंग आहे. दुसरी गोष्ट माझ्यासमोर फार दिग्गज मंडळी बसलेली आहे. ज्यांनी माझ्या चळवळीवर माझ्या कवितेवर माझ्या व्हल्गॅरिटीवरही प्रेम केलं, त्यापैकी दत्ता मेघेसाहेब इथे समोर बसलेले आहेत. त्याचप्रमाणे आमचे आदरणीय प्रा. लक्ष्मण ढोबळे सर बसलेले आहेत. खर तर त्यांनी, ढोबळे सरांनी, गेल्या वर्षी मला आवर्जून सोलापूरला बोलावलं होतं, निर्मलताईंनी बोलावलं होतं. म्हणजे आज तरी मी किमान ढकलगाडीवर मला बसवून इथपर्यंत तरी आणलेले आहे. त्यावेळेला फारच माझी तब्येत बिघडलेली होती. कारण मला अमिताभ बच्चनसारख्या एका दिग्गज माणसाला जो मेंदूचा आणि मज्जासंस्थेचा रोग आहे तो माझ्यासारख्या गरीब माणसाच्याही वाट्याला आला. मी एक्यांशी सालापासनं त्याविरूद्ध लढतो आहे. आणि कधी जवळजवळ एक्यांशीपासून ते आजतागायत जवळजवळ वीस ते तीस गोळ्या खाव्या लागतात. चळवळीच्या अंगाने जवळचे मित्र... हा जो माझा हिशोब जो चाळीस वर्ष सामाजिक, परिवर्तनाच्या चळवळीत समतेच्या चळवळीत काम केल्यानंतर ज्यावेळी हिशोब मांडतात, त्यावेळी माझ्या भोवती, आंबेडकरवादी असल्यामुळे नीती वगैरे, पाप, पुण्य, नशीब या कल्पना मानत नाही पण जो काही माझ्या भोवती एक अगदी एक षडयंत्रच रचलं नियतीनं, त्याच्याशी मी झुंजतो. त्याच्यामुळे थोडसं चळवळीतनं दूर गेल्यासारखं लोकांना दिसतं, पण ज्या वैचारिक अधिष्ठानावर उभा आहे, मला वाटतं त्या अधिष्ठानातली नागपूर ही पवित्र भूमी आहे. या पवित्र भूमीला अभिवादन करून, या भूमीनं गाडगेमहाराजांसारखे सुपुत्र, खऱ्या अर्थाचे सामाजिक प्रेरणेने अध्यात्माशिवाय सामाजिक समतेचे कंकण बांधणारे संत, त्याचप्रमाणे तुकडोजी महाराज, पंजाबराव देशमुख आणि कितीतरी अशी दिग्गज मंडळी आहेत. ही पवित्र भूमी आहे माझ्यासाठी. मला वाटतं श्रीपादनं फार छान सांगितलं की आम्ही पूर्वास्पृश्य. युगानुयुगाच्या नव्हे तर पाचहजार वर्षाच्या ज्या शृंखलातन मुक्त झालो, आणि स्वतःला जनावरापेक्षाही निकृष्ट तऱ्हेचं जीवन जे आमच्या वाट्याला आल होतं, व्यवस्थेनं दिलं होतं, त्याच्यातनं मुक्ती ज्या बाबासाहेब आंबेडकरांनी केली, ते हे पवित्र स्थान, त्याला मी अभिवादन करतो. त्याची माती कपाळाला लावल्याशिवाय कधीचं बरं वाटत नाही. चळवळीच्या अंगानही फार चांगलं मी काम इथे केलेलं आहे सुरवातीला. आपल्या या प्रश्नाचं उत्तर देण्यापूर्वी विशेषतः माझे दोन मित्र ज्यांचा ट्रॅक हा वेगळा होता, ते आज हयात नाहीत, कदाचित ते दोघे इथे असते, एक म्हणजे भाऊ समर्थ आणि दुसरा सुरेश भट. कारण सुरेश ज्यावेळी दुबेंच्या बरोबर सामाजिक संघर्ष समिती चालवत होता त्यावेळी तिचा मी सल्लागार होतो. सुरेशनं लिरिक्समध्ये काय करून ठेवलं. नंतर गझलाच्या अंगानी त्यानी काय केलं, हे सर्व माहीत होतं. पण नागपूरमधे आल्यानंतर ही अशी अवलिया मंडळी सोबत घेऊन दलित वस्त्यातनं फिरण्याच भाग्य मला या नागपूरनचं दिलं. त्याच्यामुळे नागपूरच्या भूमीला अभिवादन करतो. या माझ्या प्रकट मुलाखतीसाठी उपस्थित राहिलेली सर्व वडीलधारी मंडळी माझ्या मातांनो, भगिनींनो,

अनुक्रमणिका

भावांनो, बापांनो आणि आयांनो, आपणाला मी नतमस्तक होऊन नमस्कार करतो.

सतीशनं छान प्रश्न विचारला की रसाळ नामदेवाचा काळ संपून ढसाळ नामदेवाचा काळ सुरू झाला. ज्यावेळी 'गोलपिठा' प्रसिद्ध झाला त्यावेळी मराठीतील एका विविक्षित वाङ्मयीन क्षेत्राचे महाकवी आमचे आदरणीय गदिमा, माडगूळकरसाहेब यांनी त्या माझ्या पहिल्या पुस्तकावर केलेलं भाष्य आहे. खरंतर हा रसाळपणा का तुटला ते जाणून घेण्याची महाकवींनी कधीच गरज वाटली नाही. मला आढवलं 'एकटी' नावाचं पिक्चर लागलं होतं भारतमातेला. आणि आईवडिलांनी हाकलून दिल्यानंतर... मी आता सर्व या स्टेरॉईड वगैरे गोळ्या खाऊन तुम्हाला माजलेल्या पैलवानासारखा दिसतो.... अगदी असा स्लीम वगैरे होतो. टॅक्सी चालवत चालवत त्या टॉकीजजवळ आलो, भारतमाताच्या. आणि मला गदिमा दिसले. कवितेच्या वह्या, ज्यांना आपण गाणी म्हणतो अक्षरवाङ्मयामध्ये... कविता लिहिण्यासाठी जे व्याकरण ज्याला छंदोरचना आपण म्हणतो ते कोळून इयत्ता तिसरीपासून जे काही मी प्रसवलं होतं, त्याच्या वह्या मी झोपतानाही कुठे जातानाही सोबतच धोपटी असायची, त्या घेऊन जायचो. तो 'एकटी' पिक्चर पाहायला गेलो असताना गदिमा मला मध्ये मध्यांतरला दिसले आणि ते मालकाच्या रूममधे येऊन बसले. मी आपल्या धावतपळत गेलो कारण गदिमांच गीतरामायण असेल किंवा ग. दि. माडगूळकरांचा जो पाहिला कवितासंग्रह असेल किंवा त्यांची फार मजेशीर अशी जी गाणी की ती गाणी मला अशी त्यावेळी खेचक वाटायची आणि गदिमांसारखी देखील आपण शब्दमोड करावी असं वाटायचं. अशा त्या काळामध्ये नेमके ते मला भेटले. आणि मी गेलो. जसा होतकरू कवी आपल्या श्रद्धास्थानांना किंवा आपणाला आवडणाऱ्या कवीच्या चरणांना हात लावतो तसा मी हात लावला. गदिमांना आणि टॅक्सी ड्रायव्हरचा अंगावर पोषाख टॅक्सी बाहेर उभी. मी म्हणलो, मी कवी आहे आणि या माझ्या वह्या आहेत. जरा तुम्हाला दाखवण्यासाठी आलो, तुम्ही दिसलात म्हणून. गदिमांनी माझ्याकडे जरा अगदी म्हणजे ज्याला काय म्हणतो, पायापासून डोक्यापर्यंत पाहिलं. त्या वह्या घेतल्या. त्याच्यातली एक वही घेऊन त्यांनी ती पूर्ण चाळली वही. आणि चाळल्यानंतर त्यांनी फक्त मला एवढ्या संस्कृतप्रचुर जे माझे कवितेमध्ये जे शब्द होते, मग ते मंदाक्रांतामध्ये रचनेमध्ये अक्षरगणवृत्तामध्ये लिहिलेली कविता असेल किंवा जाती पदाकुलकमध्ये लिहिलेली असेल किंवा षडाक्षरी छंदामध्ये लिहिलेली असेल त्याच्यातले सर्व संस्कृतप्रचुर शब्द ते मला विचारत गेले, त्याचा अर्थ आणि मी त्यांना सांगत गेलो. त्यांनी बराच काळ वही चाळली. माझ्या हातात दिली आणि मला म्हणाले की बाळ तुझी जात कुठली? हे मी अक्षरशः बाबासाहेब आंबेडकरांना स्मरून सांगतो, एक श   याच्यातला खोटा नाही. मला जात विचारली आणि मी स गितलं की अस्पृश्य जातीतला अमुकअमुक आहे आ ि. का कोणास ठाऊक, मी एवढा कोसळलो त्या एका प्रश्नानं की मला तो जिव्हारी वार बसला. मी बाहेर आलो. म्हटलं या महाकवीनं या सद्गृहस्थानं माझ्यासारख्या शेंबड्या पोराला हा प्रश्न का विचारावा? बाहेर आलो आणि मग तेच. त्या धोपट्या कवितांच्या होत्याच. ग्रामीण भागामध्ये आयुष्य पंधरावर्ष गेलेलं. आमच्या पुण्याकडे फार उशिरा धर्मांतराचं वारं, पवित्र वारं, फार उशिरा आलं. त्याच्यामुळे जवळजवळ १९५६-१९५७ म्हणजे समितीच्या ऐन लढ्याच्या काळामध्ये. मला अजून आठवतं की जेव्हा आमच्या पंचक्रोशीतल्या लोकांनी धर्मांतर केलं तेव्हा त्या धर्मांतराच्या दीक्षा समारंभाचे नेते होते एस. एम. जोशी, क्रांतीसिंह नाना पाटील आणि दत्ता देशमुख सारखी मंडळी, कॉम्रेड मंडळी आणि त्या सर्व तो सर्व.... एवढ्या उशिरा आल्यानंतर त्या दरम्यानचं माझं ते आयुष्य त्याच्या अगोदरचं. अस्पृश्यतेच्या सर्व तऱ्हेच्या गोष्टी मी केलेल्या आहेत. अस्पृश्य आपल्या जातिपातीमध्ये आज तर आपण पाहतो स्वातंत्र्याला साठ वर्षे झालेली आहेत आज आपला देश एकसंघ आहे. ब्रिटिशांनी दीडशे वर्ष इथे राहून जे काही या देशाचं शोषण करायचं ते केलं परंतु सत्ता चालवण्यासाठी त्यांनी पाचशे चाळीस संस्थाने खालसा केली आहे शोषणासाठी हा देश एकसंघ केला. ब्रिटिशांच्या विरूद्ध राष्ट्रीय लढ्यातली मंडळी लढली. देश मुक्त झाला. स्वातंत्र्याला साठ वर्षे झाली. परंतु दुर्दैवानं, अत्यंत खिन्न मनानं जाहीर करावं लागत मला, तुम्हा आम्हाला, की साठ वर्षानंतरही या देशात आठशे प्रमुख जाती आणि पाचहजार उपजाती आहेत. हा देश जागतिकरणाच्या संकल्पनेने कोण कसा पुढे जाईल याची चर्चा करणाऱ्या महानुभावांनी खुशाल करावी परंतु मी तुम्हाला या मंचावरून आगाऊपणा करून स्पष्ट सांगतो की जोपर्यंत ही जातीप्रथा पूर्णतः मोडली जात नाही तोपर्यंत हा देश एकात्मही राहणं माझ्या दृष्टीन फार जिकीरीचं काम वाटतं आणि या देशाला भवितव्य नाही. असं माझं स्वतःचं प्रामाणिक मत आहे. आणि जेव्हा हा अनुभव होता, ग्रामीण भागातल्या त्या स्वयंपूर्ण ग्रामीण अर्थरचनेमध्ये अस्पृश्य जाती ज्यातील स्थायीक आहेत विशेषतः मातंग समाज चर्मकार समाज ढोर समाज आणि पूर्वाश्रमीचा महार आणि आताचा बौद्ध. मला वाटतं त्या सर्व रयतेचा शेवटचा महसुलाच्या अर्थाने चाकर हा

पूर्वाश्रमीचा महार आताचा बौद्ध. तो नसेल तर मातंग. मला वाटतं मी माझ्या शाळकरी वयामध्ये अस्पश्यतेच्या शापानं बालपणामध्ये... माझ सर्व बालपण अस्पृश्यतेच्या शापानं अक्षरशः जळून खाक झालेलं आहे. शिवताशिवत म्हणजे काय? सवर्ण माणसाला स्पर्श करू नये म्हणजे काय? मारोतीच्या देवळातच पडवीच्या खाली बसून शाळा शिकलेली आहे. वर्गातल्या सवंगड्यांसोबत अक्षरशः त्यांच्या शिदोरीला... मैदानात खेळात सूरपारंब्यामध्ये आट्यापाट्यामध्ये... अजून नदीत पोहायचं असेल तर नदीमध्ये एकत्र राहणारे सवंगडी चुकून दुपारच्या वेळेला जर त्यांच्या शिदोरीला हात लावला तर तोच मित्र प्रचंड वाईट बोलायचा आणि प्रसंगी अंगावर धाऊनही यायचा. मारामारी करायचा. मी त्या सर्व आईच्या सोबत... कारण माझ जे गाव आहे आजही अस्खलीत निसर्गदत्त गाव आहे. पुण्यापासून जवळजवळ ४० कि.मी. वर आहे. राजगुरूनगर तालुक्यामध्ये. तिथून पूर्वेला गेलो ११ कि.मी. वर माझं गाव आहे. आणि पूर आणि कणेसर असं जॉईंट गाव आहे. मध्ये नदी आहे नदीचं नाव आहे वेळ नदी. अलीकडे जे कणेरसर आहे ते आता तीर्थक्षेत्र झालेले आहे इमायीचं म्हणून. पलीकडे माझं गाव आहे. त्याचं पूर हे नाव आहे. तुम्हाला सांगतो वैशिष्ट्य असं की चाळीसहजार महाराष्ट्रातल्या गावांमध्ये जवळपास सत्तरच्या... सत्तर ऐंशीच्या दशकामध्ये प्रामुख्याने बराचसा कार्यकर्ता म्हणून बराचशा ठिकाणी मी जाऊन फिरून आलेलो आहे. परंतु एवढं मोक्याच ठिकाण मला वाटतं अस्पृश्यांसाठी... एखाद माझ्या गावासारखं आणिक एक दोन गावं असतील. अगदी गावात प्रवेश करण्याच्या अगोदर नदीच्या कडेला अस्पृश्यांची वस्ती आणि मग गावातली बाकीची मंडळी. या ग्रामीण भागामध्ये मारकी आईकडे आल्यामुळे वडील शेतीवर भागत नाही संयुक्त कुटुंब त्याच्यामध्ये चुलते त्यांची मुलं. असं धरल्यामुळे ईनाम वर्ग ६ ब च्या जमीनीचा जो प्रश्न आहे त्या वतनी जमिनीवर पोट, उदरनिर्वाह व्हायचा नाही. आणि मग शेताची पेरणी किरणी किंवा हंगाम सोडला तर उरलेला वेळ वडील चुलते सर्व मुंबई जायचे आणि मोठ्याच्या कमिल्यामध्ये मजूर म्हणून उदरनिर्वाह करायचे चार... मोठमोठी ती जनावरं गुजरातेकडनं आलेली, मध्यप्रदेशातनं आलेली, उत्तरप्रदेशातनं आलेली. म्युन्सीपालटी कापून दयायची त्याचे चार तुकडे केले की तो एक एक तुकडा किमान २०० किला, १५० किला, १०० किलोच्या खाली नाही. त्या चार तुकड्याचा एक तुकडा उचलून गाडीतनं काढायचा आणि हुकाला टांगायचा आणि त्याचं वजन लिहून ठेवायचं आणि त्या होलसेलच्या दुकानामध्ये जो मेहता होता त्याच्याकडे ते द्यायचं. त्याचे वडिलांना चार आणे मिळायचे आणि मग ते पैसे घेऊन वडील आम्हाला गावी पाठवायचे. कधीकधी थकत. पैसे पाठवायला जमायचे नाही. आईला फार वाटायचं की हा माझा बावा म्हणजे नवरा कुठल्या बाईबिईच्या फंदात तर पडला नाही. माझं एकुलतं एक लेकरू इकडे मी घेऊन बसती आहे. आणि हा काहीतरी नादी कुणाच्यातरी लागलेला आहे. माझी ऑटोनॉव्हेल आत्मचरित्रात्मक, बालपणीचे दिवस सांगण्याची... सांगितलेली, आठवणी सांगितलेली 'हाडकी हाडवळा' नावाची कादंबरी आहे. विदर्भामध्ये इनाम वर्ग ६ ब च्या जमिनीचा प्रश्न नाही. विदर्भातले आमचे सर्व दलित मंडळी ही चांगल्या जमीन जुमल्याचे मालक आहेत, त्याच्यामुळे इनाम वर्ग ६ ब किंवा महार वतनाच्या जमिनीचा प्रश्न जवळपास बुलढाण्यापासून इकडे सुरू होत नाही असं माझं स्वतःचं मत आहे. तर हे सर्व भयानक आयुष्य घेऊन जेव्हा मुंबईला आलो, ५७-५८ ला आणलं वडिलांनी मुंबईला. समितीचा जोरदार काळ होता आणि सर्व विरोधी पक्ष, मला वाटतं, भाषावार प्रांतरचनेच्या लढाईमध्ये आघाडीवर होते. आज आपण डावं आणि उजवं करतो पुरोगामी आणि प्रतिगामी करतो, संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यामध्ये जनसंघदेखील होता हे असं म्हटलं तर तुम्हाला जरा उडायला होईल. परंतु त्याला काही इलाज नाही. ते होतं ते. आणि त्या काळामध्ये काँग्रेसच सत्ताधारी होती. नेतृत्त्व मोठे साहेब आदरणीय यशवंतरावजी चव्हाण साहेबांकडं होतं आणि त्याच्या अगोदरच्या द्विभाषिकाचे तेच मुख्यमंत्री होते. साहेबांच्या विरूद्ध, यशवंतरावांच्या विरूद्ध प्रचंड लिहिलेले मी आहे. आणि लिहिल्यानंतर १६-१६ पानी अंक त्यांच्याविरद्ध काढून त्यांच्या हातातही नेऊन दिलेला आहे. यशवंतरावांचं एवढं प्रचंड प्रेम की त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला धक्का लावणारं लिखाण केल्यानंतरही तो अंक पाहून त्यांनी माझ्या पाठीवर शाबासकी मारलेली आहे. तर हे सर्व आयुष्य याच्यासाठी तुम्हाला सांगितलं की जेव्हा गदिमां मला असं म्हणाले त्यावेळी मी त्यांच्या पंथाचा होतो आणि गावी जे काही भोगल, पाण्याच्या एक थेंबासाठी जे काही वणवण करावी लागली, आषाढ श्रावणामध्ये अन्नपाण्यासाठी जो काही झगडा करावा लागतो अस्पृश्यांना, मला वाटतं त्याचा सगळा अनुभव पाठीला बांधून मी मुंबईला आलो आणि रसाळ जी कविता आहे ती माझ्यापासून दुरावली. कारण प्रत्यक्ष गावी भोगलेलं आयुष्य आणि महानगरात आल्यानंतर ज्याला अधोविश्व म्हणतात, एका बाजूला रेडलाईट एरीया, दुसऱ्या बाजूला कॉस्मोपॉलिटन वस्ती, पलीकडे मर्ढेकरांची कांदेवाडी गिरगावाला टांग मारणारी, पलीकडे भेंडीबाजार, इकडे नळबाजार इकडे बेलासिस रोड, मला वाटतं कॉस्मोपॉलिटन आयुष्य खेड्यातून

अनुक्रमणिका

आणलेल्या पोराच्या नशिबी फटकन आलं. तर या सर्व गोष्टी मला वाटतं लक्षात घेतल्याशिवाय माझ्या कवितेकडे बघता येणार नाही. पण मी हरवून बसलो रसाळ कविता. कारण प्रत्यक्ष जीवनाचा जो वेग होता आणि जीवनाच्या भोवतीचं जे पर्यावरण होतं ते मला वाटतं नरकतुल्य असं होतं आणि त्याची रसाळ कविता होणं म्हणजे ती माझ्याशीच गद्दारी झाली असती. मी रसाळ काय लिहिलं? मी इथे मघाशी श्रीपादला जरा नमुने म्हणून एक दोन सीड्या दिल्या आहेत मला वाटतं त्यांनी एक दोनतीन मिनिटं ती जर गाणी जरा ऐकवली एक अख्तर जरा बरं वाटेल की गदिमा जर आज असते तर त्यांनी नक्कीच म्हटलं असतं की हा माणूस खरचं कवितेच्यासाठी आपलं सर्वस्वपणाला लावणारा आहे. मीराबाईनी शब्दासाठी जहराचा प्याला ओठाशी लावला. मी जहर साक्षात लावलं नाही पण जीवनाच सर्व कडू जहर मी तोंडाला लावून कविता लिहिलेली आहे. ती भलीबुरी याची चर्चा मी कधीच केलेली नाही. कविता लिहून झाली की तिचे सोपस्कर मी करत नाही. मी किती ग्रेट कवी आहे याची चर्चा मी कुणाशी करत नाही. मी दुसऱ्याशी माझी तुलना कधी करत नाही आणि म्हणूनच कितीतरी विचित्र प्राणी माझे दोस्त आहेत. सुरेश भटांचं आणि माझं जमणं याच्यातनं तुम्ही जरा विचार करा की काय म्हणजे मी वह्री आहे की नुसताच काय आहे ते तुम्ही तुमचा ठरवा. पण ही रसाळ कविता आणि ढसाळ कविता, आज त्याचं जे महाकवीने केलेलं... जी रिॲक्शन होती कडवी रिॲक्शन, कारण त्यांना वाटलं की हे कायतरी धक्का लावणारं आहे. आज कवितेच पर्यावरण कसं बदललं हे तुम्हाला माहीत आहे. गदिमा च्या पिढीमध्ये ''भावना, कल्पना, रचना म्हणजे कविता'' अशी कवितेची डेफिनेशन होती. आमच्या जनरेशनमधे, भावना, कल्पना, रचना, व्यक्ती, समष्टी आणि निसर्ग याच्यामधले दहाहजार आंतरविरोध आणि त्या आंतरविरोधात एखाद्या घटनेने व्याकुळ झालेलं मन, त्याच्यातला सूक्ष्म अतिसूक्ष्म गोष्टी कवितेन पकडायचं ती माझी पिढी आहे. त्याच्यामुळे आम्ही ''रचना भावना कल्पना म्हणजे कविता'' याच्या फार पुढे आहोत. आणि नंतर तर आम्हाला जाणवलंही की वैश्विक कवितेच्या बरोबर नातं सांगण्याइतकी ताकद मला वाटतं, मिळाली, त्याच कारण अनियतकालिकाच्या चळवळीनं माझ्यावर केलेला संस्कार.

सतीश काळसेकर

मित्रांनो, ढसाळांनी माझ्या प्रश्नावरती चांगला प्रतिसाद दिला प्रश्नाला पण मला असं वाटतं की ढसाळ अजून एका गोष्टीपर्यंत आलेले नाही आहेत १९७२ मध्ये 'गोलपिठा' ज्यावेळीला आला त्यावेळेला मराठीमध्ये एक वेगळ्या तऱ्हेचे प्रस्थापित विरोधी चळवळीची सुरूवात झालेली होती. ज्याच्यामध्ये मी होतो, माझ्याबरोबर ढसाळ होता, राजा ढाले होता, वसंत गुर्जर होता, अशोक शहाणे होते, चंद्रकांत पाटील होता. असे आमचे अनेक मित्र तेव्हा त्या चळवळीमध्ये होते. भालचंद्र नेमाडे होता. हा रसाळ आणि ढसाळ मधला जो काही फरक ढसाळ सांगतो आहे, त्या फरकाची मुळं या प्रस्थापितविरोधी लढ्यामध्येच आहेत. कारण त्यावेळेला आमचं असं एक म्हणणं होतं की जगण्यामधलं आणि लिहिण्यामधलं अंतर पराकोटीच वाढलेलं आहे. किंबहुना जे लिहिताहेत त्यांचा त्यांच्या जगण्याशी काहीही संबंध उरलेला नाही. केवळ एक क्रॅप्टच्या आधारे गोष्टी चाललेल्या आहेत असं आम्हाला वाटलं होतं आणि त्यामुळे जे आम्ही त्यावेळेला प्रस्थापितविरोधी बंड केलं त्याचं दुसरं एक महत्त्वाचं वैशिष्ट्य मला या नागपूरच्या दीक्षाभूमीवर सांगायलाच हवंय. बाबासाहेब आंबेडकरांपासून महात्मा फुल्यांपासून कार्ल मार्क्सपासून आणि एकूण जे जागतिक सामाजिक लढे चाललेले होते त्या सगळ्या लढ्यांची प्रेरणा या अनियतकालिकाच्या चळवळींच्या मुळाशी होती. आम्ही सगळेजण जे काही सांगू पाहत होतो ते बाबासाहेब आंबेडकरांचे विचार होते ते महात्मा फुलेंचे विचार होते ते कार्ल मार्क्सचे विचार होते आणि ते जागतिक लढ्यामध्ये पुढे आलेले विचार होते. ते सगळे.... एक मार्क्सचं एक वाक्य जे नामदेवने अनेकवेळा मनातून आमच्यासमोर उच्चारलेले आहे की ''मला माणसाची कुठलीही गोष्ट कधीही परकी वाटत नाही'' म्हणजे माणसाचे सगळे षड्रिपू आहेत त्यांचे जे हजारो आंतरविरोध आहेत ते सगळे आम्हाला आमचे वाटतात. आमच्या पिढीतल्या सगळ्यांनी ह्या प्रकारच्या विचारांच व्रत घेतलेलं होतं. आणि त्या लढ्याचं त्या व्रतामुळे आलेल दुसरं महत्त्वाचं वैशिष्ट्य होतं, आमच्यापैकी एकानही त्यावेळेला आमची जात विचारली नव्हती. न नामदेवची जात मला माझ्या आयुष्यात माहिती होती, न माझी जात कुठली हे नामदेवला माहीत होतं. अशोक शहाणेनी आपली जात कधी आम्हाला सांगितली नाही आम्ही त्याची जात कधी विचारली नाही. हा सगळा प्रकार वारकऱ्यांच्या १४,१५ व्या , १२ व्या १३ व्या शतकाते जे सगळे लढे आहेत त्या लढ्याशी आपली नाळ जोडणारा संस्कार आहे. आम्ही आमचा परंपरेचा जो वारसा सांगतो किंवा आमची जी एक आम्ही धारा सांगतो, ती धारा वारकऱ्यांची आहेत. ती तुकोबाची आहे. ती चोखाची आहे, कुंभाराची आहे, शिंप्याची आहे. सगळ्या कष्टकरी वर्गांचा हा सगळा जो त्यावेळेला झालेला वारकरी मेळा होता तो मेळा मराठीमध्ये नव्याने एका १९७० च्या दशकात मोठ्या

प्रमाणात दिसला आणि त्या सगळ्याची मुळं ह्या सगळ्या विचार परंपरेमध्ये होती त्यामुळे रसाळ आणि ढसाळ हा केवळ काव्यातल्या शैलीचा प्रश्न नव्हता तर तुमच्या हृदयामध्ये असलेल्या सगळ्या जातीपातींचा विचार त्या जातीपातीला विरोध करणारा विचार ह्या सगळ्यानीशी ते आलेलं होतं. त्यामुळेच त्या काळात नामदेव आणि मी, राजा ढाले आणि ढसाळ हे आम्ही सगळे एकमेकांच्या खांद्याला खांदा लावून लढू शकलो. मला असं वाटतं की त्यातून जे पुढे किंवा त्या दरम्यानच्या काळात ज्या साहित्याला दलित साहित्य म्हटलं... मी नामदेव ढसाळला कधीही दलित साहित्यिक म्हणून उल्लेखित नाही. मला असं वाटतं की तो मराठी साहित्याच्या मुख्य धारेतला फार मोठा कवी आहे आणि मी हे वारंवार सांगण्याचा प्रयत्न करतो की हा मुख्य धारेतलाच कवी आहे. दलित साहित्य ही एक साहित्यिक विद्यापीठीय शाखेच्या ज्या काही शिस्ती आता.... त्यासाठी एक वर्णनात्मक शिस्त इतक्यापुरतं ठिक आहे पण त्यापलीकडे जाऊन प्रज्ञा लोखंडे असो, नामदेव ढसाळ असो, दया पवार असो, वामन निंबाळकर असो किंवा आजचा अरूण काळे असो हे सगळे मला मुख्य धारेतलेच कवी वाटतात आणि त्यांचा उल्लेख आपण सतत मुख्य धारेतले कवी म्हणूनच करायला हवा. मला मुख्य धारेतलेच कवी असण्याची एक जी काही अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाची मान्यता म्हणू आपण, ती आज या प्रसंगाने तुम्ही दाखवली. म्हणजे हा उदारपणा तुम्ही तुमच्या अन्य वर्तनातही दाखवण्याची गरज आहे असंही मला वाटतं. हे सांगून मी नामदेवला असं विचारतो की हे जे सगळं चाललेलं आहे त्या सबंध सगळ्या जे वातावरण आहे मराठी साहित्यातील आत्ताचं आणि मराठी साहित्यातला १९७० चं ज्याचे आम्ही दोघेही जो सगळा काळ पाहत आलेलो आहो त्या काळाविषयी नामदेव ढसाळने काही बोलावं असं मला मनापासून वाटतं. ते आपल्या सगळ्यांचं प्रबोधन करणारं ठरेल. नामदेव जे जे बोलतो ते इतक्या उत्कटपणे आणि इतक्या आवेगाने बोलतो की खरं म्हणजे मुलाखतीचं एक वाक्य आम्ही बोलावं आणि नंतर त्याने पुढचे दोन तास एकट्याने बोलावं अशी परिस्थिती निर्माण होते. मला नामदेवच्या प्रकृतीची काळजी वाटते म्हणजे तो ही एक भाग आहे, की नामदेवने अखंड आवेगाने बोलणं हे त्याला कितपत झेपेल असं मला वाटतं, म्हणजे प्रकृतीच्या अंगाने. त्याहीमुळे मला असं वाटतं की मी जरा त्याला थोडासा विश्रांतीकाळ दिला आणि पुन्हा आता नामदवे ह्या सगळ्या काळाविषयी बोलावं जेणेकरून एक वाङ्मयीन सबंध परिप्रेक्ष तुम्हा सगळ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या श्रोत्यांना मिळू शकेल असं मला वाटतं. नामदेवने त्याविषयी बोलावं.

नामदेव ढसाळ

वा सतीश! अलबत मी अनियतकालिकांच्या चळवळीमधला कवी आहे आणि कविता लिहिण्याचे जे प्रस्थापित ज्याला म्हणजे आज मी मानत आलो अगदी कालपरवापर्यंत... आजपर्यंत आमच्याकडे रोमॅन्टीझमचे स्तोत्र माजवणारेच कवी जास्त. रोमॅन्टीझमला कुठे घेऊन जायचं आणि किती पातळ्यांवर घेऊन जायचं याचा प्रयोग सुरेशने केला थोडासा. महानोरनं केला. महानोर देखील आमच्या अनियतकालिकांच्या चळवळीतलाच कवी. पण बिचारा पुढे शरद पवारांच्या हातात सापडल्यानंतर त्याच्या कवितेचं काय झालं मला माहीत नाही. परंतु अनियतकालिकांच्या चळवळीने आम्हाला घडवलं आणि ही चळवळ साठच्या दशकात सुरू झाली. पहिलं मराठीतलं अनियतकालिक रमेश समर्थ, म्युन्सीपल कामगार कार्यालयामध्ये टायपिस्ट असलेला रमेश समर्थ नावाचा एक कवी ज्याची मी 'भाकरी आणि लखलखणारा सूर्य नावाचा' कवितासंग्रह मी त्या काळात काढलेला आहे. अनयितकालिकांच्या चळवळीतला मी कवी आहे. मी तुम्हाला प्रामाणिकपणे सांगतो आताची जी जनरेशन लिहिते, मला वाटतं, अनियतकालिकांच्या चळवळीतनं जी एक वाङ्मयीन स्वायतत्ता लेखनाच्या अर्थानं, शैलीच्या अर्थानं, आशयाच्या अर्थानं आणि जी रूढी आणि परंपरेमध्ये अडकलेली कविता मोकळं करण्याचं काम अनियतकालिकाच्या चळवळीनं केलं. अनियतकालिकाची चळवळ सतीश म्हणतो त्याप्रमाणे खरचं संतांच्या चळवळीसारखी आणि अक्षरशः निर्वैर. जातीचा विलय करून, मला वाटतं अक्षरवाङ्मयात काम करणाऱ्या लोकांनी केलेलं काम आहे. आपल्याकडे त्याच्यानंतर साहित्यसभा आली त्याच्यानंतर वेगवेगळ्या तऱ्हेच्या वाङ्मयीन संघटना आल्या त्यांनी अनियतकालिकाच्या चळवळीकडे अत्यंत तुच्छतेने पाहिलं. त्याचं खऱ्या अर्थानं परिशीलन किंवा मूल्यमापन हे केलं नाही. नाहीतर नेमाडे सारखा... आता नेमाडेच्या 'कोसला'चं मॅटर कुठून आलं, काय आलं, याची चर्चा मी करणार नाही पण नेमाडेनी जी व्हल्गर, जी भाषा त्या काळात दिलेली आहे 'कोसला'च्या द्वारे, मला वाटतं गद्याच्या मध्ये किंवा कादंबरीच्यामध्ये किंवा कथेच्या मध्ये ही फार नवीन गोष्ट होती. अरूण कोल्हटकरासारखा कवी आला किंवा अगदी पार पारंपरिक अर्थानं मनमोहन नातूसारखा कवीदेखील जर घेतला तर तो मला वाटतं अनियतकालिकांच्या चळवळीनं दिलेला आहे आणि खरं सांगतो राजा ढाले हा पुढे आम्ही दलित पँथर

अनुक्रमणिका

काढल्यावर तो आमच्याबरोबर आला. इंदापूर बावड्याचं प्रकरण घडेपर्यंत राजा ढाले हा दलित समाजातला आहे असं मला कधी वाटलं नाही कारण सर्व वावर अशोक शहाणे, काकतकर, नेमाडे, रवींद्र किंबहुने, चंद्या पाटील, मला वाटतं. सतीश काळसेकर, चंद्रकांत खोत कितीतरी जातसमूहातली आलेली मंडळी, यांनी वाङ्मयाचा गजर मला वाटतं संत वाङ्मयाच्या चळवळीनंतर घातला. आपल्या मराठी साहित्याची परंपरा आणि इतिहास सातशे वर्षाचा आहे. मला वाटते स्पष्ट इथे बोलायला काही हरकत नाही की रूक्मिणी स्वयंवर लिहिणारा त्याचं काव्य चोरू पाहणारा रामदेव यादवासारखा राजा किंवा तिथून जे आपण निघालो तो माऊलीच्या पर्यंत येतो माऊलीपासून निघालो तर तुकोबापार्यंत येतो. तुकोबामाऊली सोडल्यानंतर लक्ष्मीबाई टिळक, बहिणाबाई, मला वाटतं ही अशी चार पाच दिग्गज मंडळी, ही नाव सोडली तर मराठीमध्ये आताच्या पिढीबद्दल बोलत नाही मी, आमच्या... आम्ही जेव्हा सुरू झालो लिहिण्यासाठी त्यावेळेपर्यंत, जीव ओवाळून टाकावा असं मराठीत काही नव्हतं हे मला तुम्हाला स्पष्टपणे सांगायचं आहे त्याचं कारण असं की सदाशीवपेठी आणि हिंदू कॉलनी या संकल्पना साहित्यात काम करत होत्या आणि तो रोमॅन्टीझमचा मक्तेदार किंवा मिरासदारी घेऊन त्या काम करत होत्या. खरं तर जगाच्या पार्श्वभूमीवर, अक्षरवाङ्मयामध्ये, रोमॅन्टीझम स्वच्छंतावाद, ज्या एका विशिष्ट काळात आला, याचं भानदेखील मराठीमध्ये स्वच्छंदतावाद, आपल्या रचनेच्या माध्यमातनं अभिव्यक्त करणारे जे लेखक आणि कवी होते, त्यांना ते भान राहिलेलं नाही. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर स्वच्छंदतावाद किंवा हा रोमॅन्टीझम आलेला आहे आणि युरोपामधे कविता ही अमीर आणि उमरावांची बटिक होती तिला मुक्त करण्याचं काम काम स्वच्छंदतावादानं केलेलं आहे आणि आमच्याकडच्या रोमॅन्टीझमच्या पुरस्कर्त्यांनी तिला परत मिरासदारांच्या हवाली केलेलं आहे. आणि म्हणून आमचं अनियतकालिकवाल्यांचं भांडण होतं. ते भांडण असं होतं की खटाववाडी किंवा सत्यकथा सांगते ती वाङ्मयीन मूल्ये आम्ही मानत नाही. आमच्या जीवनाच्या संघर्षातनं जे एक कलात्मक पातळीवर आमचं जीवन आमचं व्हिजन आमचं जे काही अभिव्यक्त होण्याचं जे काही सर्व आहे. मला वाटतं याची सर्व जी सूत्र आणि यांची बंधनं ती आम्ही स्वीकारत नाही. आम्ही त्यावेळी एक लॉजीक मांडायचो किंवा बुआ कवितेसाठी छंदोरचना आवश्यक आहे. ठीक आहे. पण मुळात असं आहे की जर कविता लिहिण्याइतकी प्रतिभाच नसेल तर? एक साधं विहिरीसारखं उदाहरण असं होतं की विहिरीला पाणी लागल्यानंतर विहीर बांधतात. पाणी लागण्याअगोदर विहीर बांधत जात नाहीत. हा साधा शेतकऱ्यांचा हा एक अनुभव आहे आम्ही छंदोरचनेला त्यावेळी डावललं, मुक्तछंदातली कविता लिहिण्याकडे आम्ही वळलो पण हे वळत असताना त्या कवितेतल्या सर्व बाकीच्या सगळ्या लयी त्या कवितेतल्या बाकीच्या आशयाच्या दृष्टीन शैलीच्या दृष्टीन जी एक वाङ्मयीन मूल्य जपणं आवश्यक होतं मला वाटतं ते आम्ही जपलेलं आहे आणि मला नेहमी सांगायला अभियान वाटतो की, अनियतकालिकाची चळवळ नसती तर कवितेमध्ये जे मी डोळसपणे काम केलं ते मी करू शकलो नसतो. आता मी पूर्वाश्रमीचा अस्पृश्य असल्यामुळं आता बौद्धधर्मी असल्यामुळं आणि दलित साहित्याची चळवळ मराठी साहित्यात आल्यामुळं मला जो तो उठतो तो सांगतो, हा दलित साहित्यिक आहे, दलित साहित्यिक आहे. ते ॲक्चुअली मनातनं शिवी देत असतात साले. पण त्या गाढवांना एवढं कळत नाही वाङ्मयातला एक संप्रदाय प्रत्येक जनरेशन प्रत्येक पिढी आपल्याला हवा तो वाङ्मयीन संप्रदाय जन्मास घालते. आणि वाङ्मयातला कुठलाही संप्रदाय अगोदरचं जुनं, ते प्रस्थापित होतं, ते एखाद्या डबक्यासारखं त्याला त्याचं मला वाटतं त्याचं डबक्यात रूपांतर होतं, डबकं होतं आणि त्याला मर्यादा पडतात आणि मग त्याच्यानंतर येणारे लोक नवं शोधत येतात. वाङ्मयाच्यामध्ये देखील ज्याला वाङ्मयातल्या वादसंकल्पना यांचा इतिहास पाहिला, तो रोमॅन्टीझमच्या नंतर रीॲलीझम येतो. रीॲलीझमच्याही नंतर मग बाकीच्या सर्व गोष्टी येतात रीॲलीझमच्या सोबत मार्क्सवाद येतो. त्याच्यानंतर सररीॲलीझम येतो त्याच्यानंतर मला वाटत युरोप किंवा वैश्विक वाङ्मयाचा जर आपण अभ्यास केला तर वाङ्मयाच्या प्रत्येक पिढीनं आपापल्या काळामध्ये आपआपला, आपल्याला व्यक्त होण्यासाठी जे जे काही त्यांनी डेफिनेशन्स केल्या समीकरणं केली त्याच्या त्या वादसंकल्पना झालेल्या आहेत. आपलं मराठी साहित्य मला वाटतं या वादाच्या अनुषंगानं फार मागास आहे. एखादा जी. ए. कुळकर्णी सापडतो एखादा अरूण कोलटकर सापडतो. अरूण कोलटकर देखील सापडतो तो सररीॲलीझमच्या नंतर. अरूण कोलटकरकडे काहीच नाही. कारण सर्व अनुभव आयुष्यभरातला हा तिरकस नजरेने घेणे किंवा अतिवास्तवानं घेणं मला वाटतं ते गैर आहे... जीएंचं नाव घेतलं. जीएंच्या कथेमध्ये मात्र कुठे ना कुठे अनेक तऱ्हेच्या वेगवेगळ्या इझम्स् या येऊन गेलेल्या आहेत. आता आमच्या सारखे सामाजिक बांधिलकी मानणारे लोक, त्याच्यात परत मार्क्सवादी परत आंबेडकरवादी आणि मग सर्व काही. जीएंना आम्ही मोजून

अनुक्रमणिका

शिव्या हाणतो पण जीएंनी प्रयोगशीलता केली आहे. तीला मात्र आम्ही दाद देत नाही. मला वाटतं वाङ्मय अक्षरवाङ्मयाचा जो प्रकार आहे तो फार पवित्ररीत्या आणि अभ्यासानं कारावयाचा प्रकार आहे. आपल्याकडे रोमॅन्टीझमवाले मानायचे की बुआ कविता लिहिणे किंवा अलौकिक असं काही लिहून जाणे ही दैवी देणगी आहे. तर आम्ही नास्तिक मंडळी. आम्ही देवबिव काही मानतंच नाही त्याच्यामुळे आम्ही जे काही मिळवलं ते अभ्यासातनं मिळवलं. तुम्ही जर मला सांगितलं की अख्या जागतिक वाङ्मयाविषयी आणि त्याच्यात होऊन गेलेल्या ईझमविषयी बोलायला जर सांगितलं तर अगदी कला साहित्यापासून जर मी बोलायला लागलो तर किमान दोन महिने मी तुम्हाला त्याच्यावर दररोज चार चार तास लेक्चर देऊ शकतो. कारण लेखकाला कवीला हा स्वाध्याय असल्याशिवाय तो चांगले लिहू शकत नाही. मी रसाळ कविता सोडून ढसाळ कवितेकडे आलो कारण ज्यावेळी त्या गाडीतनं सोललेली जनावर उतरल्यानंतर त्यांच्या पाठीवर ते ओघळणार रक्त, रात्री ते मला घेऊन फूटपाथवर झोपवायचे, मला वाटतं त्यावेळी मी सर्व रसाळ कविता ही भूललो मी. सोडून दिली. एवढं कशाला गावी असताना आई सांगायची की बाबा आज मला काय भाकरी मागायला जमत नाही. तू अस कर, तू भाकरी मागायला जा. आणि त्यावेळेसचं माझं आठ नऊ वर्षाचं वय. आमचं गाव दोन हजार वस्तीचं आणि वेगवेगळ्या ठिकाणी शेतकऱ्यांच्या त्या वस्त्या अशा राहिलेल्या. आणि मी डोक्यावर टोपलं घेऊन हातात खुळखुळ्याची काठी घेऊन, पायात कशातरी फाटलेल्या वहाणा व उन्हाळा असेल तर जमीन नांगरलेली, पावसाळा असेल तर सगळीकडे दलदल आणि त्या शेतकऱ्याच्या भल्या सकाळीच त्याच्या दरात जाऊन उभा राहयचो. ''जोहार येसकराला भाकर येऊन द्या.'' ही हाळी दिल्याबरोबर त्या वस्तीतली जी शिकारी कुत्री आहेत, त्यांना धनगरी कुत्री म्हणून त्यांचा अपमान नाही करत मी, ती फाटकन अंगावर यायची. एक सात आठ वर्षाचा मुलगा, 'अरे हाड हाड' करेपर्यंत एक कुत्र पाय ओढतय एक कुत्र चड्डी ओढतंच. मला वाटतं त्यावेळचं तुम्ही पहा काय माझं होत असेल? आणि उन्हाळा असेल तर ऊन खात बसलेल्या आहेत म्हाताऱ्या. म्हातारे बसलेले आहेत. आणि आतमध्ये त्या शेतकऱ्याची कारभारीण, आपला जो शेतकरी भल्या सकाळी बैलाना घेऊन रानात गेलेला आहे, ती त्याची शिदोरी त्याची न्याहारीची तयारी करते आहे. चूल पेटलेली आहे. चूलीमधली लाकड ओली आणि कच्ची अशी काहीतरी आहेत. धूर आहे. धूर डोळ्यात जातो आहे. म्हाताऱ्यांनी, सासवांनी, नणंदानी सतावलेलं आहे. करवलेली आहे नवऱ्याच्या पाठीमागे धावून. मग पेरणीच्या वेळेला, मग अगदी जमीन सपाट करताना, त्या वेळेला, नांगरणीला धावणारी ती न्याहारीत गुंतलेली आहे. मी हाळी दिल्यावरोबर तिकडनं आतून घरातनं स्वयपाकघरातनं कचकचीत शिवी दयायची ''याची लोहात उलटली याची मुडदा भल्या सकाळीच आला की'' ही आमची पुण्याकडली बोली आहे हं. कारण मला विदर्भातली बोली येत नाही आणि तुम्हाला सांगतो, त्या लहान वयामध्ये किती यातना होत असतील? किती डसत असेल? आणि रसाळ कविता सोडून दिली लढ्याची कविता जीवनसंघर्षाची कविता केली आणि त्याच्यामध्ये अनियतकालिकानं खरच डोळसपणे मला व्हिजन दिलं. त्या अनियतकालिकाच्या चळवळीचा मी कायम उतराई आहे.

शरणकुमार लिंबाळे

मी एक उपप्रश्न विचारतो. नामदेव ढसाळांनी अनियतकालिकाच्या चळवळीमधून लेखन केलं आणि आता ते असं म्हणाले की अनियतकालिकाची चळवळ झाली नसती तर मी लेखक झालो नसतो पण ढसाळ हे दलित चळवळीचे प्रॉडक्ट आहेत. ते एका दलित पॅंथर सारख्या अतिशय मिलीटंट चळवळीचे संस्थापक आहेत. आमचे सेनापती आहेत. मी त्यांना असा एक उपप्रश्न विचारतो की दलित चळवळ नसती, किंबहुना दलित पँथर नसती तर तुमचं आज ते नामदेव ढसाळ हे विशेषण आमच्या चळवळीचं ते राहिलं असतं का?

नामदेव ढसाळ

मला चळवळीच्या अंगानं आंबेडकरसाहेबांची पुण्याई पदरी बांधता आली. आंबेडकरसाहेबांचा सर्व आयुष्याचं मिशन आणि त्यांच सर्व जीवनसंघर्ष पाहिल्यानंतर, त्यांचं जे मुख्य उद्दीष्ट होत, चळवळीचं, जातीविहीन आणि वर्गविहीन समाज निर्माण करून या देशामध्ये सामाजिक लोकशाही उभी करण्याची. त्याच्यामुळे तुम्ही जे प्रश्न विचारले की ''असं झालं नसतं तर... असं होणार नव्हतं का?'' हे प्रश्न मला अजिबात पडलेले नाहीत. मी बाबासाहेबांचं राहिलेलं जे मिशन आहे अपुरं... कारण मघाशी मी म्हणालो की साठ वर्षे स्वातंत्र्याला झाल्यानंतर ज्या देशामध्ये आठशे प्रमुख जाती आणि उपजाती पाच हजार आहेत, त्या देशाला फ्यूचर नाही. आणि आर्थिकरीत्या तर बोलायलाच नको, आर्थिक विषमता टोकाची आहे. सांस्कृतिक विषमता आता तुटू लागली कारण आज आम्ही इथे प्रस्थापितांच्या साहित्य संमेलनामध्ये आहोत. म्हणजे जरा थोडसं काहीतरी या सांस्कृतिक अंगानं थोडी

समता डोकं वर काढायला लागलेली आहे. त्याच्यामुळे हे तुम्ही बाकीचे प्रश्न काढून टाका. कारण मुळात असं आहे की मी स्वतःला कधी पुढारी म्हणून म्हटलेलं नाही. या क्षणापर्यंत. दलित पँथर स्थापन केली कारण त्यावेळी बाबासाहेब आंबेडकरांना जाऊन बरेच जवळजवळ तीन दशकं झाली होती. आणि त्यांच्या पश्चात ज्यांच्यावर समाजाचं उत्तरदायीत्व खांद्यावर येऊन पडलं होतं ती दादासाहेब गायकवाडांपासून तर अगदी बॅरीस्टर खोब्रागडे, आदरणीय खोब्रागडेसाहेबापर्यंत तर आवळे साहेबापर्यंतची मंडळी ही संसदीय राजकारणाच्या आहारी गेली होती. आणि संसदीय राजकारणाच्या आहारी गेल्यामुळं आंबेडकरसाहेबांचे जे मिशन आहे ते अपुरंच राहिलं. कारण संसदीय राजकारणाच्या मर्यादा प्रत्यक्ष बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या हयातीत प्रत्यक्ष भोगल्या. या देशाच्या आधुनिक राजकारणाचा पाया, घटनेच्या लेखनमसुद्याचे अध्यक्ष बाबासाहेब होते म्हणून या देशाच्या राजकारणाचा आधुनिक राजकारणाचा पाया रचला गेला. संविधान ज्या पद्धतीनं आलं आपल्याकडं, त्या घटनापरीषदेमधे प्राबल्य काँग्रेसधार्जिण्या खासदारांचं होतं आणि त्या खासदारांमध्ये अगदी घटनेच्या अध्यक्षापासून तर त्या घटनापरिषदेतल्या सभासदापर्यंत प्रचंड सनातनी लोक होते. घटनेमध्ये जे काही उणिवा राहिल्या असतील त्या सर्व उणिवा लक्षात घेता.... आज सर्व बाबासाहेबांच्या माथी त्या गोष्टी मारल्या जातात खरं तर त्यावेळच्या घटनापरिषदेमधले सत्ताधारी वर्गाचे जे प्रतिनिधी होते त्यांनी ही घटना आंबेडकरांना अभिप्रेत होती त्याप्रमाणे होऊ दिली नाही. आणि त्यांच्यामुळे काही वैगुण्ये त्याच्यात राहिलेली आहेत. ती वैगुण्ये काळाप्रमाणे प्रत्येक येणारं सरकार, स्वतःला डोळस म्हणवणारं सरकार, त्याची सामाजिक बांधीलकी किती निःसंशयातीत आहे ते, ...त्या दुरूस्त्या होत राहिल्या. जवळजवळ आता शंभराव्या घटनादुरूस्तीपर्यंत आपण येऊन ठेपलेलो आहे म्हणून मी जे सांगतो तुम्हाला की आपलं अजून सर्व अर्धवट राहिलेलं आहे. हा देश खऱ्या अर्थानं योग्य ठिकाणी न्यायचा असेल, या देशातली एकात्मता आपल्याला टिकवायची असेल या देशातली, आता आज राजकारणाकडे पाहिलं प्रस्थापित तर सर्व प्रांतीक राजकारणाला त्याचा एवढा ऊत आलेला आहे की माझ्यासारख्या माणसाला भिती वाटते. केवळ काश्मिरच्या प्रश्नानेच बावरून जाता कामा नये. आसाममधे काय चाललंय, बाकीच्या इतर राज्यांमध्ये काय चाललंय, साऊथमध्ये काय चाललंय ? मला तर असं वाटतं की हे माझं प्रजासत्ताक, ज्या प्रजासत्ताकामुळे मी माणूस बनलो, नाही तर जनावर आणि माझ्यात काडीचाही फरक नव्हता.

माझ्या पूर्वास्पृश्य समाजामध्ये जो रूढी परंपरा आणि धर्मशास्त्राचा बळी होता, मला वाटतं या प्रजासत्ताकानं बाबासाहेबानं दिलेल्या घटनेच्यामुळे आम्ही मुक्त झालो, माणूस झालो आणि आज ते मिशन अपुरं राहिलेलं आहे. ते मिशन जोपर्यंत पुरं होत नाही तोपर्यंत मला वाटते हा आमचा लढा पूर्ण होणार नाही. त्याची जुळणी करायला पाहिजे. आज आम्ही पँथरवाले, तुम्ही म्हणता की तुम्ही काहीतरी नवीन केलेलं आहे. काही नवीन वगैरे काही केलं नाही की संसदीय राजकारणाच्या याच्यात अडकल्यामुळे रस्त्यातली लढाई विसरले. बाबासाहेब आंबेडकरांनी पहिल्याप्रथम या देशामध्ये राजकीय पक्ष काढला. स्वतंत्र मजूर पक्ष, वर्गीय जाणीवेतला पक्ष. म्हणजे राष्ट्रीय लढ्याच्या नेतृत्त्वाच्या आडून मग ते महात्मा गांधी असेल किंवा पंडित नेहरूजी असतील त्यांच्या आडून एखादे डांगे किंवा एखादे राम मनोहर लोहियासारखी मंडळी उघडपणे राष्ट्रीय लढ्याच्या अंतीम फेजमध्ये वर्गीय लढ्यावरले पक्ष समर्थपणे उभे करून शकत नव्हते. मला वाटतं ते त्या पार्श्वभूमीवर आंबेडकरांनी पहिल्याप्रथम वर्गीय जाणीवेचा पक्ष काढला, स्वतंत्र मजूर पक्ष आणि त्या पहिल्या पक्षामध्ये करिष्मा केला. अगदी कमलकांत चित्रेपासून सुलभा टिपणीसांपासून त्यांचे जे फॉलोअर्स होते शामराव परूळेकरापासून तर मला वाटतं किती तरी खालच्या थरापर्यंत होते. त्याच्यानंतर मग ज्या विरोधी पक्षांनी त्यांना मदत करणं पाहिजे होतं त्यावेळी ती केली नाही आणि शेवटी शेड्यूल कास्ट फेडरेशन आली. शेड्यूल कास्ट फेडरेशनच्यानंतर रिपब्लिकन पक्षाकडे आली. आणि डॉक्टरांना मृत्यूनं आपल्यापासून हिरावून नेलं. संसदीय राजकारणात अडकल्यामुळे माझ्या पिढीला असं सारखं वाटत होतं की ॲक्ट्रॉसिटी एकीकडे होत आहे. संसदेमध्ये कुठल्याही प्रश्नाला तोंड फुटत नाही आणि अशावेळेला मैदानातली लढाई करावी आणि ही मैदानातली लढाई जर करायची असेल तर समस्त अस्पृश्यांना एकत्र करायला पाहिजे आणि समस्त अस्पृश्यांना एकत्र केल्यानंतर जो सवर्ण माणूस आहे मग तो एकारन्त ब्राह्मण असेल, सारस्वत असेल, खालच्या जातीमधली मंडळी असतील, देशस्थ असतील, कोकणस्थ असेल, साळी असेल माळी असेल शहाण्णव कुळीवाला असेल, ब्यांण्णव कुळीवाला असेल, मला वाटतं ज्याला जातिप्रथा तोडण्याची खऱ्या अर्थानं आंतरिक इच्छा आहे त्या सर्व लोकांना एकत्र करून एक भौतिकलढा अशा पद्धतीन उभा करायचा की जेणेकरून जातिप्रथेवर अंतीम हल्ला आपण करू शकू . मला वाटत माझं हे दिवास्वप्न तसंच राहिलेलं आहे. मी दलित पँथर स्थापन केली म्हणजे फार मोठं काम नाही केलं. ॲक्ट्रॉसिटीला

तोंड देण्यासाठी काहीतरी संघटन असावं. सरकार काही करत नाही, आंबेडकरवादी म्हणवणारी बुजुर्ग मंडळी काही करत नाही. आंबेडकरसाहेबांच्या नावे चालवणारा रिपब्लिकन पक्ष... खरं तर रिपब्लिकन पक्ष बाबासाहेबांनी स्थापन केलाच नाही. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर तो स्थापन करण्यात आलेला आहे. ३ ऑक्टोबर १९५७ रोजी, शेड्यूल कास्ट फेडरेशन बरखास्त करून... त्या अनुषंगाने एकत्र आली. बाबासाहेबांच्या नंतर हा उत्तराधिकारी कुणी व्हायचा आणि हा समाजाचा गाडा कुणी पुढे न्यायचा? भैय्यासाहेबावर जबाबदारी टाकायची ? माईसाहेबांवर टाकायची? माईसाहेबांवर टाकायची तर माईसाहेबांवर आक्षेपच घेतला की बाबासाहेबांना त्यांनी विषप्रयोग केला. मी तुम्हाला सांगतो, या नवीन संग्रहामध्ये माईंवर मी कविता लिहिली आहे. माईसाहेब बाबासाहेबांना विषप्रयोग कुठल्या स्थितीत आणि कुठल्या फेजमधे त्यांनी करायला पाहिजे होता? बाबासाहेबांना विषप्रयोग त्यांनी केला असता तर मला वाटतं बौद्धधर्म घेण्यापूर्वी केला असता. बौद्धधर्म घेतल्यानंतर माईंच्या हातात जर माई परंपरावाद्यांच्या ताब्यात आहेत, माई सनातन्यांच्या ताब्यात आहेत माईंनी त्यावेळेसच सर्व तऱ्हेचं पर्यावरण, सामजिक पर्यावरण सनातनी असतानादेखील त्यावर मात करून एका आभाळाला ठेंगणं बनवणाऱ्या एका, महापुरूष हा शब्ददेखील फार तोडका आहे अशा युगानुयुगे हजारो वर्षे पुढे असणाऱ्या माणसाच्या हातात हात दिला आणि साथ दिली त्या माई आयुष्याच्या शेवटपर्यंत क्षणापर्यंत दुर्मुखल्या म्हणून समाजानं त्यांना किती छळल आहे! ती शोकांतिका आहे. महाकाव्याचा विषय आहे. तर मी तेच सांगतो की आम्ही जे काही केलं हे फार कुचकामी आहे. दलित पँथरची फार साधी आयडिया होती की सर्व अस्पृश्यांना एकत्र करायचं, सवर्ण माणूस जो तयार आहे त्याला एकत्र करायचं आणि मग म्हणून आम्ही प्रयोग केले. कम्युनिस्टांच्या बरोबर गेलो तर कम्युनिस्ट मंडळी विशेषतः कम्युनिस्ट पाटी ऑफ इंडिया यांच आणि आपलं फार चांगलं ट्युनिंग त्याकाळामध्ये जमलं होत परंतु कम्युनिस्टांचं म्हणणं काय की, काय नाही वर्ग लढा झाला की जातिप्रथा तुटेल. बिचारा मार्क्स. इंडियन कम्युनिस्टांच हे वक्तव्य ऐकून त्याचा आत्मा... कारण कम्युनिस्ट होतो तो साला हिंदू पण असतो त्याच्यामुळे मग ते स्वर्ग नरक वगैरे ते मानणे.

कळसेकर - मी नाही मानत.

नामदेव ढसाळ

मला माहीत नाही तुझं काय आहे ते. तर तो तळमळला असेल. मार्क्स काय होता? मार्क्स जो होता की जर्मन तत्त्वज्ञानाचं एक बोट पकडलेला ब्रिटीश अर्थव्यवस्था जी आहे आणि तिचं ते अध्ययन मार्क्सनं त्या काळात केलं, त्यावेळी मला वाटतं तो कुठला समाजवाद... त्याला आता मी शब्द विसरलो मी.. फोबीयन... नाही... नाही... फेबीयन सोशॅलीझम, ती कंसेप्ट काम करत होती, म्हणजे ब्रिटीश अर्थव्यवस्थेचं एक बोट आणि फ्रेंच राज्यक्रांतीनंतर फ्रेंचांनी दिलेला समाजवाद या तिघांचं मिश्रण म्हणजे मार्क्स होता हो! पण तो मार्क्स आपल्या जातीप्रथेवरला जालीम दवा ठरला नाही, औषध ठरलं नाही. आमच्या कम्युनिस्टांना आजही ते अजिबात पटत नाही. माझ्याबरोबर सर्व तऱ्हेचे कम्युनिस्ट राहिले. डावे राहिले, मध्यममार्गी राहिले, अगदी गडचिरोलीवालेही राहिले पण त्यांना आम्ही सांगितलं की जोपर्यंत बाबासाहेब सांगताहेत तोपर्यंत पुढल्या सर्व लढाईला काही अर्थ नाही. कारण तुम्ही जातीप्रथा तोडून पिडला गेलेला वर्गच जिथे एकत्र आणणार नाही तिथे पुढली लढाई ही खोटीच आहे. गडचिरोलीमध्ये कितीही तुम्ही सशस्त्र लढा करा, तो आम जनतेचा लढा होऊ शकत नाही. आणि म्हणून मी असं मानतो की आमचा पुढारी एकच. पुढले हजारो वर्षे चालेल असा पुढारी एकच. त्याच नाव बाबासाहेब आंबेडकर आणि माझ्यासारखे लोक आहेत त्यांच अपुरं राहिलेलं मिशन पूर्ण करणारे साधे सैनिक.

शरणकुमार लिंबाळे

दादा एक प्रश्न असा आहे की बाबासाहेबांना दादासाहेब गायकवाड भेटले. त्यांची चळवळ पुढे नेली. ढसाळांना असे दादासाहेब भेटले नाहीत तुम्ही एकाकी पडलेले आहात.

नामदेव ढसाळ

नाही. ढसाळ जे आले... ट्रँझीशन पिरीएडमधले आहेत. ऐकल का? आणि आता प्रत्येक... असं आहे, आंबेडकरी चळवळीमध्ये किंवा आंबेडकरी घराण्यामध्ये माझी माऊली गरोदर राहिली तर तिच्या पोटातला गर्भदिखील 'जयभीम' बोलतो त्याच्यामुळे दोस्ता, मला कुठल्या अशा कर्मवीराची काही गरज नाही. आपलं चाललेलं आहे पुढे.

सतीश कळसेकर

मित्रांनो, आता जी चर्चा चाललेली आहे ती एक कवी आणि त्याची राजकीय भूमिका अशा अंगाने सुरू आहे. राजकारण वर्ज्य असलेल्यापैकी मी नाही, नामदेव ढसाळ नाही. तरीसुद्धा मला वाटतं काही एका प्रमाणात नामदेवच्या कवी

अनुक्रमणिका

असण्यामुळे तो इथे आहे याचंही भान आपल्याला असायला हवं. म्हणून मला असं वाटतं की त्याच्या कवितेच्या एका अंगाकडे मी पुन्हा वळतो. एक प्रश्न माझ्याकडे असा आला आहे की ढसाळ नामदेवाचे मूळ रसाळ नामदेव नाही काय? मला वाटतं ज्या कविवर्यांनी रसाळ आणि ढसाळ हा शब्दप्रयोग केला त्यांच्या डोक्यामध्ये नामदेव शिंपी हा कवी नसावा तर एकूण त्यांची जी सगळी पारंपरिक विचाराची पद्धती असेल त्यामुळे रसाळ नामदेवाचं लिहिण्याचं जे काम असेल ते करणारे कुठल्यातरी उच्च विचाराचे, उच्च जातीचे असेच लोक असावेत असा असावा. त्यामुळे मी ज्यावेळी रसाळ आणि ढसाळ नामदेव असा उल्लेख करतो त्यावेळी तो नामदेव शिंपी ह्या कवीविषयी आहे असं आपण समजण्याचं काय कारण नाही तो नामदेव, रसाळ नामदेव असा उच्चार करणाऱ्या ग. दि. माडगूळकरांच्या हृदयातला उद्‌गार आहे इतकंच आपण समजावं असं मला वाटतं. त्याच्यामध्ये नामदेव शिंप्याचा रसाळ असण्याचा कुठलाही अपमान आम्हाला दोघांनाही अभिप्रेत नाही. नामदेवचं ज्यांनी 'सर्व काही समष्टीसाठी' एक गद्य वाचलं असेल. नामदेवचं गद्य हे पद्यास तोडीस तोड असतं. म्हणजे अगदी 'हाडकी हाडवळा' असो किंवा त्यांचा रीपब्लिकन पक्षाविषयीचा विचार असो किंवा त्याचं सदर लेखन असो, इतकं प्रगल्भ सदर लेखन मराठीमध्ये फार दुर्मिळ आहे किंबहुना दुसरं नाही असंही म्हणायला हरकत नाही. त्या सदर लेखनातलं काहीच सदर लेखन प्रकाशित झालेलं आहे. त्या 'सर्व काही समष्टीसाठी' मध्ये काही प्रकरणं फार हळवी, हळवा नामदेव व्यक्त करणारी आहेत. ती आहेत ज्यावेळी त्याला साहित्य अकादमीचा जीवनगौरव पुरस्कार मिळाला त्यानंतर त्याच्या गावानी त्याचे केलेले सत्कार आहेत म्हणजे ज्या गावाने त्याच्यावरती इतके पराकोटीचे अन्याय केलेले आहेत, जे अत्यंत माणुसकीला काळीमा फासणाऱ्या गोष्टी आहेत त्या सगळ्याकडे नामदेव ढसाळ ज्या कारूण्याने पाहतो त्या कारूण्याचा उच्चार त्याच्या 'गोलपीठा'मधल्या मी जी सुरवातीला कविता म्हटली, त्या 'माण्साने' या कवितेमध्येच होता. त्यामुळे इतकं अपार कारूण्य, सगळ्या समाजाविषयी, हे नामदेवमध्ये आहे आणि दुसरा त्यातला जो उपमुद्दा आहे तो असा आहे की 'गोलपिठा' लिहिणारा नामदेव ढसाळ हा संपूर्ण समाजाच्या एका विशिष्ट प्रस्थापित अंगाला उद्देशून 'गोलपिठा'मध्ये कविता लेखन करत होता. आज ज्यावेळेला 'मी तुझे बोट धरून चाललो आहे' असे नामदेव ढसाळ त्याच्या नवव्या किंवा दहाव्या कविता संग्रहामध्ये म्हणतो त्यावेळेला नामदेव ढसाळचा हा जो समाज आहे तो संपूर्ण समाज झालेला आहे. नामदेव ढसाळ या क्षणाला संपूर्ण भारतीय समाजाला उद्देशून आपली कविता लिहितो आहे हा त्याच्या कवितेचा जो चढता आलेख आहे आणि जो अपार कारूण्यामुळे विस्तारत गेलेला त्याचा परीघ आहे, म्हणजे कवीचं आत्मचरित्र हे कवीचं खरं... खरी कविता हे त्याचं आत्मचरित्र असतं हे खर असलं तरीसुद्धा उत्तरोत्तर कवीच्या चारित्र्याचा विस्तारच इतका होत जातो की त्याच आत्मचरित्र हे त्याच्या समाजाचचं आत्मचरित्र होत. ही जी संबंध समाजाचं आत्मचरित्र कवीच्या आत्मचरित्रात सापडण्याची गोष्ट आहे ती मला त्याच्या 'मी तुझे बोट धरून चाललो आहे' ह्या अलीकडच्या संग्रहामध्ये पहायला मिळते. हा संबंध एका विशिष्ट समाजाला उद्देशून लेखन करण्यापासून अख्ख्या समाजाला उद्देशून अख्ख्या समष्टीला उद्देशून बोलण्यापर्यंतचा त्याचा जो प्रवास आहे त्या कविता लेखनाचं मी स्वागत करतो. फक्त मला असं वाटतं की हा प्रवास ही अपार करूणा त्याला गौतम बुद्धाकडून मिळाली, बाबासाहेब आंबेडकरांपासून मिळाली आणि अनेक... आपले कबीर आहे, मीराबाई अनेकांपासून त्याला मिळाली असणार... फुले आहेत, महात्मा फुले आहेत अनेक अनेक नाव घेता येतील आपल्याला, त्या सगळ्या समाजसुधारकाकडून मिळालं. फक्त त्यांनी त्याचं त्याच्या पद्धतीने त्याच्या कवितेमध्ये घडलेला हा अत्यंत चांगला विकास आहे त्या विकासाविषयी काही विवेचन करावं असं मला वाटतं.

नामदेव ढसाळ

खरं तर लेखक म्हणून कवी म्हणून मी... माझा काही स्वतंत्र रोल आहे आणि लेखक कवी ही मंडळी अलौकिक अशी असतात अशी माझी स्वतःची भावना नाही. सर्वसामान्य माणूस आणि माझ्यात काही फरक नाही असं मानणाऱ्यापैकी आहे. मला ते जमून गेलं, व्यक्त होणं अक्षरवाङ्‌मयातून हे काही माझं भांडवल नाही पण आज मी याठिकाणी... अशा ठिकाणी येऊन पोहोचलो आहे की जातीअंतीची लढाई माझ्या पिढीच्या हयातीत आम्हाला सुरूही नीट करता आली नाही आणि जिंकताही आली नाही. तसा ट्रॅजेडी झालेला मी गृहस्थ आहे. आजही... आणि आता तर फार वाईट गोष्ट आहे. विधीमंडळात जातीयता गेली आहे कुठल्या राष्ट्रीय पक्षाकडे किती दलित आहेत कुठल्या राष्ट्रीय पक्षाकडे किती दलित आहेत? भाजप सेना यांच्याकडे अमुक अमुक दलित अस्पृश्य आमदार होते, काँग्रेसकडे एवढे आहेत राष्ट्रवादीकडे एवढे आहेत, कम्युनिस्टांकडे काय वगैरे... त्यांचं काहीच नसतं. म्हणून आता जातीप्रथा नुसती समाजात राहिली नाही ती विधीमंडळात गेली आहे आणि ती संसदेत गेलेली आहे आणि

अनुक्रमणिका

म्हणून जी आघाडीची सरकारं तुम्हाला दिसताहेत ना आणि ते वेगवेगळे प्रकार दिसताहेत डावे उजव्यांची आघाडी नुसतीच तथाकथित डाव्यांची आघाडी! आपल्या देशामध्ये आज कोणीही डावं राहिलं नाही. आपल्या देशामध्ये जे लोक स्वतःला डावे म्हणवतात तो त्यांचा अहंभाव आहे. डावा जो माणूस असेल तो किमान कष्टकऱ्यांमध्ये अशा पद्धतीचे भेद असतील मग ते वर्गीय पोटवर्ग मला वाटतं याच्यावर मात हे कुणालाच करता आलेलं नाही. मी आज अशा स्टेजमध्ये स्टेजवर आलेलो आहे सतीश, मला जातीअंताची लढाई मरताना आपण किमान त्या मैदानात आहोत अशी एक माझी स्वतःची इच्छा आहे त्याच्यामुळे दलित पँथर जेव्हा स्थापन आम्ही केली तेव्हा आम्ही काय केलं? त्यावेळी शिवसेना मुंबईमध्ये होती ज्या शिवसेनेचा उपयोग काँग्रेसनं, समितीनं आव्हान दिल्यानंतर मागेपुढे समिती आपल्याला सत्तेवरून खाली ओढेल, या भितीपोटी मला वाटतं वीस वर्ष ते तीस वर्ष शिवसेनेचा वापर काँग्रेसवाल्यांनी आपली सत्ता टिकविण्यासाठी केलेला आहे आणि आज तेच काँग्रेसवाले त्या बाबासाहेबांना मोजून शिव्या हाणतात. त्यावेळी मला तर माझ्या डोक्यावर हाणून घ्यावसं असं मला वाटतं. कारण बर्वेची निवडणूक असो कृष्ण मेननची निवडणूक असो की... बाळासाहेबांच्या आणि काँग्रेसचा जो ऋणानुबंध आहे तो मी प्रत्यक्ष पाहिलेला आहे. इंदिराजी जेव्हा आल्या आणि आणीबाणी जेव्हा आली तेव्हा गरिबाच्या अर्थानं जे काही करणं आवश्यक त्यांच्या डोक्यात होतं, कारण इंदिराजींची आंतरराष्ट्रीय राजकीय लाईन ही रशियाच्या गटाकडे झुकणारी होती, आणि म्हणून त्या काळामध्ये काँग्रेसच्या अखील भारतीय काँग्रेसमध्ये तसा मूल्यात्मक बदल झाला. मुंबईमध्ये रजनी पटेल होते. त्यांनी सोशॅलिस्ट फोरम काढला. काल त्या सुशीलकुमार शिंदेंनी इथे या सम्मेलनाचं उद्घाटन केलेलं आहे. मला वाटतं ते सुशीलकुमार शिंदे त्यावेळी पहिल्यांदा आमदार झाले होते, त्या काळामध्ये आणि मला वाटतं ती इंदिराजींची ती भूमिका आहे त्या भूमिकेमधली ते समाजवादाकडे खऱ्या अर्थानं जायचं. खरं तर समाजवादाकडे या देशाला घेऊन जाण्याच स्वप्न पंडित नेहरूजींनी पाहिलं. अगदी अव्यभिचारी निष्ठा पंडितजींची समाजवादाविषयक होती. पंडितजी युरोपात शिकले होते. युरोपातल्या सर्व उलथापालथी त्यांनी आपल्या विद्यार्थीदशेत पाहिल्या होत्या. १९१७ ची रशियन क्रांती त्याच्यानंतर बाकीच जे सर्व तिसरं जग उभं राहिलं ते ही पाहिलं होत. पण देश स्वतंत्र झाल्यानंतर ते पंतप्रधान झाल्यानंतर मला वाटतं त्यांच्या या स्वप्नांना अडसर तयार झाले आणि म्हणून या देशामध्ये पहिल्याप्रथम समाजवाद आणण्याची भाषा करणारे पंडितजी आहेत. त्यांचा अक्षरशः, म्हणजे काय म्हणतो आपण म्हणजे अपेक्षाभंग झालेला आहे. या देशामध्ये त्यांना संमिश्र अर्थव्यवस्था स्वीकारावी लागली. पब्लिक सेक्टर आणि प्रायव्हेट सेक्टर याला अनुलक्षून मी केली. नंतर पंचवार्षिक योजना, मला वाटतं त्याच्यानंतर फार काही झालं नाही. त्याच्यातनं अडीचशे तीनशे एतद्देशीय भांडवलदार उभे राहिले. म्हणजे स्वातंत्र्याच्या लढ्यामध्ये एखादा बजाज एखादा गोयनका यांच्याकडे १०० कोटी रूपये सापडणे मुश्किल, स्वातंत्र्याच्या ६० वर्षानंतर आता जर त्यांच्या स्थावर जंगमा मोजा! रीझर्वेशनचा प्रश्न येतो तर बजाजसारखा माणूस मैदानात उतरतो. आणि सांगतो की प्रायव्हेट सेक्टर या वर्गाला बंद आहे. रीझर्वेशनची तरतूद दहा वर्षासाठी होती घटनेत, पूर्वास्पृश्यांसाठी! परंतु ६० वर्षामध्ये पूर्वास्पृश्यच काय, बाकीचा कष्टकरी वर्गदेखील याला तुम्ही एवढं नागावलेलं आहे की मला वाटतं ते पाहण फार आवश्यक आहे. आणि म्हणून मला असं वाटतं की मी या स्टेजला असा आलो की, एकदा एक मोठा विद्रोह होणं आवश्यक आहे कारण आपल्याकडे भांडवली लोकशाही आहे आणि या भांडवली लोकशाहीचं जोपर्यंत सामाजिक लोकशाहीत रूपांतर होत नाही... ज्ञानेश्वर माऊलींनी वैश्विक प्रार्थना म्हटलेली आहे 'जो जे वांछील तो ते लाहो' मला वाटतं आता हे कम्युनिस्टांना जमणार नाही. 'जो जे वांछील तो ते लाहो' एवढं मोकळं एवढं निर्व्याज होणं हे जमणार नाही. मला वाटतं अशा पद्धतीचा तो 'अमृताचा दिस' येणं आवश्यक आहे. त्याची मी वाट पाहतो आहे. आणि म्हणून माझी जुळणी सध्या अशी आहे की मी मेनस्ट्रीम शोधतोय. माझा! कम्युनिस्टांच्या बरोबर गेलो त्यांनी ते सुरूच केलं. अहो ते बाबासाहेब आंबेडकर आहेत. ना ते ब्रिटिश स्कूलमधले आहेत. ब्रिटिश स्कूल म्हणजे उदारमतवादी आहेत. उदारमतवादी कम्युनिस्ट असतोच कसा? कम्युनिस्ट तो असतो की ज्याला प्रोलॅटरीएट डिक्टेटरशिप स्थापन करायची असेल तर वर्गयुद्ध करूनच करायची. आमच्या हिंदुस्तानमध्ये जातीप्रथेमुळे सरळसोट वर्गयुद्ध कधीच करता येणार नाही आणि कामगार वर्गाची अधिसत्ता कधीच स्थापन होणार नाही. ७५ वर्षे रशिया तिकडे कम्युनिझम आणण्यासाठी धडपडत होता पण त्यांना समाजवादाची पहिली पायरीदेखील चढता आली नाही निर्बंध मोकळे केले आणि रशिया तर कोसळलाच पण तिसरं जगं कोसळलं. हे सर्व सामाजिक, राजकीय, आंतरराष्ट्रीय, देशीय, सर्व वातावरण पाहिल्यानंतर मी या स्टेजला आलोय की आपण किमान वैचारिक अंगानं आपल्यापुरती तरी आपण एक जुळणी करावी. दलित पँथर जेव्हा सुरू झालं तेव्हा आम्ही लफडं असं सुरू केलं की

अनुक्रमणिका

बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या हिंदूधर्माची चिकित्सा करून ठेवली होती आम्हाला आमच्या पिढीला हिंदूधर्माची चिकित्सा करण्याची काही गरजच नव्हती पण राजा ढालेची वक्तव्ये माझी वक्तव्यं... माझी वक्तव्य तर एवढी हंड्रेड अँड वन परसेंट असतं की मी बोलल्यानंतर मारामारी झाली पाहिजे म्हणजे झाली पाहिजे. पण त्याच्यातनं काय झालं? आमचे मित्र शरद पवार तेव्हा नुकतेच आमदार झाले होते आणि राज्याचे गृहराज्यमंत्री होते, गृहराज्यमंत्री! बघा बरं का किती लबाड माणसं असतात ते ! सर्व सामाजिक चळवळींना यांचा पाठिंबा. यांचे मित्र एस. एम. जोश्यांसारखे. यांचे मित्र डांग्यांसारखे. परंतु अस्पृश्यांची चळवळ. त्या चळवळीला आलेलं गतानुगतीकपण. आंबेडकरी चळवळ सेक्टरीयन बनली तिला तोडण्याचं काम ज्या पँथरनं केलं, त्या पँथरला कोर्टाच्या आवारात दफन करण्याचं काम शरद पवार आणि वसंतराव नाईकांनी केलं. बिचारे नाईक राहिले नाहीत. गेले ते नंतर. नंतर आलेल्या लोकांनी थोडफार पँथरला समजून घेण्याचा प्रयत्न केला. परंतु १५३ ए, हे खटले, प्रक्षोभक भाषण करतो म्हणून टाकले होते. रायटचे खटले तर दहा होते, वरळीमध्ये जी दंगल झाली त्याच्यामध्ये पोलीस मारले गेले सर्वसामान्य माणसं मारल्या गेली. आम्ही रामराव आदिकांना पाडायचं म्हटल्यावर पाडलं. पण त्या पाडताना त्या बाजूला कोण होतं? ऐका, युती कुणाची होती? काँग्रेस रिपब्लिकन पक्षाचे सर्व गट आणि शिवसेना एका बाजूला आणि दलित पँथर आणि सीपीआय, कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया एका बाजूला. म्हणजे आपल्याकडे ज्या डेफिनेशन ज्या तुमच्या सारख्यांच्या डोक्यात असतात ना, पुरोगामी, पुरोगामी पुरोगामी, काही नाही, नीट... नीट जरा परिस्थिती पाहिली पाहिजे आणि मग बोलायला पाहिजे. तर मी या स्टेजला आलोय की मला... मी खर सांगतो की अस्पृश्यांची चळवळ ही मेनस्ट्रीममध्ये नेल्याशिवाय अस्पृश्यांची मुक्ती नाही. अस्पृश्य हे अल्पसंख्य आहेत, मुसलमानांसारखे नाहीत आणि जगातल्या सर्व अल्पसंख्यांकाचा तुम्ही अभ्यास केल्यानंतर, त्यांच्या चळवळीचा अभ्यास केल्यानंतर ते सर्व अल्पसंख्य आणि त्यांची उत्थाने शेवटी मेनस्ट्रीमला जाऊन सर्व प्रयत्न... कम्युनिस्टांच बोट पकडलं...

शरणकुमार लिंबाळे -आणि आता शिवसेनेचं...

नामदेव ढसाळ

नाही नाही. आता शिवसेनेचं नाही. तू लगेच शिवसेनेवर येऊ नकोस. त्यांच्यानंतर इंदिरा गांधीचं बोट पकडलं. मॅडम गेल्या. मी तुम्हाला सांगतो इंदिरा गांधी. या देशामध्ये संसदीय राजकारणात एकच पोलादी व्यक्तिमत्त्व होऊन गेलं ते म्हणजे इंदिरा गांधी. त्याच्यानंतर जे आले ते सर्व येरागबाळे होते. सामाजिक भान पण होतं. ज्या लोहियांनी इंदिराजींना गुंगी गुडीया म्हटलं, मला वाटतं इंदिराजींच्या अंतापर्यंत जर लोहिया असते तर लोहिया इंदिरा गांधींना खांद्यावर घेऊन मिरवले असते. लोहिया एवढे मोठे अंतःकरणाचे होते आणि म्हणून मित्रा, मी या स्टेजला आलेलो आहे की सर्व अस्पृश्यांना एकत्र करायचं. समोर ढोबळे सर बसलेले आहेत. त्यांचं मंत्रीपद का गेलं आणि कुणी घालवलं हे मला माहीत आहे. आणि शरद पवार काय आहेत ते पण मला माहीत आहे. ऐकलं का? म्हणून मी या ढोबळे सरांना नेहमी सांगतो 'सर हे सर्व तुम्ही संसदीय राजकारण सोडून द्या' अहो ज्या बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाच्या राजकारणाचा पाया घातला, संविधान लिहिलं, अरे काँग्रेसवाले साले एवढे भामटे, की त्या बावन्नच्या निवडणुकीमध्ये बाबासाहेबांचा पराभव केला. कम्युनिस्ट पण होते आणि काँग्रेसवाले पण होते. ज्या माणसानं या देशाला घटना दिली त्या माणसाला परत राजमार्गातनं आणि राजप्रवेशद्वारातनं संसदेत आंबेडकरांना येऊ दिलं नाही. ही खंत आहे माझ्या मनामध्ये. इंदिरा गांधीच्यानंतर मी परत काँग्रेसवाल्यांच्या नादी लागलो नाही. थोडाफार लागलो. शंकरराव चव्हाणांच्या नादी लागलो मी. कारण शंकररावांना माझं अंतःकरण कळत होतं. कारण ते थोडेसे विचार करणारे गृहस्थ होते, असं माझं मत आहे. त्यांना माझं मिशन पण कळत होतं. परंतु मग आता कोणीतरी उठेल की नामांतराच्या वेळी त्यांनी अमुक केलं तमुक केलं. नामांतराचाही जो प्रश्न आला... शरद पवारांनी वसंतदादांच्या पाठीत खंजीर मारल्यानंतर आपण किती प्रमाणिक आणि पुरोगामी आहोत. हे दाखविण्यासाठी नामांतराच्या चळवळीला त्यांनी संरक्षण दिलं. त्या भानगडीत मी जात नाही. पण राज्यकर्ते इंदिरा गांधीच्या नंतर, महाराष्ट्रात शंकरराव चव्हाणांच्या नंतर सामाजिक उत्तरदायीत्व मांडणारे राहिले नाहीत आणि आता तर चोरांचा सुळसुळाट आहे. आता सामाजिक... म्हणजे मला आठवतं, मला वसंतदादांचा अनुभव आहे. इंदिरा गांधी ज्या दिवशी पुण्याला डी.लिट्. घ्यायला येत होत्या, विरोधी पक्षांनी ठरवलं की मॅडमला आतमध्ये गावात येऊ द्यायचं नाही. आम्ही पँथरवाले, त्यांच्याबरोबर आम्ही जाहीर केलं की आम्ही तुमच्या बरोबर. वसंतरावांनी स्टेटमेंट काढली की सर्व विरोधक एकत्र आलेले आहेत आणि मॅडमला गावात शिरू देणार नाहीत, काँग्रेसवाल्यांनी भरीव बांबू घेऊन यावेत. 'मराठा' शेवटच्या स्टेजला होता, मरू घालण्याच्या. मी दुसऱ्या दिवशी जाऊन... पँथर जोरात होती, वरळी दंगल झाल्यानंतर... मी

जाऊन 'मराठा'मध्ये स्टेटमेंट दिलं की इंदिरा गांधी देशाच्या पंतप्रधान आहेत आणि देशाच्या पंतप्रधानाच्या कर्तृत्वाविषयी त्यांच्या राजकीय कारकिर्दीविषयी मत व्यक्त करण्याचा प्रत्येक नागरिकाला अधिकार आहे. एखादा दादा जर तो अधिकार हिसकावून घेत असेल तर पँथरच्या तमाम लोकांनी भरीव बांबू आणि हॉकी स्टीक घेऊन यावे. मी तुला शपथेवर सांगतो, लढाई जुंपली. आठ ते पंधरा दिवस आम्ही गायब राहिलो. मुंबईचे तेव्हा अतिरिक्त पोलीस आयुक्त जोग होते ते म्हणायचे, ''साल्यांनो! तुम्ही आमच्या धर्माला एवढ्या शिव्या दिलेल्या आहेत की आता तुला मी दाखवतोच आता. उलटा करतो आणि मिरच्याच्या धुन्या देतो.'' आणीबाणीच्या काळात म्हणायचे. तर मी म्हणायचो की संसदीय राजकारणात जोगसाहेब चिकार गोष्टी असतात. तुम्ही मला धुनी देता येणार नाही. उलट डाव उलटेल आणि मी तिकडे गेलो इंदिराजींकडे आणि आमच्यावरले सर्व खटले त्यांनी काढले आपण म्हणतो या देशात लोकशाही लोकशाही आहे अजिबात लोकशाही नाही, भांडवली लोकशाही आहे. आणि भांडवली लोकशाहीमध्ये किती बोलायचं याच्या मर्यादा ठरलेल्या आहेत, संसदेत देखील किती बोलायचं, जाहीर व्यासपीठावरदेखील किती बोलायचं, मी ज्या आता स्टेजला आलोय ती स्टेज तुला सांगतो. माझं स्वतःच मत असं आहे की संविधान या देशामध्ये १९ नोव्हेंबर १९४९ रोजी त्याचा अंमल लागू झाला. प्रजासत्ताकाची डेट मी पकडत नाही. जे अगोदर सूपूर्द केलं देशाला ती डेट पकडतो. आणि त्या दिवसापासून सर्व या देशातल्या समाजकारणाची या देशातल्या राजकारणाची समीकरणं बदललेली आहेत असं माझ मत आहे. ज्या हिंदूधर्माच्या कट्टरवादाच्या विरूद्ध बाबासाहेबांनी अत्यंत टोकाची आणि अत्यंत बुद्धिजन्य अशी टीका केली, त्याच बाबासाहेबांनी, घटनेमध्ये, फंडामेंटल राईटमधे सर्व धर्माच्या लोकांना स्वातंत्र्य दिलेलं आहे, अभिव्यक्तीचं, धर्माच्या प्रचाराचं स्वातंत्र्य दिलेलं आहे, आम्ही पँथरवाल्यांनी चूक अशी केली की बाबासाहेबांनी केलं आकाशाला गवसणी घालणाऱ्या माणसानं जे केलं, आम्ही शेंबड्या पोरानं त्याच त्याच कृत्याची पुनरावृत्ती करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्यामुळे पँथरही तूटून गेली आणि ही सर्व शोकांतिका अनुभवल्यानंतर, त्या अनुभवामध्ये डाव पुरोगामीपण जपण्यासाठी किंमत मोजल्यानंतर... कारण आता तुम्ही पाटील की आता ज्या आघाड्या होतात... रीपब्लिकन काँग्रेस आघाडी किंवा समकालीन विचाराच्या लोकांची आघाडी त्याच्यात सीपीआय आहे सीपीएम आहे त्याच्यामध्ये तो अबू आझमी आहे, बॉम्बस्फोटवाला अबू आझमी आहे. हं सर्वच आहे आणि त्यावेळचे आमचे राजा ढालेसाहेब, की त्यांना कम्युनिस्टांचं वारं चालायचं नाही, आता प्रकाश आंबेडकरांच्याबरोबर जातात अन् कम्युनिस्टांच्या मांडीला मांडी लावून बसतात. पँथर नको त्या भानगडीमुळे जर तोडली नसती तर आज या राज्यातली सर्वात मोठी ताकद असती आणि ती विधायक ताकद असती. मी आता या स्टेजला आलेलो की बाबासाहेबांनी जिथे आम्हाला आणून सोडलं तिथून पुढे आम्हाला जायला पाहिजे तिथून पुढे जायचं आहे. सर्व करून ठेवलेलं आहे. राजरस्त्यातनं फक्त चालायचं आहे. संसदीय मार्गावर विश्वास ठेवा पण संसदीय मार्गाच्या मर्यादा आंबेडकरांनाच माहीत होत्या. आज जे सर्व आता इथे बसलेले आहेत, दत्ताजी बसलेत किंवा संसदेत काम करणारे अजून कोणी महाभाग बसलेले असतील की जेव्हा ते तिथे खासदार म्हणून जातात पाच वर्षातनं कधीतरी नंबर लागतो अन् पाच मिनिटे मिळतात. पाच मिनिटं आपल्या समाजाची अन् आपल्या मतदारसंघाच्या जनतेची सेवा तिथे करता येत नाही म्हणून सर्व एक अशा टोकाला येऊन पोहोचलेले आहे आणि अशा वेळेला आपलं प्रजासत्ताक मोडण्याच्या अवस्थेत आहे आणि म्हणून मी असा आलोय की माझ्याकडनं ही गोष्ट होणार नाही. खरा आंबेडकरवादी म्हणून मी सेक्टरीयन भूमिका घेणार नाही. दलिस्तानाची भूमिका मी सोडून दिली सेपरेट सेटलमेंटची भूमिका मी सोडून दिली. सर्व अस्पृश्यांना एकत्र केलं पाहिजे आणि जो सवर्ण माणूस सामाजिक हितासाठी आणि देशहितासाठी एकत्र यायला तयार आहे त्याला बरोबर घ्यायला पाहिजे. आता आम्ही बाळासाहेबांच्या बरोबर गेलो ते तुम्हा मंडळींना फार डाचतं पण बाळासाहेब ठाकरे आणि शिवसेना संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या पार्श्वभूमीवर जन्मास आलेली आहे. संयुक्त महाराष्ट्र समिती तुटली ती समाजवादी आणि कम्युनिस्ट यांच्या भांडणामुळे. समितीमध्ये प्राबल्य कुणाच पाहिजे? कम्युनिस्टांच पाहिजे? कम्युनिस्ट आणि आचार्य अत्रे समितीमध्ये प्रबळ होते. त्याच्यामुळे ना. ग. गोरे सारखे माणसं, रचनात्मक संघर्ष की संघर्षात्मक रचना, कितीही केलं तर ते सदाशिवपेठी मध्यमवर्गीय नेतृत्त्व. अण्णाला मी फार मोठा माणूस, एक स्वातंत्र्यसैनिक मानतो पण त्यांची व्हिजन आम्ही मानत नाही. म्हणून मला काय सांगायचं आहे? हे सर्व प्रश्न आहेत आणि हे लक्षात घेता मी आता या ठिकाणी आलोय की माझा, मी ज्या अस्पृश्यवर्गाचा म्हणजे अल्पसंख्यवर्गाचा घटक आहे, मला मेनस्ट्रीममध्ये जायचयं आणि मेनस्ट्रीममध्ये जाताना मी व्यापक भूमिका घेऊनच जाणार आणि तो व्यापक भूमिकेचा पाया फक्त बाबासाहेब आंबेडकरांचा सिद्धांत आणि विचारच देऊ शकतो.

बाळासाहेब ठाकरेंकडे मी त्यांना याच्यासाठी साकडं घालायला गेलो. कारण मी विद्यार्थीदशेमध्ये प्रजासमाजवादी पक्षात होतो तर बाळासाहेब ठाकरेंच्या शिवसेनेने, ज्या शिवसेनेला रामराव आदिकांनी मदत केली, ज्या शिवसेनेला मोठ्या साहेबांनी अप्रत्यक्ष मदत केली, ज्या शिवसेनेला वसंतराव नाईकांनी मदत केली, एकेलं का? काँग्रेसवाल्यांनी मदत केली ती शिवसेना एका फेजमधे मराठी माणसाचा आवाज होता आणि तो व्हॅकूम जो आहे, ऐकलं का, तो भरून येईल. मी ही सर्व परिस्थिती चाळीस वर्षे अनुभवल्यानंतर... कारण आपल्या भारतीय माणसाचं सरासरी आयुष्य साठ वर्षांचं आहे मला शहाणं व्हायला चाळीस वर्षे लागली. मग ७२ चा नामदेव तू जर आता २००७ साली जर मागत असशील तर कुठून देणार? अन् तुम्ही एवढे गाढव लोक की 'अरे ते 'गोलपिठा'मध्ये जो नामदेव ढसाळ आहे तो त्या 'मी मारली सूर्याच्या रथामध्ये कसा नाही?' कलावंत आपल्या ग्रोथप्रमाणे आपलं सामाजिक पर्यावरण घेऊन वाढतो आणि त्यानी त्याप्रमाणेच चाललं पाहिजे.

शरणकुमार लिंबाळे

नाही, तुम्ही काँग्रेसला दोष दिला इथे पण शिवसेनेविषयी काही बोलत नाही. मौनधारण करताय. शिवसेनेनी तुम्हाला साधी आमदारकीही दिली नाहीये.

नामदेव ढसाळ

शिवसेनेची गोष्ट. शिवसेनेमध्ये मी गेलो होतो असं जे तुम्ही म्हणता... अजिबात नाही. बाळासाहेब ठाकरेंच्या पक्षाबरोबर माझी अजिबात युती नव्हती, मैत्री होती आणि मैत्री का होती त्याचही कारण सांगतो, हे ९१ साली ऐक्याचं रिपब्लिकन, ऐक्याचं पीक आलं, रायवळ आणि त्याच्यानंतर परत ९५ ला पीक आलं. प्रेसीडीयम आली. प्रेसीडीयम. प्रेसीडीयमच्या पुण्याच्या बैठकीमध्ये... प्रेसीडीयमची बैठक चालू होती सामुदायिक नेतृत्त्वाची आमच्यामध्ये. बाबासाहेब आंबेडकरांचे नातु आमचे मित्र प्रकाश आंबेडकर... हे एक फार मजेशीरच आहे समाजकारणामध्ये मोठे महापुरूष असले त्यांचे कोण सगेसोगरे असले की त्यांची दादागिरी चालते... दादागिरी चालते... एका अध्यक्षीय मंडळाच्या सभे-बैठकीमध्ये आम्ही सर्व आपापली मत व्यक्त करत असताना प्रकाश आंबेडकर उठला आणि त्यानी माझ्या छातीवरच मारली आणि मला म्हणाला 'का रे प्रत्येकवेळी तू हुशारी करतो?' मी त्याला सांगितल की 'इथे अध्यक्ष मंडळाची बैठक चालू आहे. तुम्ही अजेंडावर विषय ठेवलेला आहे अजेंडावर त्याबद्दल माझं मत व्यक्त करण्याचा अधिकार मला आहे' मला मारल्यानंतर मला फार राग आला. मी माझ्या ढुंगणाखाली असलेली खुर्ची उचलली म्हणजे असंसदीय शब्द वापरतो आणि ती प्रकाशच्या डोक्यात टाकणार तर मला माझ्या विवेकानं थांबवलं. की तू याला मारलसं तर लोक म्हणतील बघा बाबासाहेबांच्या नातूला मारलं. तो नुसता रक्तानं नातू आहे. आम्ही आयुष्यातली चाळीस वर्ष या चळवळीसाठी दिलेली आहे आणि त्या चळवळीचं आणि तत्त्वाचं पातिव्रत्य सांभाळण्याचं काम आम्ही केलेलं आहे. मी अध्यक्ष मंडळाकडे सांगितलं की प्रकाशच्या विरूद्ध तुम्ही कारवाई करा. गवई साहेबांसारखे बुजुर्ग गृहस्थ... रामदास आठवलेला तर बोलायलाच द्यायचे नाही. गवईंना तर मोजून प्रत्येक बैठकीत शिव्याच, की काँग्रेसला विकलं, काँग्रेसला विकलं. आता प्रकाशरावांनी काय काय कोणाकोणाला विकलं त्याचाही इतिहास आहे तो काही इथे मी सांगत नाही पण जेव्हा म्हटलं मला एक महिन्यात ही जी मला वागणूक दिली आहे त्याच्यावर काहीतरी केलं पाहिजे आणि मग अध्यक्ष मंडळानं काही केलं नाही. मी जयभीम म्हटला. बाहेर आलो. बाळासाहेबांची अन् माझी दोस्ती नारायण आठवलेंनी घडवली आणि बाळासाहेब प्रबोधनकार ठाकरेंचे चिरंजीव. ब्राह्मणेत्तर चळवळीचे सर्वात मोठे सल्लागार आणि छत्रपती शाहू महाराजांचे सल्लागार कोठारींपासून तर प्रबोधनकारापर्यंत होते. बाबासाहेबांना एक गळ, भाषावार प्रांतरचनेचा लढा सुरू झाल्यानंतर, प्रबोधनकार ठाकरेंनी टाकली नाहीतर त्रिसूत्री योजना मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र व्हावा की न व्हावा ही बाबासाहेबांकडे उपलब्ध होतं सर्व ते. पण संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात बाबासाहेबांचा आशीर्वाद त्यांनी मिळवला. तर ती शिवसेना. तिला पहिल्याप्रथम प्रजासमाजवादी पार्टीनं मदत केली आणि थर्टीनाईन लोक हे मुंबई महानगरपालिकेत निवडून आले. काँग्रेसने वीस वर्ष वापर केला त केला, ऐकलं का? फक्त रजनी पटेल कम्युनिस्ट पार्टीत होते म्हणून त्यांनी ते सुरू केलं आणि मग ते काय पुढे व्हायचं ते झालं म्हणजे कृष्णा देसाईच्या मर्डरपासून. त्याचेही संदर्भ वेगळे आहेत. खरं सत्य येतच नाही. आमचं डावेपण नुसतं पुस्तकी असतं आणि शाब्दीक असतं. आणि म्हणून त्या मधू दंडवतेचे..., ऐकलं का... आणि बाळासाहेबांच्या जाहीर सभांचे मंडप आणि स्टेज आम्ही बांधले, त्याच्यामध्ये मी आघाडीवर होतो मला अजून आठवतं, राष्ट्रसेवादल, म्हणजे राष्ट्रीय सेवक संघ नाही, राष्ट्रसेवादल प्रजासमाजवादी (पार्टी) तर त्याच्या केंद्रामध्ये मी काम करत असताना हा पहिला, बाळासाहेब ठाकरे, मधु दंडवते, ना. ग. गोरे आणि एस एम जोशींचा स्टेज, पाहिला-बांधलेला आहे. आता तेच नाना जेव्हा डाव्या

आघाडीचं सरकार होत मुंबईत... दिल्लीत गेलो. कारण नानांच्या मिसेस प्रमिलाताई माझ्या शिक्षिका होत्या मुंबईत गेल्यानंतर. मी तर असा अतरंगी माणूस! त्याच्यामुळे नाना मला 'अरे तू शिवसेनेचं...' तर मग नानाला तोंडावर हिशेब केले 'नाना हे जे पीक आहे नं, तुम्हीच वाढवलेलं आहे. तुम्हाला काही नैतिक अधिकार नाही बोलायचा' त्याच्यामुळे या सर्व गोष्टी आहेत ना हे समग्र अभ्यासा आणि मग बोला. आपल्याकडले जे पुरोगामी डावे, त्यांना ज्या दिवशी या देशातली खरी सामाजिक स्थिती, तिचं अंतरंग, ती व्यवस्था कळेल तर मला वाटतं पुरोगामीपणाची लढाई देखील त्यांना फार चांगल्या रीतीनं करता येईल आणि म्हणून मी आलोय तर बाबासाहेबांनी जिथून आणून ठेवलं तिथून पुढे मला जायचंय आणि मेनस्ट्रीममधे जायचंय.

शरणकुमार लिंबाळे

आपण मेनस्ट्रीम जावं त्याला माझ्या सदिच्छा आहेत. मला एक छोटासा प्रश्न असा आहे की आपल्याला पद्मश्री केंद्र सरकारने दिली. साहित्य अकादमीने आपला गौरव केला. बर्लीन इथे आंतरराष्ट्रीय साहित्य महोत्सवात आपल्याला बोलावलं गेलं. आपल्या इतक्या राजकीय ओळखी आहेत म्हणजे अगदी यशवंतराव चव्हाणांपासून ते आता शरद पवार, सुशीलकुमार शिंदे, बाळासाहेब ठाकरे पर्यंत. या महाराष्ट्राचं नाव तुम्ही मोठ केलं. मराठीचं नाव मोठं केलं पण महाराष्ट्र शासनानं... मी महाराष्ट्र शासनाविषयी प्रश्न विचारतोय... अगदी यशवंतराव चव्हाणापासून ते आजच्या विलासराव देशमुख पर्यंतच शासन आणि मधले युतीचे शासन देखील... की तुम्ही एवढा मराठीचा नावलौकिक केला तर या शासनानं... म्हणजे हे शासन कुठेतरी कुणीतरी सामना जिंकला की फ्लॅट देतं, पाच लाख रूपयांचे पुरस्कर देतं. हे शासन तुमच्याविषयी उदासीन आहे, तुमच्याविषयी काही करावं अस मला म्हणायचं नाही पण काही केलं नाही अशी एक माझी मनात खंत आहे.

नामदेव ढसाळ

बाळासाहेबांनी केलं नाही त्याचं कारण असं आहे की मी मागितलं नाही आणि मी आमदारकी खासदारकी मिळविण्यासाठी मी गेलेलो नाही. आमच्या रिपब्लिकन चळवळीला संसदीय राजकारणाचा रोग लागलेला आहे. आणि त्याच्यामुळे आंबेडकरी चळवळीपासून ती फार कोसो मैल दूर आलेली आहे. झोपेतून नवीन पोराला जरी उठवलं, तो म्हणतो. नाही मला नगरपालिकेमध्ये नगरसेवक व्हायचंय, कुणाला आमदार व्हायचंय कुणाला खासदार व्हायचंय. आमदार खासदार नगरसेवक होऊन लोकप्रतिनिधी होऊन अस्पृश्यांचा आणि कष्टकरी वर्गाचं सर्वंकष मुक्ती ही होणारच नाही त्याच्यामुळे माझ्या डोक्यात ते नव्हतं. मला, हा ते मिनिस्टर करणार होते. बाळासाहेब! मला एकदा बोलावलं की तुला मिनिस्टर करायचं. मला न विचारता त्यांनी बातम्या पण छापल्या, मी छापलेल्या नाहीत. कारण मला त्या मिनिस्टर काय असतात आणि मिनिस्टर झाल्यानंतर किती त्रास भोगावा लागतो ते मी माझे सर्व जवळचे समोरचे मित्र पाहिल्यानंतर अन् मंत्रीपद भोगल्यानंतर मी पाहतो की रात्री दोन अन् तीन वाजताही एखादा गृहस्थ येतो अन् गचांडी धरून उठवतो अन् सांगा माझं काम करता ते. तर एवढं त्रासाच काम करण्याच्या भानगडीत मी नाही मी तुम्हाला शपथेवर सांगतो इंदिराजी मला मिनिस्टर बनवणार होत्या पण माझ्याकडं... काय झालं की, जयप्रकाश नारायणची मुव्हमेंट आली. आमच्यामध्ये दोन ग्रुप पडले म्हणजे नामदेव ढसाळ जाहीरनामाप्रणित पँथर तर त्याच्यातले जे आमचे वकील होते ते पूर्वाश्रमीचे नक्षलवादी वकील. मग तो सुनील दिघे असेत किंवा आपल्या त्या बाई काय नाव रे... जासूदवाली...

सतीश काळसेकर - नवलकर

नामदेव ढसाळ

हा कॉम्रेड नवलकर असेल तर त्यांनी निर्णय घेतला जयप्रकाश नारायणच्या मुव्हमेंटबरोबर जायचे. ऐकलं का? मला फर्मान आलं की जयप्रकाश नारायणच्या बरोबर तुम्ही जा तर मी म्हटलं अजिबात नाही. जयप्रकाशजींनी समाजवाद सोडून मार्क्सवाद सोडून चिकार वर्ष झालेली आहेत ते अमेरीकाधार्जिणे आहेत आणि मी या जन्मात जाणार नाही. जयप्रकाश नारायणपेक्षा मला इंदिरा गांधी या जास्त समाजवादी वाटतात आणि त्या तिसऱ्या जगाशी बांधलेल्या आहेत. आंतरराष्ट्रीय राजकारणात. इंदिराजींनी माझ्यावरले खटले तर काढलेच, ३६० खटले आमच्यावर होते म्हणजे त्यांच्या शिक्षा तर आतापर्यंत आम्ही भोगत असतो. आतापर्यंत भोगत असतो. रजनी पटेलांनी सांगितलं, तू दिल्ली ये. बरूआ काँग्रसचे अध्यक्ष होते. मी त्यांना भेटायला गेलो. आमच्या पाठीमागे पुलीस लागले होते. जोग लागला होता. कारण मला उलटा टांगणार होता आणि मिरच्यांची धुनी देणार होता. मी गेलो. बरूआ... बरूआंच्या घरी गेलो तर तिकडे भंडारेसाहेब बिहारचे राज्यपाल होते ते बाजूला बसलेले तर ते भंडारे बसलेले असतांना बरूआ जे कार्यालया... घरातंन बाहेर आले ते ढसाळ कौन है? ढसाळ कौन है? असं करतच बाहेर आले आणि मग

मी जाऊन... मी लतीफ खाटे माझ्याबरोबर होते. ते आमच्या संघटनेचे अध्यक्ष होते आणि मी म्हटलं, 'मैं-हू!' त्यांनी मला गळ्याला पकडलं 'वा वा' आणि 'चलो बोले आज मॅडमका समय लिया है।' आता मला नक्सलाईटच जर व्हायचं असेल तर मी कशाला झक मारायला तिकड मुंबईत राहतो हो? आंबेडकरी चळवळीमध्ये आणि आंबेडकरांच्या विषयक मार्क्सवादाविषयक एक विशिष्ट म्हणणं आहे. वर्गयुद्धावर आंबेडकरांचा विश्वास नाही आंबेडकरांना समाजवाद आणायचा तो पीसफुल ट्रांझीशननं आणायचा तेवढी ती संकल्पना जगातल्या कम्युनिस्टांनी मान्य केली त्याची सुरवात रशियानं झाली. इंदिरा गांधीकडे गेलो आम्ही. माझ्याबरोबर चंद्रजित यादव, नंदिनी सत्पथी, सिद्धार्थ शंकर रे आणि हा सर्व ग्रुप आणि मॅडमने... मॅडमकडे माझी फाईलच होती. मॅडमचं एक फार बरं होतं. प्रत्येक माणसाची फाईल असायची, मॅडमला ते पुण्यातनं पळवलं ना मी, त्याची फाईल आमच्या समोरच मॅडमनी टाकली. मग आता आम्ही मार्क्सवादीच ना! मॅडमना सांगितलं की तुम्ही फार चांगलं काम केलेलं आहे. फक्त तुम्ही मक्तेदार भांडवलदारांच्या विरूद्ध काही केलेलं नाही. मी तुला शपथेवर सांगतो मॅडमने आणि मी करार केला. त्याच्यावर इंदिराजी आणि माझी सही आहे आणि मी जेव्हा परत आलो आम्हाला... आम्ही फार मोठी चळवळ केली. लाखाच्या सभा होत्या. परंतु बसने जायला ट्रेनने जायला आमच्याकडे पैसे नसायचे आम्ही विदाऊट (तिकिट) जायचो अन् सभा करायचो. मी सांगतो दिल्लीतनं मॅडमला भेटून आल्यानंतर महाराष्ट्रात शंकररावजी चव्हाण होते, अरे मुंबईत गेल्याबरोबर साला मुख्यमंत्रीपण उभा राहायला लागला. वसंतदादा पण बोलायला लागले. ज्या दादांच्या आव्हानाला प्रतिआव्हान देऊन मोठी लढाई केली पण ती माणसं ग्रेट होती. वसंतदादा काय शकंररावजी चव्हाण काय! शंकररावजी दुसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले आणि त्यांनी मला एम.एल.सी. केलं. रोहिदास पाटील आहेत यांच्याकडून मला बोलावणं पाठवलं की नामदेव ढसाळांना बोलवा आणि मला चहापान दिलं आणि मला सांगितलं की साहेबांनी तुम्हाला एम.एल.सी. केलेलं आहे. आणि एक दोनचार दिवसामध्ये तुमचं हे होईल म्हणजे अनाऊंस करू आम्ही. मग गंमत अशी झाली की हे आपल्या म्हणजे काय हे नव्हतंच ते आपल्या कुंडलीत नव्हतंच. कुंडली म्हणतो राजकीय कारण शरद पवारांनी तिकडे राजीव गांधीजींचे पाय पकडले ते एकदम मुख्यमंत्रीच झाले हो! आणि मुख्यमंत्री झाल्यानंतर शरद पवारांनी सर्वात मोठं पुण्याचं काम केलं म्हणजे माझी आमदारकी जी मला देणार होतं महाराष्ट्र सरकार ते काढून घेतलं. मी बहाद्दर लढवय्या. गेलो शरद पवाराकडे. म्हटलं पवारसाहेब अहो शंकररावजींनी ते आमदार केल एम.एल.सी. केलं त्याचं काय झालं तुम्ही का तुम्ही हे कॅन्सल केल? पवारांसारखा गोड बोलणारा माणूस आणि गोड बोलून काटा काढणारा माणूस मी माझ्या आयुष्यात दुसरा पाहिला नाही. मला काय म्हणाले ते पवार? पवार मला म्हणाले, 'अरे नामदेव... बोलणं एवढं सायलेन्स एवढं मिठाळ, अभिरूचीसंपन्न व्यक्तिमत्त्व, वाङ्मयात आलेलं नवीन पुस्तक वाचणार, नामदेव ढसाळांचं त्रोटक लेखन पण वाचणार मला सांगितलं' अरे ते राजीव गांधीनी केलं. शंकरराव असताना राजीव गांधी एम.एल.सी, एम.एल. सी. ला फॉर नाहीत. च्यायला त्या राजीव गांधीला काय दुसरी काही कामं नव्हती काय? म्हणून बाळा या संसदीय राजकारणामध्ये मला काही इंटरेस्ट नाही. आजही सांगतो ते माझं स्वप्न नाही आमदार होण्याचं स्वप्न नाही आम्ही लोकांना आमदार करतो. कार्यकर्त्यांना आमदार करतो. मंत्री बनवतो आणि ही सर्व पुण्याई बाबासाहेब आंबेडकरांच्यामुळे मला मिळालेली आहे. सर्व वडीलधारी मंडळी बसली आहेत विशेषतः दत्ताजी बसलेले आहेत. शरदराव पवार त्यांचे श्रद्धास्थान आहेत पण दत्ताजी मला राहावलं नाही अंतःकरण जळतंय कदाचित झालो असतो चुकून मंत्री तर एक वेगळा आविष्कार पण पाहायला मिळाला असता या कवीसारखा, कवितेसारखा!

मुलाखत :

सतीश काळसेकर

'कबिरा' चित्रकुटिर कलाग्राम
मु. पो आंबेघर, ता. पेण,
जि. रायगड - ४०२ १०७
भ्रमणभाष : ९४२२६८९५५९

डॉ. शरणकुमार लिंबाळे

विभागीय केंद्र
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
अहिल्याबाई अध्यापक महाविद्यालय,
कुमठानाका, सोलापूर - ४१३ ००३
भ्रमणभाष : ९४२२२९२६७२

शब्दांकन

अनिल कुळकर्णी

शिरे ले-आऊट,
शास्त्री नगर,
यवतमाळ - ४४५ ००१
भ्रमणभाष : ७५८८१८८४७३

अनुक्रमणिका



नामदेव ढसाळ साहित्य सूची

संकलन - भगवान फाळके

कवितासंग्रह

* गोलपिठा, १९७२
* मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले, १९७५
* आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्र : प्रियदर्शिनी, १९७६
* तुही इयत्ता कंची ? तुही इयत्ता...., १९८१
* खेळ, १९८३
* गांडूबगिचा, १९८६
* या सत्तेत जीव रमत नाही, १९९५
* मी मारले सूर्याच्या रथाचे सात घोडे, २००५
* तुझे बोट धरून चाललो आहे मी, २००६
* मी भयंकराच्या दरवाजात उभा आहे (संपा. सतीश काळसेकर / प्रज्ञा दया पवार), २००७
* निर्वाणा अगोदरची पीडा, २०१०
* चिंध्यांची देवी आणि इतर कविता, २०१२

कादंबऱ्या

* हाडकी हाडवळा, १९८१
* निगेटिव्ह स्पेस, १९८७

लेखसंग्रह

* आंधळे शतक, १९८५
* आंबेडकरी चळवळ आणि सोशलिस्ट, कम्युनिस्ट, २००१
* सर्व काही समष्टीसाठी, २००६
* बुद्ध धर्म आणि शेष प्रश्न
* दलित पँथर : एक संघर्ष, २०१३

कवितांचे अनुवाद

* नामदेव ढसाळ : पोएट ऑफ द अंडरवर्ल्ड, अनुवाद - दिलीप चित्रे, २००७
* हमारे इतिहास का अपरिहार्य चरित्र : प्रियदर्शिनी, अनुवाद - रतनलाल सोनग्रा, १९९७
  आक्रोश का कोरस, अनुवाद - चंद्रकांत पाटील, २०१२

नामदेव ढसाळ यांच्या कवितांवरील समीक्षापर लेख/परीक्षणे

* नामदेव ढसाळ यांचा चौथा काव्यसंग्रह : तुही इयत्ता कंची, तुही इयत्ता... - केशव मेश्राम, प्रश्नशोध, लोकवाङ्मय गृह, मुंबई, प्र.आ. १९८९.
* 'नामदेव ढसाळ यांची कविता' प्रकाश देशपांडे केजकर, मराठी कविता : नवी वळणे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती - १९९४
* मानवी आकांताचा शोध घेणारा कवी नामदेव ढसाळ - डॉ. गंगाधर पानतावणे, लेणी, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९९६
* सामाजिक जाणिवांचे सौंदर्य 'पाणी' - रा. ग. जाधव, निळी पहाट, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, तृ.आ. १९९९

* नामदेव ढसाळ यांची कविता वसंत आबाजी डहाके, कवितेविषयी, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ.१९९९
* 'खेळ' नामदेव ढसाळांचा नवा 'पुरुषा'वतार - भा. ल. भोळे, साहित्य प्रत्यय, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ.२००१
* हरवलेले माणूसपण शोधणारी कविता 'या सत्तेत जीव रमत नाही' भा. ल. भोळे, साहित्य प्रत्यय, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. २००१
* नामदेव ढसाळ यांच्या 'गोलपिठा'तल्या कविता काही शैलीशास्त्रीय नोंदी चंद्रकांत पाटील, आणि तोपर्यंत, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. २००१
* नामदेव ढसाळ किशोर सानप, लघुपत्रिकेतील कविता प्रेरणा आणि स्वरूप, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती २००६
* गोलपिठा दलितांच्या ठणकत्या वेदनांचा स्फोटक आविष्कार - अर्जुन डांगळे, दलित विद्रोह, लोकवाङ्मय गृह, मुंबई, चौ. आ. २०११
* नामदेव ढसाळांचे 'अंधारदर्शन' 'मी मारले सूर्याच्या रथाचे सात घोडे' डॉ. नीलिमा गुंडी, कविता-रती संपा. पुरुषोत्तम पाटील, (अंक सप्टें.- ऑक्टो.; नोव्हें.-डिसें. २०११)
* गोलपिठा एक काव्यानुभव विजया राज्याध्यक्ष, कवितारती, विजय प्रकाशन, नागपूर, द्वि. आ. २०११
* नामदेव ढसाळ यांच्या कवितेतील आई - भगवान पांडुरंग फाळके, कविता-रती (अंक मे-जून; जुलै-ऑगस्ट २०१२)
* नारायण सुर्वे, नामदेव ढसाळ आणि सामाजिक बांधिलकीची कविता दिगंबर पाध्ये, अवलोकन, लोकवाङ्मय गृह, मुंबई, प्र. आ. २०१२
* नामदेव ढसाळांची कविता - अक्षयकुमार काळे, साप्ताहिक साधना, पुणे ८ फेब्रुवारी २०१४
* हाडकी हाडवळाःएक आकलन - डॉ. संजय कांबळे मुक्त शब्द, मुंबई, मार्च २०१४
* नामदेव ढसाळ - डॉ. रणधीर शिंदे, समाज प्रबोधन पत्रिका कोल्हापूर, जानेवारी-मार्च २०१४

नामदेव ढसाळ यांच्यावरील विशेषांक

* अनुष्टुभ (जुलै/ऑगस्ट १९९७)

नामदेव ढसाळ यांच्या कवितेवरील समीक्षापर ग्रंथ लेखन

* कवीच पृथ्वीला वाचवू शकतात सर्वनाशापासून ! (नामदेव ढसाळ यांची कविता : आस्वाद आणि समीक्षा) - भगवान पांडुरंग फाळके, कल्याणमित्रता प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. २०१३

नामदेव ढसाळ यांच्या साहित्यावरील पीएच.डी.चे पूर्ण झालेले काम

* नामदेव ढसाळ यांची कविता : एक चिकित्सक अभ्यास - प्रा. विलास तायडे, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.
  नामदेव ढसाळ यांच्या समग्र साहित्याचा चिकित्सक अभ्यास प्रा. धम्मपाल रत्नाकर, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
* नामदेव ढसाळ यांच्या कवितेचा चिकित्सक अभ्यास - प्रा. समिता जाधव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
* नामदेव ढसाळ यांच्या समग्र साहित्याचा चिकित्सक अभ्यास - प्रा. प्रतिभा टेंबे, मुंबई विद्यापीठ, मुंबई

नामदेव ढसाळ यांच्या साहित्यावरील पीएच.डी.चे सुरू असणारे काम

* A Comparative Study of the theme of Revolt in the Poetry of Namdeo Dhasal and Langstan Hughes - Santosh Ramji Rathod, Sant Gadge Baba Amravati University, Amravati
* Namdeo Dhasal as an Exponent of Dalit Voice (with special Reference to the poems translated from Marathi to English) Gangadhar Waman Jondhale, Rashtra Sant Tukdoji Maharaj Nagpur University, Nagpur

नामदेव ढसाळ यांच्या साहित्यावरील एम.फिल.चे पूर्ण झालेले काम

* Namdeo Dhasal Poet of the Underworld - Gangadhar Waman Jondhale, Sant Gadge Baba Amravati University, Amravati.

(ही सूची परिपूर्ण नाही, याची जाणीव प्रस्तुत संकलनकर्त्याला आहे. तथापि अभ्यासकांच्या सोईसाठी काही संदर्भ येथे नमूद केले आहेत. नामदेव ढसाळ सूचीचे काम सुरू आहे. संदर्भ सुचवून सहकार्य करावे, ही विनंती)

संकलन
भगवान पांडुरंग फाळके
द्वारा, मराठी विभाग,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,
अमरावती
भ्रमणभाष : ९६५७४४९५६५

विदर्भ साहित्य संघ

कार्यवृत्त   नोव्हेंबर २०१३ ते मार्च २०१४

■

विदर्भ साहित्य संघाचे साहित्यिक व सांकृतिक उपक्रम

दि. २९ -३० नोव्हेंबर व १ डिसेंबर, २०१३

विदर्भ साहित्य संघ आणि आधार संस्था, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ३० नोव्हेंबर व १ डिसेंबर, २०१३ रोजी राज्यस्तरीय लेखिका संमेलन आयोजित करण्यात आले. कुसुमावती देशपांडे परिसर, विदर्भ साहित्य संघ, सांस्कृतिक संकुल येथे संमेलन झाले. संमेलनाचे अध्यक्षपद सुप्रसिद्ध कवयित्री नीरजा यांनी भूषविले. सुप्रसिद्ध कथा लेखिका आशा बगे ह्यांच्या हस्ते संमेलनाचे उद्‌घाटन झाले. तीन परिसंवाद, कविसंमेलन, सांस्कृतिक कार्यक्रम, डॉ. विजया राजाध्यक्ष आणि नीना कुळकर्णी यांची प्रकट मुलाखत, दृक श्राव्य माध्यमातील 'स्त्रीप्रतिमा' यात लालन सारंग आणि स्मिता तळवलकर यांची प्रमुख उपस्थिती होती. अनुभवकथन अशा भरगच्च कार्यक्रमाने संमेलन गाजले. संमेलनाच्या पूर्वी 'ग्रॅफिटी वॉल'. ह्या नाविन्यपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. चित्रकर्त्यांनी सुप्रसिद्ध कवी-कवयित्रींच्या निवडक कवितांवर आधारित उत्तम चित्रे काढली.

दि. १७ डिसेंबर, २०१३

ना.के. बेहेरे स्मृती विदर्भस्तरीय महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा १७ डिसेंबर, २०१३ रोजी नागपूर येथील केंद्रीय कार्यालयात घेण्यात आली. 'क्रिकेटचे ठीक! इतर खेळांचे काय?' हा स्पर्धेचा विषय होता.

दि. २३ आणि २४ डिसेंबर, २०१३

विदर्भ साहित्य संघ आणि स्त्री शिक्षण प्रसारक मंडळ, नागपूर आयोजित राज्यस्तरीय बाल साहित्य संमेलन दि. २३ आणि २४ डिसेंबर रोजी महिला महाविद्यालय नंदनवन येथे संपन्न झाले. संमेलनाचे अध्यक्षपद डॉ. विजया वाड यांनी भूषविले. श्री. अनंत भावे यांच्या हस्ते संमेलनाचे उद्‌घाटन झाले. कविसंमेलन, परिसंवाद, कथाकथन, बालनाट्य, सांस्कृतिक कार्यक्रम, अभिरूप न्यायालय इत्यादी कार्यक्रमात बाल साहित्यिक कलावंतांचा अपूर्व सहभाग होता. समारोपाच्या सत्रात मा. अरविंद जागीरदार (बालविहारचे अरविंदमामा) विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

दि. २५ डिसेंबर, २०१३

म. म. देशपांडे यांच्या 'अपार' ह्या अखेरच्या कविता संग्रहाचे प्रकाशन डॉ. द. भि. कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी नारायण कुलकर्णी-कवठेकर, श्याम माधव धोंडे उपस्थित होते. म. म. देशपांडे यांच्या कवितांचे सांगीतिक अभिवाचनही करण्यात आले.

दि. १४ जानेवारी, २०१४

विदर्भ साहित्य संघाचा वर्धापनदिन दि. १४ जानेवारी, २०१४ रोजी साजरा झाला. विदर्भ साहित्य संघाने ९० वर्षेपूर्ण करून ९१ व्या वर्षात पदार्पण केले. ज्येष्ठ पत्रकार श्री. अरुण टिकेकर हे प्रमुख अतिथी होते. श्री. अरुण टिकेकर यांच्या हस्ते वार्षिक वाङ्‌मय पुरस्कार प्रदान करण्यात आले.

कलादालन व चित्रशाळेचे उद्‌घाटन :

विदर्भ साहित्य संघाने आपल्या नवतीपर्वाच्या निमित्ताने दि. १४ जानेवारी, २०१४ रोजी श्री. अरुण टिकेकर यांच्या हस्ते कलादालन आणि चित्रशाळेचे उद्‌घाटन झाले. दीर्घेत निवडक कलावंतांची चित्रे प्रदर्शित करण्यात आली.

दि. १५ जानेवारी, २०१४

'सोबतीचा करार' ह्या कार्यक्रमात दर्जेदार कविता, गझल अणि रुबाई यांची सुरेल मैफल गायक श्री. दत्तप्रसाद रानडे यांनी सादर केली. वैभव जोशी यांचे काव्य आणि संगीत आशीष मुजुमदार यांचे होते.

दि. १६ जानेवारी, २०१४

क्रांतिकारी कवी नामदेव ढसाळ यांना श्रद्धांजली अर्पण करण्यास एका शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते.अनेक मान्यवरांनी त्यांच्या स्मृतींना उजाळा देऊन श्रद्धांजली अर्पण केली.

अनुक्रमणिका

दि. २५ जानेवारी, २०१४

'घर-अंगण' प्रकल्पांतर्गत दि. २५ जानेवारी, २०१४ रोजी 'सरासर' ह्या एकांकिकेचा प्रयोग सादर करण्यात आला.

दि. ३ फेब्रुवारी, २०१४

विदर्भ साहित्य संघाची गणेश व्याख्यानमाला स्त्री शिक्षण प्रसारक मंडळातर्फे आयोजित केली होती. या प्रसंगी 'स्वामी विवेकानंदांची खरी ओळख' या विषयावर दत्तप्रसाद दाभोळकर यांचे व्याख्यान झाले.

दि. १९ फेब्रुवारी, २०१४

शिवजयंती निमित्त विदर्भ साहित्य संघातर्फे चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. दि. १९ फेब्रुवारी, २०१४ रोजी सुमतीदेवी धनवटे यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. शिवजयंतीचे औचित्य साधून ज्येष्ठ लेखिका सुमतीदेवी धनवटे यांचा नव्वदीपूर्तीनिमित्त विदर्भ साहित्य संघातर्फे मानपत्र प्रदान करून सन्मान करण्यात आला.

दि. २१, २२ व २३ फेब्रुवारी, २०१४

विदर्भ साहित्य संघाचे ६३ वे विदर्भ साहित्य संमेलन विदर्भ साहित्य संघ, शाखा-आर्णी यांनी २१, २२ व २३ फेब्रुवारी, २०१४ रोजी आयोजित केले. कवी मा. शंकर बडे संमेलनाचे अध्यक्ष होते. मा. ना. शिवाजीराव मोघे स्वागताध्यक्ष होते.

दि. २५ फेब्रुवारी, २०१४

विदर्भ साहित्य संघाच्या घर-अंगण उपक्रमांतर्गत विजय तेंडुलकर यांच्या दोन कथांचे - बेडूक या कथेचे वाचन, अजित दिवाडकर व 'मरेपर्यंत फाशी'चे वाचन, दिनकर बेडेकर ह्यांनी केले.

दि. २७ फेब्रुवारी, २०१४

कविवर्य कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त 'मराठी भाषादिन' ह्या निमित्ताने २७ फेब्रुवारी, २०१४ रोजी कवयित्री इंदिरा संत यांच्या जन्मशताब्दीचे औचित्य साधून विदर्भ साहित्य संघातर्फे 'रंगबावरी इंदिरा' ह्या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

दि. ८ मार्च, २०१४

आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने विदर्भ साहित्य संघाने ज्येष्ठ गायिका आरती अंकलीकर-टिकेकर यांच्या शास्त्रीय गायनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. कार्यक्रमास रसिक श्रोत्यांचा प्रचंड प्रतिसाद होता.

दि. ९ मार्च, २०१४

'आपली सुरक्षा आपल्या हाती' ह्या सामाजिक जाणिवेच्या विषयावर आधारित राज्यस्तरीय पोस्टर चित्रकला स्पर्धा विदर्भ साहित्य संघाचे विद्यमाने आयोजि‌ि करण्यात आली.

दि. २२ मार्च, २०१४

विदर्भ साहित्य संघाच्या नवतीच्या निमित्ताने श्रेष्ठ नाटककार ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त गिरीश कार्नाड ह्यांच्या'उणे पुरे शहर एक' या नाटकाचा पुण्याच्या आसक्त या संस्थेने प्रयोग सादर केला

दि. २३ मार्च, २०१४

विदर्भ साहित्य संघातर्फे ज्येष्ठ नाटककार गिरीश कार्नाड ह्यांचा सत्कार नाटककार महेश एलकुंचवार व अध्यक्ष मनोहर म्हैसाळकर ह्यांच्या हस्ते करण्यात झाला. त्यानंतर त्यांची मुलाखत अजेय गंपावार ह्यांनी घेतली. वरील दोन्ही कार्यक्रमाना रसिकांचा उत्तम प्रतिसाद होता.

दि. २६ मार्च, २०१४

कविवर्य ग्रेस यांच्या दुसऱ्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या आठवणींना उजाळा देणारा कार्यक्रम झाला. या प्रसंगी डॉ. अक्षयकुमार काळे, डॉ. रवींद्र शोभणे यांची भाषणे झाली. प्रकाश एदलाबादकर, वसंत वाहोकार, मनीषा साधू, श्याम धोंड व तीर्थराज कापगते यांनी ग्रेसच्या कवितांचे वाचन केले. कार्याध्यक्ष वामन तेलंग कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

ग्रंथालय :

दि. २१ सप्टेंबर, २०१३ ते १४ फेब्रुवारी, ते २९ मार्च, २०१४

'जागर' कवितेचा ह्या ग्रंथसहवासच्या उपक्रमांतर्गत सप्टेंबर, २०१३ ते फेब्रुवारी, २०१४ ह्या कालावधीत एकूण सहा काव्य वाचनाच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

दि. २५ जानेवारी, २०१४ ते मार्च, २०१४

'आवर्तन' ह्या ग्रंथसहवासच्या नवीन उपक्रमांतर्गत कुसुमावती देशपांडे लिखित 'पासंग' कुसुमावती देशपांडे-१९३३, लघुकथेचे जीवनतंत्र व १९५२ भाषा आणि लोकजीवन ह्या विषयाच्या अनुषंगाने समीक्षा व चर्चात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

▌ शोभा उबगडे
सरचिटणीस
विदर्भ साहित्य संघ, नागपूर.

अनुक्रमणिका

दि. २५ जानेवारी, २०१४

'घर-अंगण' प्रकल्पांतर्गत दि. २५ जानेवारी, २०१४ रोजी 'सरासर' ह्या एकांकिकेचा प्रयोग सादर करण्यात आला.

दि. ३ फेब्रुवारी, २०१४

विदर्भ साहित्य संघाची गणेश व्याख्यानमाला स्त्री शिक्षण प्रसारक मंडळातर्फे आयोजित केली होती. या प्रसंगी 'स्वामी विवेकानंदांची खरी ओळख' या विषयावर दत्तप्रसाद दाभोळकर यांचे व्याख्यान झाले.

दि. १९ फेब्रुवारी, २०१४

शिवजयंती निमित्त विदर्भ साहित्य संघातर्फे चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. दि. १९ फेब्रुवारी, २०१४ रोजी सुमतीदेवी धनवटे यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्‌घाटन झाले. शिवजयंतीचे औचित्य साधून ज्येष्ठ लेखिका सुमतीदेवी धनवटे यांचा नव्वदीपूर्तीनिमित्त विदर्भ साहित्य संघातर्फे मानपत्र प्रदान करून सन्मान करण्यात आला.

दि. २१, २२ व २३ फेब्रुवारी, २०१४

विदर्भ साहित्य संघाचे ६३ वे विदर्भ साहित्य संमेलन विदर्भ साहित्य संघ, शाखा-आर्णी यांनी २१, २२ व २३ फेब्रुवारी, २०१४ रोजी आयोजित केले. कवी मा. शंकर बडे संमेलनाचे अध्यक्ष होते. मा. ना. शिवाजीराव मोघे स्वागताध्यक्ष होते.

दि. २५ फेब्रुवारी, २०१४

विदर्भ साहित्य संघाच्या घर-अंगण उपक्रमांतर्गत विजय तेंडुलकर यांच्या दोन कथांचे - बेडूक या कथेचे वाचन, अजित दिवाडकर व 'मरेपर्यंत फाशी'चे वाचन, दिनकर बेडेकर ह्यांनी केले.

दि. २७ फेब्रुवारी, २०१४

कविवर्य कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त 'मराठी भाषादिन' ह्या निमित्ताने २७ फेब्रुवारी, २०१४ रोजी कवयित्री इंदिरा संत यांच्या जन्मशताब्दीचे औचित्य साधून विदर्भ साहित्य संघातर्फे 'रंगबावरी इंदिरा' ह्या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

दि. ८ मार्च, २०१४

आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने विदर्भ साहित्य संघाने ज्येष्ठ गायिका आरती अंकलीकर-टिकेकर यांच्या शास्त्रीय गायनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. कार्यक्रमास रसिक श्रोत्यांचा प्रचंड प्रतिसाद होता.

दि. ९ मार्च, २०१४

'आपली सुरक्षा आपल्या हाती' ह्या सामाजिक जाणिवेच्या विषयावर आधारित राज्यस्तरीय पोस्टर चित्रकला स्पर्धा विदर्भ साहित्य संघाचे विद्यमाने आयोजि‌. करण्यात आली.

दि. २२ मार्च, २०१४

विदर्भ साहित्य संघाच्या नवतीच्या निमित्ताने श्रेष्ठ नाटककार ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त गिरीश कार्नाड ह्यांच्या'उणे पुरे शहर एक' या नाटकाचा पुण्याच्या आसक्त या संस्थेने प्रयोग सादर केला

दि. २३ मार्च, २०१४

विदर्भ साहित्य संघातर्फे ज्येष्ठ नाटककार गिरीश कार्नाड ह्यांचा सत्कार नाटककार महेश एलकुंचवार व अध्यक्ष मनोहर म्हैसाळकर ह्यांच्या हस्ते करण्यात झाला. त्यानंतर त्यांची मुलाखत अजेय गंपावार ह्यांनी घेतली. वरील दोन्ही कार्यक्रमाना रसिकांचा उत्तम प्रतिसाद होता.

दि. २६ मार्च, २०१४

कविवर्य ग्रेस यांच्या दुसऱ्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या आठवणींना उजाळा देणारा कार्यक्रम झाला. या प्रसंगी डॉ. अक्षयकुमार काळे, डॉ. रवींद्र शोभणे यांची भाषणे झाली. प्रकाश एदलाबादकर, वसंत वाहोकार, मनीषा साधू, श्याम धोंड व तीर्थराज कापगते यांनी ग्रेसच्या कवितांचे वाचन केले. कार्याध्यक्ष वामन तेलंग कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

ग्रंथालय :

दि. २१ सप्टेंबर, २०१३ ते १४ फेब्रुवारी, ते २९ मार्च, २०१४

'जागर' कवितेचा ह्या ग्रंथसहवासच्या उपक्रमांतर्गत सप्टेंबर, २०१३ ते फेब्रुवारी, २०१४ ह्या कालावधीत एकूण सहा काव्य वाचनाच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.


दि. २५ जानेवारी, २०१४ ते मार्च, २०१४

'आवर्तन' ह्या ग्रंथसहवासच्या नवीन उपक्रमांतर्गत कुसुमावती देशपांडे लिखित 'पासंग' कुसुमावती देशपांडे-१९३३, लघुकथेचे जीवनतंत्र व १९५२ भाषा आणि लोकजीवन ह्या विषयाच्या अनुषंगाने समीक्षा व चर्चात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.


❚ शोभा उबगडे
सरचिटणीस
विदर्भ साहित्य संघ, नागपूर.

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन त्रैमासिक
युगवाणी
जानेवारी-फेब्रुवारी-मार्च
एप्रिल-मे-जून २०१८

एकसंघ क्रान्तिकारक
जिवंत करायचा आहे पुन्हा मला
म्हणून मी कवितेतून बांधली यासाठी
आराधना -
... हो एक गुन्हा केला मी:
एक एक शब्द जुळवून मी कविता बांधली;
या कवितेच्या उर्जेने मी माझ्यापरीस
जान फुंकू पहिली खूँख्खार चित्याच्या कलेवरांत.
हे करताना चुकलं असेल माझं,
म्हणून काय माझ्या छंदोरचनेचा रियाज चुकला
असं तुम्ही समजणार?
कवितेच्या व्याकरणाच्याच बळावर
आणि तिच्या जागृतपणाने
अर्धसरंजामी, अर्धभांडवलदारी समाजात मी
पेटवू पाहिली ठिणगी;
पाहिली स्वप्ने अस्पृश्य-आदिवासी-भटके प्रणीत
कामगार शेतकऱ्यांची भूमिहिनांना अभिप्रेत
असलेल्या क्रान्तीची:
यासाठी जे भोगलं त्याचं भांडवल
करायचं नाही मला——
-तरीपण मी निक्षून सांगतो तुम्हाला:
कवी असतो चारचौघा सामान्य माणसासारखा;
त्याच्यातली प्रतिभा असते सर्जनशील,
तीच देते कवीला निकोप दृष्टी.
मी निकोपपणे लिहिली
कविता— आणि अन्यायाविरूद्ध लढत आलो आजवर.
मी कुणी विशेष आहे म्हणून
भांडवल केलं नाही माझं.
मी कविता केली
आणि विसरून पुढे जात राहिलो——
भाकरीच्या प्राप्तीसाठी !
-नामदेव ढसाळ



अनुक्रमणिका



अनुक्रमणिका


विदर्भ साहित्य संघ
मकर संक्रांत १९२३
विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक
युगवाणी
जानेवारी-फेब्रुवारी-मार्च, एप्रिल-मे-जून २०१४

[अनुक्रमणिका](#)